६१–अ

# द्वितीय वर्ष कला

# समाजशास्त्र अभ्यासपत्रिका क्र. २

# भारतीय समाजशास्त्र आणि विकासाचे समाजशास्त्र

PDF processed with CutePDF evaluation edition www.CutePDF.com
PDF processed with CutePDF evaluation edition www.CutePDF.com

© UNIVERSITY OF MUMBAI


**डॉ. संजय देशमुख**
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**डॉ. अंबुजा साळगावकर**
प्रभारी संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**डॉ. धनेश्वर हरिचंदन**
प्रभारी, अध्ययन साहित्य विभाग
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई



**अभ्यास समन्वयक आणि संपादक :** **मा. अशोक रामचंद्र शेळके**
जे. एस. एम. महाविद्यालय,
शिवळे, मुरबाड, जि. ठाणे.

**अभ्यास लेखक :** **प्रा. प्रतिभा भालेराव**
जी. आर. पाटील महाविद्यालय,
मुंब्रा, जि. ठाणे.

**प्रा. अविनाश दैठणकर**
समाजशास्त्र विभाग,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
गोवेली, जि. ठाणे.

**प्रा. छाया शिंदे**
मातोश्री वेलबाई देवजी हरीया
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
शहाड, जि. ठाणे.

**प्रा. सर्जेराव बोराडे**
सम्यक संकल्प महाविद्यालय,
कल्याण (पूर्व)

**प्रा. पी.डी. पाटील**
खर्डी महाविद्यालय, खर्डी



**पुर्नमुद्रण : सप्टेंबर २०१६, द्वितीय वर्ष कला, समाजशास्त्र अभ्यासपत्रिका क्र. २,**
**भारतीय समाजशास्त्र आणि विकासाचे समाजशास्त्र**

**प्रकाशक :** प्रभारी संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई – ४०० ०९८.

**अक्षरजुळणी :** **क्वॉलिटी प्रिंटर्स**
९/सी, जे. वी. पटेल कंपाऊंड, बी. एम.मार्ग,
एलफिन्स्टन (वेस्ट), मुंबई – ४०० ०१३.

**मुद्रण :** **प्रिंटोग्राफी सिस्टम्स (इं) प्रा. लि.**
१३/डि, कुर्ला इंडस्ट्रियल इस्टेट,
नारी सेवा सदन रोड, नारायण नगर,
घाटकोपर (प.), मुंबई – ४०० ०८६.

# अनुक्रमणिका


| क्रमांक | अध्याय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **विभाग १** | |
| १) | भारतातील समाजशास्त्र परंपरा | ०१ |
| २) | संरचनात्मक व प्रकार्यात्मक दृष्टिकोन | ७ |
| ३) | द्वंद्वात्मक दृष्टिकोन : डॉ. डी.पी. मुखर्जी | ११ |
| ४) | द्वंद्वात्मक दृष्टिकोन : प्रा. ए.आर. देसाई | १६ |
| ५) | जाती विरोध / जातीयता अंता संदर्भातील विचार | |
| | (महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर | २० |
| ६) | भारतीय समाजशास्त्रातील संशोधन परंपरा | ३३ |
| ७) | जात वर्ग व सत्ता | ३९ |
| ८) | कार्यवादी दृष्टिकोन ग्रामीण महाराष्ट्रातील औद्योगिक क्षेत्रातील सहकार | ४४ |
| ९) | भारतीय समाजशास्त्राची चिकित्सा | ५१ |
| १०) | भारतीय समाजशास्त्राची चिकित्सा | ६७ |
| | **विभाग २** | |
| ११) | विकासाची माहिती करुन घेणे | ८६ |
| १२) | सैद्धांतीक दृष्टिकोन १) आधुनिकीकरण सिद्धांत | १०९ |
| १३) | सैद्धांतीक दृष्टिकोन २) अवलंबन सिद्धांत | ११४ |
| १४) | सैद्धांतीक दृष्टिकोन ३) नवीन खुली अर्थव्यवस्था व उदारीकरण | ११७ |
| १५) | विकासाची प्रक्रिया : संघर्ष आणि प्रतिसाद | |
| | (विस्थापन, पुनर्वसन आणि पर्यावरण) | १२० |
| १६) | विकासाची प्रक्रिया : संघर्ष आणि प्रतिसाद | |
| | (विरोधी चळवळी) | १३४ |
| १७) | विकासाचा वैकल्पिक दृष्टिकोन भाग - १ | |
| | निरंतर / शाश्वत विकास | १४६ |
| १८) | विकासाचा वैकल्पिक दृष्टिकोन भाग - २ | |
| | स्त्रिवादी दृष्टिकोन | १६० |
| १९) | विकासाचा वैकल्पी / पर्यायी दृष्टिकोन - ३ | |
| | समावेश विकास | १७३ |


❖❖❖❖

# द्वितीय वर्ष कला
# अभ्यासपत्रिका क्र. २
# भारतीय समाजशास्त्र
# विभाग १

**उद्दिष्टये :**

१) विद्यार्थ्यांना भारतीय समाजशास्त्रीय परंपरेची ओळख करून देणे.

२) भारतीय समाजशास्त्रातील संशोधन परंपरेतील महत्वाचे मुद्दे समजावून देणे.

**अभ्यासक्रम :**

**एकूण तासिका ४५**

**घटक - १**

**भारतीय समाजशास्त्रीय परंपरा** (१५)

- वसाहतवाद, भारतीयविद्या, राष्ट्रीयवादी परंपरा (जी.एस.धुर्ये)
- संरचनावादी - प्रकार्यवाद (डॉ.एम.एन.श्रीनिवास)
- विरोधी विकासवाद / व्द्वंव्द्वात्मकवाद (डी.पी.मुखर्जी, ए.आर.देसाई)
- जाती विरोध / जातीयता अंता संदर्भातील विचार - (डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले)

**घटक - २**

**भारतीय समाजशास्त्रातील संशोधन परंपरा** (१५)

**निवडक वाचन**

१. लक्षात असणारे गाव - डॉ. एम.एन.श्रीनिवास

२. जात, वर्ग व सत्ता - आंद्रे बेतेई

३. प्रकार्यवादाच्या मार्गाने जाताना - ग्रामीण महाराष्ट्रातील औधोगिक क्षेत्रातील सहकार - बी.एस. बावीस्कर

**घटक - ३**

**भारतीय समाजशास्त्रातील वादाचे मुद्दे** (१५)

- जात व वर्ग
- परंपरा व आधुनिकता
- कनिष्ठ, दुर्बल घटकांचे समाजशास्त्र

II

# विभाग २

# विकासाचे समाजशास्त्र

**उद्दिष्टये**

- विविध सैध्दांतिक दृष्टिकोनाच्या समाजशास्त्रीय विकासाची माहिती करून देणे.
- विद्यार्थ्यांनी ज्वलंत समस्या / प्रश्न / अडचणी आणि समकालीन विकासाबाबतची चर्चा घडून आणणे.

**घटक १**

**विकासाची माहिती करून घेणे**

- मूलभूत संकल्पना : सामाजिक परिवर्तन, उत्क्रांती, वाढ, आणि विकास
- सैद्धांतिक दृष्टिकोन
- आधुनिकीकरण सिध्दांत
- अवलंबन सिध्दांत
- नवीन खुली अर्थव्यवस्था दृष्टिकोन

**घटक २**

**विकासाची प्रक्रिया : संघर्ष आणि प्रतिसाद**

- स्थलांतर आणि पुर्नवसनचा प्रश्न
- पर्यावरणाची अवनती
- अन्नधान्य विषयक समस्या
- विरोधी चळवळची माहिती (पोस्को चळवळ, वेदांता चळवळ, सिंगूर चळवळ, जैतापूर चळवळ)

**घटक ३**

**विकासाचा वैकल्पिक दृष्टिकोन**

- निरंतर / शाश्वत विकास
- स्त्रिवादी दृष्टिकोन
- समावेश विकास

# SYBA
# Sociology-II
# Sociology of India
# Section-I

**Objectives:**

- To Introduce Students to the Indian Sociological traditions.
- To familiarize students with the research traditions in Indian sociology And Key debates within Indian Sociology.

**Course Outline**

**Unit - I**

- Indian Sociological traditions

Colonial Nationalist, Indological, (G.S Ghurye,) Structural-Functional, (M. N. Srinivas,) Dialectical, (D. P. Mukherji, A. R. Desai,) Anti Caste (Mahatma Phule, Dr.Babasaheb Ambedkar)

**Unit - II**

- Research Traditions In Indian Sociology
  - Selected readings
    - o Remembered Village- M.N Srinivas
    - o Caste, Class and Power- Andre Beteille
    - o Walking On The Edge of Factionalism: An Industrial Cooperative In Rural Maharastra- B.S Baviskar

**Unit - III**

- Debates in Indian Sociology
  - Caste and Class
  - Tradition and Modernity
  - Sociology From Below

**Reading List**

**Required readings**


- Aloysius, G. (20100. Dalit-Subalten Self Identifications. Lyothee Thassar and Tamizhan. New Delhi: Critical Quest
- Ambedkar.B.R. (2007).Annihilation of Caste. New Delhi “Critical Quest.
- Dhanagare, D.N (1999). Themes And Perspectives In Indian Sociology, Rawat Publications

- Dahiwale,S.M(ed)(2004) Indian Society: Non-Brahmanic Perspectives, Rawat Publications
- Deshpande, S (20010. Contemporary India: Sociological
- Geetha V. (20020. Gender, Calcutta: Stree.
- Guru, Gopal. (1993). Dalit Movement in Mainstream Sociology. Economic and Political Weekly, 28(14)
- Fuller. (2003). the renewal of Priesthood: Modernity and traditionalism in a South Indian Village. Princeton University Press
- Omvedt, Gail. (1994). Dalits and Democratic Revolution, Sage, New Delhi
- Patel Sujata 2011(Ed), Doing Sociology In India: Genealogies, Locations and practices. New Delhi: OUP
- Rudolph, Susanne and Lyold. (1999). The Modernity Of Tradition: Political Development in India. Hyderabad: Orient Longman Limited.
- Uberoi; Sundar and Deshpande. 92007). (Ed). Anthropology in the East: Founders of Indian Sociology and Anthropology New Delhi: Permanent Black.


**Recommended Readings**


- Aloysius, G.(2009). Ambedkar on National and Nationalism. New Delhi: Critical Quest.
- Guha R., (19980 A Subaltern Studies Reader, Oxford University Press, New Delhi.
- Ludden (2000), Critique of Subaltern Studies, Oxford University Press, New Delhi.
- Omvedt and Patankar. (2004). the Dalit Liberation Movement in Colonial Period. New Delhi: Critical Quest.
- Omvedt, Gail. (2008). Seeking Begumpurva: The Social vision of anti Asteintellectuals.New Delhi: Navayana.
- Rodrigues, Valerian. (2008). Dalit Bahujan Discourse. New Delhi: Critical Quest.
- Patel, Sujata.2011. Sociology in India: Trajectories and Challenges. Contributions to Indian Sociology 45(427)


.

# Section – II
# Sociology of Development

**Objectives**

- To introduce various theoretical perspectives that have shaped the concept of development
- To help students to gain an insight into emerging issues and contemporary debates within the development discourse

**Course Outline**

**Unit – I**

Understanding Development

- Basic concepts: Social change, evolution, growth and development
- Theoretical approaches
    - Modernization theory
    - Dependency theory
    - Neo liberal economic approach

**Unit – II**

Process of Development: Crisis and Responses

- Issues of land displacement and rehabilitation
- Environmental degradation
- Food Crisis
- Resistance movements (Posco, Vedanta, Singur, Jaitapur)

**Unit – III**

Alternative Approaches to Development

- Sustainable Development
- Feminist approach
- Inclusive Development

**Reading List**

**Required readings**


- Agrawal, B. (1997). The gender and environment debate: Lessons from India. In Nalinivisvanathanetal (Ed) the women, gender and development reader. New Delhi:Zubaan
- Harris, Graham. (1989). The Sociology of Development Longman
- Joshi and Verma(Ed), 1998, Social Environment for Sustainable Development, Rawat Publications, Jaipur

- Kabra, Kamal Nayan. Development Planning in India: Exploring an alternative approach. New Delhi: Sage publications
- Padel, Felix and Das Samrendra. (2010). Out Of This Earth. East India Adivasis and the Aluminium Cartel. New Delhi: Orient Black swan
- Shiva, V.(1997) Women in nature. In Nalinivisvanathanetal (Ed) the women, gender and development reader. New Delhi: Zubaan
- Sen, Amartya. (2000). Development as freedom. Anchor Books.
- Waquar Ahmed, Amitabh Kundu and Richard Peet. (20110. (Ed). India's New Economic Policy: A Critical Analysis. New York: Routledge
- Dhanmanjari, Sathe. 2011. Political Economy of Land and Development in India. Economic and Political Weekly 16(29)
- Iyer, Ramaswamy. 2007. towards A Just Displacement And Rehabilitation Policy. Economic and Political Weekly 42(30)
- Ramesh,J. 2010. The Two Cultures Revisited: The Environment Development Debate in India. Economic and Political Weekly 45(42)
- Ramanathan, Usha. 2011. Land Acquistion, Eminent Domain and the 2011 Bill. Economic and Political Weekly 46(44-45)
- Sarkar, Swagoto.2011.The Impossibility of Just Land Acquisition. Economic and Political Weekly 46(41)
- Sarkar, Abhirup. 2007. Development and Displacement; Land Acquisition in West Bengal Economic and Political Weekly 42(16)
- Sahai, S. 2004. Distrust of GM Foods: Addressing crisis of confidence Economic and Political Weekly 39(23)
- India: Social Development Report by Council for Social Development published by Oxford University Press, New Delhi, 2006
- Rich lands and poor people: Is Sustainable mining possible? Centre For Science And Environment.
- India Human Development Report, 2011: Towards Social Inclusion.

## Recommended Readings


- Bhaduri, Amit. 2007. Development or Developmental Terrorism? Economic and Political Weekly 42(7)
- Dasgupta, Partha. (2001). Human Well-Being and the Natural Environment. New Delhi: OUP
- Elliot, Jennifer. (2006). An introduction to sustainable development.
- Routledge.
- Webster, Andrew. (1984). Introduction to the sociology of Development, London: McMillan.
- Films.
- Development at gunpoint.
- Development flows from the barrel of a gun.


❖❖❖❖

# विभाग - १

# १

# भारतातील समाजशास्त्र परंपरा

**घटक रचना**


१.० उद्दिष्टये (Objective)
१.१ प्रस्तावना (Introduction)
१.२ डॉ. जी.एस. घुर्येचा प्राच्यविद्या सिद्धांत
१.३ डॉ. जी.एस. घुर्येचा वांशिक सिद्धांत
१.४ जाती, उपजाती निर्मिती सिद्धांत
१.५ प्राच्यविद्याविषयक दृष्टिकोन
१.६ भारतीय आदिवासीचा अभ्यास
१.७ भारतीय खेडयांचा अभ्यास
१.८ सारांश (Summary)
१.९ संदर्भ ग्रंथ (Reference List)
१.१० प्रश्न (Questions)


## १.० उद्दिष्टये (Objective)

१) समाजशास्त्राच्या भारतीयकरणाची ओळख करुन देणे
२) डॉ. जी.एस. घुर्येच्या कार्याची ओळख करुन देणे
३) समाजशास्त्रात शुद्ध भारतीय दृष्टिकोन रुजवण्याचे मुख्य उद्दिष्टये या प्रकरणात समाविष्ट आहेत.

## १.१ प्रस्तावना (Introduction)

मानवी संस्कृतीचा उगम, विकास, समाज जीवन धर्म तत्वे या बद्दल प्राचीन काळापासून अनेक तत्वज्ञानी, धर्मतत्वे, व विचारवंतानी आपली मते विविध ग्रंथाच्या माध्यमातून मांडली. पाश्चिमात्य देशात मानवी समाजाचा अभ्यास समाजशास्त्राच्या नावाखाली सुरु झाला. नव नविन सिद्धांत व दृष्टिकोनाचा विकास होवू लागला. भारतात ही प्राचीन काळापासून समाज व सामाजिक विकास या बद्दल मते मांडली आहेत. वेद, उपनिषदे, पुराणे, स्मृती, वाङ्मय, रामायण, महाभारत, कौटिल्यचे अर्थशास्त्र, अबुल फझलचे एन.अकबरी इ. ग्रंथात समाज जीवनाचा अभ्यास केला आहे. शुक्राचार्याचा नितीसार या ग्रंथात समाज व्यवस्था शासन, नीतीमत्ता,

यांच्यावर भर दिलेला आहे. एन.अकबरी ग्रंथात भारतीय समाज जीवनाचा अभ्यास केला आहे. आधुनिक काळात डॉ. जी.एस.धुर्ये, डॉ.एम.एन. श्री निवास रणजीत गुन्हा, नीरा देसाई, लीला दुबे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ.दुबे, डॉ. पंढरीनाथ प्रभू, राधाकमल मुखर्जी, डी.पी. मुखर्जी, इरावती कर्वे, इ. अनेक समाजाशास्त्रज्ञांनी भारतीय समाजाचा पद्धतीशास्त्राच्या आधारे अभ्यास केला आहे.

## १.२ डॉ.जी.एस. धुर्ये यांचा वांशिक प्राच्यविद्या सिद्धांत

### परिचय :

प्रा. डॉ. जी.एस. धुर्येना जन्म 12 डिसेंबर १८९३ मध्ये महाराष्ट्रातील मावळ प्रांतात झाला. सन १९१८ मध्ये संस्कृत व नंतर इंग्रजी मध्ये मुंबईतील एफ्लिस्टंन महाविद्यालयातून सुवर्ण पदकासह प्रथमश्रेणीत एम.ए. पास झाले. सन १९१९ मध्ये मुंबई विद्यापीठात पैट्रिक गेड्रिडस यांच्या नेतृत्वाखाली समाजशास्त्र विषयाची सुरुवात झाली. पैट्रिक गेड्रिब्स यांनी डॉ. धुर्येना समाजशास्त्राच्या प्रशिक्षणासाठी इंग्लडमध्ये पाठवण्याची मुंबई विद्यापीठाकडे शिफारस केली. इंग्लडमध्ये हॉबहाऊस, रिवर्स यांच्या सारख्या दिगज समाजशास्त्रज्ञांशी त्यांचा संपर्क झाला. डॉ. रिवर्स यांच्या मार्गदर्शनाखाली Ethin Theory of Caste (जातीचा वांशिक सिद्धांत) या विषयावर शोध निबंध लिहिला. १९२३ मध्ये केंम्ब्रिज विद्यापीठाची डॉक्टरेट मिळवून ते भारतात आले. १९२४ मध्ये त्यांन मुंबई विद्यापीठाच्या समाजशास्त्र विषयाच्या प्रमुखपदाची सुत्रे स्विकारली. Anthropological Society of Bombay Indian Sociological चे 1945 - 50 पर्यंत ते अध्यक्ष होते. Society ची स्थापना केली. 1952 मध्ये Sociological Buletan या जागतिक दर्जाच्या पत्रिकेची सुरुवात त्यांनी केली.

**प्रा. डॉ. धुर्येची ग्रंथ संपदा :**

i) The Aborigines : So - Called and Their Future (1943)
ii) Family and Kin-in-Indo- Europen Culturer (1962)
iii) Cities and Civilization (1962)
iv) Anatomy of Ruruban Community (1963)
v) The scheduled Tribes (1963)
vi) Indian Sadhus (1964)
vii) Social Tensions in Indians (1961)
viii) Caste, Class and Accupation (1961)
ix) Culturer and Society
x) Indian Costume.

## १.३ डॉ. धुर्येचा वांशिक सिद्धांत

भारतातील जातीच्या निर्मितीसाठी वंश व जन्म हे दोन मूलभूत घटक जबाबदार आहेत. डॉ.जी.एस. धुर्ये यांनी Ethic Theory of Caste या जातीव्यवस्थेच्या वांशिक सिद्धांत या प्रबंधात त्यांने भारतीय जाती व्यवस्था व त्यांचे उगमस्थान या संदर्भात विस्तृत विवेचन केले आहे.

प्राचीन काळी हिंदू समाजव्यवस्थेत वर्णव्यवस्था अस्तित्वात होती, वर्ण हा शब्द शारीरिक गुणधर्मांशी म्हणजेच त्वचेच्या रंगाशी संबंधीत होता असे डॉ. धुर्ये यांनी आपले मत मांडले. शारीरिक गुणवैशिष्टये ही अनुवांशिक तत्वे व रंगसुत्रावर आधारलेली असतात. त्यामुळे शारीरिक संबंधातून निर्माण झालेल्या संततीतही समान शारीरिक गुणधर्म आढळतात. त्यामुळे शारीरिक गुणधर्म अबाधित ठेवण्यासाठी वैवाहिक संबंध जोडले जातात. डॉ. जी.एस. धुर्ये यांनी श्रम विभाजन सिद्धांत अमान्य करून जाती व्यवस्थेच्या निमितीस "वांशिक धटक हाच कारणीभूत असल्याचे निर्भिड मत मांडले.

सुमारे ३००० वर्षा पुर्वी इंडो-आर्यन वंशाचे लोक भारतात आले. त्यांनी मुळच्या हिंदुस्थानातील रहिवास्थांना जिंकुन दास बनवण्यास सुरुवात केली. इंडो-आर्यन व भारतातील मुळचे रहिवाशी यांची शारीरिक गुणवैशिष्टचे भिन्न असल्याने हे भिन्नत्व कायम टिकवण्यासाठी त्यांनी आंतर्विवाहाचा पुरस्कार केला. परंतु इंडो-आर्यन वंशातील लोकसमुदायात स्त्रियांचे प्रमाण तुलनेनी खुपच अत्यल्प असे होते. अशा वेळी त्यांनी बहिर्विवाहाचा पुरस्कार करण्यास मान्यता दिली. पण अशा मिश्र स्वरुपाच्या विवाहामुळे जन्मास आलेली संततीत संमिश्र स्वरुपाची गुणविशेषता आढळून येवू लागली. अशावेळी संकर संततीचा अंतर्भाव कोणत्या वर्गात करावा यामध्ये मतभेद होवून शेवटी अनेक जातींची निर्मिती झाल्याचा दावा डॉ.जी.एस.धुर्येनी केला.

## १.४ जाती, उपजाती व पोटजाती निर्माण होण्यास कारणीभूत घटक

डॉ. धुर्येनी उपजाती व पोटजाती निर्मितीस कारणीभूत घटकांचा शोध घेण्यासाठी ऐतिहासिक व तुलनात्मक अभ्यास पद्धतीचा वापर केला. भारतातील विविध प्रदेशातील, धर्मातील, पंथातील जाती व पोटजातीचा तुलनात्मक अभ्यास करुन पोटजाती व जातीच्या निर्मितीच्या घटकांची चर्चा केली.

### १. प्रादेशिक भिन्नता व अलगता :

आपला मुळचा प्रदेश सोडून इतरत्र स्थलांतरित झालेल्या जाती समुहाने स्थानीक जातीसमुहापासून संरक्षण मिळवण्यासाठी व स्वतःचे वेगळेपण टिकवण्यासाठी आप-आपल्या प्रादेशिक तत्वावर आधारलेल्या लोकांनी एकत्र येण्याया प्रयत्न सुरु झाला. कालांतराने त्यातून प्रदेशाच्या नावाने नविन पोटजात तयार झाली. उदा. कोकणस्थ ब्राम्हण, देशस्थ ब्राम्हण, सारस्वत ब्राम्हण इ.

### २. मिश्र विवाह :

विभिन्न वांशिक समुदायातील स्त्री-पुरुषांमध्ये वैवाहिक संबंध निर्माण झाल्यास प्रजननशास्त्राच्या आधारावर समिश्र स्वरुपाची गुणवैशिष्टये पुढील संततीत उतरत असतात. अशा समिश्र स्वरुपाच्या शारीरिक गुण वैशिष्टयांच्या आधारावर अनेक जाती, उपजाती निर्माण झाल्याचे डॉ. धुर्येनी दावा केला आहे. त्याशिवाय अनेकदा अनुलोभ व प्रतिलोभ विवाह करणाऱ्यांच्या आपल्यांना ही जातीबाह्य ठरवले आहे. अशा जातीबाह्य लोकांच्या ही उपजाती तयार होत आहेत.

### ३. विशिष्ट साधने व उपकरणे:

विविध साधने व उपकरणाचा वापर करुन उपजीविका करणाऱ्या समुदायाला त्यांच्या उपकरणावरुन त्यांना विशिष्ट जातीचा दर्जा देण्यात आल्याचे डॉ.धुर्येनी दाखवून दिले.

### ४. धार्मिक पंथभेद:

भारतातील सर्वच धर्मामध्ये पंथ किंवा वेगवेगळे विचारप्रवाह असल्याचे आढळते. उदा. ख्रिश्चन धर्मात कॅथलिक व प्रोटेस्टंट, इस्लाम धर्मात शिया व सुन्न, जैन धर्मात श्वेतांबर व दिगंबर, बौध्द धर्मात महायान व हिमयान, तर हिदूं धर्मात वैष्णव व भागवत तर ब्राम्हणामध्ये ऋग्वेदी, यजुर्वेदी इत्यादि. प्रत्येक पंथाची संस्कार पद्धती भिन्न, रितिरिवाज जीवनपद्धती वेगळी असल्यामुळे या धार्मिक पंथ भेदातून अनेक पोटजाती तयार झाल्या आहेत.

### ५. आहार विषयक रीतिरीवाज :

आहार विषयक शुद्ध, अशुद्ध व निषध नियम असल्याने हिंदू धर्मात आहार घेण्याच्या पद्धतीतून अनेक जातीची उत्पत्ती झालेली आहे. थोडक्यात, आहार विषयक, संकल्पना अनेक पोटजाती निर्माण करण्यास कारणीभूत ठरतात, असा दावा धुर्येचा होता.

## १.५ डॉ. जी.एस. धुर्येचा प्राच्यविद्याविषयक दृष्टिकोन

**प्रस्तावना :**

प्राच्याविद्या किंवा भारतीय विद्या म्हणजे संस्कृती श्रद्धा, कल्पना, विश्वास, परंपरा, रुढी प्रथा, सवयी, चालीरिती व जाती-जमाती या सर्वाचा निव्वळ भारतीय दृष्टिकोनातून अभ्यास करण्यासाठी वापरली गेलेली एक शास्त्रीय पद्धत आहे. प्राच्यविद्येत प्राचीन धर्मग्रंथ, ऐतिहासिक कागदपत्रे शिलालेख, ताम्रपट, पुरातत्व विभागातील अवशेष व शिल्पकला इ. आधार धेवून प्राचीन समाज व्यवस्थेच्या संशोधनात्मक अभ्यास करण्यावर भर दिला. प्राश्चविद्या अभ्यासक म्हणून धुर्येनी संस्कृत, पाली, अर्धमागधी, फारसी व अरेबिक इ. भाषा अत्मसात केल्या. व त्यातील ज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहचविले. ‘Religious Consiousness’ या ग्रंथात डॉ. धुर्येनी इजिप्त, मेसापोटैमिया व भारत या देशांच्या धर्म विषयक जाणीवांचा ऐतिहासिक आढावा घेतला. तर God and Man या ग्रंथात भारतीय दैवतांची व त्याद्वारे भारतीय समाजाची तद्रुपता कशी साधली गेली आहे. याचे समाजशास्त्रीय दृष्टया विश्लेषण केले. विशेष म्हणजे भारतातील संस्कृतीच्या विविध घटकांचा अभ्यास करताना त्यांनी प्राच्यविद्या दृष्टिकोनाच्या अनुषंगाने नृत्य, शिल्पकला, वास्तुकला, नाटयसाहित्य व वेशभुषा इत्यादीशी समाजशास्त्राची सांगड घालण्याचा प्रयत्न केला.

## १.६ भारतीय आदिवासींचा अभ्यास

भारतातील आदिवासींचा अभ्यास The Scheduled Tribes - 1963 या ग्रंथात केला. भारतातील आदिवासीयांच्या ख्रिश्चयन मिशनऱ्यांनी केलेला अभ्यास हा दोषपूर्ण होता असे सांगूण डॉ. धुर्येनी आदिवासी समुदायाचा अभ्यास वस्तुनिष्ठ पद्धतीने केला. डॉ. धुर्ये यांनी आदिवासींना मुळचे रहिवाशी मानले आहे. त्यांचा उल्लेख मागासलेले हिंदू असा केला. आदिम लोक हेच देशातील मुळचे रहिवाशी असून, त्यांचा अंतर्भाव भारतीय लोकसंख्येत करुन,

नागरिकत्वांचा दर्जा प्रदान करुन त्यांना नागरी हक्क प्राप्त करुन देण्याच्या उद्देशाने धुर्येनी सामिलीकरणाचा आग्रह धरला.

## १.७ भारतीय खेडयांचा अभ्यास

इ.स. १८९१ ते १९५१ या कालखंडातील शिरगणती अहवालाच्या आधारे महाराष्ट्रातील हवेली तालुक्यातील ११० खेडयांचा अभ्यास करुन लोकसंख्येच्या दृष्टिकोनातून खेडयांचे वर्गीकरण करण्याचा प्रयत्न धुर्येनी केला. लोकसंख्याच्या आधारावर त्यांनी कृषीपुरा, ग्रामराज्य, महाग्राम, खेटकर असे चार प्रकार पाडले.

त्याच बरोबर भारतातील साधू, भारतातील ताण तणाव इत्यादी विषयावर भारतीय दृष्टिकोनातून संशोधन केली आहेत.

भारतीय समाजव्यवस्थेत लोकांचे व्यवहार हे मुल्यावर आधारित असतात. व मुल्यांना सामाजिक अधिष्ठान किंवा मान्यता असते. त्यामुळे त्यांनी पाश्चात्य विचारवंतानी भारतीय समाजाचा पाश्चात्य दृष्टिकोनातून केलेल्या अभ्यासावर प्रखर टिका केली. भारतीय समाजाचा वास्तववादी अभ्यास करण्यासाठी भारतीय दृष्टिकोनातूनच केला जावा अशी अग्रही भूमिका डॉ. धुर्येनी घेतली त्यांच्या मते भारतीय विद्या किंवा प्राच्यविद्या ही एक स्वतंत्र ज्ञान शाखा आहे.

पोलॉक, इरावती कर्वे डयुमाँ, मॅक्स मुल्लर, डॉ. भांडारकर, डॉ.मुंजे, डॉ. कोसंबी, डॉ. केतकर इ. युरोपियन पाश्चात्य व भारतीय विचारवंताचा समावेश प्राच्यविद्या अभ्यासकांमध्ये होतो.

**आपली प्रगती तपासा : (Check Your Progress)**

१) डॉ. घुर्येच्या मते जाती, उपजाती निर्माण होण्यास कारणीभूत घटक कोणते ते सांगा.

२) डॉ. घुर्येचा प्राच्यविद्या विषयक दृष्टिकोन स्पष्ट करा.

## १.८ सारांश (Summary)

भारतातील समाजशास्त्राला युरोपिय, पाश्चात्य दृष्टिकोनापासून वेगळे करुन स्वतंत्र ओळख निमार्ण करण्यात मोलाचा वाटा डॉ. जी.एस. धुर्येचा आहे. भारत विद्या अभ्यास किंवा प्राच्यविद्या दृष्टिकोनाचा विकासामध्ये अग्रमान डॉ. धुर्येना मिळतो. म्हणून त्यांना भारतीय समाजशास्त्राच्या जनक म्हणतात.

जातीच्या उत्पत्तीचा वांशिक सिद्धांत, जाती, पोटजाती निर्मितीचा सिद्धांत, भारतीय खेडयांचा अभ्यास, आदिम जमातीचा अभ्यास व त्यांचे भारतीय मुळप्रवाहात आणण्याचे कार्य, भारतातील समाजव्यवस्थेतील ताण, तणाव या सर्व घटकांचा अभ्यास शुद्ध भारतीय दृष्टिकोनातून केला.

## १.९ संदर्भ ग्रंथ (Reference Books)


1. The Structure of Social Theory - Turner, Jonuth H.
2. Contemparar, Sociological Theory - Ritzer, George
3. भारतका समाजशास्त्र - सिंह वी.एन., विवेक प्रकाशन, दिल्ली.
४. सामाजिक विचारक - पडाडिया बी.एम., सतिश पब्लिशर्स इंदौर.
६. अभिजात समाजशास्त्रीय विचार, प्रदिप आगलावे, श्री. साईनाथ, नागपूर


## १.१० प्रश्न (Questions)

१) डॉ. धुर्ये यांचा जातींच्या उगमाचा वांशिक सिद्धांत स्पष्ट करा.

२) डॉ. धुर्ये यांचा प्राच्यविद्या दृष्टिकोनावर चर्चा करा.

❖❖❖❖

# २

# संरचनात्मक व प्रकार्यात्मक दृष्टिकोन
# (Structural and Functional Approach)

**एम.एन. श्रीनिवास**

**घटक रचना**

२.० उद्दिष्टये (Objective)
२.१ प्रस्तावना (Introduction)
२.२ डॉ. श्रीनिवास यांचा संरचनात्मक कार्यवादी दृष्टिकोन
  २.२.१ कार्यवादी दृष्टिकोन (Functional Appraoch)
  २.२.२ जातीनिष्ठ व्यवस्थेचा कार्यात्मक दृष्टिकोनातून अभ्यास
  २.२.३ डॉ. श्रीनिवास यांची अन्य कार्य
२.३ सारांश (Summary)
२.४ संदर्भ ग्रंथ (Reference Book)
२.५ प्रश्न (Questions)

## २.० उद्दिष्टे (Objectives)

१. ह्या प्रकारणाचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना संरचनात्मक व प्रकार्यात्मक दृष्टिकोनाची ओळख करुन देणे.
२. एम.एन. श्रीनिवास यांच्या समाजशास्त्रातील योगदानाची ओळख करुन घेणे.
३. संरचनात्मक व प्रकार्यात्मक दृष्टिकोनातून भारतीय समाजाचा अभ्यास करणे.

### संकल्पना (Concept)

**१) संरचनात्मक दृष्टिकोन : (Structural Approach)**

समाजाचा अभ्यास करण्यासाठी सामाजिक संस्था, संघटना, यांचा आधार घेवून केलेला अभ्यास

**२) प्रकार्यवादी दृष्टिकोन : (Functional Approach)**

समाजाचा कार्यात्मक दृष्टिकोनातून अभ्यास केला जातो.

## २.१ प्रस्तावना (Introduction)

भारत हा खेडयांचा देश आहे. खेडयातील समाजाचे वस्तुनिष्ठपणे अध्ययन करण्यासाठी संरचनात्मक कार्यवादी दृष्टिकोनाचा अवलंब केला जातो. संरचनात्मक दृष्टिकोनाचा अवलंब करताना समाजशास्त्रज्ञांनी वैचारिक मूल्ये व स्थित्यंतरे यावर विशेष भर दिला आहे. 'लेव्ही स्ट्रॉस' हे संरचनात्मक दृष्टिकोनाचे पुरस्कर्ते आहेत. संरचनात्मक प्रकार्यवादाचे प्रमुख वैशिष्टये म्हणजे खेडेगावाचा, जातीनिष्ठ समाजव्यवस्थेचा पद्धतशीर अभ्यास करणे.

व्यक्तीचा सामाजिक दर्जा, परस्परांबदलचे प्रेम, सामाजिक संबंध, व्यक्तीची सामाजिक भूमिका त्यांचा अभ्यास करण्यासाठी संरचनात्मक प्रकार्यवाद उपयुक्त ठरतो. याचे आणखी एक वैशिष्टये म्हणजे समाजाचे कार्यात्मक स्वरुपाचे संबंध जाणूण घेण्यासाठी समाजाच्या व्यवस्थेचा अभ्यास याद्वारे केला जातो.

डॉ.एम.एन. श्रीनिवास यांनी ग्रामीण समुदायाच्या भौगोलिक परिसर, नैसर्गिक साधनसंपत्ती श्रमविभाजन, सामाजिक संबंध या सर्व दृष्टिने संपूर्ण खेडयाचा पद्धतशीर अभ्यास करणे. संरचनात्मक प्रकार्यवादाने शक्य होतो. हे दाखवून दिले.

## २.२ डॉ.एम.एन. श्रीनिवास यांच्या संरचनात्मक कार्यवादी दृष्टिकोन

भारतीय समाजशास्त्राच्या विकासाच्या प्रक्रियेत डॉ.एम.एन.श्रीनिवास यांचे योगदान अत्यंत मौलिक आहे. स्वतंत्र संशोधनात्मक कार्याच्या दृष्टिकोनाचा वापर करुन त्यांना समाजशास्त्राच्या अभ्यासाला वेगळी दिशा देण्याचा प्रयत्न केला. भारतीय खेड्यांचा अभ्यास, प्रभावी जातीचा अभ्यास, सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तन, अस्पृश्यता निवारण, जातीव्यवस्थेचा राजकारणावरील प्रभाव, कुटुंब, विवाह, ग्रामीण भागातील कलह यासारख्या संवेदनशील विषयांचा अभ्यास, संशोधनात्मक मार्गाने करण्याचे महत्वाचे कार्य डॉ. श्रीनिवास यांनी केले. या सर्व घटकांची भारतीय समाजातील वास्तवता स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला.

### २.२.१ संरचनात्मक कार्यवादाच्या दृष्टिकोनातून समाजशास्त्रीय अभ्यासाचा उद्देश :

श्रीनिवास यांनी रॅडक्लिफ ब्राऊन यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधनात्मक कार्य केले. रॅडक्लिफ ब्राऊन यांनी संरचनात्मक कार्यवादाचा अवलंब केला होता. डॉ. श्रीनिवास यांनी त्यांचे मार्गदर्शन घेतल्यामुळे खेडेगावांचा व जातीव्यवस्थेचा अभ्यास करताना संरचनात्मक कार्यवादाचा पुरस्कार केला. श्रीनिवास यांच्या मते, समाजाचे कार्यात्मक स्वरुपाचे संबंध जाणून घेण्यासाठी समाजाच्या संरचनात्मक व्यवस्थेच्या अभ्यास करावा लागतो. कोणत्याही प्रादेशिक समाजाच्या रचनात्मक व्यवस्थेचा जो पर्यंत अभ्यास केला जात नाही तो पर्यंत त्या समाजाचे कार्यात्मक स्वरुपाचे संबंध अभ्यासकास अभ्यासता येत नाहीत. म्हणून समाजरचना हा समाजशास्त्राचा मूलभूत अभ्यास विषय असतो. व्यक्तीची सामाजिक भूमिका, दर्जा, परस्पराना दिली जाणारी वागणूक, सामाजिक संबंध इ. अभ्यास करताना डॉ.एम.एन श्रीनिवास यांनी संरचनात्मक कार्यवादी दृष्टिकोनाचा पुरस्कार केला.

### २.२.२ डॉ.श्रीनिवास यांनी जातीनिष्ठ समाजव्यवस्थेचा कार्यात्मक दृष्टिकोनातून केलेला अभ्यासः

डॉ. श्रीनिवास यांच्या मते, प्रत्येक जाती-समुदाय हा सांस्कृतिक समुह म्हणून विशिष्ट पद्धतीचे जीवन जगत असल्याने त्यांचा अभ्यास संरचनात्मक कार्यवादातून करण्याचा प्रयत्न अभ्यासकांनी केला पाहिजे. संरचनेचा जातीव्यवस्था हा मूलभूत घटक आहे. तसाच सामाजिक कार्यपद्धतीचा ही तो अविभाज्य घटक आहे.

The Religion and Society amount the coorge of south India. या शोध प्रबंधात संरचनात्मक कार्यवादाचा उपयोग करुन कुर्ग लोकांचा धर्म व साामाजिक संरचना यांचा विस्तृत अभ्यास केला. धर्म समाजव्यवस्थेला कसा प्रभावित करतो हे उदाहरणासह पटवून दिले.

डॉ. श्रीनिवास यांनी सांस्कृतिकरणाच्या संकल्पने आधारे सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनाचा सविस्तर अभ्यास केला. 'भारतीय ग्राम' 'Indian Village' या पुस्तकात मैसूर येथील रामपूरा गावाचा अभ्यास करुन समाजव्यवस्थेतील जाती व्यवस्थेचा अभ्यास केला. प्रभावी जात ही संकल्पना मांडून भारतीय समाजातील जातीचे सामाजिक सांस्कृतिक, राजकिय प्रभावाचा अभ्यास केला.

### २.२.३ डॉ. एम.एन. श्रीनिवास यांच्ये अन्य कार्य :

भारतीय समाजातील जाती व्यवस्था, अस्पृश्यता निवारण्याचे कार्य, राखीव जागांचा प्रश्न, भूमिहीनच्या समस्या, प्रचंड वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्येचा प्रश्न इ. सर्व प्रश्नांच्या माध्यमातून निर्माण झालेल्या क्रांतीची नोंद घेणारा. 'on living in a revolution' लेख 1992 प्रकाशित झाला. या लेखात सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेवर प्रकाश टाकण्यात आला.

डॉ.एम.एन. श्रीनिवास यांनी संरचनात्मक कार्यवादी दृष्टिकोनाचा पुरस्कार करुन समाजरचनेचा अभ्यास करायचा असेल तर त्यासाठी ढोबळमानाने समाजरचना विचारात घेऊन चालनार नाही. त्यासाठी संरचनात्मक कार्यवादी दृष्टिकोन व्यवहारात स्वीकारण्याची गरज आहे. असे मत व्यक्त केले.

## २.३ सारांश (Summary)

डॉ. श्रीनिवास यांनी आपल्या सर्व संशोधन कार्यामध्ये संरचनात्मक प्रकार्यवाद दृष्टिकोनाचा उपयोग करुन अन्य अभ्यासकांना एक आदर्श धालून दिला आहे. त्याच बरोबर एक प्रेरणा स्त्रोत म्हणून त्यांच्या या संशोधन कार्याकडे पाहिले जाईल. अनेक समाजशास्त्रीय अभ्यासक संरचनात्मक - प्रकार्यवादाचा पुरस्कार करुन संशोधन कार्य करतील.

## २.४ संदर्भ ग्रंथ (Reference List)

1. Indin Village - Dr. M.N. Shrinivas
2. अभिजत समाजशास्त्रीय विचार - डॉ. प्रदिप आगलावे

3. भारत का समाजशास्त्र - सिंह वी.एन.
4. Chicago Journals
5. http://www.jstor.org.

## २.५ प्रश्न (Questions)

१. डॉ. एम.एन.श्रीनिवा यांनी भारतीय समाजाचा संरचनात्मक प्रकार्यवादी दृष्टिोकनातून केलेल्या अभ्यासाचा विस्तृत आढावा दया ?

२. भारतीय जातीव्यवस्थेचे संरचनात्मक व प्रकार्यात्मक दृष्टिकोनातून श्रीनिवास यांनी केलेले संशोधन - सविस्तर मांडा.

३. भारतीच समाजातील 'प्रभावी जाती' बद्दलचे श्रीनिवास यांचे विचारांची चर्चा करा.

❖❖❖❖

# ३

# व्दंव्दात्मक दृष्टिकोन : डॉ. डी.पी. मुखर्जी

**घटक रचना**

३.० उद्दिष्टये (Objective)
३.१ प्रस्तावना (Introduction)
३.२ प्रा. डी.पी. मुखर्जी व्दंव्दात्मकवादी विचार
३.३ डॉ. मुखर्जी यांचा ऐतिहासिक विरोध - विकास संकल्पना
    ३.३.१ परांपरामधील व्दंव्द
    ३.३.२ शहरी भागातील व्दंव्द
    ३.३.३ परंपरा व्दंव्दात्मक प्ररुप
    ३.३.४ पुनर्जागरनाची श्रृंखला
    ३.३.५ उच्च व निम्न परंपरा व्दंव्द
    ३.३.६ आंतरगत व बाह्य परंपरा व्दंव्द
३.४ परंपरा व आधुनिकता व्दंव्द
३.५ सारांश (Summary)
३.६ संदर्भ ग्रंथ (Reference Book)
३.७ प्रश्न (Questions)

## ३.० उद्द्दिष्टये (Objective)

१) ह्या प्रकरण्याचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना व्दंव्दात्मक दृष्टिकोनाची ओळख करुन देणे.

२) डॉ. डी.पी. मुखर्जी यांनी व्दंव्दात्मक दृष्टिकोनातून भारतीय समाज व भारतीय परंपरा यांचा केलेल्या अभ्यासावर चर्चा करणे.

३) माक्सवादी दृष्टिकोनातून भारतीय समाजाची ओळख करुन धेणे.

### संकल्पना (Concept)

**१) व्दंव्दात्मक दृष्टिकोन :**

'सामाजिक परिवर्तन' हे वाद - प्रतिवाद - संवाद या चक्राच्या माध्यमातून धडून येतात ह्या विचार म्हणजेच व्दंव्दात्मक दृष्टिकोन होय.

## ३.१ प्रस्तावना (Introduction)

भारतीय समाजाच्या अध्ययनात माक्सवादी दृष्टिकोन वापरला जात आहे. डॉ.डी.पी. मुखर्जी व ए.आर. देसाई यांच्या सारख्या समाजशास्त्रज्ञांनी भारतीय समाजव्यवस्था व त्यामध्ये होणाऱ्या बदलांचा अभ्यास करताना मार्क्सवादी विचारांचा स्विकार केला. मार्क्स प्रमाणे यांनी ही समाज विकासाच्या प्रक्रियेचे व्दंव्दात्मक दृष्टिकोनाचा आधार घेऊन विश्लेषण केले.

## ३.२ प्रा.डॉ.डी.पी. मुखर्जी व्दंव्दात्मकवादी विचार (Dialectical : Dr. D.P. Mukherji)

**प्रस्तावना : (Introduction)**

डॉ.डी.पी. मुखर्जी भारतीय समाजशास्त्रीय विचारवंतामध्ये माक्सवादी विचारांचे पुरस्कार करणारे आद्य विचारवंत होते. असे असले तरी ते कोणत्याही विचारधारेला संपूर्णपणे मानणारे नव्हते. डॉ.डी.पी. मुखर्जीच्या मते कोणताही विचार किंवा घटना ही तर्काच्या आधारावर तपासूनच स्विकारली पाहिजे. कोणत्याही गोष्टींच्या सत्यापर्यंत जाण्यासाठी विविध मार्गाचा पुरस्कार करावा तर वास्तव सत्य शोधने शक्य होते. व्यक्तित्वाचा संपूर्णवादी दृष्टिकोनाच सामाजिक विज्ञानाचा आधार असावा तरच समाजशास्त्र ज्ञानापर्यंत पोहचले.

ज्ञानाचा आज विविध शाखा, उपशाखा झालेल्या आहेत. विविध ज्ञान शाखाच्या माध्यमातून समाजाच्या विविध पैलूचा अभ्यास केला जातो. डॉ. मुखर्जी यांच्या मते व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू असतात. पण सर्व पैलूच्या एकिकरणातून संपूर्ण व्यक्तित्व तयार होते. त्या प्रमाणे समान विज्ञानातील संपूर्णता व एकीकरणच समाजशास्त्रासाठी महत्वाचे आहेत.

**डॉ.डी.पी.मुखर्जी यांचे योगदान :**

१) समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना 1932 (Basic concept of society , 1932)
२) आधुनिक भारतीय संस्कृती 1942 (Modern Indian Culture, 1942)
३) भारतातील युवकांची समस्या 1946 (Problems of Indian youth, 1946)
४) विचार व प्रतिविचार, 1946 (View and counter)
५) विविधता, 1958 (Diversities)
६) भारतीय संस्कृतीचे समाजशास्त्र, 1942 (Society of Indian Culter, 1942)
७) भारतीय परंपरा व सामाजिक परिवर्तन (Indian Tradition and Social Change)

## ३.३ डॉ.डी.पी. मुखर्जीची ऐतिहासिक विरोध - विकासाची संकल्पना

डॉ. डी.पी. मुखर्जी व्दंव्दात्मक दृष्टिकोनाचे समर्थक आहेत. जगातील सर्वच समाजात व्दंव्दात्मक प्रक्रियेद्वारे विकास घडून येतो असे त्यांचे मत आहे. प्रत्येक समाजात दोन परस्पर

विरोध गट असतात. त्यांच्या मध्ये संघर्ष होतो. या संघर्षाच्या परिणाम म्हणून, नविन समाज व्यवस्था तयार होते जी दोन्ही गटांच्या समन्वयाच्या प्रक्रियेतून तयार झालेली असते. या ठिकाणी मुखर्जी मार्क्सच्या त्री सुत्रीचा वापर करतात. वाद-प्रतिवाद-संवाद या सुत्रीचा वापर कारुन मुखर्जी भारतीय परंपराचा अभ्यास करतात.

## ३.४ परंपरामधील व्दंव्द : (Dialectic of Tradition) :

भारतीय परंपरेत आजपर्यंत जी स्थित्यंतरे, परिवर्तने घडून आलीत, त्याबाबातचे विश्लेषण करताना डॉ.डी.पी. मुखर्जी ऐतिहासिक द्वंद्वात्मक तंत्राचा पुरस्कार करताना आढळतात.

भारतीय समाज व्यवस्थेतील अनेक पारंपरिक मुल्ये संस्कृति व संख्या भारतीय परंपरेचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील असतात. त्यालाच मुखर्जी अन्वय (Thesis) म्हणतात. यामध्ये प्रामुख्याने धर्म, राजकिय संस्था, व वर्ग, जातव्यवस्थेचा इत्यादींचा समावेश होतो. प्रचलित असलेल्या ह्या समाजमान्य स्वरुपाच्या परंपरा जेव्हा कालबाह्य ठरतात तेव्हा त्या प्रथा परंपराना विरोध होतो. अशा विरोध होणाऱ्या प्रथा, परंपराचा समावेश तसेच मुल्यांचा समावेश विरोधान्वयात (Antithesis) मध्ये केला जातो. अशा प्रकारे सांस्कृतिक व पारंपारीक विविधता हे भारतीय समाजव्यवस्थेचे लक्षण असल्याने सुरुवातीस विभिन्न समुदायातील परस्पर विरोधी परंपरेत संघर्ष होवून, नंतर समन्वयात्मक (Systhesis) स्वरुपाची भूमिका भारतीय समाजात रूढ झाली. असे मुखर्जी यांचे मत आहे. इतिहासाचा पाठपुरावा, अनुभवाधिष्ठत अध्ययन तंत्र व स्पष्टीकरणात्मक पद्धतीचा स्वीकार करुन व्दंव्दात्मक दृष्टिकोन सिद्ध करण्याचा प्रयत्न केला.

भारतीय समाजात आर्यांच्या आगमनापासून परिवर्तन सुरु झाले. भारतीय समाजावर मुस्लिमांच्या राजवटीचा प्रभाव आहे. ब्रिटिशांच्या प्रभाव भारतीय समाजावर असल्याचे मुखर्जी यांनी दाखवून दिले.

### ३.४.१ भारतीय परंपरा व पश्चिमी परंपरा संघर्ष :

डॉ. मुखर्जी भारतीय परंपरा व पश्चिमी परंपरा यांच्यातील संघर्षाची चर्चा करतात. मुखर्जीच्या मते सामाजिक मुल्ये व वर्गाच्या हितांमध्ये सतत संघर्ष होतो. पारस्पारिक संघर्षाचा हा आंतर खेळ (Inter Play) सतत सुरु राहतो व त्यातून समन्वयात्मक विचार पुढे येतो. त्यामुळे सामाजिक परिवर्तन धडून येते. भारतीय परंपरा व पाश्चिमात्य परंपरा यांच्यात समन्वय धडून भारतीय समाज व्यवस्थेत परिवर्तन घडून आल्याचे मुखर्जी अभ्यासांती दाखवून देतात.

### ३.४.२ शहरी भागातील व्दंव्द :

डॉ. मुखर्जी यांच्या मते शहरी भागातील मध्यवर्गीयांच्या मध्ये व्यक्तिवाद वाढत आहे. या लोकांचे जवळून अभ्यास केल्यास असे आढळून येते की. परंपरावाद व व्यक्तिवाद यांची एक परंपरा विकसित झालेली आहे. त्यांच्यात एक विद्रोही परंपरा तयार होत आहे. धर्मच्या संबंधीत परंपरा आज ही आपली महत्वाची भुमिका पाडत आहेत. तर शहरी मध्यम वर्गातील नवीन परंपरा व समाजातील निरंतर चालणारी मुल्य यांच्यात संघर्ष पहावयास मिळत आहे. यावर समाजशास्त्रीय विचारवंत परंपरेच्या विकास संघर्ष व व्दंव्द यांच्या माध्यमातून अभ्यास करतात.

### ३.४.३ परंपरा व्वंव्दात्मक प्ररुप (Dialectical Typologies of Traditions)

प्रा. डॉ. डी.पी. मुखर्जी यांनी भारतीय समाजातील परंपरेतील संघर्षाचे प्ररुप पुढील प्रमाणेः

१) लघू व बृहत् परंपरा संघर्ष (Typology of Little and Great Traditions Dialectics)

प्रा. डी.पी. मुखर्जी यांच्या मते भारतात बहत् व लघू परंपरा अस्तित्वा आहेत. त्यांच्यात व्वंव्द अस्तित्वात असतो. बहद् परंपरा संघर्षातील व्वंव्दामुळे लघू परंपरेचा जन्म होतो. समाज व धर्म सुधारणेसाठी भारतात संत व समाज सुधारकांनी चालवलेल्या चळवळीच्या माध्यमातून बृहत परंपरा विरोध केला. या प्रकारे भारतात लघू व बृहत परंपरा यांच्यात संघर्ष अस्तित्वात आहे.

### ३.४.४ पुनर्जागरणची श्रृंखला (Series of Renaisance):

मुखर्जी यांच्या मते भारतात १९ व्या शतकात पुनर्जागरण चळवळ अस्तित्वात आली. भारतीय परंपरातील संघर्षाचे कालखंडानुसार सहा विभागात विभाजन केले.

१) वैदिक - आर्यकाळ २) बुद्ध-काळ ३) गुप्त काळ ४) हर्ष एवं विक्रमादित्य काळ ५) मुस्लिम किंवा भक्त काळ ६) ब्रिटिश काळ या सर्व काळात अस्तित्वात असलेल्या संघर्ष, अनुकुलन व परिवर्तन यांचे विवेचन केले.

### ३.४.५ उच्च व निम्न परंपरातील व्वंव्द (Dialectic between high and low Traditions):

भारतीय समाजात उच्च व निम्न परंपरा अस्तित्वात आहेत. त्यांच्यात संघर्ष अस्तित्वात असतो या संघर्षामुळे उच्च परंपरा परिवर्तीत होवून त्यांचे महत्व कमी होते व निम्न परंपरेचे महत्व वाढते. या प्रकारे समाजात आरोहण (ascending) व अवरोहन (descending) क्रम सतत चालत असतो.

### ३.४.६ आतर्गत व बाह्य परंपरा संघर्ष :

भारतीय समाजात वेळोवेळी भारतीय परंपरा अंतर्गत व बाह्य परंपरा यांच्यातील संघर्ष प्राचीन काळापासून सुरु आहे. शक,हुण, कुषाण, मंगोल, मुसलमान व इंग्रज यांनी भारतीय परंपरा व त्यांच्या परंपरा यांच्यात संघर्ष घडून आला व वेळोवेळी सम्नवय घडून भारतीय परंपरामध्ये परिवर्तन घडून आले त्यामुळे प्रत्येक बाह्य संस्कृतीचा प्रभाव भारतीय संस्कृती व परंपरेवर आढळून येतो.

### ३.४.७ परंपरा व आधुनिकता व्वंव्द (Dialectic of Tradition and Modernity):

डॉ. मुखर्जी यांनी परंपरा व आधुनिकता यांच्यात व्वंव्द असलयाचे सांगितले आहे. यामध्ये वाद-प्रतिवाद असल्याचे स्पष्ट केले व त्यांनी या दोन्हीतील संघर्षामध्येच आधुनिकीकरण असल्याचे सांगतात. वाद-प्रतिवाद-समन्वय या प्रक्रियेच्या माध्यमातून भारतीय परंपरामध्ये आधुनिकरण प्रक्रिया सुरु झाली.

## ३.५ सारांश (Summary)

डॉ.डी.पी. मुखर्जी यांनी भारतीय परंपरामध्ये होत असलेलया परिवर्तनास संघर्ष किंवा व्दंव्द अस्तित्वात आहे. भारतीय समाजातील परंपरामधील वाद-प्रतिवाद-समन्वय या व्दंव्दवादाच्या माध्यमातून भारतीय परंपरेतील परिवर्तन मांडण्याचा प्रयत्न केला. भारतीय समाजातील परंपरेस अस्तित्वात असलेलया संघर्षाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन धडून येतात असा संघर्षात्मक विचार मुखर्जी यांनी मांडला.

## ३.६ संदर्भ ग्रंथ (Reference Books)


१) अभिजात भारतीय समाजशास्त्रीय विचारवंत : तोष्ठीवाल

२) अभितात समाजशास्त्रीय विचार : डॉ. प्रदिप आगलावे

३) भारत का समाजशास्त्र : सिंह वी.एन.

४) सामाजिक विचारक : पहाडिया, बी.एम.

५) Contemparary Sociological Theory : Ritezer, Geo.


## ३.७ प्रश्न (Questions) :

१) डॉ. डी.पी. मुखर्जी यांच्या विरोध विकासवादाचे स्वरुप स्पष्ट करा.

२) भारतीय परंपरा व्दंव्दात्मक दृष्टिकोनातून सविस्तर मांडा.

३) डॉ. डी.पी. मुखर्जीचे व्दंव्दात्मक विचार थोडक्यात सांगा.

❖❖❖❖

# ४

# व्दंव्दात्मक दृष्टिकोन (Dialectical)

**प्रा.ए.आर.देसाई (Prof. A.R. Desai)**

**घटक रचना**

४.० उद्दिष्टये (Objective)
४.१ प्रस्तावना (Introduction)
४.२ डॉ. ए.आर.देसाईयांचा व्दंव्दवाद
४.३ डॉ. देसाई यांचे राष्ट्रवादा विषयी विचार
४.४ डॉ. देसाई यांचा ग्रामीण जीवन पद्धतीचा अभ्यास
४.५ ग्रामीण विकाससंबंधी विचार
४.६ सारांश (Summary)
४.७ संदर्भ ग्रंथ (Reference Book)
४.८ प्रश्न (Questions)

## ४.० उद्दिष्टये (Objectives)

१) ह्या प्रकरणाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना दूंद्वात्मक दृष्टिकोनाची ओळख करून देणे.
२) डॉ. ए.आर.देसाई यांच्या दृष्टिकोनातून राष्ट्रावादा विषयी व ग्रामीण जीवन पध्दतीच्या अभ्यासावर चर्चा घडवून आणणे.
३) दूंद्वात्मक दृष्टिकोणाची ओळख करून घेणे.

## ४.१ प्रस्तावना (Introduction)

भारतातील व्दंव्दात्मक व मार्क्सवादी दृष्टिकोनाचे समर्थक डॉ.डी.पी.मुखर्जी व ए.आर. देसाई मुख्य आहेत. डॉ.डी.पी. मुखर्जी यांच्या विचारांचा अभ्यास आपण पाठीमागील प्रकरणात केला आहे. आत या प्रकरणात डॉ.ए.आर.देसाई यांच्या विचारांची चर्चा करु.

## ४.२ डॉ.ए.आर.देसाई यांची ग्रंथ संपदा :

1) Rural Sociology in India :1969
2) Slums and Urbanization : 1970
3) India’s Path of Development : 1984

4) Peasent Struggle in India : 1929
5) Social Background of Indian Nationalism : 1946

### ४.२.१ डॉ.ए.आर.देसाई यांचा व्दंव्दवाद

मार्क्सवादी विचारवंतामध्ये डॉ.ए.आर.देसाई अग्रण्य भारतीय समाजशास्त्राज्ञ होते. मार्क्सवादी विचारवंताच्या मते "जागतिक भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील असंतुलित विकासाचे फलित म्हणजे, 'राष्ट्रवाद' संकल्पना विकसित झाली. त्यानंतर १९ च्या शतकात आधुनिकरण, पाश्चिमात्यीकरण होत गेले तस तसे जागतिक पातळीवर राष्ट्रवादाचा प्रसार जगभर होवू लागला. पण देसाई यांच्या मते, राष्ट्रवाद ही संकल्पना युरोपात विकसित होवून ब्रिटिशाच्या बरोबर ती भारतात आली. डॉ.देसाई यांच्या मते "राष्ट्रवाद ही राष्ट्राला एकसंघ बनवणारी प्रक्रिया आहे." अशा प्रकारे राष्ट्रवादातून ऐक्याची भावना वाढीस लागते व पुढे त्याच ऐक्यपूर्ण भावनेतून राष्ट्रवादाचा उदय होतो. ऐक्याची भावनाची खऱ्या अर्थाने एकसंघ समाज किंवा राष्ट्र असते. ऐक्य भावनेतूनच प्रखर राष्ट्रवाद उदयास येतो याचे उदाहरण भारतीय स्वातंत्र्य संग्राम असल्याचे डॉ. ए.आर.देसाई सांगतात. भारतीय राष्ट्रवादाचे अध्ययन डॉ.देसाई यांनी मार्क्सवादातून केले आहे.

## ४.३ डॉ.देसाई यांचे राष्ट्रवादा विषयी विचार :

१९४६ मध्ये लिहिलेल्या Social background of Indian Nationalism या ग्रंथात भारतीय राष्ट्रवादाची पार्श्र्वभूमी, अर्थ, उत्पत्ती, विकास, कारणे महत्व व भिन्नता यांच्या माध्यमातून भारतातील राष्ट्रवादाच्या विकासाच्या अभ्यास केला. डॉ.देसाई यांच्या मते, भारतीय राष्ट्रवाद ही राष्ट्राला एकसंघ बनवणारी भावनीक प्रक्रिया आहे. राष्ट्रवादात राष्ट्राविषयी निष्ठा, देशभक्ती व अभिमान यांचा अंतर्भाव असतो. राष्ट्रवाद हा राष्ट्रविषयी देशप्रेम व परराष्ट्राविषयी जागरुकता निर्माण करीत असतो.

भारतातील राष्ट्रवादी संकल्पनेचा उदय एक राज्य किंवा राष्ट्र या संकल्पनेतून झाला.भारतातील उद्योग दळण-वळण साधने मुद्रण व्यवस्था व आधुनिक शिक्षण इ. माध्यमातून राष्ट्रवादाची पाळेमुळे रुजली अशी माहिती डॉ. देसाई यांच्या अभ्यासात सापडते. भारतीय राष्ट्रवादाच्या विकासात सामाजिक शक्ती, सामाजिक आदांलने यांचा मोठा वाटा आहे. या आंदोलनानी भारतीय राष्ट्रवादाला अशा पद्धतीने हाताळले की येथील अर्थव्यवस्थेने अंतर्गत बंडाळीला जन्म दिला.त्यामुळे भारतीय समाजव्यवस्था सरंजामशाहीतून मुक्त होवून आधुनिक समजाव्यवस्थेकडे वाटचाल करत आहे असे मत डॉ.ए.आर.देसाई यांनी मांडले.

**भारतीय राष्ट्रवादाची कारणे :**

१) इ.स. १८५७ च्या उठावाने भारतीय समाजात स्वाभिमान व अस्मिता जागृत झाली.
२) विविध समाजसुधारक चळवळी, सुधारणावादी विचार, संताच्या शिकवणी भारतात देशप्रेमाची निर्मिती करु लागल्या.
३) शिक्षण, पाश्चिमात्य साहित्य, स्वातंत्र्याची मुल्य व लोकशाहीची जीवनविषयक मुल्य, यक्ति स्वातंत्र्यमुळे राष्ट्रवाद वाढीस लागला.

४) स्त्री मुक्ती, जाती व अस्पृश्यता अंदोलनामुळे भारतीय राष्ट्रवादास पुरक वातावरण तयार झाले.

५) दळन-वळणाची साधने, प्रसार माध्यमे इ. माध्यमातून राष्ट्रभक्तीची भावन मनात तयार होण्यास मदत मिळाली.

६) भारतातील अनेक संस्था, संघटना, पक्ष, त्याच बरोबर विचारवंत, तरुण, वृध्द, महिला यांनी भारतीय स्वातंत्र्याची मागणी लावून धरली त्यामुळे राष्ट्रवादी भावना प्रखर झाली. संकुचित भावना नष्ट होवून संपूर्ण देशभर भारतीय असल्याची जाणीव झाली.

## ४.४ डॉ.देसाई यांचा ग्रामीण जीवन पद्धतीचा अभ्यास

इ.स. १९६९ मध्ये Rural Society in Indian या ग्रंथात भारतातील ग्रामीण समाजजीवनाचे अतिशय सुक्ष्म अध्ययन केले. डॉ.देसाई यांच्या मते स्वातंत्र्य पुर्व काळात भारतीय ग्रामीण समाज हा जातिनिष्ठ समाजसंरचनेमुळे परंपरेने चालत आलेल्या जीवनमानानुसार जगत होता. जमिनीची मालकी जमीनदार व इतर उच्च जातीकडे होती व अनेक जाती पारंपारीक व्यवसाय करत होत्या. पण स्वातंत्र्य प्राप्तीनंतर जमीनविषयक संबंध सुधारण्याच्या दृष्टीने भारत सरकारने कमाल जमीन, धारण कायदा,जमीनदारी निर्मलून कायदा कुळकायदा, सावकारी प्रतिबंध कायदा, कामगारांना योग्य मजूरी देणारा कायदा आंमलात आणून अल्पभूधारक, शेतमजूर व पारंपारिक जमीनदार वर्ग यांच्यातील आर्थिक विषमतेचे दरी कमी करण्याचा प्रयत्न केला.परंतू या सर्व बाबीचा परीणाम म्हणून जमीनदार व शेतमजूर यांच्यात वर्गीय संघर्ष निर्माण झाला. या तणावपूर्ण संघर्षाचा अभ्यास डॉ.ए.आर.देसाई यांनी Rural Society in India ह्या पुस्तकात मांडला.

डॉ.ए.आर.देसाई यांनी Rural Indian Interaction विश्लेषण मार्क्सवादी दृष्टिकोनातून केले आहे.

## ४.५ ग्रामीण विकासा संबंधीचे विचार

डॉ.देसाईयांनी आपलया अभ्यासात अल्पभूधारक शेतमजूर व कामगार यांच्यावरील अन्यायाची बाजू अधिक स्पष्टपणे मांडण्याचा प्रयत्न केला.त्यांच्या मते ग्रामीण विकास साधण्याच्या दृष्टिने नविन नविन प्रकल्प राबवले जातात. पाणलोट क्षेत्र विकास योजना राबवलाया जातात. प्रत्यक्षात या योजनेने अल्पभूधारकांचा कोणताही फायदा झाला नाहीच पण त्यांच्या दास्यत्वात वाढ झाली. नकळतपण त्यांच्यावर अन्यायच झाला. दुसरी महत्वाची बाब म्हणजे या योजनांची आखणी करताना शेतमजूर, अल्पभूधारक मध्यम शेतकऱ्यांचा कोणताही विचार केला नाही. त्यामुळे ह्या वर्गानी सतत सामाजिक अंदोलनाच्या माध्यमातून आपल्यावरील अन्याय दूर करण्यासाठी प्रयत्न केले. शेतकऱ्यांची विविध आंदोलने ह्या शासनाच्या अपयशाचा परिणाम असल्याचे मत डॉ. देसाई यांनी मांडले.

## ४.६ सारांश (Summary)

मार्क्सवादी दृष्टिकोनातून डॉ.ए.आर.देसाई यांनी भारतातील समाज जीवनाचा अभ्यास केला. भारतीय राष्ट्रवादाला इंग्रजी राजवटील केलेला विरोध कारणीभूत असलयाचे मत त्यांनी मांडले. शिक्षणाचा प्रसार, पाश्चिमात्य, सांस्कृतीचा प्रभाव, लोकशाही जीवनमुल्य, व्यक्तिवाद, प्रसार माध्यमे सामाजिक सुधारणा आदोलने भारतीय राष्ट्रवादाला मुख्य कारण ठरली आहेत.

भारतातील ग्रामीण जीवन संरचना व सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास ए.आर.देसाई यांनी व्दंव्दात्मक दृष्टिकोनातून केला आहे. भारतीय खेडयातील परिवर्तन हे सामाजिक आंदोलनाच्या माध्यमातून घडून आलयाचे त्यांनी त्यांच्या अभ्यासात मांडले आहे.

## ४.७ संदर्भ ग्रंथ (Reference Book)

१) भारतीय समाजशास्त्रीय विचार : तोष्णीवाल
२) अभिजात समाजशास्त्रीय विचारवंत : डॉ. प्रदिप आगलावे
३) भारत का समाजशास्त्र : सिंह. व्ही. के.

## ४.८ प्रश्न (Questions)

१) डॉ.ए.आर.देसाई यांचा व्दंव्दात्मक दृष्टिकोन सविस्तर लिहा.
२) Social Background of Indian Natinalis या ग्रंथातील डॉ.ए.आर.देसाई यांचे विचार सविस्तर सांगा.

❖❖❖❖

# ५

# जाती विरोध /जातीयता अंता संदर्भातील विचार (महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर)

**घटक रचना**


५.० उद्दिष्टये (Objectives)

५.१ प्रस्तावना (Introduction)

५.२ महात्मा फुले यांचा जीवन प्रवास (Life of Mahatma Phule)

५.३ महात्मा फुले यांचे सामाजिक योगदान / कार्य (Social Contribution of Mahatma Phule)

५.४ महात्मा फुले यांचा जातीविषयक दृष्टिकोन (Mahatma Phule's Approach Towerds Caste)

५.५ डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय परंपरा (Indian Traditions)

५.६ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चरित्र (Biography of Dr. Babasaheb Ambedkar)

५.७ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा दृष्टिकोन (Approach of Dr. Ambedkar)

५.८ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान (Contribution of Dr. Ambedkar)

५.८.१ अस्पृश्यते विरुद्धची चळवळ (Anti - Caste Morement)

५.८.२ स्वातंत्र्य चळवळ व पुणे करार (Independence Movement & Pune Pact)

५.८.३ राज्यघटनेचे शिल्पकार

५.९ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ग्रंथसूची / लेखण

५.१० सारांश (Summary)

५.११ प्रश्न (Questions)


## ५.० उद्दिष्टये (Objectives)

१) महात्मा ज्योतिबा फुले यांचे जीवन कार्य समजावून घेणे.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक व राजकिय कार्याची महती जाणून घेणे.

## ५.१ प्रस्तावना (Introduction)

१९ व्या शतकाच्या शेवटच्या कालखंडात धर्मसुधारणा व सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या अनेक चळवळी घडून आलेल्या आढळतात. याकाळात काहीशा वेगाने सामाजिक बदलांची प्रक्रिया घडून येत होती. भारतीय समाजात आढळणारी संकुचित वृत्ती, जातीभेदांचे पालन, भौतिक सुखे, व्यावसायिकता व व्यवहारिकता याविषयीचे गैरसमज यासारखे दोष निर्माण झाल्याने समाजाची मोठी हानी होत आहे हे लक्षात आल्यामुळे हे दोष दूर करुनच आपल्या समाजाची प्रगती साधता येईल असे तत्कालीन समाज सुधारकांचे मत होते. समाजाची राजकिय किंवा आर्थिक उन्नती घडवून आणायची असल्यास प्रथम सामाजिक सुधारणेकडे लक्ष पुरविले पाहिजे. ज्याप्रमाणे गुलाबाचे सौंदर्य आणि सुगंध हे जसे वेगळे करता येत नाही त्याप्रमाणे राजकारण, अर्थकारण आणि सामाजिक सुधारणा यांची फारकत करता येत नाही, असे तत्कालीन विचारवंतांचे मत होते. सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे, आगरकर, महर्षी कर्वे, सावित्रीबाई फुले, पंडिता, रमाबाई, गोपाळ हरी देशमुख, बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील यासारख्या अनेकांनी प्रयत्न केले. त्यापैकी महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याविषयी आपण अधिक माहिती घेणार आहोत.

## ५.२ महात्मा फुलें यांचा जीवनप्रवास

१९ व्या शतकात सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीचे नेतृत्व सखोल चितंन करणाऱ्या समाज हित जपणाऱ्या महात्मा फुले यांच्याकडे होते. शिक्षण व समता या दोन शब्दात त्यांच्या आयुष्यातील विविध टप्प्यांमध्ये केलेल्या सामाजिक कार्याची मूळ प्रेरणा स्पष्ट होते.

महात्मा ज्योतिबा फुले यांचा जन्म एप्रिल १८२७ साली झाला. बालपणापासून ते तेजस्वी आणि कुशाल बुद्धीचे होते. त्याचे प्राथमिक शिक्षण पंतोजीच्या शाळेत झाले व इंग्रजी शिक्षण त्यांनी स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये घेतले. त्यानंतर १८४७ साली त्यांनी "रॉईट ऑफ मॅन" ह्या थॉमस पेन यांच्या ग्रंथाचा सखोल अभ्यास केला. १८४० साली त्यांचा सावित्रीबाईशी विवाह झाला.

तत्कालीन भारतातील बहुजन समाज अंध-कारात चाचडत होता. १८४८ साली मित्राच्या विवाहप्रसंगी मिरवणुकीत ब्राम्हण वर्णीयांकडून त्यांचा अपमान झाला.१८४८ साली त्यांनी मुलींची पहिली शाळा सुरु केली. बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी काम सुरु केले. १८५१ साली त्यांनी भिडे वाड्यात आणि रास्ता-पेठेत मुलींची शाळा सुरु केली. तर १८५२ साली त्यांनी पुणा लायब्ररीची स्थापना केली. त्यानंतर वेताळ पेठेत अस्पृश्यांसाठी पहिली शाळा सुरु केली. या गोष्टी करताना त्यांना अनेक विरोधकांचा सामना करावा लागला. परंतु त्यांनी न घाबरता अनेक सुधारणा घडवून आणल्या. त्याच्या अखंड परिश्रमामुळेच आज अनेक स्त्रीया शिक्षण घेताना आढळतात. १८८८ साली मुबंईतील कोळावाडा येथे जनतेने रावबहादुर वडेकर यांच्या हस्ते त्यांना महात्मा ही पदवी बहाल केली. २८ नोव्हेंबर १८९० साली महात्मा फुले यांचे पुणे येथे निधन झाले.

**आपली प्रगती तपासा**

१) महात्मा फुलेंचा जन्म कधी झाला ?

२) महात्मा फुलेंचा विवाह कधी व कोणाशी झाला ?

## ५.३ महात्मा फुले यांचे सामाजिक योगदान / कार्य

महात्मा फुले यांच्या जन्माच्या वेळी संपूर्ण भारतात अज्ञान, अंधश्रद्धा व अस्पृश्यता यांचे प्रमाण अधिक होते. स्त्री आणि अस्पृश्य समाज हे या समाज व्यवस्थेतील सर्वाधिक उपेक्षित घटक होते तत्कालीन स्त्रियांना शिक्षण मिळत नसल्याने त्या स्वतःची अस्मिताच हरवून बसल्या होत्या त्यांच्यावर अन्याय केला जात असे. या परिस्थितीतून त्यांना बाहेर काढण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता होती. समाजउद्धारासाठी शिक्षण हेच प्रमुख अस्त्र आहे. हे ज्योतीरावांनी ओळखले. एक स्त्री सुशिक्षित झाली तर संपुर्ण कुटुंब सुशिक्षित होतच पण त्याचबरोबर पुढच्या सर्व पिढ्या सुशिक्षित होतात हे समीकरण त्यांच्या लक्षात आल्याने त्यांनी प्रथम आपल्या पत्नीला सावित्रीबाईंना शिक्षिण दिले. पुण्यात मुलींची पहिली शाळा काढली. त्यांनी व त्यांच्या पत्नीने अतिशय प्रतिकूल परिस्थितीत लोकविरोधाला न जुमानता स्त्रियांसाठी अनेक कन्या शाळा स्थापना केल्या.

स्त्रियांना सबला बनविण्यासाठी, स्त्री उद्धारासाठी त्यांनी बालविवाह, कुमारीविवाह, विधवांचे केशवपन या परंपरांना प्रचंड विरोध केला. या परंपरांच्या विरोधात जाऊन त्यांनी १८६४ साली पहिला विधवा पुनर्विवाह घडवून आणला. त्याचबरोबर त्यांनी केशवपनाच्या विरोधी आंदोलन करुन नाभिकांचा अभिनव असा संप घडवून आणला. पण तरीही पुनर्विवाह समाजाला पचणे अवघड होते. एखाद्या विधवेला दुर्दैव परिस्थितीत संतती झाल्यास त्या विधवेस भ्रूणहत्या वा आत्महत्येशिवाय पर्याय राहत नसे ही समस्या ओळखून त्यांना १८६३ साली पुण्यात पहिले बालहत्या प्रतिबंधक गृह उघडले. त्यांनी याच प्रतिबंधक गृहातील एक मुलगा दत्तक घेतला. यावरुन त्यांचे स्त्रीविषयक विचार किती आधुनिक व पुरोगामी होते हे स्पष्ट होते.

भारत देश हा कृषीप्रधान आहे आणि तरीही येथील शेतकरी अज्ञानी, कर्जबारी, दरिद्री व मागासलेला असा आहे. त्यामुळे या समस्या लक्षात घेऊन शेतकऱ्यांची बाजू मांडण्यास आणि त्यांचे संघटन करण्यास महात्मा फुले यांनी सुरुवात केली. शेतकरी, शेतमजुर यांच्या हालाखीच्या परिस्थितीचे त्यांनी "शेतकऱ्यांचा आसूड" या ग्रंथात त्यांनी वर्णन केले. या ठिकानी शिक्षणाशिवाय पर्याय नाही ही भूमिका मांडली. तसेच शेतकऱ्यांच्या मुलांना व्यावसायिक शिक्षण मिळावे म्हणुन वार्षिक कृषी प्रदर्शन भरवले जावे, पाणी पुरवण्यासाठी तलावे, विहिरी, धरणे बांधावीत, पीक संरक्षणासाठी बंदूक परवाने मिळावेत या मागण्यांचा पाठपुरावा केला.

१८८८ साली त्यांनी “ड्युक ऑफ कॅनॉट” समोर भारतीय शेतकऱ्यांच्या वेषात शेतकऱ्यांचे प्रतिनिधीत्व केले. शेतकऱ्यांच्या समस्या व त्या अनुषंगाने त्यावरील पर्याय योजनांची बाजू मांडली.

महात्मा फुले यांनी असंघटित कामगारांच्या समस्यांचाही विचार केला. कामगार संघटक नारायण मेघाजी लोखंडे यांनी महात्मा फुले यांच्या प्रेरणेतून १८८४ साली मुबंईत गिरणी कामगारांची पहिली कामगार संघटना स्थापन केली. महात्मा फुले काही काळ पुणे नगरपालिकेचे सदस्य होते. त्यांच्या चळवळीचे केंद्र पुणे हेच होते.

पिढीजात चालत आलेल्या अमानवी अशा धार्मिक रुढी व परंपरा बंद झाल्याशिवाय समाजात परिवर्तन होणार नाही हे त्यांनी ओळखले, सामाजिक सुधारणांसाठी व्यापक योगदान देऊन आपल्या मानवतावादी भूमिकेतून वंचित व उपेक्षित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचे महत्वाचे कार्य महात्मा फुले यांननी केले. आजच्या आधुनिक भारतातील समाजात झालेल्या सामाजिक सुधारणांचे मूळ हे महात्मा फुले यांच्या सामाजिक कार्यात आढळते.

त्यांनी लिहीलेल्या खालील पंक्तीत त्यांची निरीक्षण शक्ती, नेमकी जाणीव व प्रतिभा स्पष्ट होते.

विद्येविना मती गेली । मतिविना नीती गेली ।
नीतीविना गती गेली । गतिविना वित्त गेले ।
वित्तविना शुद्र खचले । इतके अनर्थ एका विद्येने केले ।।

**आपली प्रगती तपासा :**

१) पहिला महिला पुनर्विवाह कोणत्या वर्षी झाला ?

२) मुंबईत महात्मा फुलेंनी कोणती संघटना स्थापना केली ?

## ५.४ महात्मा फुले यांचा जातिविषयक दृष्टिकोन :

स्त्री उध्दाराबरोबरच अस्पृश्येध्दार व अस्पृश्यता निर्मुलन हा त्यांचा ध्यास होता. तत्कालीन अस्पृश्यता समाज हा राजकिय, सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक हक्कांपासून वंचित होता. त्यांना समाजाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी, त्यांच्या प्राथमिक मानवी हक्कांच्या प्राप्तीसाठी ते सामाजिक समता चळवळीचे आद्य प्रवर्तक बनले. महात्मा फुलेच्या या विचारांचे अनुयायी अनेक जण बनलेले आढळतात. उदा. राजर्षी शाहू महाराज, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व बाबासाहेब आंबेडकर वगैरे.

ईश्वर एकच व निर्गुण-निराकार आहे. ईश्वराच्या भक्तीसाठी कोणालाही कोणत्याही मध्यस्थाची गरज नाही. धार्मिक कर्मकाडांवर विश्वास ठेवू नका. ह्या विचारांना महात्मा फुले विशेष महत्व देत असत. हेच विचार बहुजन समाजात रूजविण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

१८५२ साली महात्मा फुलेंनी अस्पृश्यांसाठी शाळा काढली. दृष्काळग्रस्त काळात अस्पृश्यांसाठी त्यांनी स्वतःच्या राहत्या घरातील हौद पाण्यासाठी खुला केला. "गुलामगिरी व ब्राम्हणांचे कसब" या ग्रंथातून त्यांनी जाति व्यवस्थेवर प्रहार केला. अस्पृश्य समाजातील लोकांमध्ये आत्मविश्वास, समस्यांची जाणीव निर्माण होण्यासाठी आणि त्यांना स्व-विकासाचे महत्व समजण्यासाठी त्यांनी १८७३ साली पुण्यात सत्यशोधक समाजाची स्थापना केली. या संस्थेच्या स्थापनेतून त्यांनी बहुजन समाजाच्या विकासाचे बीज रोवले. सत्यशोधक समाजाचे प्रमुख उद्‌दिष्ट शुद्रांना वा कनिष्ठ जातीतील व्यक्तींना शिक्षण देणे व उच्च वर्णियाकडून त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायास आळा घालणे हे होते. हिंदू धर्मात पवित्र असणारे वेद - यांना पवित्र मानवण्यास त्यांनी नकार दिला पण त्याचबरोबर त्यांनी चार्तुवर्ण व्यस्थेवर टिका केली. सत्यशोधक समाजामार्फत त्यांनी फक्त ब्राम्हणांनाच शैक्षणिक व धार्मिक नेतृत्व देऊ नये, असा प्रचार केला. वैयक्तिक हितास विशेष महत्व देणाऱ्या ब्राम्हणांवर त्यांनी सतत टिका केली. असे असले तरी अनेक ब्राम्हण त्यांचे मित्र होतेच पण त्याचबरोबर त्यांनी एका ब्राम्हण मुलास दत्तक घेतले होते. मृत्युनंतर त्यांची संपूर्ण मालमत्ता त्या मुलाच्या नावी झाली.

सार्वजनिक सत्यधर्म हा सत्यशोधक समाजाचा प्रमाण ग्रंथ मानला जातो.
सर्वसाक्ष जगत्पती । त्याला नकोच मध्यस्थी ।

हे सत्यशोधक समाजाचे घोषवाक्य होते. दीनबंधु हे साप्ताहिक मुख्यपत्र चालविले जात असे. सत्यशोधक समाजाने गुलामगिरी विरूध्द आवाज उठविला आणि सामाजिक न्यायाची व पुर्नरचनेची मागणी केली. सत्यशोधक समाजातर्फे पुरोहिता शिवाय विवाह लावण्यास सुरुवात केली. मराठीत मंगलाष्टके रचली. सत्यशोधक समाजाने शिक्षणास विशेष महत्व दिलेले आढळते.

पिढीजात चालत आलेल्या अमानवी अशा धार्मिक रुढी व परंपरा बंद झाल्याशिवाय समाजात परिवर्तन होणार नाही हे महात्मा फुलेनी ओळखले. सामाजिक सुधारण्यासाठी व्यापक योगदान देऊन आपल्या मानवतावादी भूमिकेतून वंचित आणि उपेक्षित घटकांना मुख्य समाजप्रवाहात आणण्याचे महत्वपूर्ण कार्य महात्मा फुले यांनी केले. आजच्या आधुनिक भारतातील समाजात झालेल्या सामाजिक सुधारणाचे मूळ हे महात्मा फूले यांच्या सामाजिक कार्यातच आहे.

निर्मिकाचा धर्म सत्य, आहे एक, भांडणे अनेक कशासाठी
हा त्याचा सत्यधर्माचा व मानवताधर्माचा संदेश आजही अनुकरणीच ठरतो.

**आपली प्रगती तपासा.**

१) सत्यशोधक समाजाची स्थापना कोणत्या साली झाली ?

२) सत्यशोधक समाजाच्या प्रमाण ग्रंथाचे नाव सांगा ?

## ५.५ डॉ. बाबासाहेब आंबेडकर :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे शून्यातून जग निर्माण करण्याची किमया साधणारे महापुरुष होते त्यांचे जीवन तमाम भारतीयांना स्फूर्ती देणारे आहे. एका दलित समाजात जन्माला आलेल्या या व्यक्तीने आपल्या शिक्षण व कार्याद्वारा अनेकांना आश्चर्यचकित केलेल आढळते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म होण्यापूर्वी भारतीय समाज कशा प्रकारचा होता. याबाबतची थोडक्यात माहिती घेऊः

### ५.५.१ भारतीय परंपरा (Indian Traditions) :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जन्माआधी भारतीय समाजात विविध प्रथा परंपरांचे पालन अधिक प्रमाणात केले जात असे. यामुळे भारतातील करोडो अस्पृश्य लोकांचे जीवन अंधकारमय झालेले होते. त्यांच्यावर अनेक बंधने लादलेली होते. रुढी - परंपरांच्या मगरमिठीत समाज कोंडाला गेलेला होता. त्यांना कोणत्याही ठिकाणी मुक्तपणे संचार करता येत नसे. त्यांचे दर्शन व सावली त्याज्य मानली जाई. अस्पृश्य व्यक्तींची सावली आपल्यावर पडू नये याची काळजी उच्च वर्णिय घेत असत. अस्पृश्य व्यक्तींला सकाळी व संध्याकाळी भर रस्त्यातून चालण्यास मनाई होती. तो फक्त दुपारी बारा वाजता रस्तावरुन चालू शकत होता कारण यावेळेस यांची सावली त्यांच्या पायाजवळच पडते. त्यामुळे त्याच्या सावलीची इतरांना बाधा होत नसे. अस्पृश्य व्यक्ती रस्त्यावरुन गेल्यानंतर तेथील जागा अपवित्र होते व त्यांची बाधा आपणास होऊ नये यासाठी अस्पृश्य व्यक्तींच्या कमरेला बोऱ्याटयाची फांदी बांधली आत असे ज्यायोगे त्याच्या पाऊल खुणा नष्ट होत असत. अस्पृश्य व्यक्तींने रस्त्यावर थुंकू नये यासाठी त्याच्या गळ्यात मडके बांधले जाई. पेशवाईची ही देणगी अस्पृश्य व्यक्ती निमूटपणे सहन करीत असे. अस्पृश्यांना कोणत्याही पाणवटयावर पाणी पिण्याची मुभा नव्हती. किती ही तहान लागली तरी तो स्वऱ्हाताने पाणी घेऊन पिऊ शकत नसे. अस्पृश्य व्यक्ती रोटी बंदी, भेटी बंदी व बेटी बंदी अशा अनेक बंधनात अडकलेला होता. त्याला कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र्य दिलेले नव्हते. वर्षानुवर्षे चालत आलेल्या रुढी-परंपरा तो निमूटपणे पाळत होता. 'ठेविले अनंत तसेची राहावे.' यात धन्यता मानत होता. अज्ञानामुळे त्या विरोधात जाण्याचा अस्पृश्य व्यक्ती विचार ही करु शकत नसे, कर्म सिध्दांताने सांगितल्याप्रमाणे तो आपल्याला मिळालेला जन्म हा मागील पापाची परिनिती आहे, असे तो मानत होता. अस्पृश्यांना आपण गुलाम आहोत, ही गुलामगिरी आपण

झुगारून दिली पाहिजे याबाबतची जाणीवच नव्हती. पण ही जाणीव करुन देण्याचा प्रयत्न हळूहळू काही समाजसुधारकांनी केला त्यात महात्मा फुले, गोपाळबाबा वेलणकर आणि शिवराम जाणबा कांबळे यांचा समावेश होतो. महात्मा फुले यांनी यासाठी अनेक प्रयत्न केले. पण त्यांच्यावर अनेक उच्च वर्णियांनी दगड वर्षात केलाच पण त्याचबरोबर त्यांना विरोध ही केला. पण ते त्यांच्या विरोधास जुमानत नव्हते. या नंतरच्याच काळात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म झाला. ज्यांनी अन्यास सहन करणाऱ्या करोडो लोकांना मुक्ती देण्याचे कार्य केले.

**आपली प्रगती तपासा.**

१) अस्पृश्यांना कोणत्या वेळेस रस्त्यावरुन चालण्यास मुभा दिली जात असे ?

२) गुलामगिरी झुगारुन देण्याची जाणीव अस्पृश्यांना प्रथम कोणी करुन दिली ?

## ५.६ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चरित्र (Biography of Dr. Babasaheb Ambedkar)

डॉ. भीमराव रामजी सकपाळ यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ साली मध्यप्रदेशातील महू या गावी झाला. त्यांचे मूळ गाव रत्नागिरी जिल्हयात होते. त्यांना त्यांच्या एका शिक्षकाने आपले आडनाव आंबेडकर हे वहाल केले होते. त्यामुळे त्यांना आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर या नावानेच ओळखले जाते. १८९६ साली त्यांच्या आईचा (भीमाईचा) मृत्यू झाला. त्यानंतर त्यांचा संभाळ त्यांच्या आत्याने केला. १९०८ साली त्यांनी मॅट्रिकची परिक्षा पास केली. त्यांच्या सत्काराच्या वेळी किर्लोस्कर गुरुजींनी त्यांना बुध्द चरित्र भेट दिले. त्यातील विचारांचा त्यांच्यावर सखोल व दीर्घकालीन परिणाम झाला. पूर्वी भारतात समता, बंधुता, अस्तित्वात होती याची जाणीव त्यांना झाली. या गोष्टी पुन्हा भारतात अस्तित्वात याव्यात याचा ध्यास त्यांनी घेतला. त्यासाठी त्यांनी पुढील आयुष्यात प्रयत्न केले.

मॅट्रिकची परीक्षा पास झाल्यानंतर पदवी परिक्षा एलफिस्टन कॉलेजमधून त्यांनी पास केली, यानंतर पुढील शिक्षणासाठी त्यांना बडोदयाचे महाराज सयाजीराव गायकवाड व राजर्षी शाहू महाराजांनी बरीच मदत केली. ते १९१३ साली सयाजीराव गायकवाड यांनी दिलेल्या शिष्यवृत्तीच्या आधारे अमेरिकेस शिक्षणासाठी गेले. अमेरिकेत त्यांना अस्पृश्यतेचा कोणताही त्रास झाला नाही कारण तिथे समानतेचे तत्व अस्तित्वात होते. भारतात आलेले अनुभव व अमेरिकेत असणारे मुक्त वातावरण यात त्यांना तफावत आढळली. आलेल्या अनुभवांवर सखोल विचार करुन त्यांनी आपल्या देशातील अस्पृश्य बांधवाना या सामाजिक विषमतेच्या विळख्यातून बाहेर काढायचे मनोमन ठरविले. कोलंबिया विद्यापिठात समाजशास्त्र, राज्यशास्त्र व अर्थशास्त्र या विषयांचे त्यांनी अध्ययन केले व तेथून त्यांनी पी.एच.डी. पदवी संपादन केली. कोलंबिया

विद्यापिठा तर्फे त्यांना जी डॉक्टरेटची पदवी दिली गेली त्याचा विषय होता 'नॅशनल डिव्हीडंड ऑफ इंडिया. ए हिस्टॉरिकल ॲड अनॅलिटिकल स्टडी' (National Dividend of India - A Historic and Analytical Study) पुढे त्यांनी लंडन येथील विद्यापीठात दी प्राब्लेम ऑफ रुपी (The problem of Rupee) हा प्रबंध सादर केला की ज्यामुळे त्यांनी डी.स्सी. ही पदवी मिळाली. भारतात आल्यानंतर त्यांनी अनेक कार्ये केली. डॉ. आंबेडकर केवळ जातीव्यवस्थेच्या विरोधातच लढत नव्हते किंवा ते विशिष्ट समाजाच्या उन्नतीसाठी प्रयत्नशील होते असे नव्हे तर त्यांना भारतीय स्वातंत्र्य लढयाचेही भान होते. शिक्षण, अंधश्रध्दा, स्त्रियांची स्थिती, अर्थकारण, राजकिय किंवा प्रशासकीय व्यवस्था या मुद्दयाकडे त्यांचे लक्ष होते.

डॉ. आंबेडकर यांच्यावर संत कबीर, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारांचा व कार्याचा मोठा प्रभाव होता. त्यांनी आपल्या वृत्तीतून इतरांना समानतेचे पाठ दिले ते उच्च शिक्षित झाले तरी त्यांना आपल्या समाज बांधवाचा विसर पडला नाही. त्यांची दुःखे सतत त्यांच्या स्मरणात राहीली. समाजबांधवांची दुःखे दूर करण्यासाठी ते सतत प्रयत्नशील होते. याबाबत त्यांनी भक्कम स्वरुपाचे कार्यही केलेले आढळते. या अस्पृश्योध्यारक व्यक्तींचा मृत्यू ६ डिसेंबर १९५६ रोजी झाला.

**आपली प्रगती तपासा.**

१) बाबासाहेबाचे मूळ गाव कुठे आहे?

२) बाबासाहेबानी कोंलबिया विद्यापिठात कोणत्या विषयांचा अभ्यास केला?

## ५.७ डॉ. आंबेडकरांचा दृष्टीकोन (Approach of Dr. Ambedkar)

डॉ. आंबेडकरांना आपल्या जीवनात स्त्रिया, अस्पृश्य वा कनिष्ठ जातीतील लोकांच्या समस्यांची जशी जाण होती. तशीच भारतीय कृषी व्यवस्थेची देखील चांगली जाण होती. सामूहीक शेतीचे ते पुरस्कर्ते होते. भारतासारख्या कृषीप्रधान देशात पाणी आणि बीज यांचा समानरित्या पुरवठा झाला तर भारत एक समुध्द देश होण्यास वेळ लागणार नाही असे त्यांचे मत होते. पूर्वीच्या काळी भारतात खोती पध्दती अस्तित्वात होती. या पध्दतीमुळे शेतकरी वर्गावर खूप अन्याय होत असे. ती एक प्रकारची आर्थिक शोषण करणारी व्यवस्थाच होती. ही पध्दती नष्ट करणारे कायदे डॉ.आंबेडकरांनी केले. ज्याप्रमाणे रेल्वे मार्गावर पूर्णपणे केंद्र सरकारची मालकी असते त्याप्रमाणे जलमार्गावर ही केंद्र शासनाचीच मालकी असावी असे मत त्यांनी मांडले. पण हे मत कोणी फारसे विचारात घेतले नाही. त्यामुळे आज त्याचे झालेले परिणाम आपणास दिसतात. आज भारतात जी नदी जोड प्रकल्पा विषयी चर्चा चालू आहे. त्या नदी जोड प्रकल्पाची एक योजनादेखील यांनी फार आधीच मांडलेली आढळते.

डॉ.आंबेडकरांना शिक्षणाचे महत्व चांगल्या प्रकारे माहित होते. शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी ते प्रयत्नशील होते. यासाठी त्यांनी मुंबई येथे १९४६ साली. सिध्दार्थ महाविद्यालयाची स्थापना केली. १९५० मध्ये औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय सुरु केले. याशिवाय त्यांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटी आणि डिप्रेस्ड क्लास एज्युकेशन सोसायटी या शैक्षणिक संस्थाची स्थापना केली. शिक्षणा बरोबरच त्यांनी राजकिय क्षेत्रातही १९२४ मध्ये बहिष्कृत हितकारिणी सभा स्थापना केली. १९२७ ला सवर्णाच्या अन्याय व अत्याचारापासून पददलितांचे संरक्षण करावे या हेतूने शिस्त्रबध्द असे समता सैनिक दल स्थापन केले. १९३६ साली त्यांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. तर १९४२ साली अखिल भारतीय शेडयूल्ड कास्ट फेडरेशन ची स्थापना केली. पुढे अखिल भारतीय स्तरावर रिपब्लिकन पक्ष स्थापन करण्याचे त्यांनी ठरविले पण दुर्देवाने हे स्वप्न वास्तवात येऊ शकते नाही.

**आपली प्रगती तपासा.**

१) डॉ. आंबेडकरांनी कोण कोणती महाविद्यालये काढली ?

२) डॅ. आंबेडकरांनी १९३६ साली कशाची स्थापना केली ?

## ५.८ डॉ. आंबेडकरांचे योगदान(Contribution of Dr. Ambedkar)

डॉ. आंबेडकरांनी आपल्या जीवनात अनेक मोलाचे काम केले असले तरी त्यातील काही महत्वपूर्ण गोष्टींचा / कार्याचा आपण अभ्यास करणार आहोत.

१) अस्पृश्यते विरुध्दची चळवळ

२) स्वातंत्र्य चळवळ व पुणे करार

३) राज्यघटनेचे शिल्पकार

### ५.८.१ अस्पृश्यते विरुध्दची चळवळ (Anti caste Movement)

भारतात असणारी सामाजिक विषमता दूर करण्यासाठी, अस्पृश्य मानल्या गेलेल्या समाजाच्या समस्या समाजापुढे मांडण्यासाठी आंबेडकरानी मूकनायक (१९२०), बहिष्कृत भारत (१९२७), जनता (१९३०) आणि प्रवुध्द भारत (१९३६) अशी वृत्तपत्रे चालविली. तत्कालीन महाराष्ट्रात जी वृत्तपत्रे चालवली जात होती त्यात दलितांचे वा बहुजन वर्गाच्या प्रश्नांची चर्चा होत नव्हती. यामुळे या विशिष्ट समाजासाठी वृत्तपत्रांची गरज होतीच, त्यांनी सुरु केलेल्या वृत्तपत्रांमधून सामाजिक सांस्कृतिक व राजकिय घडामोडी होणे कसे गरजेचे आहे व

त्यातून नवीन समाजाची निर्मिती होणे आवश्यक असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. वृत्तपत्रांचा वापर त्यांनी आपल्या पक्षाची राजकीय ध्येयधोरणे राबविण्यासाठी केला नाही. समाजातील सर्व स्तरावरील लोकांना विचार करण्यास प्रवृत्त करणे हे त्यांचे उद्‌दिष्ट होते.

त्यांनी फक्त लिखाणा द्वाराच अस्पृश्य व स्पृश्य समाजास जागृत करण्याचे प्रयत्न केले नाहीत तर त्यांनी प्रत्यक्ष कृती ही केलेली आढळते. १९१७ ते १९३५ या काळात हिंदू धर्मातच राहून त्यांनी अस्पृश्यता नष्ट करण्याचा प्रयत्न केला. याचसाठी त्यांनी वर्णव्यवस्थेचे समर्थन करणाऱ्या मनुस्मृतीचे दहन केले. १९२७ साली रायगड जिल्हयातील महाडच्या चवदार तळयावर अस्पृश्यांना पाणी भरता यावे यासाठी सत्याग्रह केला. १९३० साली नाशिक येथे काळाराम मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळावा यासाठी सत्याग्रह केला. कारण जर मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळाल्यास अस्पृश्यतेचा प्रश्न सुटण्यास हातभार लागेल असे त्यांचे मत होते. त्यांनी केलेले सत्याग्रह केवळ तळ्यापुरते किवा मंदिरापुरते मर्यादित नव्हते. तर तो लढा सन्मानाने जगण्याच्या हक्कांसाठी होता. तसेच अस्पृश्यांमध्ये आत्मविश्वास वाढविण्यासाठी आणि मानवी हक्कांसाठी होता.

त्यांनी दी अनट्रचेबल्स, (The untouchables) शुद्र पूर्वीचे कोण होते, बुध्दा ॲन्ड हिज धम्म असे ग्रंथ लिहीले.

याशिवाय डॉ. आंबेडकरांनी एक आघाडीचे विद्‌वान या नात्याने गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ऍक्ट १९१९ च्या बाबत साऊथबिरो कमिटी समोर आपले विचार मांडले. त्यावेळेस त्यांनी दलित व इतर मागासलेल्या समाजासाठी वेगळे मतदान विभाग व आरक्षणाची मांगणी केली. सुरु केलेल्या वृत्तपत्रांतून त्यांनी सनातनी हिंदू नेत्यांवर आणि जातीभेदा विरूध्द काही ही करत नसलेल्या भारतीय राजकारण्यांवर टिका केली. अनेक सभामधून त्यांनी जाती व्यवस्थेवर ही टिका केली.

डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी विविध प्रयत्न केले तरी त्यांना पुरेसे यश प्राप्त न झाल्यामुळे ते नाराज झाले. तसेच तथाकथित उच्च वर्णीय लोक आपल्या वर्तनात व मानसिकतेत बदल करत नाहीत हे त्यांच्या लक्षात आले म्हणूनच १९३५ साली त्यांनी 'मी हिंदू म्हणून, जन्माला आलो, तरी हिंदू म्हणून मरणार नाही' अशी घोषणा येवला येथे केली. १४ ऑक्टोबर १९५६ साली सुमारे पाच लाख अस्पृश्य बांधवासह बौध धर्माची दीक्षा घेतली व धर्म परिवर्तनाची घोषणा प्रत्यक्षात आणली.

## ५.८.२ स्वातंत्र्य चळवळ व पुणे करार (Independance Movement & Pune Act)

डॉ. आंबेडकरांना भारतीय स्वातंत्र्य लढयाचेही भान होते. १९३० च्या गोलमेज परिषदच्या वेळी ब्रिटीशांनी भारत सोडावा असा सल्ला त्यांनी दिला. आपल्या पी.एचडी च्या प्रबंधातून त्यांनी ब्रिटीशांनी भारताच्या चालवलेल्या आर्थिक शोषणाचे मुद्‌देसूद विश्लेषण ही केलेले आढळते.

डॉ. आंबेडकरांना अनेक दलित बांधवाचा पाठिंबा असल्याने ते बहुजन समाजाचे नेते बनले. यामुळे इ.स. १९३१ साली लंडन येथील दुसऱ्या गोलमेज परिषदेचे निमंत्रण डॉ. आंबेडकरांना पाठविले होते. या परिषदेत त्यांचे गांधीजी बरोबर विभक्त दलित मतदार संघावरुन मतभेद झाले. गांधीजीना धार्मिक वा जातीय आधारावर विभक्त मतदारसंघ मान्य नव्हते. त्यांना यामुळे भविष्यात हिंदू समाज दुभंगण्याची भीती वाटत होती.

इ.स. १९३२ साली राव बहादुर राजा यांनी दोन उजव्या विचारसरणीचे कॉग्रेंस नेते बी.एस.मुंजे आणि जाधव यांच्या बरोबर केलेल्या करारानुसार मुंज्यांनी राजानां पाठिंबा देण्याच्या बदल्यात काही आरक्षित जागा अनुसुचित जातीमधील लोकांना देण्याचे ठरविले. या घटनेमुळे आंबेडकरांनीही संपूर्ण भारतात दलितांसाठी विभक्ता मतदार संघाची मागणी केली होती. गोलमेज परिषदेत त्यांची ही मागणी ब्रिटीशांनी मान्य केली, तेव्हा गांधीजींनी येरवडा तुरुगांत उपोषण सुरु केले. सनातनी हिंदू समाजाला अस्पृश्यतेचे निर्मूलन करण्यास सांगून हिंदूमध्ये राजकिय आणि सामाजिक एकी आणण्याचे त्यांनी आवाहन केले. गांधीचीच्या उपोषणाला लोकांचा पाठिंबा मिळाला. हिंदू नेत्यांनी आंबेडकरां बरोबर येरवडा येथे बेठका घेतल्या. गांधीजीचा उपोषणामुळे मृत्यू झाल्यास दलित समाजाविरूध्द दंगल होऊन विनाकारण त्रास होईल असे वाटल्याने आंबेडकरांनी स्वतंत्र मतदार संघाऐवजी आरक्षित मतदार संघाची मागणी केली. यामुळे स्वतंत्र मतदार संघ मिळाले नसले तरी दलितांना जास्त जागा मिळाल्या दलितांच्या राजकिय अधिकारांना बगल देण्यासाठी गांधीजीनी केलेली राजकिय चाल असे आंबेडकरांनी या उपोषणानंतर वर्णन केलेले आढळते.

## ५.८.३ राज्यघटनेचे शिल्पकार:

१९४६ साली नवीन प्रांतिक सरकारच्या कामकाजास सुरुवात झाली. प्रांतिक कायदेमंडळाना एक महत्वाचे काम होते. ब्रिटींशांनी भारतास स्वातंत्र्य देण्याचे आश्वासन दिले होते. स्वतंत्र भारताचा राज्यकारभार राज्यघटनेनुसार व्हावा, यासाठी निवडून आलेल्या मध्यवर्ती व प्रांतिक कायदेमंडळांनी काही प्रतिनिधी निवडून घटना समिती तयार करावी आणि त्या घटना समितीने राज्यघटना तयार करावी असे सुचविले गेले. त्याप्रमाणे मध्यवर्ती व प्रांतिक कायदेमंडळानी घटना समितीचे प्रतिनिधी सभासद ही निवडले. मुंबई कायदेमंडळात व डॉ. आंबेडकर शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनचे निवडून आलेले सभासद नसल्यामुळे त्यांची निवड झाली नाही. मुंबई कायदेमंडळाच्या कॉंग्रेस सभासदांनी घटना समितीचे सभासद म्हणून ब.मुकूंद जयकर आणि के.एम.मुन्शी यांची निवड केली. परंतु अस्पृश्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी घटना समितीचे सभासद होण्याची गरज असल्याने डॉ. आंबेडकरानी बंगाल प्रांताच्या कायदेमंडळाच्या मुस्लिम लीगच्या सभासदांच्या सहकार्याने निवडणूक लढवली व ज्यात ते यशस्वी झाले. अखेर डॉ. आंबेडकरांना अस्पृश्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी घटना समितीचे सभासद झाले.

२० ऑगस्ट १९४७ रोजी घटना समितीच्या अध्यक्षांनी स्वतंत्र भारताचा कायदा आणि त्या संबंधीच्या सर्व कायदेशीर गोष्टींचा विचार करण्यासाठी जी समिती जाहीर केली त्यात डॉ. आंबेडकरांचे नाव होते.

२९ ऑगस्ट १९४७ रोजी घटना समितीने स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेचा मसुदा तयार करण्यासाठी ज्या सात सभासदाची मसुदा समिती बनविली त्या समितीचे अध्यक्ष डॉ. आंबेडकर होते. राज्यघटनेच्या निर्मितीत डॉ. आंबेडकरांचा सिंहाचा वाटा होता. विविधतेने नटलेल्या आपल्या भारतात सक्षम संघराज्यासाठी यशस्वी प्रयत्न केले. आजच्या काळात गुंतागुंतीच्या राजकिय परिस्थितीतही राज्यघटना मार्गदर्शक ठरते, यावरुन डॉ. आंबेडकरांची बुध्दीमत्ता व द्रष्टेपणाची कल्पना येते. इतर पाश्चात्य देशात स्त्रियांना व गरीबांना मतदानाचा अधिकार फार उशिरा मिळाला, पण डॉ. आंबेडकरांनी प्रौढ मतदान पध्दतीचा स्वीकार देशाला स्वतंत्र झाल्यापासूनच करायला लावला. यामुळे भारतीय लोकशाहीचा पायाचभक्कम झाला. प्रशासकीय अधिकाऱ्यांना त्यांचे कार्य नीट करता यावे यासाठी त्यांच्या सेवाशर्ती, नेमणूक याबाबत राज्यघटनेतच तरतूद करुन त्यांना डॉ.आंबेडकरांनी निर्भयपणे काम करण्यास स्वातंत्र्य दिले.

त्यांच्या अशा योगदानामुळेच त्यांना राज्यघटनेचे शिल्पकार व अस्पृश्योध्दारक असे संबोधले जाते.

**आपली प्रगती तपासा.**

१) डॉ. आंबेडकरांनी कोणकोणती वृत्तपत्रे चालविली ?

२) डॉ. आंबेडकर कोणत्या समितीचे अध्यक्ष बनले ?

## ५.९ डॉ. आंबेडकरांचे लेखण (ग्रंथसूची) (Writings of Dr. Ambedkar)

डॉ. आंबेडकरांनी लिहीलेली अनेक पुस्तके आहेत. त्याची यादी पुढील प्रमाणे

1) The Evolution of Provincial Finance in British India.

2) Caste in India - Their Mechanism, Genesis & Development - 1917.

3) A Review of Bertrand Russell's Principles of Social Recon struction - The Journal of India Economic Society - March 1918

4) Anonilation of Castes - 1936

5) Problem of Rupee - History of Indian Currency and Banking - 1947

6) Thoughts on Pakistan - 1940
Second revised edition was published under the title 'Pakistan or the Partition of India - 1945

7) Ranade, Gandhi and Jinnah - 1943
8) What Congress and Gandhi have done to the untouchables - 1945
9) Who were shudreas - 1946
10) The untouchables - 1948
11) Maharashtra as a linguistic Province - 1948
12) The Buddha as a linguistic province - 1948
13) The Budhha and his Dhamma - 1957

या व्यतिरिक्त महाराष्ट्र सरकारने प्रकाशित केलेली पुस्तके

1) Philosophy of Hindusim - 1987
2) Buddha or Karl - Marx
3) Riddles in Hindusim
4) Pali Grammer - 1948
5) Pali Dictionary

## ५.१० सारांश (Summary)

पिढीजात चालत आलेल्या अमानवी रुढी, परंपरा नष्ट करण्यासाठी प्रथम महात्मा फुले यांनी प्रयत्न केले. त्यासाठी त्यांनी शिक्षणास महत्व दिलेच पण त्याच बरोबर अनेक शैक्षणिक संस्था चालू करुन सर्वसामान्य जनता आणि स्त्रियांना साक्षर करण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या विचारांचा प्रभात अनेकांवर पडला. डॉ. आंबेडकर हे त्यापैकी एक डॉ. आंबेडकरांनी शिक्षण, संघटन, संघर्ष आणि धम्मचक्र प्रवर्तन यांच्या साहाय्याने हजारो वर्षे अस्पृश्यतेच्या व गुलामगिरीच्या खाईत लोटल्या गेलेल्या लाखो दलितांना हात देण्याचे काम केले. महात्मा फुले यांना आधुनिक भारताचे पहिले समाजक्रांतिकारक वा समाजसुधारक संबोधले जाते. तर महामानव आंबेडकरांनी सांगितलेला सत्यधर्माचा व मानवताधर्माचा संदेश आजही अनुकरणीय ठरतो.

## ५.११ प्रश्न (Questions)

१) अस्पृश्यता निर्मूलन चळवळीतील डॉ. आंबेडकरांचे योगदान, स्पष्ट करा.
२) राज्य घटनेचे शिल्पकार या अर्थाने डॉ. आंबेडकरांचे नाव कसे सार्थक आहे ह्या बाबत विवेचन करा.

❖❖❖❖

# ६

# भारतीय समाजशास्त्रातील संशोधन परंपरा

**घटक रचना**

६.० उद्दिष्टये (Objectives)
६.१ प्रस्तावना (Introduction)
६.२ डॉ. एम.एन. श्रीनिवास
६.३ डॉ. एम.एन. श्रीनिवास यांचा भारतीय खेडयांचा अभ्यास (Remembered Village)
६.३.१ प्रभावी जात
६.३.२ सांस्कृतिकीकरण
६.३.३ पाश्चिमात्यीकरण
६.४ सारांश (Summary)
६.५ संदर्भ ग्रंथ (Reference Books)
६.६ प्रश्न (Questions)

## ६.० उदिष्टये (Objectives)

१) भारतीय समाजशास्त्रातील संशोधन परंपरेची ओळख विद्यार्थ्यांना करुन देणे.

२) समाजशास्त्रातील प्रदिर्घ संशोधन परंपरा व विविध समाजशास्त्रीय दृष्टिकोनाची माहिती विद्यार्थ्यांच्या पर्यंत पोहचवणे.

३) भारतीय समाज, खेडी, परंपरा यांचा वास्तववादी अभ्यास कसा केला जातो हे विद्यर्थ्यांना समजावून देणे हे या प्रकरणाचे मुख्य उद्देश आहेत.

## ६.१ प्रस्तावना (Introduction)

भारतात प्राचीन कालावधीपासून भारतीय समाज व्यवस्थेचे चित्रण करणारे अनेक ग्रंथ लिहिले गेले आहेत. त्यामध्ये कोटील्याचे अर्थशास्त्र, अबुल फजल यांचे एन.अकबरी इ. अनेक ग्रंथाचा उल्लेख होईल पण शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करुन भारतीय समाजाशास्त्रात ब्रिटीश अधिकाऱ्यांनी भर घातली. डॉ. एम.एन.श्रीनिवास यांच्या मते, भारतीय समाजशास्त्राचा आरंभिक विकास ब्रिटिशांनी केला पण डॉ. राधाकमल मुखर्जीनी या विधानाला विरोध केला त्यांच्या मते ब्रिटीश अधिकाऱ्यांनी भारतीय समाजाचे फक्त वर्णन केले. त्यामध्ये समाजशास्त्रीय दृष्टिकोन नव्हता.

डॉ. एम.व्ही. केतकर व डॉ. बी.आर. आंबेडकर या दोन भारतीय विचारवंतानी इंग्लड व अमेरिकेत जावून समाजाशास्त्राचा संदर्भात ग्रंथ व संशोधनवर पेपर्स प्रसिद्ध केले.

इ.स. १९१४ पासून मुंबई विद्यापीठात समाजशास्त्राला अध्ययन विषय म्हणून मान्यता देण्यात आली होती पण स्वतंत्र समाजशास्त्र विभाग १९१९ साली प्रा. पैट्रिक गिडिस यांच्या अध्यक्षतेखाली सुरू करण्यात आला. पुढे डॉ. जी.एस.धुर्ये मुंबई विद्यापीठात समाजशास्त्र विषयाचे प्रमुख झाले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी संशोधन केले. १९१७ साली कलकत्ता विद्यापीठात मा. ब्रजेंद्रनाथ शिल व एम.आर. वाडिया यांच्या प्रयत्नांमुळे समाजशास्त्राच्या अध्ययनाला एक स्वतंत्र विषय म्हणून सुरुवात झाली. १९२१ साली राधाकमल मुखर्जी यांच्या नेतृत्वाखाली मैसुर विद्यापीठात समाजशास्त्राला स्वतंत्र विषय म्हणून सुरुवात झाली.

भारतीय समाजशास्त्राचा विकासामध्ये डॉ.धुर्ये प्रमाणे डॉ. एम. केतकर, डॉ. बी.आर. आंबेडकर,डॉ. कापडिया, डॉ.ए.आर.देसाई, डॉ.एम.एस.गोरे, डॉ.विलास संगवे, डॉ.योगेंद्र सिंह, डॉ.रजनी कोठारी, डॉ. धनागरे, पंढरीनाथ प्रभू इ. असंख्य समाजशास्त्रांनी योगदान दिले. आज भारतातील बहुतेक सर्वच विद्यापीठात समाजशास्त्राचे अध्ययन केले जाते.

## ६.२ डॉ. एम.एन. श्रीनिवास

डॉ.एम.एन. श्रीनिवास भारतातील पहिल्या पिढीचे समाजशास्त्रज्ञ आहेत. त्यांच्यावर डॉ. धुर्येचा प्रभाव होता. मुंबई बिद्यापीठातून शिक्षण पूर्ण करुन ऑक्सफोर्ड युनिव्हरसीटी, इंग्लडाला उच्च शिक्षणासाठी गेले त्यानंतर त्यांनी बडौदा विद्यापीठात समाजशास्त्र व सामाजिक मानवशास्त्र या विभागात काम केले.

डॉ.एम.एन. श्रीनिवास यांनी संरचनात्मक प्रकार्यवादी दृष्टिकोनातून संशोधन कार्य केले. The Religion and Society Among the Coorges of South India (1952) ह्या प्रबंध सादर करुन पी.एच.डी. पदवी संपादन केली. या पुस्तकात कुर्गवासियांच्या धर्म व सामाजिक संरचनेचे सविस्तर विश्लेषण केले.

डॉ.एम.एन.श्रीनिवास यांची ग्रंथ संपदा :

1) Religion and Society among the coorges of South India (1952)
2) India's Village (1952)
3) Caste in modern India and othe essey. (1962)
4) Dynamics of Population and Family walfare (1985)
5) The Remembered Village (1976)

## ६.३ डॉ.एम.एन. श्रीनिवास यांचा भारतीय खेडयाचा अभ्यास (Remembered village : M.N. Shrinivas)

**प्रस्तावना :**

संरचनात्मक - प्रकार्यवाद पद्धतीवर आधारित डॉ. श्रीनिवास यांनी भारतीय ग्राम (Indian Village - 1952) या ग्रंथात मैसूर मधील रामपुरा या गावचा अभ्यास केला. यामध्ये श्रीनिवास यांनी जातीय संरचना व त्यांच्या कार्यांचा आढावा घेतला आहे. त्याचा बरोबर त्यांनी

The Remembered Village या पुस्तकात भारतातील विविध खेडयाचा अभ्यास करुन संरचनात्मक व प्रकार्यात्मक व्यवस्थेचा आढावा घेतला आहे.

**भारतातील खेडयांचा अभ्यास :**

डॉ.एम.एन.श्रीनिवास मैसूर येथिल रामपुरा या खेडयाचा अभ्यास करुन Indian Village (1952) हा ग्रंथ लिहिला. या गावात जाती व मुस्लिम लोक राहात होते. प्रत्येक जात कोणताना कोणता व्यवसाय करत होती. ज्याप्रमाणे ओक्कालिंगा कृषक किंवा शेती, कुरुबा गुरेचारनारे, याच बरोबर तेली, खाती, कुंभार, या सारख्या जाती आपआपला पारंपारिक व्यवसाय करत होते. आत मात्र यामध्ये परिवर्तन होत होते. या जाती आपले पारंपारिक व्यवसाय सोडून नविन व्यवसाय आत्मसात करण्याचा प्रयत्न करताना डॉ. श्रीनिवास यांना आढळले.

रामपुरा गावत आधिकतर लोक शेती करुन आपले जीवन जगत होते. शेतीची आधिकत्तर मालकी जमीनदारांची होती. जमीनदार लोक शेतमजूर व अल्पशेती धारकांच्या कडून शेती करुन घते होते. परंतु आज परिस्थिती बदलत असून लोकांचा ओध खेडयाकडून शहराकडे स्थलांतरीत होण्याकडे वाढला आहे.

**रामपुरा गावाची सामाजिक स्थिती :**

लिंगायत गावातील पुजारी जात आहे. ही जात मंदिरात पूजा पाठ व मंदिराची देखभाल करते पण या जातीला ब्राम्हण म्हटले जात नाही.

रामपुरा गावातील कुंभार, धोबी, नाव्ही, सुतार इ. जाती शेतकरी जातीच्या सेवा करण्याच्या जाती आहेत.

गावाची अर्थव्यवस्था शेती, लघू व्यवसाय, कुटीर व्यवसाय, व मासे पकडण्यावर अवलंबून आहे.

### ६.३.१ प्रभावी जात (Dominant Caste) :

रामपुरा खेडयाचा अभ्यास करताना डॉ.एम.एन. श्रीनिवास यांनी प्रभावी जात ही संकल्पना मांडली. डॉ. एम.एन. श्रीनिवास यांच्या मते रामपुरा गावाची राजकीय सत्ता अधिकार हे प्रभावी जातींच्या आधिकाराऱ्खाली आहेत. प्रभावी जाती अशा जातींना म्हटले जाते ज्याच्याकडे राजकीय सत्ता आहे. ह्या जाती आर्थिक दृष्टया संपन्न आहेत व कर्मकांड व धार्मिक कार्याच्या दृष्टिकोनातून त्यांना पवित्र मानले जाते. त्यामुळे निम्नजाती किंवा अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जाती भारतीय समाजव्यवस्थेत प्रभावी जाती झालेल्या नाहीत असे डॉ. श्रीनिवासन यांच्या अभ्यासात आढळून आले. प्रभावी जाती अधिकार, सत्ता व आर्थिक दृष्टयां संपन्न असल्याने या जाती गावातील भांडण तटे मिटवण्यासाठी पुढाकार घेतात. काही प्रसंगी दोषी व्यक्तींना शिक्षा किंवा दंड करतात. अलिकडे लोकसंख्येवर आधारित प्रभावी जात ही संकल्पना पुढे येत आहे. डॉ.एम.एन. श्रीनिवास यांच्या मते आधुनिक समाजव्यवस्थेत प्रभावी जातीचे स्वरुप भिन्न आहे.

पारंपारिक समाजव्यवस्थेत जमीनीची मालकी असणारा आनुवांशिक तत्वावर आधारीत आधिकार प्रतिष्ठ संपादन करणारा, शैक्षिणक वारसा लाभलेला व कमी संख्येचा जाती समुह

प्रभावी जाती म्हणून ओळखला जात असायचा. तर आधुनिक समाजव्यवस्थेत लोकसंख्यात्मक घटकांवर आधारीत प्रभावी जाती संकल्पना अस्तित्वात आल्याचे श्रीनिवास यांनी म्हटले आहे. या समाजातील संख्येने अधिक असलेला जातीय समुह व त्यांचे नेते आपआपल्या प्रादेशिक विभागात जास्तीत जास्त मते मिळवण्यासाठी जातीसमूहाचा आधार घेताना आढळतात. एवढेच नव्हे तर राजकिय पक्ष देखील जातील लोकसंख्येचा विचार करुन उमेदवार निवडतात. एक प्रकारे जातीचा सत्ता मिळवण्यासाठी वापर होवू लागतो. त्यामुळे लोकसांख्यिक घटकांवर आधारित प्रभावी जातीची संकल्पना आधुनिक काळात अस्तित्वात आलेली असली तरी पारंपारिक समाजव्यवस्थेतील प्रभावी जातीचे अस्तित्व संपूर्णतः नष्ट झालेले नाही.

डॉ.एम.एन.श्रीनिवास यांनी India's Village या पुस्तकात काही प्रभावी जातींचा उल्लेख केला त्या पुढील प्रमाणे महाराष्ट्रातील मराठा, केरळमधील नायर, कर्नाटकातील लिंगायत, आंध्रप्रदेशातील कम्मा व रेड्डी, गुजरात मधील राजपूत, तामिळनाडूतील गौडरं, पंजाबातील जाट, व उत्तरप्रदेशातील जोधपूर येथील ठाकूर.

### ६.३.२ सांस्कृतिकीकरण (Sanskritization) :

डॉ.एम.एन. श्रीनिवास यांनी इ.स. १९५२ मध्ये दक्षिण भारतातील "कुर्ग"लोकांच्या सामाजिक व धार्मिक जीवनाचे विश्लेषण करताना सांस्कृतिकरण ही संकल्पना वापरली. २० व्या शतकाच्या मध्यापर्यंत जातीयव्यवस्था अभ्यास एकतर वर्णव्यवस्थेच्या संदर्भात किंवा शुद्धा शुद्धतेच्या संदर्भात केला जायचा. पण श्रीनिवास यांनी जातीव्यवस्थेचे विश्लेषण उर्ध्वगामी गतिशीलतेच्या (upward mobility) संदर्भात केल्याचे आढळते. जातीयव्यवस्थेत गतिशिलता नेहमीच असते.

कनिष्ठ जाती उच्चजातीचे विशेषतः ब्राम्हणांचे कर्मकांड संस्कार, जीवनपद्धती, आहार, पोषाख व अन्य लक्षणांचा स्विकार करते. त्यालाच श्रीनिवास यांनी ब्राम्हणीकरण ही संज्ञा वापरली परंतू काही काळानंतर अभ्यासांती त्यांना असे आढळून आले की, कनिष्ठ जाती केवळ ब्राम्हणाचे अनुकरण करतात असे नाही. तर ब्राम्हणाच्या शिवाय इतर ही उच्च जातीचे अनुकरण करतात. म्हणूण संकुचित वाढणारी ब्राम्हणीकरण संकल्पने ऐवजी सांस्कृतिकीकरण ही संकल्पना वापरली.

सांस्कृतिकीकरण (Sanskitization) या प्रक्रियेत कनिष्ठ जाती आपल्यापेक्षा श्रेष्ठ वा उच्च असलेल्या ब्राम्हण अगर ब्राम्हणेत्तर जातीच्या प्रथा, कर्मकांड, विचारसरणी, राहणीमान व जीवनपद्धती यांचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करतात. असे श्रीनिवास यांनी मांडले.

१) सांस्कृतिकीकरण ही खुप व्यापक संकल्पना आहे. देशाच्या कानाकोपऱ्यातील विविध कनिष्ठ जाती आप-आपल्या भागातील किंवा इतर संदर्भ जाती म्हणून उच्च जातीचे अनुकरण करताना आढळतात. जाट, नायर, लिंगायत, रजपूत मराठा गौंडर इ. उच्च जाती कनिष्ठ जातीच्या संदर्भ जाती म्हणूण ओळखला जातात. या ब्राम्हणेत्तर जातीचे कनिष्ठ जातीच्या कडून अनुकरण केले जाते.

२) सांस्कृतिकीकरण प्रक्रिया दिर्ध व अनिश्चित काळ चालणारी प्रक्रिया आहे. पिढयान् पिढया ही प्रक्रिया चालत राहते.

३) सांस्कृतिकीकरण प्रक्रियेत प्रभावी जातीचे अनुकरण कनिष्ठ जाती करतात.

४) सांस्कृतिकीकरणाच्या प्रक्रियेत कनिष्ठ जाती उच्च जातींच्या धार्मिक विधीच्या अनुकरणाला महत्व देतात श्रीनिवास यांच्या मते उच्च सामाजिक स्थान प्राप्त करण्यासाठी आर्थिक व राजकिय सुबत्ते सोबतच, धार्मिक प्रतिष्ठा असणे गरजेच आहे अशी भावना असलयाने धार्मिक विधीच्या अनुकरणाला कनिष्ठ जाती महत्व देतात.

५) आंधळे व अविवेकी अनुकरण वरिष्ठ जातीचे आचरण, जीवनपद्धती, विचार कोणताही वास्तविक विचार न करता कनिष्ठ जाती स्विकारतात त्यामुळे वरिष्ठ जातीतील काही दोष ही कनिष्ठ जाती स्विकारताना आढळतात.

६) कनिष्ठ जातीनी वरिष्ठ जातीचे अनुकरण केल्यामुळे जीवनमानाचा दर्जा उंचावतो पण सामाजिक दर्जात कोणत्याही प्रकारचे परिवर्तन होत नसल्याचे श्रीनिवास यांना आढळले.

### ६.३.३ पाश्चिमात्यीकरण (Westernlization)

भारतातील सामाजिक परिवर्तनाचे विश्लेषण करताना डॉ.एम.एन. श्रीनिवास यांनी पाश्चिमात्यीकरण ही संकल्पना मांडली.

सुमारे १५० वर्षापेक्षा अधिक काळ ब्रिटिश राजवट भारतात होती. पाश्चात्य संस्कृतीचे ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान नवनवीन संस्था, व मुल्ये इ. घटकांचा भारतीय समाजावर खोलवर प्रभाव पडून परिवर्तनास चालना मिळाली. त्या प्रक्रियेस श्रीनिवास पाश्चिमात्यकिरण असे म्हणतात.

इंग्रजाच्या प्रभावाने भारतामध्ये जे भौतिक, राजकिय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक परिवर्तन घडून आले त्यास पाश्चिमात्यीकरण असे म्हटले आहे.

पाश्चिमात्यिकरणाचा सर्वात मोठा प्रभाव भारतातील शहरावर दिसून येतो. पण भारतीय खेडी ही पाश्चिमात्यीकरणाच्या प्रभावाने थोडयाफार प्रमाणात परिवर्तीत झाल्याचे श्रीनिवास मान्य करतात.

## ६.४ सारांश (Summary)

डॉ.एम.एन. श्रीनिवास यांनी संरचनात्मक प्रकार्यवादी दृष्टिकोनातून भारतीय खेडयाचा अभ्यास केला. त्यांनी संपूर्ण भारतातील खेडयाचा प्रतिनिधीक स्वरुपात अभ्यास करुन खेडयाची समाज व्यवस्था, जाती व्यवस्था व त्याचे स्वरुप त्यामधील परिवर्तनाचा अभ्यास केला. प्रभावी जाती, सांस्कृतिकीकरण, पाश्चिमात्यीकरण या सारख्या संकल्पनाचा वापर करुन भारतीय खेडयाचे वास्तववादी रुप मांडण्याचा प्रयत्न श्रीनिवास यांनी केला. भारतीय खेडयातील जाती व्यवस्थेचे संरचनात्मक रुप प्रकार्यवादी दृष्टिकोनातून मांडले.

## ६.५ संदर्भ ग्रंथ (Reference Books)

1) India’s Village : Dr. M.N.Srinivas
2) http://www.jstor.org
3) chicago journals
4) अभिजात समाजशास्त्रीय विचारवंत : डॉ. आगलावे

## ६.६ सराव प्रश्न

१) डॉ.एम.एन. श्रीनिवास यांचा भारतीय खेडयावरील संशोधनावर चर्चा करा.

२) डॉ.एम.एन.श्रीनिवास यांनी मांडलेली प्रभावी जात संकल्पनेचे सविस्तर विश्लेषण करा.

❖❖❖❖

# ७

# जात, वर्ग व सत्ता

# Caste, Class and Power

**(डॉ. आंद्रे बेतेई)**

**घटक रचना :**


७.० उद्दिष्टये (Objectives)

७.१ प्रस्तावना (Introduction)

७.२ डॉ. आंद्रे बेतेई यांचे संशोधन

७.३ जात, वर्ग व सत्ता (Caste, Class & Power)

- ७.३.१ जात (Caste)
- ७.३.२ वर्ग (Class)
- ७.३.३ सत्ता (Power)

७.४ सारांश (Summary)

७.५ संदर्भ ग्रंथ (Reference Books)

७.६ प्रश्न (Questions)


## ७.० उद्दिष्टे : (Objectives)

१) विद्यार्थ्यांना सामाजिक संशोधनातील क्षेत्रकार्य अभ्यास पद्धतीची व सहभागी निरिक्षण पद्धतीची ओळख करुन देणे.

२) विद्यार्थ्यांच्या मध्ये ग्रामीण समाजाच्या अभ्यासाची आवड निर्माण करणे.

## ७.१ प्रस्तावना (Introduction)

भारतीय समाजाचे वेगळे वैशिष्टये म्हणजे जातीय व्यवस्था होय. भारतात साधारणतः तीन हजार जाती अस्तित्वात आहेत. त्यातील काही प्रबळ तर काही दुर्बल आहेत. ग्रामीण भागाचा अभ्यास करताना ग्रामीण भागातील जाती व्यवस्थेचा अभ्यास करणे अनिवार्य आहे. ग्रामीण भागातील आर्थिक, सामाजिक, राजकिय जीवनात जातीय व्यवस्थेचा प्रभाव मोठा आहे.

ग्रामीण समाजात जातीय व्यवस्थेतून वर्गीय व्यवस्था तयार होते. या दोन घटकांचा उपयोग करुन सत्ता प्राप्त केली जाते. ग्रामीण भागातील सत्ता संघर्ष, जातीय व्यवस्था या संदर्भात अनेक संशोधन झालेली आहेत. डॉ.श्रीनिवास, India's village, मिल्टन सिंगर, बी.एस. कोहन यांनी १९३८ साली structure and change in Indian society जातीय व्यवस्थेचे बदललेले रुप मांडण्याचा प्रयत्न केला. श्रीनिवास यांनी ग्रंथातील Cast in modern India या प्रसिद्ध केलेल्या ग्रंथातील The study of dispute in an Indian Village या लेखात शेतजमीन विषयक हक्कातून निर्माण झालेल्या विभिन्न जाती समुहातील संघर्षाचे विवेचन मांडले आहे. Remembered Village हे पुस्तक डॉ. श्रीनिवास यांनी प्रसिध्द करुन अनेक अभ्यासाकरीता, संशोधकाना ग्रामीण समाजाकडे आकर्षित केले. डॉ. आंद्रे बेतेई यांनी १९६६ साली caste, class and power हा ग्रंथ प्रकाशित करुन ग्रामीण समाजातील जातीय व वर्गीय व्यवस्थेच्या आधारे राजकीय कायदेचे अध्ययन केले.

## ७.२ आंद्रे बेतेई यांचे संशोधन कार्य

आंद्रे बेतेई हे समाजशास्त्रातील अत्यंत प्रतिष्ठीत संशोधक होते. त्यांना समाजशास्त्रातील योगदानाबद्दल पद्मश्री किताबाने सन्मानीत करण्यात आले आहे. समाजशास्त्र संशोधन पद्धती, जात व राजकारण, सामाजिक विषमता ई. विषयावर विविध संशोधन प्रसिद्ध आहेत.

1)समाजशास्त्र : दृष्टिकोन व पद्धतीवरील निबंध (Sociology : Essays on Approch and Method)
2)Society and Politics in India : 1991
3) The Idea of Natural Inequality and other essays
4) Inequiality and Social Change
5) Castes : Old and New
6) Caste, Class and Power : 1965

## ७.३ जात, वर्ग व सत्ता (Caste, Class and Power)

आंद्रे बेतेई यांनी तामिळनाडू राज्यातील तंजावर जिल्हातील श्रीपूरम या खेडयाचा अभ्यास करुन १९६६ साली Caste, Class and Power हा ग्रंथ प्रकाशित केला. ग्रामीण समाजातील राजकीय व्यवस्थेचे अध्ययन करीत असताना त्यांनी क्षेत्र कार्यपद्धतीचा (Field work) व सहभागी निरीक्षण तंत्राचा अवलंब करुन राजकीय व्यवहार व राजकीय वर्तन कोणत्या प्रकारचे असते याचा श्रीपूरम गावात वास्तव्य करुन, बारकाईने अध्ययन केले.

एका ब्राम्हण कुटुंबात वास्तव करुन त्यांना ब्राम्हण व ब्राम्हणेत्तर जातीचे सहसंबंधाचा अध्ययन केले. ब्राम्हण व ब्राम्हणेत्तर जातीचे संबंध कोणत्या प्रकारचे असतात ते कोणत्या मर्यादे पर्यंत तयार झालेले असतात याचे सुक्ष्म निरीक्षण बेताई यांनी केले. हे अध्ययन संख्यात्मक गुणवैशिष्टयांऐवजी गुणात्मक (qualititative) गुणवैशिष्टयावर आधारलेले होते.

डॉ. बेतेई  हे सहभागी निरीक्षणाचे समर्थक होते. त्यांच्या मते कोणत्याही समाजाचे वास्तवता जाणून घेण्यासाठी त्या समाजात वास्तव्य करणे गरजेचे आहे. अभ्यासकाने अभ्यास क्षेत्राची एकरुप झाल्यानंतरच त्यासमाजाचे वास्तव समजते. डॉ. बेताईच्या मते एखादया गृहीत विधानाची (Hypothesis) सत्यता पडताळून पाहतेवेळी सुद्धा क्षेत्रीय कार्यपद्धती व सहभागी निरिक्षणाची मदत घेता येते.

ग्रामीण समाजातील विभिन्न जाती व वर्गीय समुदायांमधील परस्पर विरोधी विचारप्रणालीतून विशिष्ट प्रकारचे विशिष्ट मर्यादे पर्यंत काही संबंध निर्माण होत असतात. व असा परस्पर विरोधी सहसंबंधातून परिवर्तनाच्या असे असले तरी खऱ्या अर्थाने श्रीपूरम मध्ये तीन जातीय गट आहेत. त्यामध्ये अग्रहरम् म्हणजेचे २४% टक्के ब्राम्हण जातीचे अस्तित्व असलेल्या १२ जातीचा गट होय. यामध्ये श्री वैशवांन या ब्राम्हणांसारखे राहणीमान असणाऱ्या जातीचे अग्रहरम् मध्ये अर्धाहून अधिक लोकसंख्या प्रमाण आहे.

जातीय दृष्टया सर्वात मोठा जातीय गट म्हणजे ब्राम्हणेत्तर वर्ग होय. यामध्ये शेतकरी, कुळे व शेतमजूर साहयक जाती, व मनोरंजन किंवा कलाकार जातीचा समावेश होतो. ब्राम्हण व अस्पृश्य यांच्यामधील जातीचा समुह म्हणून या जातीना ओळखले जाते. श्रीपूरम मध्ये ४९% लोकसंख्या ब्राम्हणेत्तर जातींची आहे. श्रीपूरम मध्ये  कोतअ वेल्लाल ही जातीच्या २६ उपजाती आहेत. तर कल्लास ही सुद्धा सर्वात मोठी दुसऱ्या क्रमांकाची जात आहे. अग्राहरम् व चेरी यांच्या मधील सामाजिक दर्जा असणारी जात म्हणजे ब्राम्हणेत्तर जाती होय.

सर्वात तळाचा सामाजिक दर्जा असणारी जात म्हणजे हरिजन होय. दक्षिण भारतात या जातीला आदि द्रविडयन (Adi-Dravidas) असे म्हणतात. ही जात श्रीपूरम मध्ये आढळते. यांना मुळचे रहिवासी द्रविडयन असे म्हणतात. शेतमजूरी हा त्यांचा व्यवसाय आहे.

### ७.३.१ वर्ग (Class)

श्रीपूरम् नावाचा क्षेत्रीय अभ्यास करताना डॉ. बेतेई यांना असे आढळले की, श्रीपूरम मध्ये तीन जातीय गट आहेत. त्याच प्रमाणे तीन आर्थिक वर्ग ही आहेत यामध्ये एक शेतकरी, दुसरा कूल व तिसरा शेतमजूर असे आर्थिक वर्गात विभागणी झाली होती. काही काळानंतर शहरी संस्कृतीचा विकास झाला. पाश्चात शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्या त्यामुळे ब्राम्हणानी आपली जमीन विकून नविन संधी किंवा क्षेत्राची निवड केली. त्यामुळे अनेक ब्राम्हणेत्तर लोकांनी जमिनी विकत घेतलया त्यातील काही थोड्या जमिनी दलित-हरिजन लोकांनी विकत घेतल्या. जमिनीच्या विक्री व्यवहारामुळे मोठया प्रमाणावर सामाजिक परिवर्तन घडून आले. सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेला प्रारंभ होत असतो. ग्रामीण समाजातील जातीय, धार्मिक, वर्गीय व व्यावसायिक वैविध्यतेमुळे ज्या श्रेष्ठ कनिष्ठतेच्या संकल्पना जोपासलया जाऊ लागल्या त्यातून असमानता (Inequality)  विषमता, पिळवणूक प्रधान स्वरुपाचे संबंध निर्माण होऊ लागले व अशा संबंधाचे विश्लेषण आंद्रे बेताई यांनी 1977 साली Inquality among men या ग्रंथात केले. विषमतावादी सहसंबंधाचा राजकीय सत्ता हस्तगत करण्यासाठी राजकीय पक्ष व राजकारणी लोक नेहमीच उपयोग करीत असतात. असा दावा त्यांनी केला आहे. विशेषतः लोकशाही सत्तेच्या विकेंद्री करणामूळे व सहकारी संस्थाच्या आधिकाधिक निर्मितीमुळे सत्तेची अनेक केंद्र ग्रामीण समाजात निर्माण होवू लागली व अशा सत्तेच्या केंद्रस्थानी आपल्या जातीय अथवा वर्गीय किंवा व्यावसायिक समुदायाचे वर्चस्व असावे, या जाणिवेतून विषमतावादी

समजाव्यवस्था प्रयत्न करीत असते असे बेताई यांचे मत आहे. ‘Studie in Agrarian Social Structure’ 1974 साली या ग्रंथात ग्रामीण समाजरचनेत फक्त जातीय समाजव्यवस्थेचा अंतर्भाव होतो असे नाही तर शेती व्यवसायाचा पूरक उरणाऱ्या अन्य व्यावसायिंकाचा व विशेषतः बलूतेदारांचा समावेश होतो. शेतकरी व बलूतेदार, शेतकरी यांच्या व्यावसायिक व आर्थिक हितसंबंधावर आधारलेल्या समाजव्यवस्थेचे अध्ययन करण्याकडे अभ्यासकांनी विशेष लक्ष केंद्रित करावे असे मत बेताई यांनी व्यक्त केले.

### ७.३.२ जात (Caste)

डॉ. आंद्रे बेतेई यांनी जाती व्यवस्थेचा अभ्यास करताना श्रीपूरम गावचा अभ्यास केला. शेतकरी जाती ग्रामीण अर्थव्यवस्थेवर प्रभुत्व असणाऱ्या जाती आहेत. श्रीपुर मधील कावेरी नदी काठावरील  अत्यंत सुपीक जमीनीत भात व इतर नगदी पीक घेवून फायदयामध्ये शेती करत आहेत. डॉ. बेताई यांना तामीळनाडू राज्यातील जातीचा अभ्यास केला. त्यांना श्रीपूरम मध्ये ४२ जाती आढळल्या जमिनीच्या मालकीवरुन सामाजिक वर्गात परिवर्तन घडून आले. तरी ही ब्राम्हण वर्गाने आपले वर्चस्व कायम ठेवले असे बेतेई यांनी आपल्या संशोधन अहवालात नमूद केले.

जातीय निषेध नियमामुळे ब्राम्हण प्रत्येक्ष विकास प्रक्रियेत नव्हते. शेती करण्याचे काम शेतकरी व शेतमजूर करीत होते. पण बदललेल्या कायदयामुळे ब्राम्हण स्वतः शेती व्यवसायात लक्ष घालू लागले त्यामुळे शेतकरी कुळे झाली. व हरिजन यांना शेतमजूर म्हणून काम करावे लागले. तरीही या जाती एकमेकांच्या  जवळ नव्हत्या म्हणून बेतेई यांनी जाती व्यवस्था व आर्थिक सत्ता यांचे अत्यंत धनिष्ठ संबंध असल्याचे स्पष्ट केले.

### ७.३.४ सत्ता (Power)

डॉ. बेतेई यांनी जात, वर्ग व त्यातून मिळणारी सत्ता या संदर्भात संशोधन करतान श्रीपूरम गावचा अभ्यास केला. बेताई म्हणतात राजकीय सत्ता विभागणीमुळे श्रीपूरम मध्ये महत्वाचे बदल घडून आले. आर्थिक सत्ता व राजकीय सत्ता अशा दोन प्रकारच्या सत्ता अस्तित्वात आल्या. राजकिय सत्ता जी जातीय स्तरिकरणातील उच्च जातीना प्राप्त होत होती ती प्रौढ मताधिकारामुळे संख्येने जास्त असणाऱ्या जातीच्याकडे आली. श्रीपूरम मध्ये ग्राम पातळीवर स्थापन झालेल्या संघटनेत ब्राम्हणेत्तर जातीची सत्ता आली. संपूर्ण भारतभर सुरु झालेल्या ब्राम्हणेत्तर चळवळीला कायदे मंडळ, न्यायव्यवस्था व कॉग्रेंस पार्टीने पाठींबा दिल्यामुळे यशस्वी झाली. त्याचाच परीणाम म्हणजे ब्राम्हणेत्तर जाती गाव पातळीवर आपले राजकीय वर्चस्व गाजवू शकले.

डॉ.बेताई या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे श्रेणीकरण नसलेले ब्राम्हण व ब्राम्हणेत्तर असे जातीय तुकडीकरण मांडतात. ब्राम्हण ज्यांच्याकडे आर्थिक सत्ता आहे तर ब्राम्हणेत्तर ज्यांच्याकडे राजकिय सत्ता जी प्रौढ मताधिकाराणी मिळाली आहे बेताई पुढे असे ही म्हणतात की, अग्रहरम्, ब्राम्हणेत्तर व चेरी या तिन्ही जातीय वर्ग एकमेकापासून तुटक आंतर्गत संघर्ष करत असतात.

## ७.४ सारांश (Summary)

डॉ. बेतेई यांनी जात, वर्ग व सत्ता या संदर्भात श्रीपूरम गावचा अभ्यास करताना सहभागी निरीक्षणाचा वापर केला व वास्तव विश्लेषण मांडले. डॉ.बेतेई यांनी ग्रामीण भागातील जातीय संरचना मांडली. ब्राम्हण, ब्राम्हणेत्तर व दलित (हरिजन) असा तीन जातीय गटात त्यांचे वर्गिकरण केले त्याच बरोबर त्यांना शेतकरी जमिनदार, कुळ, शेतमजूर असे आर्थिक वर्ग आढळले. सुरुवातीस आर्थिक व राजकीय सत्ता ही ब्राम्हणांच्याकडे एकवटली होती नंतरच्या काळात आर्थिक व राजकीय सत्ता विभागली गेली आर्थिक सत्ता ब्राम्हणांच्याकडे तर राजकीय सत्ता ब्राम्हणेत्तर जातीनी मिळवली. प्रौढ मताधिकार, न्यायव्यवस्था यामुळे राजकिय सत्ता ब्राम्हणेत्तरांना मिळाली. त्याच काळात सुरु झालेली ब्राम्हणेत्तर चळवळीला यश प्राप्त झाले त्यामुळे ग्राम पातळीवर ब्राम्हणेत्तर जातीना सत्ता प्राप्त झाली.

## ७.५ संदर्भ ग्रंथ (Reference List)

1) Caste, Class and Power: Changing Patterns of stratification in Tanjor Village, Andre Beteille and Los Angeles : University of California Press.

2) भारतीय सामाजिक संशोधन परंपरा :

3) Journal of Asian Studies :

## ७.६ सराव प्रश्न (Questions)

१) आंद्रे बेतेईने केलेल्या श्रीपूरम खेडयाच्या क्षेत्र अभ्यासावर थोडक्यात टिप्पणी करा ?

२) जात, वर्ग व सत्ता संदर्भात आंद्रे बेतेई यांचे विचार सविस्तर लिहा.

❖❖❖❖

# ८

# कार्यवादी दृष्टिकोन ग्रामीण महाराष्ट्रातील औद्योगिक क्षेत्रातील सहकार

**बी.एस.बावीस्कर**

**घटक रचना :**

८.० उद्दिष्टये (Objective)
८.२ प्रस्तावना (Introduction)
८.३ बी.एस.बावीस्करांचा परिचय
८.४ कोपरगाव सहकारी साखर कारखान्याचा क्षेत्रकार्य अभ्यास पद्धतीने व सहभागी निरिक्षण पद्धतीने अभ्यास
 ८.४.१ साखर कारखाना सभासदांची जातीय संरचना व माहिती
 ८.४.२ साखर उद्योगातील सहकार व राजकारण
 ८.४.३ मराठी जातीचे राजकीय प्रभूत्व
 ८.४.४ भ्रष्टाचारा संदर्भातील अनुउत्तरीत प्रश्न
८.५ सारांश (Summary)
८.६ संदर्भ ग्रंथ (Reference List)
८.७ प्रश्न (Questions)

## ८.० उद्दिष्टे : (Objective)

१) विद्यार्थ्यांना सामाजिक संशोधनाची आवड निमार्ण करणे
२) क्षेत्र कार्यपध्दतीची व सहभागी निरिक्षणाची ओळख करुन देणे.

**संकल्पना (Concept)**

**१.१ क्षेत्रकार्य पद्धती :**

अभ्यासकाने निवडलेलया संशोधन विषयानुसार एखादया विशिष्ट क्षेत्राची (विभागाची) अभ्यास क्षेत्र म्हणून निवड करुन त्या क्षेत्राचा उद्देशपूर्ण अभ्यास म्हणजे क्षेत्रकार्य अभ्यास होय.

### १.२ निरीक्षण :

पी.व्ही.यंत्र : "पद्धतशीर पाहाणे व पद्धतशीर पाहण्याबरोबर पाहिलेल्या घटकांची चिकित्सा करणे म्हणजे निरिक्षण होय."

### १.३ प्रकार्यवाद :

Social Theory and Social Structur राबर्ट मर्टन यांनी या ग्रथांत, एका समाजव्यवस्थेची निर्मिती अनेक घटकांनी एकत्र येवून झालेली आहे. त्यातील प्रत्येक घटक संपूर्ण सामाजिक व्यवस्थेच्या अनुकूलनासाठी किंवा पोषणासाठी जे योगदान देतो ते त्याचे प्रकार्य होय.

## ८.१ प्रस्तावना (Introduction)

सामाजिक संशोधन क्षेत्रातील महत्वाची व प्रभावी व विश्वसनीय पद्धती म्हणून क्षेत्रकार्य पद्धतीचा आवलंब अनेक सामाजिक अभ्यासकाकडून केला जातो. क्षेत्रकार्य पद्धतीचा वापर करुन अनेक देशी विदेशी संशोधकांनी आदिवासी, ग्रामीण शहरी तसेच झोपडपट्टी क्षेत्राचा अभ्यास केला. डॉ.एस.सी.दुबे यांनी आंधप्रदेशातील 'शमिर पेठ' खेडयाचा अभ्यास केला. डॉ.डेव्हिड हर्डिमन यांनी गुजरात मधील 'राणी महल' या भागाच अभ्यास केला.

महाराष्ट्रातील ग्रामीण भागात सहकारी तत्वावर साखर उद्योगाची सुरुवात झाली. ऊस उत्पादक शेतकरी एकत्र येवून त्यानी सहकारी तत्वावर साखर उद्योगाची निर्मिती केली. सहकारी तत्वावर सुरु झालेल्या या साखर उद्योगाचा महाराष्ट्रातील ग्रामीण समाजावरील प्रभाव लक्षणिय आहे. सहकारी साखर उद्योगाच्या विकासामुळे महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील आर्थिक, सामाजिक व राजकीय व्यवस्थेत लक्षणीय परीवर्तन दिसून आले आहे. साखर उद्योगाच्या बरोबर सहकारी तत्वावर दुग्ध व्यवसाय, व इतर अनेक व्यवसाय विकसीत झाले. विशेषतः पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, अहमदनगर, सातारा, सांगली, कोल्हापूर इत्यादी जिल्हात ऊस उत्पादन क्षेत्र मोठे आहे. त्यामुळे सहकारी साखर उद्योगाचा विकास पश्चिम महाराष्ट्रात मोठया प्रमाणात झाला. सहकारी साखर उद्योग विकास व ग्रामीण समाज जीवनावरील प्रभावाचा अभ्यास अनेक संशोधन, अभ्यासकांनी केला त्यामध्ये बी.एस.बाविस्कर हे महत्वाचे अभ्यासक आहेत.

सहकारी साखर उद्योगाचा विकास व त्याचा ग्रामीण समाजावरील प्रभाव यांच अभ्यास करण्यासाठी बी.एस.बावीस्कर यांनी कोपरगांव तालुक्यातील (जिल्हा अहमदनगर) कोपरगाव सहकारी साखर कारखान्याची निवड आपल्या संशोधनासाठी 'क्षेत्र अभ्यास' म्हणून निवडली.

## ८.२ बी.एस.बावीस्कर यांचे संशोधन कार्य

बी.एस.बावीस्कर यांनी क्षेत्रकार्य पद्धती व निरिक्षण पद्धतीच्या साह्याने महाराष्ट्रातच नव्हे संपूर्ण भारतातील विविध प्रदेशातील जीवनपद्धतीचा अभ्यास केला. त्यांचे उल्लेखनीय संशोधन कार्य पुढील प्रमाणेः

१) गुजरात मधील दुग्धव्यवसाय विकास : विशेष संदर्भ अमुल व मदर डेअरी
२) भारतातील महिलांचा अभ्यास
३) राजकारणाचा विकास : ग्रामीण महाराष्ट्रातील साखर उद्योग व सहकार
४) भाग भांडवल कुणाचे ? सहकार व ग्रामीण विकास

## ८.३ अहमदनगर जिल्हातील कोपरगाव सहकारी साखर कारखान्याची क्षेत्रकार्य पद्धतील अभ्यास करण्यासाठी निवड

बी.एस.बावीस्कर यांनी महाराष्ट्रातील ग्रामीन भागातील सहकारी साखर उद्योगाचा विकास व त्याचा परिणाम,स्वरुप धडून आलेली आर्थिक, सामाजिक व राजकीय परिवर्तनाचा अभ्यास करण्यासाठी अत्यंत विचारपूर्वक कोपरगाव सहकारी साखर कारखान्याची निवड केली. हा विषय नविन असून वेगळा असल्यामुळे बाविस्करांनी निवडलेलया या विषयाला दिल्ली विद्यापीठाचे समाजशास्त्र विभाग प्रमुख एम.एन.श्रीनिवास व एम.एस.ए.राव यांनी मान्यता दिली.

सन १९६३ बाविस्करांनी अभ्यास विषयाच्या प्राथमिक अभ्यासासाठी महाराष्ट्रातील सर्व कारखान्यांचा अभ्यास करण्याचे ठरवले. त्यावेळी संपूर्ण महाराष्ट्रात २० कारखाने होते त्यातील १७ कारखाने चालु होते ३ कारखान्याचे निर्मितीचे काम सुरु होते. बी.एस.बाविस्करांनी कारखान्यांची माहिती मिळवण्यासाठी कारखान्याचे चेअरमन, सदस्य, सभासद व व्यवस्थापनातील महत्वाच्या पदावशील व्यक्तीच्या मुलाखती घेतल्या.

### ८.३.१ कोपरगाव सहकारी साखर कारखान्याची माहिती :

कोपरगाव सहकारी साखर कारखाना १९५५ पासून साखर उत्पादन करीत आहे. हजारो सभासदांच्या माध्यमातून हा कारखाना चालवला जात होता. साखर कारखाना क्षेत्रातील ऊस उत्पादक विहिरी, कालवा इ. माध्यमातून निर्माण सिंचन क्षेत्रात ऊस उत्पादन घेत होते. कोपरगाव सहकारी साखर करखान्यातील सभासद (shareholder)१७ वेगवेगळया जातीचे होते. त्यामध्ये मोठ्या संख्येने मराठा, माळी, कारेकर, धनगर, ब्राह्मण इत्यादी जातीचे होते. कारखान्याचे कार्यक्षेत्र हे कोपरगाव तालुक्यातील ५९ गांवामध्ये विखुरलेले होते. कारखान्याची आर्थिक बाजू व्यवस्थित होती. कारखान्याने भाग भांडवलावर घेतलेले (Block Capital Loan)४० लाखाचे कर्ज ८ वर्षात पूर्ण भरले. त्यामुळे ऊस उत्पादकांना त्यांच्या ऊसाला चांगला दर देणे कारखाना व्यवस्थापकांना शक्य झाले. अशा अनेक चांगल्या गोष्टीमुळे बाविस्करांनी हा कारखाना संशोधनासाठी निवडला.

### ८.३.२ साखर उद्योगातील सहकार व राजकारण :

बी.एस. बाविस्करांनी संशोधन सुरु करण्यापूर्वी औद्योगिकरण व आर्थिक विकास यांच्या सहसंबंधाचा अभ्यास करण्याचे ठरवले होते. सहकाराच्या माध्यमातून झालेला औद्योगिक विकास व त्या अनुसंधाने धडून येणारा सामाजिक व आर्थिक विकास यांचा अभ्यास करणार होते पण प्राथमिक अभ्यास दौऱ्यामध्ये मिळालेल्या माहितीच्या आधारे महत्वाची निरिक्षणे त्यांच्या समोर आली. त्यामध्ये त्यांना असे जाणवले की सहकारी साखर कारखान्यामध्ये मोठया प्रमाणात राजकारणाचा ही समावेश आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक मोठया साखर कारखान्याची ओळख सहकारा बरोबर एका प्रबळ राजकिय नेत्याशी आहे. बाविस्करांना असे ही जाणवले की त्यातील

बहुतेक कॉंग्रेस पार्टीसी संबंधीत आहेत. प्रत्येक सहकारी साखर कारखान्यात सत्ताधारी पक्ष विरोधी पक्ष व विविध गट आहेत. सहकारी साखर कारखान्याची सत्ता मिळवण्यासाठी सत्ताधारी, विरोधीपक्ष व विविध गट यांच्यात राजकिय घटना घडत असतात. या सर्वांचा परीणाम साखर उद्योग विकास, व्यवस्थापन व सभासद यांच्यावर होतो असे बाविस्करांना जाणवल्यामुळे त्यांनी आपलया संशोधनाची दिशा बदलून स्थानिक राजकारण व सहकारी साखर कारखाना व्यवस्थापन व सहकारीतत्व यांच्यातील सहसंबंध शोधण्याचे ठरवले.

बी.एस. बाविस्कर यांनी सहभागी निरिक्षण पद्धतीचा अवलंब करुन कोपरगाव सहकारी साखर कारखान्याचा अभ्यास केला. जून १९६३ ते १९६४ (ऑगस्ट) या कालावधीत त्यांनी कोपरगाव साखर कारखान्याच्या गेस्ट हाऊस मध्ये राहून अभ्यास केला. कारखाना चेअरमन यांनी बोर्ड ऑफ डायरेक्टर मिटींग मध्ये एक ठराव पास करून बाविस्करांच्या अभ्यासाला परवांगी मिळवून दिली. त्याच बरोबर त्यांना गेस्ट हाऊस मध्ये राहण्याची व्यवस्था केली.गेस्ट हाऊस मध्ये राहिल्यामुळे बाविस्करांना राजकीय व्यक्ती आधिकारी व काही सभासदाी संवाद साधने सोपे गेले.

बाविस्करांनी कोणत्याही स्पष्ट स्वरुपाचे अभ्युगमन न करता संशोधनास सुरुवात केली. सहकार व राजकारण यांच्यातील सहसंबंधा संबंधी बाविस्करांना कल्पना होती पण ती आर्थिक स्पष्ट करण्यासाठी व ती भक्कम बनवण्यासाठी त्यांना कामगार संघटना, सभोवतालच्या कारखाना परिसरातील सहकारी संस्था, राजकिय पक्ष यांच्या मिटींगमध्ये प्रवेश घेतला. त्यांची कार्यपद्धतीचा अभ्यास केला.त्याच बरोबर त्यांनी कृषी अधिकारी, लेखा अधिकारी, यांच्या बैठका घेतल्या त्यांच्याशी चर्चा केल्या व कारखाना व्यवस्थापन जाणून घेतले. ऊस तोडणी व वाहातुकीसाठी रोजारच्या जिल्हातून कामगार आणणेसाठी गेलेल्या कृषी आधिकाऱ्याच्या भेटी घेतल्या त्याच बरोबर कारखान्याला वेळोवेळी भेट देणाऱ्या राजकीय नेत्याशी चर्चा केलयानंतर सहकार व राजकारणातील सहसंबंधाचे चित्र स्पष्ट झाले. बाविस्करांनी कामगार, व्यवस्थापक आधिकारी व कामगार संघटनाचा एक बाजुला अभ्यास केला तर दुसऱ्या बाजुला सभासद व राजकिय नेत्यांचा अभ्यास केला. बाविस्करांना असे आढळून आले की अनेक जातीचा एक ठेवण्याचा मुख्य स्त्रोत म्हणजे राजकारणआहे.

१९६२ च्या शेवटी कोपरगाव सहकारी साखर कारखान्याची निवडणूक लागली. स्थानिक सहकारी पक्ष व स्थानिक कॉंग्रेस पक्ष संघटन यांच्यात सत्ता स्थापनेसाठी संघर्ष सुरु झाला. या दोन्ही पक्षामध्ये प्रमुख नेतृत्व हे मराठा जातीकडेच होते. आप-आपल्या राजकीय पक्षाच्या दृष्टिकोनातून विचार होत होते. या परिस्थितीत बाविस्करांनी अत्यंत चतुराईन दोन्ही पक्षांच्याकडून संशोधना संदर्भात माहिती मिळवली. हे काम तलवारीच्या धारेवर चालण्यासारखे होते.

१९६३ मध्ये बाविस्करांचे संशोधन कार्य मध्यावर आले असतान रोहमरे यांची कारखान्यावरील सत्ता गेली व काळे कोल्हे यांची सत्ता प्रस्तापित झाली. बाविस्करांच्या संशोधनासाठी थोडया समस्या निर्माण झाल्या पण कोल्हे-काळे यांच्याकडून ही सहकार्य मिळाले. त्यांना बोर्ड ऑफ डायरेक्टर मिटींग मध्ये बसण्याची परवानगी मिळाली. पण त्याच वेळी एक घटना धडली की कोपरगाव साखर कारखान्याची स्थिती इतर साखर कारखान्याच्या तुलनेने वाईट होती. साखर उतार कमी होता. अशा वेळी काही तज्ञ व ऊस उत्पादक सभासदांची एक कमिटी अभ्यासासाठी नेमली. या कमिटीने ऊस योग्य तारखेचा व योग्य वेळी कारखान्याने

स्विकारावा अशी सुचना केली. काळे-कोल्हे यांनी ती मान्य केली. विरोधकांनी या घटनेचे राजकारण केले. अभ्यास मंडळातील एक ऊस उत्पादक सभासद या विषयावर बोलू इच्छित होता पण कारखाना चेअरमन यांनी त्याला बोलू दिले नाही त्याच बरोबर त्याला सभागृहा बाहेर जाण्यास सांगितले. बाविस्करांना त्यावेळी समजले की सत्ताधारी व विरोधकांनी त्यांना किती मदत केली आहे व किती मोठे सहकार्य केले आहे.

बाविस्करांना मिळालेल्या सहकार्याचे परतफेड करण्याची संधी मिळाली. कारखाना व्यवस्थापनाने बाविस्करांना महाराष्ट्रातील इतर कारखान्यांचा अभ्यास करुन कोपरगाव सहकारी साखर कारखान्याच्या दैनिय स्थितीस कारणीभूत घटकांचा शोध घेण्याची विनंती केली. बाविस्करांनी ती मान्य करुन महाराष्ट्रातील इतर साखर कारखान्यांचा तुलनात्मक अभ्यास केला. दररोज साखर गाळप, साखर उतारा, उत्पादन प्रक्रिये दरम्यान होणारी साखरेची नासाडी, विजेचा वापर इ. संदर्भात माहिती गोळा करुन कोपरगाव सहकारी साखर कारखाना वाईट अवस्थेत आहे हे स्पष्ट केले. या सर्वासाठी अकार्यक्षम अधिकारी, चिफ इंजिनिअर केमिस्ट जबाबदार आहेत असे सांगितले. पण दोन आधिकाऱ्यांनी त्याचे खापर डायरेक्टरांवर फोडले त्यामुळे त्यांना त्यांच्या नोकऱ्या गमवाण्या लागल्या.

बाविस्करांनी आपलया संशोधनासाठी माहिती मिळवत असतांना बरे वाईट असे बरेच अनुभव आले. काही आधिकाऱ्यांनी माहिती दिली तर काहीनी शंका उपस्थित करुन संदिग्ध माहिती दिली. एक अशिक्षित दलित कामगार तर मुलाखतीसाठी बोलावलयानंतर बाविस्करांच्या पायावर डोके टेकून रडायला लागला. या समस्येतून सुटण्यासाठी बाविस्करांनी प्रश्नावली तयार केली पण उत्तरे समाधान कारक मिळाली नाहीत म्हणून बंधिस्त प्रश्नावलीचा वापर केला पण फारसा फरक पडला नाही. शेवटी बाविस्करांनी अनौपचारिक पद्धतीने माहिती मिळवली. गप्पा, चर्चा, वैयक्तिक भेटी इ. प्रसंगी माहिती मिळूण लागले.

बाविस्करांनी बदललेल्या किंवा आधुनिक क्षेत्रा संदर्भात विचार मांडताना म्हटले आहे की, अभ्यास क्षेत्रात मोठया संख्येने व्यक्ती शिक्षित आहेत. त्याच बरोबर त्यांना बऱ्याच चांगल्या प्रकारे इंग्रजीचे ज्ञान आहे. त्यासाठी त्यांनी आपल्या अभ्यास क्षेत्राचे उदाहरण दिले. बाविस्करांनी आपल्या संशोधन अहवालाच्या काही प्रती, अभ्यास क्षेत्रातील अधिकारी, ऊस उत्पादक व काही नेत्यांना पाठवल्यां सर्वानीच त्या काळजीपुर्वक वाचल्या असे नाही. पण ज्या काही निवडक लोकांनी वाचलया त्यांनी त्यांच्या प्रतिक्रिया कळवल्या. एका कॉंग्रेस विरोधी कार्यकर्त्याने म्हटले आहे की तो निवडणूक लडवण्यासाठी अर्ज भरण्या अगोदर त्याने ३ वेळा संशोधन अहवाह वाचला व निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला व अहवालाच्या मदतने असे कळले की, मागील वेळी आमच्या काय चुका झाल्या होत्या. आता आम्ही त्या चुका टाळयाचा विचार करत आहोत. आपल्या संशोधनाचा उपयोग होतो आहे.

बी.एस.बाविस्कर कोपरगाव सहकारी साखर कारखान्याचा अभ्यास करीत असताना असे जाणवले की, वाङ्मय, लेखी साहित्य व त्याच बरोबर सत्ताधारी व विरोधी पक्ष यांनी राजकारण व सहकार वेगळे असावे हे मान्य आहे. त्याच बरोबर राजकारण सहकारासाठी मारक असलयाचे ही मान्य करतात पण व्यवहारात सहकाराच्या माध्यमातून सत्ता व सत्तेच्या माध्यमातून सहकार हेच समीकरण दिसून येते. कोपरगाव सहकारी साखर कारखान्यामध्ये रोहमरे यांची सत्ता होती. त्यावेळे ते महाराष्ट्र विधानसभा सदस्य (आमदार) होते. त्याच बरोबर जिल्हा कॉंग्रेसचे ते अध्यक्ष ही होते. पण ज्यावेळी विरोधक असणारे काळे-कोल्हे कारखान्याच्या

सत्तेवर आले त्यामुळे रोहमरे च्या जागेवर काळे चेअरमन झाले. नंतर ते आमदार सुद्धा झाले व कॉंग्रेसचे जिल्हा अध्यक्ष ही बनले. त्यामुळे बाविस्कर म्हणतात महाराष्ट्रातील सहकार समजण्यासाठी राजकारण समजले पाहिजे व राजकारणाचा अभ्यास करण्यासाठी सहकार अभ्यासले पाहिजे.

### ८.३.३ मराठा जातीचे प्रभूत्व :

महाराष्ट्रातील ग्रामीण भागात आर्थिक, राजकीय जीवनात मराठा ही एक प्रभावी जात आहे. कोपरगाव सहकारी साखर कारखान्यामध्ये विरोधक व सत्ताधारी दोन्ही पक्षात मराठा हीच प्रभावी जात आहे. त्यामुळे इतर अल्यसंख्याक व छोटया जातीच्या मदतीने सत्ता मिळवून मराठा जाती इतर अल्पसंख्याक जातींना चेअरमन, उपचेअरमन, कार्यकारी संचालक पदावर बसवतात. व त्यांच्या कडून हवे त्या पद्धतीने कार्य करुन घेतात. त्यांना महत्वाची पदे दिली जातात पण त्या पदांच्या अधिकाराचा वापर मात्र मराठा जातीच्या मर्जीनेच होतो. त्यामुळे माळी, कारेकर यांना मिळालेली पदे ही नाममात्र किंवा कटपुतळीच्या बाहुल्या सारखीच असतात. मराठा ही जातीचे नाते संबंध ही सर्वत्र पसरलेले व घट्ट स्वरुपाचे असतात. त्यामुळे मराठा कोणत्याही संघटने शिवाय प्रभावी जात म्हणून प्रस्तापित झालेली आहे.

### ८.३.४ सहकार क्षेत्रातील अनुउत्तरीत प्रश्न भ्रष्टाचार :

बी.एस. बाविस्करांनी दीर्ध अभ्यास केल्यानंतर ही सहकार क्षेत्रात भ्रष्टाचार का नाही हा प्रश्न शिल्लक राहतो. why no corruption ? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा बाविस्कर प्रयत्न करतात. पण त्याचे समाधन होईल अशा पद्धतीची माहिती मिळत नाही. बाविस्कर अभ्यास किंवा संशोधन करत असताना काही गोष्टी जाणवल्या त्या म्हणजे आर्थिक गोष्टी संदर्भात सहकार क्षेत्रात कमालीची गुप्तता पाळली जाते. उघडपणे त्या संदर्भात सत्ताधारी किंवा विरोधक बोलत नाहीत. बाविस्कर सर्वेक्षण करत असताना त्यांना दोन्ही पक्षाच्या कडून सहकार्य मिळाले पण त्यांच्या प्रत्येक हालचालीवर व विरोधक ऐकमेकांवर आरोप प्रत्यारोप करतात काही भ्रष्टाचारीची प्रकरणे लोकांच्या समोर मांडतात. त्यामध्ये कमिशन व इतर गोष्टीचा उल्लेख होतो. ग्रामीण भाषेत पैसे खाल्ले या स्वरुपात चर्चा होते पण विशेष महत्वाचे म्हणजे सभासद शेतकऱ्यांच्या कडून विरोध गंभीर दखल घेतली जात नाही.

त्यामुळे हजारो लोकांच्या कडून दर वर्षी दहा कोटीच्यावर उचल होणाऱ्या क्षेत्राकडे झटपट श्रीमंत होण्याया मार्ग म्हणून पाहिले जाते पण भ्रष्टाचार मात्र समोर येत नाही. हे मात्र बाविस्करांच्या सारख्या अभ्यासकांना विशेष अश्चर्य वाटते.

## ८.४ सारांश (Summary)

बी.एस.बाविस्करांनी कोपरगाव सहकारी साखर कारखान्याचा क्षेत्रकार्य पद्धतीने अभ्यास करुन सहकार व राजकारणाचा सहसंबंध शोधण्याचा यशस्वी प्रयत्न केला. बाविस्करांनी राजकारण व सहकार यांच्यातील सहसंबंध शोधण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्रातील राजकारण व सहकार यांच्यात सहसंबंध आहे. राजकारणातील महत्वाच्या व्यक्ती सहकार क्षेत्रात आहेत. त्याच बरोबर सहकार्य क्षेत्रातील व्यक्ती राजकारणातील महत्वाच्या पदावर हक्क गाजवतात. सहकारातून राजकारण व राजकारणातून सहकार अशा पद्धतीने महाराष्ट्रातील सहकार व राजकारण यांचा सहसंबंध आहे. दुसरी उल्लेखनीय बाब म्हणजे महाराष्ट्राच्या

राजकारण व सहकार क्षेत्रावर मराठा या जातीचे वर्चस्व आहे. महाराष्ट्रातील सहकार क्षेत्राचा विकास व राजकारणाचा विकास सोबतीने झाल्याचे बाविस्करांनी स्पष्ट केले आहे.

## ८.५ संदर्भ ग्रंथ (Reference List)


1) Field And Field Work : It Problem and Challanges M.N. Shinivas

2) Patel Sujata : Sociology in India; Trajectories and Challages. Contributions to Indian Sociology - 45


## ८.६ प्रश्न (Questions)

१) बी.एस. बाविस्करांनी महाराष्ट्रातील सहकार व राजकारण यांच्यातील सहसंबंध कशा प्रकारे स्पष्ट केला आहे ते सविस्तर लिहा ?

२) बी.एस. बाविस्करांच्या संशोधना आधारे मराठा ही महाराष्ट्रातील प्रभावी जात आहे हे सविस्तर सांगा ?

३) बी.एस. बाविस्करांच्या क्षेत्रकार्य संशोधनाच्या आधारे केलेल्या कोपरगाव सहकारी साखर कारखान्यावर सविस्तर टिप्पणी करा ?

❖❖❖❖

# ९

# भारतीय समाजशास्त्राची चिकित्सा

# (Debates in Indian Sociology)

**घटक रचना**


९.० उद्दिष्टये (Objectives)

९.१ जात (Caste)

९.२ जातीची व्याख्या (Caste Definition)

९.३ जातीची प्रमुख वैशिष्टये (Characteristics of Caste)

९.४ वर्ग (Class)

९.४.१ प्रस्तावना (Introduction)

९.४.२ वर्गाच्या व्याख्या (Class Definition)

९.५ वर्गव्यवस्थेची वैशिष्टये (Characteristics of Class)

९.६ भारतीय ग्रामीण समाजातील वर्ग

९.७ जाती-वर्ग-सदय:स्थिती

९.८ सारांश (Summary)

९.९ शब्दार्थ (Glossary)

९.१० महत्वाचे प्रश्न (Questions)


## ९.० उद्दिष्टये (Objectives)

१. जात म्हणजे काय याचा अभ्यास करता येईल.

२. जात आणि वर्ग यातील फरकाचा अभ्यास करता येईल.

३. जातीचा अभ्यास कुठल्या घटकांवर अवलंबून आहे. हे समजून घेता येईल.

४. जातीचे प्रमुख वैशिष्टयचे कोणती हे अभ्यासला येतील.

५. वर्गाचे आधार कोणते याचा अभ्यास करता येईल.

६. वर्ग कसे तयार होतात. वर्गाचे आधार कोणते यावर सविस्तर अभ्यास करता येईल.

७. वर्गव्यवस्थेची वैशिष्टये कोणती याचे परिक्षण करता येईल.

८. भारतीय ग्रामीण समाजातील वेगवेगळया वर्गाची लक्षणे समजुन घेता घेईल.

९. जाती-वर्ग सदयः स्थिती अभ्यासता येईल.

## १.१ जात (Caste)

मराठी भाषेतील जात हा शब्द संस्कृत मधील “जन” या शब्दापासुन तयार झालेला आहे. जन या शब्दाचा अर्थ जन्मने, जन्म घेणे असा होतो. या वरून जात हा शब्दाला इंग्रजीमध्ये caste (कास्ट) हा प्रतिशब्द वापरला जातो. caste हा इंग्लिश शब्द पार्तुगीज भाषेतील caste या शब्दापासून तयार झाला आहे. caste या पोर्तुगीज शब्दाची व्युत्पत्ती caste या लॅटीन शब्दापासुन झाली. caste हा शब्द वंश किंवा मानवसमुह हा अर्थ सुचीत करतो. caste हा शब्द पोर्तुगीजांनी वंशशुध्दतेला उद्देशुन १५६७ साली गोवा मंडलाच्या हूकुमनाम्यात स्पष्ट केलेला आहे. मात्र मानववंशशास्त्रज्ञांनी या संदर्भात संशोधन करून जाती ह्या वंशशुध्दतेचे निदर्शक नसल्याचे स्पष्ट केले आहे.

विशिष्ट मानवी समुह किंवा वंश एवढयापुरताच जातीव्यवस्थेचा अर्थ मर्यादित राहिलेला नाही हे. आजच्या जातीव्यवस्थेच्या स्वरुपावरुन लक्षात येते. जात ही जन्माने ठरते. जातीत गतिशीलतेचा अभाव असतो. एवढेच नव्हे तर प्रत्येक जातीची आचारसंहिताही ठरलेली असते. प्रत्येक जातीचा समाजिक दर्जा कोणता असावा, प्रत्येक जातीचा व्यवसाय कोणता असावा, एका जातीतील व्यक्तीने दुसऱ्या जातीतील व्यक्तीशी कसे वागावे इत्यादी. बाबी ही जातिव्यवस्थेने निश्‍चित केलेल्या असतात. भारतीय ग्रामीण संरचनेत जातिव्यवस्था ही फार महत्वाची व्यवस्था आहे. संयुक्त कुटुंबाप्रमाणेच जात ही एक ग्रामीण समाजातील महत्वपूर्ण संस्था आहे. भारतीय समाजाची उभारणी जाती संस्थेवर झाली आहे. त्यामुळे जाती हा भारतीय ग्रामीण समाजाचा पाया आहे असे म्हटले जाते. जातीव्यवस्था हे परंपरागत भारतीय समाजाचे व्यवच्छेदक लक्षण बनले आहे. भारतीय जातीव्यवस्थेचा इतिहास दिर्धकालीन आहे. व्यक्तीच्या सामाजिक आणि वैयक्तिक जीवनात जातीव्यवस्था महत्वाची भूमीका बजावत असे ग्रामीण भारतातील जातीव्यवस्थेला बंदिस्त वर्गाचे स्वरुप प्राप्त झाले आहे. भारतीय समाजाची एकूण श्रेणीरचना जातीवर अथिष्ठित आहे. भारतीय समाजाची भिन्न भिन्न समूहांत झालेली विभागणी जातीनेच घडवून आणली आहे. आपले बहुतेक सामाजीक व्यवहार जातीसंस्थेवरच आधारीत असतात. व्यक्तीच्या समाजातील स्थान जात व जन्म या वर अवलंबून असते. भारतीय समाजातील विविध समुहांची उच्चनीच या स्तरात जी विभागणी झालेली आहे. ह्याचा मुख्य आधार म्हणजे जात हा घटकच आहे. जातीचे विशिष्ट स्वरुप व कार्यपध्दती यांनी भारतीय समाजजीवन नियंत्रीत झालेले आहे.

## १.२ जातीची व्याख्या : (Caste Definition)

### १. सी.एच. कुले

“When a class is somewhat strictly hereditary we may call it class”.

### २. डॉ. मुजुमदार व मदन यांच्या मते

जात हा एक बंदिस्त वर्ग आहे. Caste is a closed society.

३. **सर हर्बर्ट रिस्ले** यांनी जातीची व्याख्या खालीलप्रमाणे केली आहे. एकच सामान्य नाव धारण केलेल्या, विवक्षित मानवी अगर दैवी अशा काल्पनिक मुळ पुर्वजापासून आपल्या संतान

परंपरेला सुरूवात होते असे मानणाऱ्या, पिठीजात व्यवसाय करणाऱ्या व जे आपले मन व्यक्त करण्यास समर्थ आहेत अशा लोकांकडून तो एक एकजिनसी समुदाय आहे अशी मान्यता पावलेल्या कुटुंबाचा समुच्च म्हणजे जात होय.

"Caste is a collection of families or group of families bearing a common name, claiming a common descent from a mythical ancestor human or divine, professing to follow the same hereditang calling and regarded by those who are competert to give an opinion as forming a single homogeneous community." Sir Herbert Rislay (The people of India.)

४. **डॉ. केतकर** यांनी आपल्या History of caste in India या ग्रंथात जातीची व्याख्या खालीलप्रमाणे दिली आहे.

जात हा पूढील दोन वैशिष्टये असलेला सामाजिक समूह होय. १) विशिष्ट जातीतील सभासदांच्या पोटी जन्मास आलेल्यांनाच त्या जातीचे सदस्यत्व प्राप्त होते. अशा प्रकारे जनमलेल्या सर्वांचा समावेश त्या जातीत केला जातो. २) आपल्या सदस्यांना आपल्या जाती बाहेरील व्यक्तीशी लग्न्न करण्यास कडक सामाजिक नियमांद्वारे प्रतिबंध असतो.

A caste is a social group having two charactoristics 1) Membership is confined to those who are born of members and includes all persons, so born. 2) The members are forbidden by an inevorable social law to Marry outside the group Dr. S.V. Ketkar (History of Caste in India)

५ **डॉ. बाबासाहेब आंबेडकर :**

बहिर्विवाह बंधनावर अंतर्विवाह वर्चस्व प्रस्थापित करणे म्हणजे जात होय. जात हा बंदवर्ग आहे. असे म्हटले आहे.

वरिल विविध त्यांच्यावरून हे स्पष्ट होते कि, जातीव्यवस्थेचे व्यक्तीवर अनेक निर्बंध लादलेले आहेत. व्यक्तीचीं जात तीच्या जन्मावरून ठरत असते. ही जात व्यक्तीला बदलता येत नाही. याशिवाय व्यक्तींने केव्हा, कोणाशी व कशा रितीने विवाह करावा, कोणता व्यवसाय करावा हे तर जातीव्यवस्था ठरवतेच पण त्याशिवायही व्यक्तीच्या सामाजीक व घरगुती जीवनातील मुल्ये, वसतिस्थानाचे स्वरूप सांस्कृतिक भेद इत्यादी बाबीसुध्दा जातीवरून ठरत असतात. व्यक्तीचे समाजातील स्थान तीच्या जातीवरूनच ठरत असते. जातीव्यवस्था ही अत्यंत क्लिष्ठ अशा स्वरूपाची संस्था असुन तीच्या स्वरूपात समानता नाही. म्हणूनच जातीची निश्चित व सर्वसामान्य अशी एकच व्याख्या करणे कठीण आहे.

## १.३ जातीसंस्थेची प्रमुख वैशिष्टये (Characteristics of Caste)

डॉ. धुर्ये यांचे जातीव्यवस्थेचा वैशिष्टयासंबंधीचे विवेचनः डॉ.धुर्ये यांनी कास्ट क्लास अँड ऑक्युपेशन, तसेच कास्ट अँड रेस इंडीया, या त्यांच्या दोन्ही ग्रंथामध्ये जातीव्यवस्थेची पुढील वैशिष्टये सांगीतलेली आहेत.

## १.३.१ समाजाचे खंडात्मक विभाजन (Segmental Division of Society)

जातीव्यवस्थेमुळे संपूर्ण समाजाची वेगवेगळया गटामध्ये किंवा समुहामध्ये विभागणी होत असते. प्रत्येक जातीच्या गट सुसंघटीत व स्वतंत्र असतो. त्याचे स्वतःचे एक वैशिष्टयपूर्ण आणि वेगळे जीवन असते. प्रत्येक समुहाची कार्य , हक्क व दर्जा यामध्ये भिन्नता आढळते. त्याचप्रमाणे हे गट निति-नियम, विवाह, खाणे-पिणे, सामाजिक संपर्क या बाबत परस्परांपासून भिन्न असतात. यात व्यक्तीला मिळणारे सभासदत्व ऐच्छिक स्वरूपाचे नसते. तर जातीव्यवस्थेत व्यक्तीचे सभासदत्व त्या त्या जातीत अनिवार्य असते. आपली जात बदलून व्यक्तीला दुसऱ्या जातीत प्रवेश करता येत नाही. ज्या जातीत व्यक्ती जन्माला आलेली आहे त्या जातीचे सभासदत्व तीला सांभाळवे लागते.

जातीव्यवस्था आस्तित्वात असलेल्या समाजातील व्यक्तीच्या मनात समाजिक भावनेपेक्षा जातीय भावना जास्त प्रबळ असते. ही समुहनिष्ठा सदस्याचे नैतीक कर्तव्य मानले जाते. जातीतील कोणत्याही सदस्यानी नियमांचे उल्लघंन केल्यास जात त्या व्यक्तीला शिक्षा करते किंवा त्यास जातीबहिष्वृत्त केले जाते. व्यक्ती जीवनातील सर्व क्षेत्रे जात या घटकांने नियंत्रीत केलेली असुन जातबांधव जन्म, मृत्यु, उत्सव या कारणांनी एकत्रीत येऊन परस्परांना सहकार्य करतात. अशा विविध बाबीमुळे जातीगट हा एक स्वयंपूर्ण व इतर गटापासुन वेगळा ओळखता येण्याजोगा गट आहे.

## १.३.२ जातीतील श्रेणीरचना (Hierarchy) :

जातीव्यवस्थेत श्रेणीरचनेचे तत्व महत्वपूर्ण मानले जाते. सर्व जातीचा दर्जा समान नसतो. काहीना श्रेष्ठ तर काहीना कनिष्ठ दर्जा मिळालेला असतो. जातीची ही स्वरचना श्रेष्ठ मध्यम आणि कनिष्ठ अशा उतरत्या क्रमाने झालेली दिसते. सामाजिक स्तररचने मध्ये प्रत्येक जातीचे स्थान निश्चित स्वरूपात ठरवून दिलेले असते. या स्तररचने सर्वात वरचा क्रम वा स्तर ब्राम्हणांचा असतो. त्यानंतर क्षत्रीय व त्यापाठोपठ वैश्य यांचा क्रम लागतो. शुद्राचे स्थान सर्वात शेवटी असते.

जात ही जन्माने ठरली असल्याने व्यक्तीला जशी जात बदलता येत नव्हती, त्याप्रमाणे व्यक्तीला आपला समाजातील दर्जाही बदलता येत नव्हता. भारतातील २०० (दोनसे) जातीत व २००० (दोन हजार) पोटजातीत अशीच उत्क्रम रचना आढवून येते. दक्षिण भारतातील कम्मलन जात याला अपवाद आहे. कम्मलन जातीचे लोक स्वतःला ब्राम्हणांपेक्षा श्रेष्ठ समजात. त्यासाठी त्यांचा संघर्ष सतत सुरू आहे. दोन टोकांच्या गटांचे स्थान निश्चित ठरलेले असले तरी इतर जातीच्या बाबतीत श्रेष्ठकनिष्ठां संबंधी प्रतवारी ठरविणे कठीण असते. उदाहरणार्थ तेली, कुळबी, सोनार, इत्यादी जातीच्या बाबतीत कोणती जात श्रेष्ठ या संदर्भात कोणतेही स्पष्ठ नियम नाहीत.

## १.३.३ रोटी-व्यवहार व सामाजिक संबंधावरील निर्बंध (Restrictions of Feeding and Social Intercourse)

जाति व्यवस्थेमध्ये एका जातीने दुसऱ्या जातीशी कोणत्या प्रकारचे सामाजिक संबंध ठेवावेत. त्याचप्रमाणे रोटी व्यवहारा विषयी कोणते निर्बंध पाळावेत यासंबंधी जातीचे कडक नियम होते. या नियमानुसार प्रत्येक जातीतील व्यक्ती काही नियोजीत जातीच्या लोकांच्या हातयेच अन्न

ग्रहण करू शकते किंवा पाणी पिऊ शकते. म्हणजेच स्वजाती या कडून कच्चे अन्न घेणे, सुकी फळे घेणे ग्राह्य होते. मात्र निषिध्द जातीच्या व्यक्तीकडून अन्न व पाणी घेणे अमान्य होते. या नियमामुळे व्यक्तीच्या आचारावर अनेक मर्यादा पडल्या होत्या. उदाहरणार्थ, ब्राम्हण क्षत्रीयाकडून तुपात शिजवलेले अन्न किंवा फळे घेऊ शकतो पण त्याच्याकडून पाण्यात शिजविलेले अन्न तो घेत नसे. कनिष्ठ जातीच्या व्यक्ती मात्र वरिष्ठ जातीकडून कोणतेही अन्नपदार्थ प्राप्त करू शकतात.

सामाजिक संबंधाच्या बाबतीतही जातीव्यवस्थेचे नियम कडक होते. उच्च जातीच्या लोकांना कनिष्ठ जातीच्या लोकांचा स्पर्शसुध्दा आजही ग्रामीण भागातुन निषिध्द मानला जातो. कनिष्ठ जातीतील व्यक्तीच्या स्पर्शाने किंवा तीची सावली जरी अंगावर पडली तरी विटाळ होतो ही कल्पना दक्षिण भारतात तीव्र प्रमाणात आढणते. तामिळनाडू मध्ये ब्राम्हणांशी बोलताना शुद्राने काही अंतर ठेवून बोलावे असा नियम आहे. शाणार या शुद्र जातीने ब्राम्हणांशी बोलताना २४(चोवीस) पावलांचे अंतर ठेवावे असा नियम होता. केरळमध्ये नायर या कनिष्ठ जातीचे लोक नंबुद्री ब्राम्हणांना स्पर्श करीत नव्हते. महाराष्ट्रात या नियमाची तीव्रता अस्पृश्य जातीच्या बाबतीत विशेष दिसून येते. खेडूतांची सेवा करणारे न्हावी व वरिष्ठ हे सुध्दा अस्पृश्यांना वगळत होते.

### १.३.४ सामाजिक व धार्मिक अयोग्यता व विशेषाधिकार (Social and religious disabilities and privilleges) :

श्रेष्ठ-कनिष्ठपणा हा जातीचा स्थाईभाव होता. या श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या तत्वावरच जातीना समाजामध्ये स्थान व विशेष अधिकार मिळत होते. जातीबरोबर पवित्र-अपवित्रतेची भावना जोडली गेली होती. कनिष्ठ जातीना समाजात कोणतेच स्थान नसल्याकारणाने या जाती धार्मिक आणि सामाजिक अधिकारापासून वंचित होत्या. तवढेच नाही तर कनिष्ठ जातीना जगण्यासाठी आवश्यक असलेले सर्वसाधारण अधिकार वा हक्कसुध्दा नाकारले गेले होते. गावात निरनिराळ्या जातीच्या लोकांसाठी राहण्याच्या जागादेखील वेगवेगळ्या होत्या. वरिष्ठ जातीना गावातील मध्यमवर्ती जागा मिळत असे. अस्पृश्य गावाच्या बाहेर राहत असत. कनिष्ठ जाती धार्मिक व सामाजिक जीवनात मुक्तपणे भाग घेऊ शकत नव्हते. कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या जातीना सार्वजनिक विहीरीवर पाणी भरता येत नव्हते व शाळेतही प्रवेश नव्हता. महाराष्ट्रात अस्पृश्यांना रस्त्यावर थुंकण्याचीही बंदी होती. इतरांना त्यांचा विटाळ होऊ नये म्हणून कमरेला झाडू बांधावा लागे. जेणेकरून त्याच्या पावलाचे ठसे पुसले जातील. थुंकण्यासाठी गण्यात मडके बांधलेले असे. हातात घूंगराची काठी ध्यावी लागे. गुजरात मध्ये अस्पृश्यानी आपली ओळख पटावी म्हणून जनावरांची शिंगे जवळ बाळगली पाहिजेत असा नियम होता.

कनिष्ठ जातीने कोणत्या तऱ्हेचे कपडे धालावेत, भांडी वापरावीत व अलंकार धालावेत यासाठीसुध्दा नियम होते. मलबारमधील इसवाज व शाणार या शुद्रांनी छत्र्यांचा, सुवर्णाचा, चपलाचा वापर करावयाचा नाही असा नियम होता. धार्मिक बाबतीत शुद्रांना वेदाचे अध्ययन, पठण करण्यास बंदी होती. वैदिक संस्कार करण्याचा हक्क फक्त ब्राम्हणांनाच होता. एकूणच ग्रामीण सामाजीक जीवन या विविध बाबीनी पोखरलेले होते.

### १.३.५ व्यवसाय निवडीवर निर्बंध : (Lack of Unrestricted choice of occupation):

प्रत्येक जातीचा एक विशिष्ट व्यवसाय ठरलेला असे. तो परंपरागत व्यवसाय एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जात असे. स्वतःच्या इच्छेनुसार व्यवसाय निवडण्याचे स्वातंत्र्य त्या जातीतील लोकांना नव्हते. व्यवसाय आणि जाती यांच्यातील परस्पर संबंध व परस्परावलंबीत हे भारतीय जातीव्यवस्थेचे प्रदान वैशिष्टये आहे. प्रत्येकाने आपल्या जातीच्या वाटयाला जो व्यवसाय आला आहे. तोच व्यवसाय केला पाहिजे असा नियम होता. ब्राम्हणांचा व्यवसाय अध्ययन करणे, क्षत्रियांचा व्यवसाय संरक्षण करणे व सैनिक क्षेत्र सांभांळणे, वैश्यांनी शेती व व्यापार करणे, तर शुद्राना इतर कनिष्ठ सेवा कराव्या लागत असत. व्यापार शेतीव्यवसाय व सैनिकी व्यवसाय बहुतेक सर्वच जातीकरीता मोकळे होते पण सहसा जातीच्या व्यवसायात बदल दिसून येत नव्हता. एकापरीने प्रत्येक व्यक्तीला मिळालेले हे आर्थिक संरक्षण होते.

### १.३.६ विवाहावरील निर्बंध : (Restriction on marriage) :

आंतरविवाहाचे नियम हे जाती व्यवस्थेचे एक महत्वाचे वैशिष्टय आहे.हिंदूधर्मात आंतरजातीय विवाहावर कडक निर्बंध घालण्यात आले आहेत. जात हा आंतरर्विवाही गट आहे. या गटात प्रत्येक जातीतील व्यक्तीने आपला जोडीदार आपल्याच जातीतुन निवडला पाहिजे असा नियम आहे. हे विवाहविषयक बंधन अतीशय काटेकोर पणे पाळले जात असत या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यास कडक शासन दिले जाईल. म्हणूनच वेस्टर्न मार्क म्हणतात, आंतर्विवाह हाच जातीचा कणा होता. आंतर्विर्वाह निर्बंधात अनुलोम प्रतिलोम विवाहाचा अपवाद आढळतो. अनुलोम विवाहात उच्च जातीतील पुरूष कनिष्ठ जातीच्या स्त्रीबरोबर विवाह करू शकत असे. मालबारमधील नंबद्री व इतर ब्राम्हण जातीतील पुरूष नायर स्त्रीबरोबर विवाह करीत असे. आजही आंतरविर्वाहचा नियम पुर्वीइतवाच प्रभावी असलेला दिसून येतो.

### १.३.७ आनुवंशिकता :

व्यक्तीची जात तीच्या जन्मावरू ठरविण्यात येत असल्यामुळे जातीला जन्मतत्वावर आधारीत गट असे म्हटले जाते. जन्म हा जातीचा आधार असतो. त्यामुळे ज्या जातीमध्ये व्यक्ती जन्मास येते तीच जात त्या व्यक्तीस कायम चिटकते. तीचा दर्जा हा तीच्या जातीवरून निश्चित केला जातो. एकदा मिळालेला हा दर्जा त्यांना बदलता येत नाही कनिष्ठ जातीची व्यक्ती उच्च जातीत किंवा उच्च जातीतील व्यक्ती कनिष्ठ जातीत प्रवेश करू शकत नाही.

वरिल वैशिष्टयाच्या आधारे जातीव्यवस्था ही सामाजीक स्तरीकरणाच्या प्रकारातला असा प्रकार आहे की, जात ही सामाजीक दर्जा व व्यवसाय हा जन्मनेच ठरतो. या व्यवस्थेत सामाजीक गतिशीलतेचा अभाव आहे. विवाह संबंध व सामाजिक संबंध या बाबतही निश्चित नियम आहेत. या नियमांचे उल्लंघन व्यक्तीनी केल्यास त्याला शासन केले जाते. या संस्थेला धर्माचे अधिष्ठान असलेले दिसते.

मात्र आधूनीक काळात आधूनीक तंत्रज्ञान वाढते उदयोगीकरण, दळणवळणाची आधूनीक साधने,पार्श्मिात्य संस्कृतीचा संपर्क, समाज सुधारकांच्या चळवळी, प्रशासकीय कायदे या व इतर अनेक कारणानी जातीव्यवस्थेची बंधने शिथील होताना दिसत आहेत.

**आपली प्रगती तपासा**

१) जात या संकल्पनेवर चर्चा करा.

२) जात या संकल्पना कुठल्या घटकांवर आधारलेली आहे. यावर चर्चा करा.

## १.४ वर्ग (Class)

### १.४.१ प्रस्तावना :

गेल्या शंभर दिडशे वर्षाच्या काळात जातिव्यवस्थेत शिघ्रगतीने परिवर्तन झाले. आज सामाजिक दर्जाकरीता जन्म हा आधार राहिला नाही. व्यक्तीच्या पात्रतेनुसार व्यवसाय निवडण्याची समान संधी घटनेने सर्वांना दिलेली आहे. याच अर्थाने आज जाती वर्गात परिवर्तीत होत आहेत. प्रत्येक समाजात श्रेणीरचना आढणून येते वर्गविहीत समाज जगातलया कोणत्याच समाजात दिसून येत नाही.

सामाजिक स्तरीकरणाचे स्वरूप सार्वत्रीक आहे समाजातील प्रत्येक व्यक्तीला एक विशिष्ट स्थान असते. व्यक्तीचे स्थान लिंग, वय, कुळ, गुणवत्ता, व्यवसाय इत्यादी गोष्टीवर अवलंबून असते. व्यक्तीच्या स्थानानुसार तीचा दर्जा ठरत असतो. दर्जाच्या अनुषंगाने व्यक्तीला भुमीका पार पाडाव्या लागतात दर्जामध्ये व्यक्तीला अधिकार प्राप्त होतो. तर भुमीके मध्ये कर्तव्य आणि जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. समान सामाजिक दर्जा प्राप्त झालेल्या व्यक्तीचा एक वर्ग तयार होत असतो. एकाच वर्गातील सदस्यांत सामाजिक वर्तन त्याची जीवनमुल्ये आर्थिक स्थिती, व्यवसाय या बाबतीत समानता आढळून येते. कोणत्याही समाजात अशा प्रकारचे अनेक सामाजीक वर्ग असतात. सामाजीक वर्ग हा व्यक्तीच्या सामाजीक दर्जावर अवलंबून असतो. आणि प्रत्येक वर्ग हा दुसऱ्या वर्गाच्या तुलनेत श्रेष्ठ किंवा कनिष्ठ असतो. प्रत्येक वर्ग आपली प्रतिष्ठा व दर्जा टिकूण राहावा यासाठी प्रयत्नशील असतो.

### १.४.२ वर्गाच्या व्याख्या (Class Definition)

१. **मॅकआयव्हर व पेज** यांनी वर्गाची व्याख्या पूढील प्रमाणे केली आहे.

“सामाजिक वर्ग हा समुदायाचा असा हा भाग आहे, कि जो सामाजिक दर्जामुळे इतर भागापासून वेगळा असतो.”

“A Social class is any portion of community marked off from the rest by social status.”

**२. ऑगबर्न व निमकॉफ यांच्या मते**

"एखादया विशिष्ट समाजात समान किंवा सारखा दर्जा असलेल्या व्यक्तींचा जो एक गट तयार होतो तो गट म्हणजेच सामाजीक वर्ग होय."

"A Social class is the aggregate of person having essentially the same status in a given society."

**३. गिन्सबर्ग यांच्यामते**

वर्ग हा अशा व्यक्तींचा समुह आहे की, जो समान वंशपरंपरा संपत्ती, शिक्षण व व्यवसाय यांच्या आधारावर समान जीवनपध्दती, समान विचारसरणी व प्रवृत्ती जपत असतो व या अगर यातील काही कारणाने हे सदस्य परस्परांना समान भुमीकेवरून भेटत असतात व परस्परांना आपल्या एकाच समुहाचे सदस्य मानतात.

A class is a grouo of individuals, who through common descent, familiarity of occupation, health and education have come to have a similar mode of life, similar stock of ideas, feeling, attitudes and forms of behaviour, who on any or all of these grounds meet one another on equal terms and regard themeselves, although with a varying degrees of explietness as belonging to one group." (Ginsberg)

४. **लेपियर** यांच्या मते :

"संपूर्ण लोकसंख्येत विशिष्ट स्थान किंवा दर्जा मिळालेला सांस्कृतीक समुह म्हणजे सामाजीक वर्ग होय."

"A Social class is cultirally defined group mat accorded a prticular position or status within the population a whole" (R.T. Lapire)

५. **गिटलर** यांनी सामाजिक दर्जाचा विचार करताना दर्जानुरूप प्राप्त होणाऱ्या अधीकाराला व कर्तूत्वाला अधिक महत्व दिले आहे ते म्हणतात.

"सामाजिक वर्ग अशा व्यक्तीचा गट आहे की, ज्या गटाचे काही विशेष अधीकार व कर्तव्य असतात हे अधीकार व कर्तव्य त्यांना प्रामुख्याने या गुणांमुळे प्राप्त होतात की जे गुण त्या विशिष्टसंस्कृतीच्या दृष्टिने श्रेष्ठ असतात."

A social class may be defined as a catergory of person with a self a privileges, responsibilities, power, obtained through their position of a common degree of those qualities are appraised by values in a particular culture." (J.B. Gettler)

## १.५ वर्गव्यवस्थेची वैशिष्टये (Characteristcs of Class)

### १.५.१ सामाजिक दर्जा :

प्रत्येक समाजात अनेक गट असतात. प्रत्येक गटाचा एक विशिष्ट दर्जा असतो. हया दर्जानुसार समाजात त्यांना श्रेष्ठ किंवा कनिष्ठ स्थान मिळालेले असते. व्यक्तीच्या या विशिष्ट स्थानाचा विचार करूनच तीच्या सामाजिक वर्गाची निश्चिती केली जाते.

### १.५.२ श्रेष्ठ - कनिष्ठ भावना :

समाजातील सर्व वर्ग गटाचे संबंध श्रेष्ठ - कनिष्ठतेचा भावनेतुन निर्माण झालेले असतात. एखादा विशिष्ठ वर्ग हा इतर वर्गाच्या तुलनेत श्रेष्ठ किंवा कनिष्ठ समजला जातो. परस्परांत विशिष्ट सामाजिक अंतर ठेवूनच परस्पर विरोधी भूमिकेतून हे वर्ग वर्तनव्यवहार करीत असतात आणि स्वतःचा वर्ग टिकवून ठेवतात. उच्च व कनिष्ठ वर्गातील लोकांच्या मनात श्रेष्ठ-कनिष्ठत्वाची भावना प्रखर असते.

### १.५.३ सोपान परंपरा :

समाजात सर्वच वर्गाना समान दर्जा मिळत नसतो. प्रत्येक गटाचा एक विशिष्ट दर्जा असतो. या दर्जानुसार समाजात त्याना चढत्या किंवा उतरत्या क्रमाने एक स्थान असते. श्रेष्ठ वर्गातील लोकांचे समाजातील स्थान उच्च असते व कनिष्ठ वर्गातील लोकांचे स्थान खालचे असते. मध्यकालीन समाजात राजघराण्यातील लोकांचे वर्ग सर्वश्रेष्ठ होता तर त्यापाठोपाठ सरदार मंडळी आणि सर्वसाधारण शेतकरी व कारागीर लोकांचा वर्ग होता. रोमन साम्राज्यात तीन प्रमुख वर्ग होते. १) उच्चकुलीन वर्ग २) सर्वसामान्य जनतेचा वर्ग ३) गुलामांचा वर्ग. आधूनीक युगात विचारवंतानी श्रीमंत व गरीब असे दोन प्रमुख वर्ग मानले आहेत.

### १.५.४ जन्माचे नगण्य महत्व :

वर्गव्यवस्थेत व्यक्तीचा वर्ग ठरविताना व्यक्तीचा जन्म विचारात घेतला जात नाही. म्हणजेच व्यक्तीचा जन्म हा वर्गाचा आधार नसतो. व्यक्तींच्या जन्मावरून तीचा वर्ग ठरत नसल्यामुळे कनिष्ठ वर्गात जन्माला आलेली व्यक्ती स्वतःच्या कर्तव्यावर उच्च वर्गात जाऊ शकते. अशा तऱ्हेने वर्गात गतीशीलता दिसून येते. व्यक्तीचे पूर्वज कनिष्ठ वर्गातले असले तरी स्वतःच्या गुणवत्तेने, कौशल्याने, स्वसामर्थ्यांने ती व्यक्ती उच्च वर्गात प्रवेश मिळवून स्वतःच्या आणि पूर्वजांचा देखील दर्जा श्रेष्ठ करू शकते. त्याचबरोबर उच्च वर्गात जन्माला आलेली व्यक्ती गुणवत्तेने अपात्र असेल तर त्या व्यक्तीचा कनिष्ठ वर्गात समावेश होतो. थोडक्या या स्तरीकरण प्रकारात व्यक्तीला एका वर्गातुन दुसऱ्या वर्गात प्रवेश मिळविता येतो.

### १.५.५ वर्गाची अस्थिरता :

वर्ग हा अस्थिर स्वरूपाचा समुह आहे. संपत्ती, शिक्षण, व्यवसाय हे वर्गाचे अधारभुत घटक आहेत. मुळात हे घटकच परिवर्तनशील आहेत. व्यक्तीची आजची शैक्षणीक व आर्थिक स्थिती परिस्थितीनुरूप व काळानुरूप बदलत असते. आज गरीब असणारी व्यक्ती स्वकर्तत्वाने उदया श्रीमंत होऊ शकते. मात्र व्यक्तींच्या सामाजीक दर्जात काही अंशी स्थैर्यही असते. वर्गव्यवस्थेत निर्माण झालेल्या सर्व वर्गाचा व दर्जा सापेक्षतः स्थिर असल्याने त्यांना सापेक्ष स्थिर गट असेही म्हणतात.

### ९.५.६ मर्यादित सामाजिक संबंध :

वेगवेगळ्या वर्गाचे परस्परांशी असलेले सामाजिक संबंध मर्यादित असतात. वर्गजाणिवेमुळे एकाच वर्गातील व्यक्तीमध्ये आपल्या वर्गाविषयी आत्मीयतेची भावना वाठीस लागते. उलट निरनिराळ्या वर्गाच्या लोकांमध्ये असा आवलेपणा आढणून येत नाही. त्याचे परस्परांशी असलेले सबंधं मर्यादित असतात. कारण या संबंधात श्रेष्ठ-कनिष्ठत्वाची भावना असते. वरिष्ठ वर्गातील लोक कनिष्ठ वर्गातील लोकांशी तुटकपणाने वागत असतात. तथापी गरज म्हणून कनिष्ठ वर्गातील लोकांना वरिष्ठ वर्गातील लोकांशी जुळवून ध्यावे लागते. थोडक्यात श्रेष्ठ-कनिष्ठत्वाच्या भावनेमुळे व्यक्तींच्या संबंधावर मर्यादा येतात.

### ९.५.७ सार्वत्रियता :

वर्गव्यवस्थेचे स्वरूप सार्वत्रिक आहे. समाज मग तो कोणताही असो प्रत्येक समाजात वर्गव्यवस्थेचे अस्तित्व दिसून येते. सामाजिक दर्जा ठरविण्याचे निकष प्रत्येक समाजात वेगवेगळे असले तरी समाजात वर्गव्यवस्थेचे अस्तित्व निर्विवाद आढळून येते ही वस्तु स्थिती आहे.

थोडक्यात कार्ल मार्क्स यांनी वर्ग विभाजनासाठी आर्थिक आधारच प्रमुख मानला आहे. समाजात श्रीमंत वर्ग व श्रमिकांचा वर्ग असे दोन प्रकारचे वर्ग असतात. वेठलेन यांनी शारीरिक श्रम हाच वर्गविभाजनाचा आधार मानला आहे. ऐश्वर्यात जीवन जगणाऱ्यांच्या वर्गास वेठलेन विकासी वर्ग असे म्हणतात. त्यानी मध्यमवर्गाची कल्पना स्पष्ट करताना असे म्हटले आहे की, हा वर्ग विलासी वर्गाचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करतो. पण तो तितका श्रीमंत नसतो.

वर्ग आणि जात या सामाजिक स्तरीकरणाच्या दोन्ही प्रकारांत काही मुलभूत फरक दिसून येतो. जात आंतरर्विवाही समुह आहे. मात्र वर्गातील सदस्य दुसऱ्या वर्गाशी विवाह-संबंध प्रस्थापीत करू शकतात. जाती संस्थेत खानपान व सामाजिक संबंधावर निर्बंध घातले जातात, मात्र वर्गव्यवस्थेत असे निर्बंध दिसून येत नाहीत. जात जन्मानुसार ठरते. जन्माने ठरलेले सभासदत्व कायम असते. मात्र वर्गांचे सभासदत्व संपत्ती, शिक्षण, व्यवसाय यानुसार ठरत असते. जातीत व्यवसायाची निश्चिती असते. परंतु वर्गव्यवस्थेत व्यक्तीला व्यवसाय निवडीबाबत पूर्ण स्वातंत्र्य असते. जात बदलता येत नाही पण स्वसामर्थ्यांच्या बळावर वर्ग बदलता येतो म्हणजे एका वर्गातुन दुसऱ्या वर्गात व्यक्ती प्रवेश करते.

**आपली प्रगती तपासा.**

१) वर्गव्यवस्थेची वैशिष्टय सांगा.

२) वर्ग ही संकल्पना स्पष्ट करा.

३) जातीची व्याख्या सांगून तिची वैशिष्टये स्पष्ट करा.

## ९.६ भारतीय ग्रामीण समाजातील वर्ग

### ९.६.१ प्रस्तावना :

भारतीय ग्रामीण समाज अनेक विभागांमध्ये विभागला गेला आहे. ग्रामीण समाजातील स्तर रचनेचा जातीव्यवस्था हा महत्वाचा आधार होता. जातीव्यवस्थेची पाळेमुळे ग्रामीण समाजात अदयापदी मुळ धरून आहेत. ग्रामीण समाजातील सामाजिक स्तरीकरणाचा अभ्यास करताना त्या ठिकाणी अस्तित्वात असलेल्या सामाजिक वर्गाचाही विचार करावा लागतो. स्वातंत्र्योत्तर काळात आर्थिक, सामाजिक व राजकीय घटकाच्या प्रभावामुळे जातीव्यवस्थेचे बंधन ग्रामीण समाजात खूपच शिथिल झाले आहे. आधूनिक औदयोगिकरणामुळे ग्रामीण समाजातील परंपरागत व्यवसाय लयाला जात आहेत. म्हणूनच ग्रामीण भारतातील वर्गाचे स्वरूप समजावून घेणे गरजेचे आहे.

भारतातील ग्रामीण समाज हा मुख्यतः कृषिप्रधान समाज आहे. ग्रामीण जनतेचा शेती हाच मुख्य व्यवसाय आहे. शेती हेच त्यांच्या उपजीविकेचे साधन आहे. स्वातंत्र्योत्तर काळात शासनाने औदयोगिक विकासाचे कार्यक्रम हांती घेतले असले तरी ग्रामीण भागात उदयोगधंदाची फारसी वाढ झाली नाही. भारतातील ८० % लोक खेडयांत राहतात व एकूण लोकसंख्यापैकी ६९ % लोक प्रत्यक्ष शेतीत काम करून आपली उपजीविका भागवितात. साहजिकच आजशुध्दा भारतीय ग्रामीण समाजाच्या स्तररचनेचा शेती या व्यवसायाशी जवळचा संबंध आहे.

उच्च, मध्यम आणि कनिष्ठ असे वर्ग आधुनिक समाजात दिसून येतात, तसेच वर्ग ग्रामीण समाजातही आढळतात. ग्रामीण समाजातील वर्गरचनेचा पाया शेती हा आहे. साहजिकच ग्रामीण समाजात खालील वर्ग आढळून येतात.

### ९.६.२ जमिनदार व मोठे शेतकरी :

भारतातच्या ग्रामीण समाजातील सर्वात श्रीमंत आणि सधन वर्ग म्हणून या वर्गाचा उल्लेख केला जातो. ग्रामीण समाजातील संपूर्ण आर्थिक व सामाजिक संपूर्ण आर्थिक व सामाजिक जीवन या वर्गाने नियंत्रीत केले आहे. हा वर्ग सर्वात प्रबळ असल्यामुळे याच्या हातात बरीचशी सत्ता एकवटलेली असते. हा वर्ग संख्येने अगदी अल्प आहे. त्यांनी एकूण जमीनीच्या फार मोठया क्षेत्रावर आपली मालकी प्रस्थापीत केली आहे. सुमारे १०% लोकांकडे ५०% हून अधीक शेतजमिनीची मालकी आहे. विकास योग्य असलेल्या जमीनीपैकी ११% जमीन एक टक्का वर्गाकडे आहे. बाकीच्या ९९% जमीन मालकांकडे ८९% एवढी जमीन शिल्लक आहे.

ब्रिटिशपूर्व भारतीय ग्रामीण समाजात बरीच परिवर्तने घडून आली आहेत. निर्वाहप्रधान अर्थव्यवस्था ग्रामपंचायत, जाती व कुटुंब यांचा प्रभाव व आर्थिक स्वयंपूर्णतेने शेती व बिगर शेतीवर अवलंबून असणाऱ्यांमधील सम्नवय ही ब्रिटिशपूर्व ग्रामीण समाजाची वैशिष्टये होती. ब्रिटिशांच्या आगमनानंतर भारतीय खेडयांचा कायापलट झाला. १९७१ च्या शिरगणतीनुसार भारतात विविध क्षेत्रात जे लोक काम करतात. त्यापैकी एकटया शेतीच्या क्षेत्रात २/३ लोक काम करीत आहेत.

जमीनदार व मोठे शेतकरी या वर्गाकडे जमीनीची मालकी असली तरी या वर्गातील लोक स्वतः जमीन कसत नसत. शेतीवर उपजीविका करणारी कुळे व भुमीहीन शेतमजूर

यांच्यामार्फत जमीनी करून घेतात आणि जमिनीतील उत्पन्नाच्या मोठा वाटा उचलतात. या वर्गाची आर्थिक स्थिती चांगली असते. सहकारी चळवळीचा फायदाही याच वर्गाने अधिक घेतलेला आहे. परिणामतः ग्रामीण समाजावर त्यांचीच पकड अधीक मजबूत झाली आहे. स्वातंत्र्योत्तर काळात शासनाने ग्रामीण समाजातील आर्थिक विषमता दूर करण्यासाठी अनेक उपाय योजीले आहेत. मात्र अनेक कायदे करूनही जमीनदाराची जमीनमालकी होती तशीच आहे. आर्थिक विषमता नष्ट करण्यासाठी शासनाने कमाल जमीन धारणा विषयक कायदा केला. या कायदयातील अनेक त्रुटींमुळे अमलबजावणीत अडथळे निर्माण झाले. निरनिराळ्या घटकराज्यानी केलेल्या या संबंधीच्या कायदयात एकवाक्यता नाही. त्यामुळे या कायदयानां शेतजमिनीच्या मालकीविषयीच्या विषमतेस दूर करण्यात अपयश आले आहे.

### १.६.३ सावकार व व्यापारी :

ग्रामीण समाजातील दुसरा प्रभावी वर्ग म्हणजे शेठ, सावकार आणि व्यापारी हा होय. भारतातील गरीब ग्रामीण जनता प्राचीन काळापासून सावकारशाहीच्या विळख्यात सापडली असल्याचे दिसून येते. ग्रामीण समाजातील बहुसंख्य जनता दारिद्रयातच आपले जीवन घालवीत असल्यामुळे तीला अडीअडचणीच्या वेळी सावकाराचा आश्रय घेण्याशीवाय पर्याय नसे. ग्रामीण भागातील सधन जमीनदाराच सावकारी करीत असे. म्हणजेच सावकार आणि जमीनदार यांची भूमिका सारखीच होती. सावकार गरीब जनतेच्या अडीअडचणीचा कायदा घेऊन भरमसाठ व्याजाने कर्ज देत असत. या व्यवहारात फक्त शब्दावर विश्वास ठेवून सर्वकाही केले जाते. कर्जाची रक्कम आणि त्यावरील व्याज देने शेतकऱ्याना अशक्य होई. म्हणूनच म्हटले जाते की भारतीय शेतकरी कर्जात जन्मतो. कर्जात वाढतो. कर्जात मरतो. अलीकडील काळात शासकीय उपाययोजनामुळे सावकारशाहीला थोडासा आळा बसलेला आहे. मात्र अजुनही काही प्रमाणात खेड्योपाडयांत हा वर्ग अस्तित्वात आहेच.

### १.६.४ मध्यम शेतकरी :

ग्रामीण समाजात ज्यांच्याकडे स्वतःच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करता येईल, एवढी जमीन असते, अशा शेतकरी कुटुंबाचा समावेश मध्यम शेतकरी या वर्गात होतो. या वर्गातील शेतकरी स्वतः कष्ट करून आपली जमीन पिकवितो. या वर्गाकडे जमीनीचे क्षेत्र बऱ्यापैकी असले तरी अज्ञान, भांडवलाचा अभाव मागासलेली उत्पादन साधने. निरक्षरता यामुळे त्यांचे शेतीतुन निघणारे उत्पन्न जेमतेमच असते. कष्ट अधीक व उत्पन्न कमी यामुळे हा शेतकरीही दारिद्रय आणि कर्जबाजारीपणाचा बळी ठरतो. ज्यांच्याकडे सहा एकरापासून तर एकोण पन्नास एकरा पर्यंत जमीन असते. त्यांच्या मध्यम शेतकऱ्यांत समावेश होतो.

### १.६.५ लहान शेतकरी :

ज्या शेतकऱ्यांच्या मालकीचे जमीनीचे क्षेत्र अतिशय अल्प किंवा तोकडे असते. त्यांचा या वर्गात समावेश होतो. देशात अशा शेतकऱ्यांची संख्या प्रचंड आहे. जमीन कमी असल्याने उत्पन्नही कमी त्यामुळे या वर्गातील लोकांना आपल्या उदरनिर्वाहासाठी जमीनदाराकडे शेतमजुर म्हणून राबावे लागे. या वर्गातील शेतकरी कुटुंबाजवळ स्वतःच्या मालकीची पाच एकरापेक्षा कमी जमीन आहे. आणि भारतात अशा शेतकरी कुटुंबाची संख्या सुमारे ७२% झाली आहे. या वर्गातील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती नेहमीच हलाखीची असते. ग्रामीण समाजातील लहान शेतकरी पराकोटीच्या दारिद्रयात जीवन जगत असतो. कारण हा शेतकरी ना शेतकरी असतो ना मजुर. थोडक्यात लहान शेतकरी मजुरापेक्षाही हलाखित जीवन जगत असतो. कारण त्याला जमीनीतुन जास्त उत्पन्नही घेता येत नाही आणि आहे ती जमीन विकावी असेसुध्दा वाटत नाही.

या कात्रीत तो सदैव अडकलेला असतो. म्हणून या वर्गाला मध्यम व मोठया शेतकऱ्यांच्या मेहरबानीवर जीवन जगावे लागते.

### ९.६.६ भुमिहीन शेतमजुर :

भुमिहीन शेतमजुर आपली उपजिविका शेतीवरच करीत असतात. परंतु या वर्गातील लोकांकडे त्यांच्या मालकीची मुळीच जमीन नसते. भुमीहीन शेतमजुरांचा फार मोठा वर्ग ग्रामीण समाजात आढवून येतो. या वर्गातील लोक जमीनदार वा मोठे शेतकरी यांच्याकडे शेतमजुर म्हणून काम करतात आणि त्यातून मिळणाऱ्या अलप मजुरीवर ते आपली उपजीविका भागवितात. भारतातील शेतमजुरांची स्थिती अतिशय शोचनीय व भयानक आहे. दारिद्रयान सतत पिचत असलेल्या या वर्गात वर्षभर कामही मिळू शकत नाही. रोजगारांची शास्वती नसते. त्यांचा रोजगार जमीन मालकांच्या मर्जीवर आणि गरजेवरच अवलंबून असते. त्यांच्या रोजगारीचा दर अतिशय कमी असतो. त्यामुळे प्रसंगी त्यांना अर्धपोटीही राहावे लागते. कुटुंबातील काही सदस्य शेतमजुर म्हणून रोजच्या हजेरीने काम करतात तर काहीजन सालगडी म्हणून आयुष्यभर दुसऱ्याच्या शेतात राबत असतात. सालगडी वर्षाच्या बोलीने जमीन मालकाकडे मजुर म्हणून काम करतो. त्याला रोजगारीची हमी असते. मात्र त्याची स्थिती गुलामासारखी असते. त्याला मालकाकडे पडेल ते काम करावे लागते. या वर्गात प्रामुख्याने कनिष्ठ जातीच्या लोकांच्या अधीक भरणा असतो.

### ९.६.७ इतर व्यायावसायिक

ग्रामीण समाजात शेतीव्यवसायावर अवलंबून असलेल्या इतर व्यवसाय करणाऱ्या व्यावसायीकांचाही एक वर्ग असतो. ग्रामीण समाजातील इतर व्यवसाय प्रामुख्याने शेतीव्यवसायाशीय निगडीत असतात. दैनंदिन गरजांची पूर्तता करण्यासाठी व शेती व्यवसायाला पुरक म्हणून या व्यवसायाला महत्व आहे. ग्रामीण भागात या व्यावसायीकांना किंवा कारगिरांना बलुतेदार व अलुतेदार म्हणून ओळखले जाते. या व्यावसायींकात सुतार, लोहार, चाभांर, परिट, न्हावी, गुरव, कोळी इत्यादी व्यावसायीकांचा समावेश होतो. हे लोक शेतीला लागणाऱ्या वस्तु पुरविण्याचे काम करून त्याच्या मोबदल्यात शेतमालकाकडून ठरविल्याप्रमाणे काही प्रमाणात शेतीतील अन्नधान्य व इतर वस्तु घेत असतात. पूर्वीच्या काळी खेडयांचे आर्थिक जीवन स्वंयपूर्ण बनविण्यात या व्यावसायींकाचा मोठा वाटा होता. अशा प्रकारे शेतकरी आणि व्यावसायीक परस्परांवर अवलंबून होते.

सध्यः स्थितीत मात्र या यांत्रीकीकरणामुळे परंपरागत व्यवसायाचे स्वरूप बदलले. या व्यवसायाचे महत्व कमी झाले. वाडत्या शहरी संपर्कामुळे खेड्यांची स्वयंपूर्णता नष्ट झाली. नवनवीन व्यावसायीक स्पर्धात जुने व्यवसाय मागे पडू लागले. परंपरागत व्यवसाय मोडकळीस आलयामुळे, कारागीरांच्या उपजीविकेचे साधन हिरावले गेले. त्यांच्यापूढे आर्थिक संकट उभे राहिले. परिणामी उपजिवीकेच्या शोधात हे ग्रामवासी शहराकडे धाव घेऊ लागले.

थोडक्यात ग्रामीण वर्गरचनेचा विचार करता समाजात मोठया प्रमाणात आर्थिक व सामाजिक विषमता आढळते. श्रीमंत शेतकरी व जमीनदार यांच्या हातात सर्व सत्ता एकवटली असल्यामुळे या वर्गरचनेतही जातीभेद दिसून येतो. शेठ, सावकार, व्यापारी, जमीनदार हे उच्च जातीतले असतात तर शेतकरी, शेतमजूर या वर्गात कनिष्ठ जातीतील लोकांचा भरणा आढळतो. अर्थात अलीकडील काळात एकाच वर्गात वेगवेगळया जातीतील लोकांचा समावेश होऊ लागला आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) भुमीहीन शेतमजूर कोणाला म्हटले जाते ते लिहा.

२) भारतीय ग्रामीण समाजातील वर्गावर चर्चा करा.

## १.७ जाती - वर्ग - सदयः स्थिती

### १.७.१ समाजाच्या खंडात्मक विभाजनामधील परिवर्तन :

पूर्वी जातीचे सभासदत्व जन्मावरून ठरत असे. त्यामुळे त्याचे स्वरूप बंदिस्त होते. आज प्राचीन काळातील जाती प्रमाने कोणतीही जात स्थिर नाही. तीच्यात पूर्वीप्रमाणे एकी नाही राजकीय प्रश्न, श्रमीक संघटना, कारखाने , कार्यालये अशा वेगवेगळया व्यवसायात अनेक जातीच्या व्यक्तींनी प्रवेश केला आहे. त्यामुळे जातीच्या संकुचित निष्ठा राहीलेल्या दिसत नाहीत व्यक्तीचा दर्जा जातीवर आधारीत राहीला नाही. तर तीचा दर्जा गुण, कौशल्य, पैसा व व्यवसायावर आधारलेला आहे.

### १.७.२ जातीच्या अधीकार परंपरेमधील परिवर्तन :

जातीव्यवस्थेतील अधीकार, परंपरा याला धार्मिक अधिकार होता. जाती व्यवस्थेनुसार ब्राम्हणाचे स्थानसर्वोच्य होते. मात्र सदयः स्थितीत औदयोगिकीकरणामुळे व बुध्दिवादामुळे ब्राम्हणाचे वर्चस्व कमी झाले आहे. त्यांच्या प्रभुत्वाला धक्का बसला आहे. आधुनीक युगात श्रमाचेही प्रभुत्व कमी होत चालले आहे.

### १.७.३ जातीय स्तररचनेतील बदल :

जातीव्यवस्थेवरून समाजात जी स्तररचना निर्माण झाली होती, त्यातही आज बदल झाला आहे. जातीव्यवस्थेनुसार भेदावर आधारलेली उच्च व निचतेची भावना संपुष्टात आली आहे. शिक्षणाचे क्षेत्र सर्वांसाठी खुले केले गेल्यामुळे सर्व जातीचे लोक याचा कायदा घेऊ लागले. कनिष्ठ जातीचे लोक उच्च जातीतील लोकांचे अनुकरण करू लागले. श्रेष्ठ समजली जाणारी ब्राम्हण जात आणि इतर जाती यांच्यातील अंतर दिवसागणिक कमी होत आहे.

### १.७.४ अस्पृश्यांची उन्नती :

सर्वासाठी शिक्षण खुले असल्या करणाने सर्वांना शिक्षणाची समान संधी मिळाली. अस्पृश्य जातीना शिक्षण व नौकरी हयात अनेक सवलती मिळू लागलया. ते लोक शिक्षणामुळे उच्चपदस्य बनु लागले. हयावरुन त्यांना दर्जा प्राप्त होऊ लागला. यामुळे जातीव्यवस्थेची चौकट ढिली झाली.

### १.७.५ परंपरागत व्यवसायात बदल :

जन्मानुसार व्यवसायनिश्चिती हे जाती संस्थेचे प्रमुख वैशिष्टये आहे. प्रत्येक व्यक्तीला आपला पिढीजात व्यवसाय करणे बंधनकारक होते. मात्र सद्य:स्थितीत प्रत्येक व्यक्ती आपल्या इच्छेनुसार, आवडीनुसार कोणताही व्यवसाय करू शकते. भारतीय घटनेने व्यवसायाच्या निवडी संबंधी सर्वांना समान संधी दिलेली आहे.

### १.७.६ खान-पान संबंधाच्या प्रतिबंधात शिथिलता :

आज आधूनिकीकरणाच्या प्रभावामुळे व वाडत्या संपर्कामुळे खानपाना वरील निर्बंध शिथील झालेले आहेत. हॉटेल, खानावळी येथे विविध जातीचे लोक एकत्र भोजन घेतात. त्या बद्दल सदय:स्थितीत फारसे निर्बंध नाहीत.

### १.७.६ जन्मानुसार दर्जा यात परिवर्तन :

परंपरागत जातीव्यवस्थेत व्यक्तीचा दर्जा तिच्या जन्मानुसार ठरत असे. परंतु आज जन्म हा घटक व्यक्तीचा दर्जा ठरवित नसुन संपत्ती, व्यवसाय, विदवत्ता यावरून व्यक्तीचा दर्जा ठरत आहे. सद्य:स्थितीत जन्माऐवजी व्यक्तीच्या गुणांना आणि कर्तृत्वाला इथे स्थान आहे.

थोक्यात सद्य:स्थितीत जाती व्यवस्थेमुळे समाजात जी उच्चनीचतेची भावना निर्माण झाली होती ती नष्ट झाली. जातीची जुनी मुळचे व सांस्कृतीक आदर्श बदलले. आज जाती शिथील व प्रभावशुन्य बनल्या आहेत हे जरी खरे असले तरी जाती संस्थेचे अस्तित्व पूर्णपणे नष्ट झाले आहे. असे मात्र आपल्याला समाजात जातीचे अस्तित्व आपणास दिसून येते.

**आपली प्रगती तपासा**

१. लहान शेतकरी आणि भूमिहीन शेतकरी यामधील फरक सांगा.

२. जाती आणि वर्ग मध्य स्थिती सांगा.

## १.८ सारांश (Summary)

जात ही अनंवंशीकतेवर आधारलेला घटक आहे. व्यक्तीची जात ही त्यांच्या जन्मा वरून ठरत असते. तर व्यक्ती ज्या कुटुंबात जन्माला आला त्या कुटुंबाची जात त्याला काहीही न करता मीळते म्हणजेच जात व्यक्तीला आपोआप मिळते. परंतु वर्ग या संकल्पने मध्ये तस नाही. कारण वर्ग हा एका विशिष्ट लोकांचा मिळून तयार झालेला असतो. वर्ग मिळविण्यासाठी व्यक्तीला धडपड करावी लागते. म्हणजेच व्यक्ती हा एखादया वर्गाचा सदस्य हा करावी लागते, धडपड करावी लागते म्हणजे वर्गाचे सदस्यत्व हे त्याच्या गुणावर आणि कौशल्यावर अवलंबून असते.

## १.९ शब्दार्थ (Glossary)

१. निदर्शक - दाखविने, दाखविनारा
२. व्यवछदेक - तपासने, अभ्यासने
३. खंडात्मक - वेगवेगळे भाग, प्रकार
४. स्तर - खालीवर, एकपेक्षा दुसरावर
५. निर्बंध - नियम
६. स्थाई - कायमस्वरूपी, कधी ही न जाणारा
७. अधीष्ठान - वर्चस्व, पगडा
८. नगण्य - अजीबात नसते
९. सार्वत्रिकता - सर्वच ठिकाणी, सगळी कडे
१०. ऐश्वर्य - सुखसोयीने, सुखकारक, आरामदायक

## १.१० प्रश्न (Question)

१. वर्गाची व्याख्या सांगून त्यांच्या वैशिष्टयाचे वर्णन करा.
२. जात आणि वर्ग यातील फरकाचे सविस्थर विवेचन करा.
३. जात आणि वर्ग तुमच्या शब्दांत मांडा.

❖❖❖❖

# १०

# भारतीय समाजशास्त्राची चिकीत्सा
## (Debates in india Sociology)

**घटक रचना**


१०.१ उदिष्टये (Objectives)
१०.२ आधुनिकता (Modernity)
१०.३ आधुनिकतेची व्याख्या (Definition of Modernity)
१०.४ स्पष्टीकरण (Interpretation)
१०.५ परंपरा (Tradition)
१०.६ परंपरा आणि आधुनिकता यातील फरक (Difference between Traditional Modernity)
१०.७ तळागळातील सामाजिक स्थिती (Sociology from below)
१०.८ साईमन कमीशन
१०.९ सुधारणावादी आणि कल्याणकारी कार्यक्रम (Aneliorative and welfare programmes)
१०.१० पंचवार्षीक योजनेत विकासाची योजना
१०.११ राखीव मतदार संघ
१०.१२ सरकारी सेवा मध्ये विशेष आरक्षण
१०.१३ इतर मागांस जाती / वर्ग (Other backward castes / classes)
१०.१४ आरक्षण नीती (The Reservation Policy)
१०.१५ अनुसुचीत जाती आणि भटक्या व विमुक्त जाती-जमातीसाठी अत्याचार प्रतिबंधक कायदा (१९८९)
१०.१६ अनुसुचीत जातीसाठी राष्ट्रीय आयोग
१०.१७ अनुसुचीत जातीसाठी राष्ट्रीय आयोगाची कार्ये
१०.१८ सारांश (Summary)
१०.१९ शब्दार्थ (Glossary)
१०.२० महत्वाचे प्रश्न (Questions)

## १०.१ उद्दिष्टये (Objectives)

१. आधुनिकता म्हणजे काय ? या संकल्पनेचा अभ्यास करता येईल.
२. परंपरा या संकल्पनेचा अभ्यास करता येईल.
३. आधुनिकता आणि परंपरा यातील फरकाचा आढावा घेता येईल.
४. तळागळातील सामाजिक घटकांची चिकित्सा करता येईल.
५. सायमन कमीशन म्हणजे काय ? हे जाणून घेता येईल.
६. पंचवार्षिक योजनेत विकासाची कोणती भुमिका आहे यावर लक्ष केंद्रीत करता येईल.
७. राखीव मतदार संघ का व कशासाठी आवश्यक आहेत यावर चिकित्सा करता येईल.
८. सरकारी सेवामध्ये दलीताच्या आरक्षणाचे महत्व, जाणून घेता येईल.
९. अनुसूचीत जाती आणि जमातीसाठी राष्ट्रीय आयोगाची कार्य काय ? हे लक्षात घेता येतील.

## १०.२ आधूनिकता : (Modernity)

आधूनिकता शब्द साधारनतः उत्तर-पारंपारीक, उत्तर मध्यमयुगीन ऐतीहासीक कालावधी निर्दशीत करतो. जो साम्यवाद ते भांडवलवाद, औदयोगीकरण, धर्मनिरपेक्षवाद, राष्ट्र-राज्य आणि त्यांच्या संस्था च्याकडे पाय उचलताना दिसतो. संकल्पनाच्या आधारावर आधुनिकतेचा संबंध आधुनीकयुग आणि आधुनीकतेशी आहे. परंतु हा एक विशिष्ट संकल्पनाची निर्मीती करतो. जो की पाश्चिमात्य दर्शन मध्ये एका विशिष्ट आंदोलनाकडे इशारा करतो. आधुनीकता फक्त भांडवलवादच्या उदया बरोबर सामाजिक संबंधाला शुध्दा निर्दशीत करतो. आधुनीकता बौध्दिक संस्कृतीच्या प्रवृत्तीना शुध्दा निर्दशीत करतो. विशेषकरून आंदोलनाला धर्मनिरपेक्षीकरण आणि उत्तर औदयोगीक जीवनाबरोबर जोडला गेला आहे. जसे कि, मार्क्सवाद, अस्तित्वाद आणि सामाजिक विज्ञानाची औपचारिक स्थापना या संदर्भामध्ये, आधुनिकतेला इ.स. १४३६-१७८९ च्या सांस्कृतिक आणि बौध्दिक आंदोलना बरोबर जोडला गेला आहे. ज्याचा विस्तार १९७० दशका पर्यंत किंवा त्याच्या नंतर झाला.

**सम्बंधीत शब्द :**

इंग्रजी शब्द मॉडर्न (आधुनीक) मोडो पासुन लॅटीन शब्द मोडर्नस बनला आहे. या शब्दाचा उपयोग इ.स. पाच मध्ये सापडतो. जो की मुळ रुपा पासुन इसाई युगाला अलग करण्याच्या संदर्भात आहे. याच्या वितीरिक्त या शब्दाचा उपयोग १७ (सतराव्या) शतकापासुन सुरूवात झाली आहे. जो कि (क्वारल ऑफ दि एन्शिएन्ट ॲन्ड दी मॉडर्न्स) पासुन बनला होता. त्याच्यामध्ये वादविवाद शुध्दा केला गेला होता. आधुनीक संस्कृती (युनानी-रोमन) संस्कृतीपेक्षा वेगळी आहे का ? आणि हा वादविवाद १६९० च्या दशकाच्या सुरुवातीला अकादमी फ्रान्कैसच्या मध्ये साहित्यिक आणि कलात्मकामध्ये वादविवाद होता.

या प्रयोगानुसार आधुनिकता चे तातपर्य होते. सध्याच्या स्थितीचा त्याग करने, आणि एक नविन सुरुवात करणे. आणि ऐतिहासिक मुळ शब्दाची व्याख्या करणे. याच्या वितिरिक्त

आधुनिकता आणि आधुनिक मधील अंतर एकोणीसाल्या (१९) शतकापर्यंत (२००७) पर्यंत केल गेल नाही.

## १०.३ आधुनिकतेची व्याख्या (Definition of modernity)

**१. रोजेनाऊः**

आधुनिकता एक प्रगतीशिलतेकडे निर्देशीत करते, जो मानुस जातिला अज्ञानता आणि तर्फहीनता पासुन मुक्त करण्याचा निश्चय करतो.

**२. डेलान्टी :**

सामाजिक आणि दार्शनिक जबाबदारी बरोबर मौलीक नवीन जबाबदाऱ्या निर्माण झालया. आधुनिकतेच युग सामाजिक स्थिती पासुन औदयोकीकरण आणि श्रम विभाजन स्पष्ट होते आणि दार्शनिक रूपाने निश्चितता ची हानी.

## १०.४ स्पष्टीकरण :

आधुनीक समाज किंवा औदयोगीक सभ्यता साठी एक आशुलिपी शब्द आहे. अधीक रूपात उल्लेख केल्या नंतर याचा संबंध

१) जगाबद्दल एक खास दृष्टिकोनासी आहे. अशा जगाचा विचार ठेवने जो परिवर्तनासाठी त्यार आहे. मानवी हस्तक्षेपा द्वारे.

२) आर्थिक संस्था, विशेष करून औदयोगीक उत्पादन आणि एक बाजार अर्थव्यवस्था चा परिसर.

३) राजकिये संस्थाची एक निश्चित श्रृंखला, ज्यामध्ये राष्ट्र-राज्य शामील आहे. खास करून या वैशिष्टया परिणामाच्या रूपा मध्ये, आधुनीकता एखादया पूर्व सामाजिक व्यवस्थाच्या तुलनेने अधीक गतीशिल आहे.

**आधुनिकता :**

इतर संकल्पना प्रमाणेचा आधुनिकता या संकल्पनाची व्याख्या करने शुध्दा अवघड आहे. संकल्पना देश-काळ सापेक्ष ना केवळ आपल्या तात्विकता मध्ये जी की आपल्या व्यावहारीक घटने मध्ये गुंतागुंतीची होते. आधुनीकता शुध्दा एक गुंतागुंतीची संकल्पना आहे. याच मुख्य कारण आधुनीकतेच्या विकासामध्ये मोठा विस्तार आहे.

एक साधारण मानुस आणि एक बुध्दीजीवी व्यक्ती आधुनीक होण्याचा अर्थ एकच समझत नाहीत. ज्ञानशास्त्रीय स्थरामंध्ये आणि सामान्य जीवन व्यवहारामध्ये आधुनिकतेचा अर्थ वेगळा आहे. हे अर्थ परस्पर विरोधी पण असु शकतात. ज्या वेळेस आपण संकल्पनात्मक प्रमाणात उपयोग बघतो. तेव्हा समजतो की ज्ञानानुसार या संकल्पनाचा विस्तार होतानां दिसतो.

राज्यशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र इत्यादी ज्ञानाच्या क्षेत्रात आधुनिकतेची व्याख्या एकसारखी केली जात नाही. ऐवढेच नाही तर आधुनीकता एक गतिशील संकल्पना आहे. आधुनिकता या संकल्पनेवर वेळ जागा/ठिकाण इत्यादि गोष्टींचा शुध्दा असर पडलेला दिसतो. युरोपीय देशातील आणि आशीया आणि आफ्रीकी देशातील आधुनीकता एकसारखी दिसत नाही. येवढेच नाही तर त्या देशातील आधुनिकतेचा प्रादुर्भाव चे कारण पण वेगवेगळे आहेत. यामुळे बोलले जाते कि आधुनिकता वेगवेगळया प्रकारची असु शकते. जीतकी विविध सामाजिक व्यवस्थेची अवस्था किंवा त्याला परिवर्तीत करणारी समस्या आहे. यावरून स्पष्ट होते कि, आधुनिकतेची संकल्पना विनाकारण गुंतागुंतीची नाही.

आधुनिकतेची सुरूवात केव्हा आणि कुठे झाली याचा शोध घेताना कुठल्या निश्चित इसविसनात सांगने निरर्थक उपक्रम आहे.

**आपली प्रगती तपासा.**

१) आधुनिकतेची व्याख्या आणि त्याचे स्पष्टीकरण दया.

२) आधुनिकता या संकल्पनेवर परीक्षण करा.

## १०.५ परंपरा (Tradition)

विशिष्ट भौगोलिक क्षेत्रात एकत्र राहणाऱ्या व्यक्तीच्या समुहापुढे काही सार्वत्रीक व सामुहीक स्वरूपाच्या समस्या असतात. अन्नपाणी, निवारा, स्वरक्षण, कामवासनापूर्ती, अपत्यसंगोपन, रूग्णांची देखभाल मृतशरींरांची विलहवाट इत्यादी प्रश्न प्रत्येक समाजास सोडवावे लागतात. व्यक्तीनी परस्परांशी कसे वागावे, हा ही प्रश्न असतोच. वारंवार उद्‌भवनाऱ्या अशा प्रश्नाच्या बाबतीत आपल्या भौगोलीक परिस्थित्यनुरूप तसेच उदनिर्वाहार्थ उपलब्ध असलेल्या गोष्टीनुसार काही मार्ग शोधुन काढलेले असतात. व दरवेळी नविन प्रयोग करून पाहण्याऐवजी अनुभवाने समाधनकारक ठरलेले व सरावाचे झालेले मार्ग आचरण्याकडेच लोकांची प्रवृत्ती असते. निरीक्षण, अनुकरण, अनुभवाची "देवानधेवान" यामुळे हे मार्ग, त्या सर्व समाजात प्रसुत होऊन रूठ बनतात. या विविध वर्तनप्रकाराशी काही कल्पनाही निगडीत असतात. या रूठ आचार विचाराची एक विशिष्ट प्रणाली बनुन जाते. व ती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सांस्कृतीक वारसा या रूपाने संक्रमित होत असते. तीलाच परंपरा म्हणण्यात येते. ही परंपरा त्या त्या समाजाच्या एकतेस, स्थैर्यास, सातत्यास व वैशिष्यास कारणीभूत तसेच पोषक असते. भौगोलिक व आर्थिक स्थित्यंतरे, अन्य समाजांशी संपर्क व दळणवळण इत्यादी कारणांनी परंपरेमध्ये बदल होत जातात. हे खरे, तथापी नव्याची जुन्याशी सांगड घातली जाते व

समन्वयही साधला जातो. काही आचारविचार तर नवीन परिस्थितीस अनुरूप नसले, तरी पूर्वापार चालत आले म्हणून लोक त्याना चिकटून राहतात.

माणसात वांशीक व नवीन संपादीत गुण असतात. हे सर्व जीवनार्थ कलहात यशस्वी होण्यासाठी उपयुक्त होतात हे दोन्ही मिळून परंपरा निर्माण होते. मागच्या मानवी पिठीकडून पूढील पिठीस प्राप्त झालेली पध्दती म्हणजे परंपरा होय. मनुष्याची विशिष्ट प्रकृती असते. तेवढयावर जीवनार्थ कलहात मानव यशस्वी होऊ शकत नाही. माणुस निसर्गाचा विचार करून नवे गुण, ज्ञान कलाकौशलये, आचरणपध्दती वा जगण्याची साधने संपादन करतो व यशस्वी होतो. हे सर्व संपादीत विशेष पुढील पीढीला मिळतात. त्यांची ठरावीक पध्दती वा चाकोरी बनते. सर्व मानवी संस्कृती ही अशी परंपराच होय पण परंपरेतील अपुर्णता व दोष ध्यानात आल्यावर नवी मानसीक तसेच भौतिक साधने व त्यांच्या पध्दती माणुस शोधतो. त्यामुळे नवी परंपरा निर्माण होते. मानवी जीवनाच्या म्हणजे संस्कृतीच्या सर्व शाखा वा क्षेत्रे यांत जुनी परंपरा, परिवर्तन व नवी परंपरा अशी मालीका असते. आणि तीच्यामुळेच जीवनार्थ कलहात मनुष्य यशस्वी होतो.

परंपरेमध्ये समाजाची रचना, व्यक्तीवर्तनाचे संघटन, श्रध्दा आणि सांस्कृतिक प्रतिके यांचा समावेश होतो. काहीच्या मते समाजात जे दिसते, जे मानवी वर्तनप्रकार, आढळतात, त्यांनाच परंपरा म्हणावे. इतर काहीच्या मते राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक एकात्मतेची प्रतीके म्हणजेच परंपरा होय. समाज आपल्या समस्या कसा सोडवितो, समाजाचे घटक सामाजीक संकटाना कसे तोंड देतात, भुतकाळात त्यांनी या समस्या कशा सोडविल्या आणि सामाजिक संघर्षातुन समाजाची रचना कशी तयार झाली. यावरून ही परंपरा म्हणजे काय हे कळु शकते. सामाजिक आणि सांस्कृतिक वैशिष्टयाचे सातत्य म्हणजे परंपरा अशी व्याख्या केली जाते. कोणतीही गोष्ट पारंपारीक आहे की नाही, हे तीच्या मुल्यावरून ठरत असते. व्यक्तीसमुहास संस्थाची जरूरी असते व जुन्या पिढीकडून संस्थात्मक जीवन निवडलेले असते. संस्था ही परंपरा नसुन संस्थेच्या मुल्याविषयीची श्रध्दा ही परंपरा असते. म्हणुनच परंपरा म्हणजे मुल्य असलेली कल्पना होय. धार्मिक ग्रंथाचे सातत्य आणि त्यात पिढयान् पिढया होणारे संक्रमण हा ही परंपरेचा भाग असतो. जुन्या पिढीकडून नव्या पिढीकडे जतन करण्यासाठी दिलेला ठेवा, असाही परंपरेचा अर्थ आहे. त्या कल्पनेत, जे जुन्या पिढीकडून आलेली आहे त्यात भर न घालता अथवा त्यातुन काहीही न वगळता जसेच्या तसे जतन करावयाचे हा अर्थ आहे.

परंपरेची व्याख्या करतानाच परंपरा हया स्थिर असतात आणि त्या परिवर्तनिच असतात, असे दोन्ही विचार मांडले गेले आहेत. आधुनीक काळात वर्तनाचे जे काही प्रकार समाजाने जतन करून ठेवले आहेत, त्याचे सातत्य म्हणजे परंपरा, ही कल्पना पूढे येत आहे. धार्मिक परंपराच्या बाबतित त्या परमेश्वराकडून अथवा प्रेषीता कडून, आल्या आहेत असे मानले जाते. एतिहासिक परंपराही धार्मिक परंपरेप्रमाणे रूढ होतात. या परंपराना प्रतिकात्मक अर्थ असतो. त्यातुनच राष्ट्रवाद व समुहनिष्ठा जोपासल्या जातात. धार्मिक ऐतिहासिक तसेच सामाजिक परंपराचे खरे दर्शन चित्रकला, वास्तुकला, वाङय इत्यादी मध्ये घडते. कोणत्याही समाजाची सांस्कृतीक घटना कशी असावी, समाजाची सांस्कृतीक व सामाजिक उदिष्टये कोणती असावीत, सांस्कृतीक घटनेच्या मर्यादा असाव्यात इत्यादी गोष्टींचा परंपरेशी जवळचा संबंध असतो.

समाजाच्या सांस्कृतिक परंपरेची दोन अंगे असतात १) बहिरंग वा मुर्त संस्कृती व २) अंतरंग वा अमुर्त संस्कृती त्या त्या प्रदेशाचे भौगोलिक विशेषः अन्नपाण्याची उपलब्धता वा कमरता; श्रृतुमानातील बदल; त्या भागातील प्राणि इत्यादिच्या निमित्ताने काही ठरावीक प्रकारच्या प्रसंगाना त्याला वारंवार तोंड दयावे लागते. नातेवाईक अतिथी व अपरीचीत व्यक्ती यांच्याशी वागण्याचे प्रसंग ही वारंवार येत असतात. अशा वारंवार येणाऱ्या प्रसंगाच्या बाबतीत, वर्तन प्रकार बहुतांशी सर्वसामान्य झालेले आढळतात, असे वर्तनप्रकार म्हणजे त्या त्या भुप्रदेशातील समाजाची मुर्त अथवा दृष्शय संस्कृती होय. त्या त्या समाजाची भाषा, खानपान अवजारे व हत्यारे, वस्त्रावरणे, घरे, प्रवासाची साधने, विवाहविषयक चालीरिती, नातीगोंती ठरविण्याच्या पध्दती, औषधोपचार पध्दती, शासनपध्दती, इतरांच्या स्थान व दर्जानुसार त्याच्याशी वागण्याच्या रीति इत्यादीचा समावेश मुर्त संस्कृतिच्या सदरात होतो.

या प्रत्यक्ष वर्तनाच्या मुळाशी काही समजुती वा श्रध्दा काही मुलयकल्पना काही मानदंड तसेच काही गृहीतेही असतात. या सर्व गोष्टी परस्परांशी निगडीत असतात. या सर्व मिळून बनलेली विचारप्रणाली म्हणजे संस्कृतीचे अतंरंग होय.

सांस्कृतीक समजुतीच्या सदरात त्या त्या समाजातील लोकांचे विचार, ज्ञान व विज्ञान, अंधश्रध्दा, पुराणकथा या गोष्टी येतात. या पैकी पुराण कथाचे महत्व सांस्कृतीक जीवनात फार असते. त्या त्या समाजातील लोक पुराणकथा म्हणजे केवळ कल्पितकथा किंवा कलात्मक कल्पना विलसिते मानीत नाहीत, तर ऐतिहासीक घटना मानतात. बाय बलातील गोष्ट म्हणजे ऐतिहासीक वृत्तांन्त होत, अशी श्रध्दाळू ख्रिस्ती धर्मायांची श्रध्दा असते. याप्रमाणेच प्रत्येक समाजाचा जीवनव्यवहार त्यांच्या पुराणकथानी प्रभावीत झालेला असतो. असे ब्रॉनीस्लॉ मॅलिनोस्की (१८८४-१९४२) या सांस्कृतीक मानवशास्त्रज्ञाने दाखवून दिले आहे.

इष्ट व हितकर काय, या विषयीच्या कल्पना प्रत्येक समाजात असतात. उदा. संयम, सहकार्य, प्रेम, अस्तेय, अव्याभीचार हे गुण सामुहीक जीवनाच्या दृष्टिने इष्ट मानले गेले आहेत. ज्ञानानंद, सौदर्यानुभव व अध्यात्मिक गुठ अनुभुती या गोष्टी व्यक्तीचे जीवन संपन्न बनवितात म्हणुन मोलाच्या गणलया जातात. ही मुल्ये सिध्द होतील अशा तऱ्हेची समाज व्यवस्था घडविण्यात आलेली असते. व समाजातील व्यक्ती ही आपली उदिष्टये या मुल्यांशी सुसंगत ठेवीत असतात. काही मुल्ये समाजाच्या जिवनात केंद्रीयुत असतात, तर काही साधनीभुत असतात ज्या गोष्टी करण्यात लोकांच्या शक्तीच्या व वेळेचा बराचसा भाग खर्च होत असतो, ज्या गोष्टी त्यांच्या चर्चा संभाषणाचे व वाद-विवादाचे विषय बनतात, ज्या गोष्टी वडीलधारी मंडळी लहानाच्या मनावर बिंबाविण्याचा प्रयत्न करीत असतात, ज्या चारित्र्यगुणांची व वृत्तीची समाजात प्रशंसा होत असते. त्यावरून त्या त्या समाजाची केंद्रीभुत मुल्ये कोणती आहेत, हे कळते.

एखादया समाजातील लोकांचा काही गोष्टी करण्यावर आणि काही गोष्टी न करण्यावर भर असतो असे आढळून येते. त्या गोष्टी कटाक्षाने टाळण्याच्या मुळाशी काही सांस्कृतीक गृहिते असतात. उदा. इतरांच्या वाईट इच्छांचा परिणाम होऊ शकतो आणि त्यांची दृष्ट लागु शकते, हे गृहीत धरून बालकाला काळी तीट लावणे व इतरांच्या देखत त्यांना उघड उघड दुध न पाजने; जादुहोण्याची सत्यता गृहीत धरून बालकाची नखे, केश वगैरे इतरांच्या हाती न लागतील याची

काळजी घेणे, स्वतःचे नाव परक्यास समजुनदेने; मौजीबंधनाच्या वेळी देण्यात आलेले नाव गुप्त राखने, वडील मनुष्य जेवत असताना त्यास नमस्कार न करणे इ. प्रकाराची कारणीमांस करू लागले, की वरील विधानाची सत्यता पटते.

### १०.५.१सांस्कृतिक मानदंड :

सांस्कृतिक मानदंडाच्या सदरात, लोकरीती (कोकवेज), रूढी, प्रथा व नैतीक संकेत यांचा समावेश होतो. शेतीची कामे, स्वयंपाक, जेवणखाण, भिन्न प्रसंगी करावयाचा पेहराव, इतरांना त्यांच्या त्यांच्या सामाजिक दर्जानुसार अभिवादन आतिश्य, वधु-वर निवड, शोकप्रदर्शन वगैरे गोष्टी करण्याच्या ज्या रीति जनसामान्यांकडून योग्य गणलया जातात, त्यांना लोकरीति अशी संज्ञा आहे. या लोकरिती म्हणजे व्यक्तीच्या वर्तनावर असलेल्या सामाजिक अकुंशाचाच एक प्रकार होय. मात्र हा अंकुश अनौपचारिक व सौम्य स्वरूपाचा असतो. जी व्यक्ती लोकरीति अनुसरीत नाही तीला लोक हसतात. इतकेच.

### १०.५.२रूढी आणि प्रथा :

रूढी आणि प्रथा हे सामाजिक वर्तनाचे नियमन करणारे अंकुश अधीक महत्वाचे व प्रभावी होत. वडिलधाऱ्यांना, बरोबरीच्या व इतरांना संबोधने, अभ्यागताचे अतिशय सामाजिक दृष्टया महत्वाचे असे विवाहादी प्रसंग निरोप देने घेणे, इत्यादीच्या संबंधात रितिरिवाज रूढ झालेले असतात व ते न पाळणाऱ्या व्यक्तीशी लोक कमी संबंध ठेवू लागतात. या दृष्टिने रीतिरिवाजाचा अंकुश अधीक प्रभावी व जाचक असतो.

सामुहीक जीवन व समाजाची धारणा यांचा विचार करण्या इतपत जो समाज प्रगत झालेला असतो, त्या त्या समाजात काही वर्तनप्रकार इष्ट, आवश्यक व नैतीक तर काही अनैतीक समजण्यात येतात आणि कर्तव्याकर्तव्य विषयक विधीनिषेध ही आस्तित्वात असतात. हे नैतीक संकेत म्हणजे एक प्रकारच्या लोकरितीच होत. परंतु त्यांना समाजहितविषयक तत्वज्ञानाची बैठक असते. वैवाहीक एकनिष्ठा, गृहस्थधर्माचे पालन, प्रामाणीक व्यवहार, अहिंसा अस्तेच ही नैतीक संकेताची उदाहरणे होत. समाजातील परंपरागत नैतिक संकेताचे उल्लंघन खपवून घेतले जात नाही. त्यांचे उल्लघंन करणाऱ्या व्यक्तीस बहिष्कार, देह दंड, कारावास इ. स्वरुपाच्या शिक्षा करण्यात येतात.

### १०.५.३संस्थात्मक वर्तनप्रबंधं :

अमुक अमुक गोष्टी समाजाच्या स्थितीच्या दृष्टिने महत्वाच्या आहेत, या जाणिवेतुन समाजा मध्ये ज्या व्यवस्था निर्माण झालेल्या असतात. त्यांना सामाजिक संस्था ही संज्ञा आहे. वस्तुचे उत्पादन, देवघेव, आयात निर्यात, आरोग्यरक्षण, मृतदेहाची, विलहेवाट, शत्रुपासून संरक्षण, प्रजोत्पादन, मुलांचे शिक्षण इ. गोष्टी एंकदर समाजाच्याच गरजा आहेत. या जाणिवेतुनच विवाहसंस्था, कुटुंबासंस्था, शिक्षणसंस्था, वित्तसंस्था, राज्यसंस्था, न्यायदानसंस्था, धर्मसंस्था वगैरे अस्तित्वात आलेल्या आहेत. समाजजीवन या प्रकारे संस्थात्मक झाले की व्यक्तीला काही प्रसंगातुन जावेच लागते आणि काही भुमीका स्विकारण्या व पार पाडाव्याच लागतात.

विधीपूर्वक व शपथपूर्वक विवाह वा शरीरसंबंध, अपत्याच्या योग्य संगोपनाच्या दृष्टिने योग्य त्या वयात अन्यसंस्कार, व्रतबंधासारखे दिशाविधी, विदयार्थी दशेची व कर्तव्ये समाजाच्या अपेक्षानुसार बजावणे वगैरे संस्थात्मक वर्तनप्रबंधाची उदाहरणे होत. या पैकी पुष्कळ

वर्तनप्रबंधाशी ठरावीक पध्दती निगडीत झालेल्या असतात.आणि त्या परंपरेने टिकुनही राहतात. त्याचे एक कारण असे, की सामुहीक जीवनाच्या दृष्टिने अर्थपूर्ण आहेत, ही जाणीव समाजातील व्यक्तीना असते. दुसरे कारण म्हणजे प्रजोत्पत्ती, मृत्यु इ. घटनाशी मानसाच्या भावना व भावनात्मक समजुती निगडीत असतात. या विधीना पारंपारीक प्रतिष्ठा प्राप्त झालेली असल्यानेही लोक त्या चालू ठेवतात व अशा रीतिने ही परंपरा अखंडीत राहते यापैकी काही विधीच्या निमित्ताने माणसाची समारंभाची होस, संपत्तीच्या प्रदर्शनाची इच्छा, कलात्मक, प्रवृत्ती, सामुहीक, आनंदाची इच्छा वगैरेही पूर्ण होतात व त्यामुळेही बरेच विधी त्यांतील अर्थ समजला नाही, तरी टिकून राहतात. काही विधी तर उत्सवप्रियतेस आणि वैभवप्रर्शनास केवळ निमित्त म्हणुन पार पाडण्यात येतात.

परंपरागत लोकरीती, रूढी, नैतीक, आचारसंकेत व विधी निषेध, संस्थात्मक वर्तनप्रबंध, तत्वज्ञान, धार्मिक समजुती व श्रध्दा इत्यादीमुळे समाजातील व्यक्तीच्या आचार विचारात व उदिष्टांत सारखेपणा राहतो व समाजजीवनही बहुतांशी सुस्थिर राहते. बहुतांशी असे म्हण्याचे कारण असे, की परिस्थितीतील बदल, विज्ञानाची प्रगती, अन्य समाजाच्या संस्कृतीशी संपर्क, व्यक्तीमत्वविकासाची ओढ, अध्यात्मीक जाणिवा इ. अनेक कारणामुळे समाजाचे परिवर्तनही होत असते. व चालत आलेल्या परंपरेत नवनवीन विचार, मुलये, नैतीक ठरलेल्या, जाचक, अनिष्ठ, समाजहितास अपकारक ठरलेल्या परंपरा बदलण्यासाठी पुष्कळ वेळा समाज चळवळी, आंदोलने व बंडखोरीही करताना इतिहासावरून दिसून येते. अर्थातच जुन्या हाकारू परंपरांचा त्याग केल्यावर त्यांची जागा घेणाऱ्या नव्या अनुरूप गोष्टीचेही कालातंराने परंपरेने रूपांतर होते.

**आपली प्रगती तपासा.**

१) परंपरा संकल्पनेची व्याख्या सांगुण तीचे विशलेषण करा.

२) परंपरा हया संकल्पनेवर निबंध लिहा.

## १०.६ परंपरा व अधुनिकता :

परंपरेतुन आपण अधुनिकतेकडे वळतो. परंतु परंपरा व आधुनिकता हया दोन मितीमधील मुलभुत फरक काय हे बघने आवश्यक आहे. ह्या संदर्भात टॉलकॉट पारसन्स ह्या समाजशास्त्रज्ञाने विकसनशील देशास लागु होणारी चलावरुन बदलनारी सामाजिक पध्दती दिलेली आहे. त्यातुन आधुनिक व पारंपारिक समाजाचे तुलनात्मक स्पष्टीकरण करता येते घ्यासाठी प्रथम होझेलिटझ हया तज्ज्ञाने अभ्यास करून तीन मुल्ये मांडली. ती मुल्ये पारंपारिक विरूध्द आधुनिक हया क्रमाने १) विशिष्टता विरूध्द विश्वव्यापकता २) विस्तृत्वा विरूध्द आणि

अर्पित विरूध्द अर्जित दर्जा अशी आहेत. हया विभागणीत होझेलिटझ नंतर स्टॉम्पका हया तज्ज्ञाने दोन मुल्यांची अधीक भर घातली. ती मुल्ये १) सामुदायीकता विरूद्ध व्यक्तीवाद आणि २) भावनात्मकता विरूद्ध तटस्थता अशा रितीने पारसन्सने दिलेल्या हया पाच चलाचा अभ्यास आपणांस परंपरा व आधुनिकता घ्यातील फरक दाखवितो. घ्या चलांचे स्पष्टीकरण अनुक्रमे पूढील प्रमाणे पाहा.

### १०.६.१पारंपारीक समाज

१) **विस्तृतता :**

भुमिका व सामाजिक संबंध हे समजण्याजोगे, मोकळे व गुंतागुंतीचे नसतात.

२) **अर्पित दर्जा :**

मिळालेल्या भुमिका व दर्जा तसेच गट संबंध जन्मानुरूप व पिढीजातप्रमाणे ठरतात.

३) **विशिष्टता :**

एखादया भागीदाराची निवड किंवा त्याचे सामाजिक संबंध हे त्याच्या गटानुरूप संबंधाशी किंवा भुमीकाशी निगडीत असतात, त्याच्या कामाशी नव्हे. त्या कामास लागणाऱ्या निकषांचा त्याच्या गटातील सामाजिक संबंधाशी किंवा भुमिकांशी संबंध असतोच असे नाही.

४) **सामुदायिकता :**

लोकांची मुल्ये व सुज्ञपणा हे त्यांच्या गटावरून तसेच सामाजिक सभासदात्वावरून ठरते. ते कोण आहेत हयापेक्षा कोणत्या गटाचे, कोणत्या समाजाचे आहेत हयास महत्व असते.

५) **भावनात्मकता :**

सामाजिक जीवन हे भावनांनी भरलेले असते.

### १०.६.२आधुनिक समाज :

१) **निश्चितता :** भुमिका व संबंध हे सुधारलेले व निश्चित असतात. त्यांत श्रम विभागणी स्पष्ट असते. तसेच सांधीक जीवनांकडे जाण्यास वाव असतो.

२) **अर्जित दर्जा :** भुमिका व दर्जा तसेच गट संबंध हे व्यक्तिगत प्रयत्न व लायकीप्रमाणे ठरतात.

३) **विश्वव्यापकता :** एखादया भागीदाराची निवड किंवा त्याचे सामाजिक संबंध हे त्याच्या गटानुरूप संबंधाशी किंवा भुमिकांशी नसुन हातात असलेल्या कामाशी निगडीत असतात. त्याची भुमिका ही सर्वसाधारण निकषांवर किंवा गटातील सामाजिक संबंधावर अवलंबून नसते.

४) **व्यक्तिवाद :** लोकांची मुल्ये व सुज्ञपणा हे त्याच्या कृतीवरून ठरलीले जाते. ते कोण आहेत हयापेक्षा ते काय करू शकतात घ्यास महत्व असते.

५) **तटस्थता :** सामाजिक जीवन हे सामजसपणाचे, सुज्ञपणाचे असते. भावनात्मकतेपेक्षा तटस्थतेला महत्व असते.

**आपली प्रगती तपासा :**

१) आधुनिकता आणि परंपरा यामधील फरकाचे स्पष्टीकरण घ्या.

२) आधुनिकता आणि परंपरा दोन्ही संकल्पना परस्पर विरोधी आहेत ध्यावर चिकित्सा करा.

## १०.७ तळागळातील सामाजिक स्थिती

दलीत (शुद्र) कोण आहेत आणि केव्हापासून किंवा कुठल्या कारणामुळे त्यांच्या दर्जाची स्थिती खालच्या दर्जाची बनली ब्राम्हकाळ किंवा उत्तर वैदिय काळापासुन अनेक प्रकारचे दाखले दलिताच्या (शुद्राच्या) बाबतीत बघायला मिळतात त्यांना यज्ञशाळा मध्ये जाण्याची परवानगी नाकारली गेली होती. वैदिक साहित्यात ज्यामध्ये वेद ब्राम्हण, अरण्यक, पूर्व उपनिषद इत्यादी साहित्यामध्ये असे कुठले दाखले मिळत नाहीत जे कि शुद्र जाति पूर्वी किंवा तत्कालीन काळात होत्या. श्रृगवेदा मध्ये जवळपास इ.स. पूर्व १५०० व्या शतकापर्यंत फक्त तीनच जाती आस्तित्वात होत्या. म्हणजे ब्राम्हण, क्षत्रिय आणि वैश्य ह्यांच्या उल्लेख बघायला मिळतो. हयावरून असे सिध्द् होते कि शुद्र जाति ची रचना आर्य द्वारा श्रृग्वेदाच्या शेवटच्या टपटप्या मध्ये केली गेली. भारतीय समाजशास्त्रज्ञ जी.एस. धुर्ये ने शुध्दा सांगीतले की, वैदिक युगा मध्ये शुद्धा पहिल्या तीन व्यवस्थाला मान्यता होती. शुद्राना आर्याच्या धार्मिक प्रथाचे पालन करण्यापासुन व्यवस्थितरित्या रोखले गेले होते.

## १०.८ सायमन कमीशन

१९३५ मध्ये सायमन कमीशन द्वारा अनुसूचीत जाती या शब्दाचा प्रयोग केला गेला होता. जो की, अस्पृश्यता लोकांसाठी उपयोगात आनल्या गेला. डॉ. आंबेडकराच्या मतानुसार आदिमकालीन भारतात यांना भग्न पुरूष किंवा बाह्य जाति मानले जात होते. इंग्रज त्यांना दलित वर्ग म्हणजे होते. १९३१ च्या जनगननेनुसार त्याना बाह्यजाति च्या रूपात वर्गीकृत केल गेल. महात्मा गांधीने त्याना हरिजन (इश्वरांची लेकर) असे म्हटले. परंतु अस्पृश्य जातीमधील शिक्षीत लोकांनी या नामकरणाचा स्विकार नाही केला. कारण कि ते विचार करत होते की, इश्वरांची लेकरे म्हणुन असमानता निर्माण करणारी व्यवस्था नष्ट करण्याची केले जात होते. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बी.आर.आंबेडकर यांनी शुद्धा सायमन कमीशन द्वारा दिल्या गेलेल्या शब्दाचा उपयोग केला.

सायमन कमिशनने कुठल्या जातिला अनुसुचित जाति मध्ये सम्मिलित करावयाचे यासाठी काही अधार सांगितले आहेत. ते पुढील प्रमाणे सांगता येतील.

- त्या जाति उच्च जातिनां स्पर्शाने अपवित्र करतात का ?
- त्या जाति मंदिरामध्ये प्रवेश करू शकत नाहीत का ?
- त्या जातिला शाळेत, विहीरी आणि सार्वजनीक ठिकाणी प्रवेश नाकारलेला आहे का ?
- त्या जातिसाठी ब्राम्हण पुरोहितांचे काम करू शकते का ?
- त्या जातिसाठी धोबी, वारीक इत्यादी काम करू शकतात का ?
- त्या जातिकडून सुशिक्षित व्यक्ति सामाजिक आदान-प्रदानामध्ये उच्च जातिच्या द्वारा समान मानला जातो का ?
- त्या जाति आपल्या अशिक्षित, अज्ञात आणि गरिबीकारणामुळे दलित आहोत यामुळे सामाजिक रूपाने योग्य होऊ शकत नाही का ?
- त्या जाति आपल्या व्यवस्थावरून दलित मानल्या जातात का ?

## १०.९ सुधारणावादी आणि कल्याणकारी कार्यक्रम

महात्मा गांधीने उच्चारलेला शब्द हरिजन (इश्वरांची लेकरे) यांनी शुध्दा हरिजनांचा मुद्दा विकासासाठी उचलून धरला होता. परंतु त्याच्या अगोदर शुध्दा काही प्रयत्न केले गेले होते. त्यामधील प्रमुख प्रयत्न होता. (१९१६-१९२२) दलित वर्गाला शिक्षणांचे प्रोत्साहन देणे. अस्पृश्यता निवारनासाठी कार्य व योजना बनवली गेली होती. दुकान किंवा पुजा स्थानामध्ये त्यांच्यासाठी किंवा त्यांच्या प्रवेशासाठी उद्देशपूर्ण काही कार्यक्रम तयार केले गेले होते.

स्वातंत्र्य प्राप्तीच्या नंतर भारतीय राज्यघटने मध्ये अनुसूचित जाती (आणि त्याच बरोबर अनुसूचित जनजाती आणि मागासलेल्या जाति) च्या सामाजिक नियोग्यता निवारणच्या उद्देशाने किंवा विविध हिताला प्रोत्साहित करणाच्या उद्देश्याने काही प्रयत्न केले गेले होते. त्याचा महत्वपूर्ण उद्देश होता. अस्पृश्यता निवारण, सामाजिक अन्याय किंवा विविध प्रकारच्या शोषणापासुन सुटका, धार्मिक संस्था मध्ये सर्व व्यक्तींना प्रवेश विहिरी, तलाव, हॉटेल किंवा दुकाना मध्ये प्रवेश, शाळा, महाविद्यालयामध्ये प्रवेश मिळविण्याचा अधीकार, शासकीय सेवेमध्ये त्यांच्यासाठी राज्याला अरक्षण देण्याची अनुमती, लोकसभा आणि विधानसभा मध्ये त्यांना प्रतिनिधित्व देणे, त्यांच्या हितासाठी किंवा हिताच्या रक्षणार्थ आणि कल्याण कार्यक्रमाला प्रोत्साहित करण्याच्या उद्देश्याने सल्ला समित्या आणि विभागाची स्थापना करणे, इत्यादी. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या कार्याला राजनैतिक दान ची संज्ञा दिली.

अनुसूचित जातिंच्या हिताच्या रक्षणार्थ अनुसुचित जाति आणि जनजाति राष्ट्रीय आयोग च्या रूपात एक कार्य व्यवस्था ची स्थापना केली गेली. हा आयोग अनुसुचित जाति, अनुसुचित जमातीच्या विकासासाठी निती आणि प्रकरणावर कार्य, करण्याच्या उद्देश्याने सल्लाहाकार समितीच्या रूपात निर्माण केल्या गेल्या. त्यामध्ये सामाजिक मानवशास्त्र, सामाजिक कार्य किंवा अन्य, सामाजिक विधवानांची समीती आहे. यांचे प्रमुख कार्य पूढील प्रमाणे आहेत.

- अस्पृश्यतेची सिमा किंवा त्यातुन उत्पन्न सामाजिक भेदभाव आणि वर्तमान उपाययोजनाच्या प्रभावशिलतेचे अध्ययन करणे.
- अनुसुचित जाति आणि अनुसुचित जमाती च्या सदस्यांच्या प्रति केले गेलेले अपराध आणि सामाजिक आर्थिक परिस्थिचे अध्ययन करणे.
- समाजाच्या मुख्य प्रवाहात एकीकरणाला सुनिश्चित करण्याच्या उददेशाने अनुसुचित जाती आणि अनुसुचित जमाती विकासच्या विविध अंगाचा अभ्यास करणे.

## १०.१० पंचवार्षीक योजनेत विकासाची योजना

पंचवार्षीक योजनेत अनुसुचित जाति आणि अनुसुचित जमातीच्या कल्याणासाठी विशेष लक्ष दिले गेले.

स्वतंत्र भारताची पहिली पंचवार्षिक योजनेत त्यांच्या विकासासाठी (१९५१-५६) मध्ये ३०.०४ कोटी रूपयांची तरतुद करण्यात आली. त्यात वाड करून दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत (१९५६-६१) पंचवार्षिक योजनेत ७९.४१ कोटी रूपयांची तरतुद करण्यात आली. तृतीय योजनेत (१९६१-६६) मध्ये १००.४० कोटी रूपये. पंचवार्षिक योजनेत (१९७४-७९) मध्ये २९६.१९ कोटी रूपये. सहावी योजना (१९८०-८५) मध्ये १३३७.२१ कोटी रूपये आणि सातव्या पंचवार्षिक योजनेत (१९८५-९०) मध्ये १५२१.४२ कोटी रूपयांची तरतुद केली गेली. ह्या लोकांसाठी राज्य सरकारने शुध्दा मोठया प्रमाणात आर्थिक योजना तयार केली.

केंद्र सरकार कडून नियोजीत योजना राबवला गेल्या, त्या काही पूढील प्रमाणे सांगता येतील.

१. विविध सेवामध्ये अनुसुचित जाति आणि अनुसुचित जमातिच्या प्रतिनिधीत्वामध्ये सुधारणा घडवून आनन्याच्या उद्देश्याने विविध स्पर्धात्मक परिक्षांसाठी ट्रेनिंग आणि कोंचिग.

२. उच्च, शिक्षण प्राप्त करण्याच्या उद्देश्याने मॅट्रीक परिक्षा नंतर आर्थिक मदतीच्या रूपात शिष्यवृत्ती देने.

३. शाळा, महाविद्यालय आणि विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या अनुसुचित जाति आणि अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी निवासासाठी वस्तीगृहाची निर्मीती.

४. अनुसुचित जाति आणि अनुसुचित जमातिचा विकास आणि समस्यांच्या अभ्यासात रस निर्माण करने आणि प्रसिध्द समाज विज्ञान संशोधन संस्थासाठी आर्थिक मदत देणे.

५. अनुसुचित जाति आणि अनुसुचित जमातीच्या विदयार्थ्यांसाठी मेडिकल किंवा इंजिनियरींग कोर्सचे पुस्तके प्रदान करने.

६. भारताच्या बाहेर म्हणजे विदेशात शिक्षण घेणाऱ्या विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती आणि प्रवास अनुदान देणे.

अनुसुचित जाति आणि जमातींच्या विकासात गती आनन्यासाठी वरिल उपाययोजनाच्या वितिरीक्त भारतीय संविधानने विभन्नि स्तरावर शासकीय संस्थामध्ये त्यांचे प्रतिनिधीत्व किंवा शैक्षणिक संस्थामध्ये आणि नौकऱ्यांमध्ये आरक्षण ठेवले गेले . अनुसुचित जातीसाठी १५.० प्रतिशत अरक्षण ठेवले गेले. ही मर्यादा काही राज्यामध्ये पाठवीली गेली आहे.

## १०.११ राखीव मतदार संघ

अनुसुचित जाती साठी काही राखीव मतदार संघ राखीव ठेवण्यात आले आहे. याचा मुख्य उद्देश अनुसुचित जातीचे प्रतिनिधी लोकसभेत आणि विधान सभेत निवडून दयावेत असी शुध्दा तरतुद करण्यात आलेली आहे. ती लोकसंख्येच्या प्रमाणात ठेवण्यात आलेली आहे. राखीव मतदार संघामुळे अनुसुचित जातीचे उमेदवार संसदेत आणी विधान सभेत निवडून आनले जातात.

## १०.१२ सरकारी सेवामध्ये विशेष आरक्षण

सरकारी नौकऱ्यामध्ये विशेष आरक्षण केवळ भर्ती मध्येच नाही तर उच्च पदावर पदोन्नती मध्ये लागु आहे. त्यांच्या प्रतिनिधीत्वाला सुनिश्चित करण्यासाठी वयाच्या मर्यादेत सुट, योग्यता मध्ये सुठ किंवा अनुभवामध्ये शुद्धा सुठ दिली जाते. पंधरा नोव्हेंबर (१५.११.१९९२) च्या आरक्षण प्रकरणावर आपल्या निर्णययोमध्ये उच्च न्यायालयाने म्हटले कि, पदोन्नती मध्ये कुठलेच अरक्षण असु शकत नाही, परंतु केंद्र सरकारने काही वेळासाठी हे अरक्षण चालू ठेवण्याचा निर्णय घेतला. उच्च न्यायालयाने ही शुध्दा घोषणा केली की, काही ठरावीक पदे, जसे कि, विज्ञान विभाग, चिकित्सा विज्ञानामध्ये, इंजिनियरींग मध्ये, संरक्षण, शिक्षणामध्ये प्रोफेसर, एयर इंण्डिया व इंडियन एयर लाइन्स मध्ये पायलट इत्यादी पदासाठी आरक्षण दिले जाणार नाही.

वरील सर्व उपाय योजनामुळे अनुसुचीत जाती अनुसुचीत जमातीच्या स्थितीमध्ये बदल झाला का? ह्यावर काही लोकांचे मत आहे कि, जो पर्यंत जाति व्यवस्था आहे किंवा जाति व्यवस्था अस्तित्वात राहील तो पर्यंत अनुसुचित जाती-जमातीच्या परिस्थिती मध्ये सुधारणा घडून येणार नाही.

**आपली प्रगती तपासा.**

१. अनुसुचीत जाती आणी अनुसुचित जमातीच्या विकासासाठी पंचवार्षिक योजनेत केलेल्या तरतुदीचा आढावा घ्या.

२. अनुसुचीत जाती आणि जमातीसाठी सरकारी सेवा मध्ये अरक्षणाचे महत्व का? घ्यावर प्रकाश टाका.

## १०.१३ इतर मागास जाति / वर्ग (Other Backward Castes /Classes)

अनुसुचित जाति आणी अनुसुचीत जमातीसाठी आरक्षणाची सुविधा स्वातंत्र्यप्राप्ती नंतर भारतीय राज्यघटनेत दिले गेले, परंतु इतर मागास जाती / वर्गासाठी आरक्षण ७ ऑगस्ट १९९० मध्ये जनता दल सरकार द्वारा घोषीत केलं गेल. २७ प्रतिशत जागे वरती ३७४२ मागास जाति आणी वर्गास सुरक्षितता दिली हे मंडल आयोगाच्या सिकारशीवरून दिल गेल. आयोगानी ३१ डिसेंबर १९८० मध्ये आपला रिपोर्ट सादर केला होता. या रिपोर्टवर लोकसभा आणि राज्यसभा दोन्ही सभागृहात चर्चा केली होती. त्यानंतर हे प्रकरण परिक्षणासाठी सचिव समीतीकडे पाठविले गेला होता. हे प्रकरण संसदेच्या दोन्ही सभागृहामध्ये खुप वेळा विचार करण्यासाठी पाठविले गेलें परंतु कुठलाच निर्णय घेतला गेला नाही. मंडल आयोगाच्या सिफारसीची घोषणा तत्कालीन पंतप्रधान वी.पी. सिंह यांनी केली. हा एक राजकिय निर्णय मानला गेला. कारण याच्यासी संबंधीत उद्भावणाऱ्या समस्यांचा अभ्यास न करता घेतला गेला होता. त्यांनी जाती आणि जाति सुचक मध्ये येणारी गती, तीव्रता आणि औचित्यला प्रभावीत न करता हा निर्णय घेतला गेला होता.

मंडल आयोग द्वारा विशिष्ट जाति/वर्गाला मागास आहे म्हणून ठरविण्यासाठी कुठला निकस लावला गेला होता? आयोगाने तीन निकसाचा उपयोग केला होता. सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक सामाजिक सुचकांचे चार आधार होते, शैक्षणिक सुचकांचे तीन आणि आर्थिक सुचकांचे चार आधार होते. एकंदरीत आकरा निर्देशक होते. प्रत्येक निर्देशकाला विशेष वजन दिले गेले. ते मनमानी किंवा विवेकहीन होते. सामाजिक निर्देशकाला तीन गुणांचे वजन शैक्षणिक निर्देशकाला दोन गुणांचे आणि आर्थिक निर्देशकाला एक अंकाचे वजन निर्धारित केले गेले. ज्या जातिला ५० प्रतिशत गुण मिळाले,अर्थात आकरा गुण किंवा जास्त त्यांना मागास जातीच्या यादी मध्ये ठेवले गेले.

मंडल आयोगाची सिफारीस लागु करण्याच्या निर्णयाने विदयार्थ्यांमध्ये आक्रोषाच वातावरण झाल. संपूर्ण देशात आंदोलन भडकल खुप कुटूंबाला आपल्या मुलाच्या शिक्षणासाठी खुप समस्यांचा सामना करावा लागला. लाभदायक नौकरी प्राप्त करण्यासाठी अडचणी पहिल्यापासुनच होण्याच कारण देशात, मोठ्या प्रमाणात बेरोजगारी होती. खुप विदयार्थी बेरोजगारी किंवा निमम्या रोजगाराच्या शक्येतेमुळे घाबरले होते. अशा परिस्थिती मध्ये सरकारने घेतलेला निर्णयामध्ये २७ प्रतिशत ये अतिरिक्त आरक्षण निश्चत तरूणामध्ये नैराश्य निर्माण करण्याचे कारण होते.

## १०.१४ आरक्षण नीति :

अनुसुचित जाती बरोबर मागास जातीच्या लोकांनसाठी विशेष अधीकार आणि योजनाची मागणी हा अधीकारांचा विषय आहे. हा अधीकार ना उदारता किंवा लोकउपकाराचा आहे. सर्व आयोगाने किंवा समित्याने या मुद्दयाचा विचार केला. यामध्ये मिलर समिती (पूर्व राज्य मैसुर द्वारा नियुक्त) किंवा कालेकर आयोग (भारत द्वारा १९५५ मध्ये नियुक्त) स्विकार

केला आहे. काही न्यायालयाने शुध्दा या प्रकरणाची तपासनी केली आहे. एका न्यायाधीशाने संकेत दिला की आरक्षण योजनेमुळे आतनिष्ठतेला जन्म दिला. त्यामुळे प्रत्येक जातीला आणि समुदायाला वाटु लागले की आपण मागास आहोत असे मानन्यात लागले आहेत. दुसऱ्या एका घटनेमध्ये सर्वोच्य न्यायालयाच्या पूर्व मुख्य न्यायाधीश न्यायमुर्ती चन्द्रचुड ने सिफारिश केली होती की, आरक्षण योजनेचे पूनरावलोकन दर पाच वर्षानंतर केल पाहिजे. सर्वोच्य न्यायालयाने १५-११-१९९२ आपल्या निर्णयामध्ये जातीच्या आधारावर आरक्षण योजनेला अनुमोदन दिल. आजच्या विषयावर चर्चा होत आहे, आरक्षण योजना किंवा संरक्षणात्मक भेदभाव न्यायाला सुनिश्चित करण्यासाठी किंवा सामाजिक रूपाने दलित किंवा आर्थिक शोषनाचे शिकार दलीत लोकांसाठी तर्कपूर्ण आणि लाभदायक योजना आहे. ?

## १०.१५ अनुसुचित जाती आणि भटक्या विमुक्त जाती-जमातीसाठी अत्याचार प्रतिबंध कायदा (१९८९)

अनुसुचित जाती आणि भटक्या विमुक्त जाती-जमातीसाठी अत्याचार थांबविण्यासाठी अत्याचार प्रतिबंध कायदा केला. या कायदाचे उद्दिष्ट हे आहे की, अनुसुचित जाती व भटक्या व विमुक्त जाती जमातीतील लोकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणने.

या कायदानुसार खास न्यायालयाची नेमणुक करून अनुसुचित जाती व भटक्या व विमुक्त जातीतील लोकांविरूध्द खटले सोडविले जाऊ शकतात.

- **गुन्हे व नियमांचे उल्लंघन :**

जो कोणी अनुसुचित व भटक्या व विमुक्त जाती जमातीतील नसुन गुन्हा केल्यास त्यास कमीत कमी सहा महिने व जास्तीत जास्त पाच वर्षापर्यंत तुरूंगवास व दंड म्हणुन काही रक्कम भरावी लागेल.

- **गुन्हयाचे स्वरूप खालील प्रमाणे :**

१. अशा तऱ्हेची वर्तणुक की जिच्यामुळे अ.जा. व भ.वि.जा.ज मधील व्यक्तीस जखम होईल, किंवा त्याचा पाणउतारा होईल किंवा त्यास त्रास होईल किंवा त्यांच्या जागेमध्ये धाण, कचरा टाकणे किंवा टाकाऊ पदार्थ किंवा मेलेली जनावर टाकूण देने किंवा त्यांच्या शेजारी टाकणे.

२. अ.जा. व भ.वि.जा. जमाती मधील एखादया व्यक्तीस जबरदस्तीने अंगावरील कपडे काडावयास लावणे किंवा त्यास कपडे काढून चालण्यास लावणे किंवा त्याचे तोंड रंगवून त्यांची धिंड काठणे किंवा असे कृत्य जे माणुस म्हणून समाजातील त्या व्यक्तीची किमंत कमी करने.

३. चुकिच्या मार्गाने अ.जा.व भ.व वि.जा.ज. मधील एखादया व्यक्तीच्या जमीनीवर कब्जा करणे किंवा जमीन कसणे किंवा अशी जमीन त्या व्यक्तीचे नाव कमी करून आपल्या नावावर करणे.

४. चुकीच्या मार्गाने अ.जा. व भ.व वि.जा.ज. मधील एखादया व्यक्तीच्या नावावरील जमीन किंवा काही जागा किंवा पाणी काढून घेऊन त्या व्यक्तीच्या आनंद हिरावून घेणे.

५. सरकारने सांगितलेली सामाजिक जबाबदारी म्हणुन अ.जा.व भ. व वी.जा. ज्यांनी जमातीतील एखादया व्यक्तीस भुल पाडून किंवा जबरदस्ती करीन भीक मागावयास लावणे किंवा तशाच प्रकारचे वर्तन त्यास करावयास लावणे.

६. अ.जा.व भ.व वि.जा.ज मधील एखादया व्यक्तीस जबरदस्ती करून मतदान करू न देने किंवा एखादया ठरावीक उमेदवारास मतदान करावयास लावणे किंवा कायदयाने सांगितलेल्या पध्दतीपेक्षा वेगळ्या पध्दतीने मतदान करावयास लावणे.

७. समाज सेवकास अविश्वासार्ह माहिती पुरविणे आणि त्यामुळे तो समाजसेवक त्याची कायदेशीर ताकत वापरून अ.जा.व भ.वि.जा मधील व्यक्तीस जखमी करेल किंवा त्रास देईल.

८. जाणीपूर्वक पाणउतारा करणे किंवा अशा तऱ्हेने घाबरविणे की त्याची मानहानी होईल व हे सर्व लोकांचे लक्ष असेल अशा सार्वजनिक ठिकाणी करणे.

९. अ.जा.व भ.व वि.जा.ज मधील कोणत्याही व्यक्तीची ग्राहक म्हणुन सार्वजनिक हॉटेल किंवा अशा कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी त्यास खरेदी करू न देणे.

१०. अ.जा.व भ.व वि.जा.ज मधील कोणत्याही व्यक्तीस जबरदस्तीने त्यांचे राहते घर किंवा गाव सोडून जाण्यास लावणे.

## १०.१६ अनुसुचित जातीसाठी राष्ट्रीय आयोग :

१९९० मध्ये राज्यघटनेमध्ये सुधारणा (६५वी सुधारणा) केली गेली त्यानंतर अनुसुचित जाती आणि भटक्या विमुक्त जाती व जमातीसाठी कायदेशीर राष्ट्रीय आयोग अस्तित्वात आला. १९९२ मध्ये कायदा समत केला गेला. त्यानंतर आणखी तीन यासारखेच आयोग नेमले गेले.

० **अनुसुचित जमातीसाठी राष्ट्रीय आयोगाची कार्ये :**

या आयोगाची कार्य व जबाबदारी खालीलप्रमाणे आहे.

१. राज्य घटनेने दिलेल्या अनुसुचित जातींच्या संरक्षणाच्या संदर्भात असणाऱ्या गोष्टीबाबत देखरेख करणे किंवा शोधुन काठने जे राज्यघटनेच्या अनुसार किंवा इतर कोणत्याही नियमानुसार किंवा सरकारने दिलेल्या हुकुमानुसार असेल व संरक्षणाच्या कार्यपध्दतीचा आढावा घेणे.

२. अनुसुचित जातीच्या हक्कांच्या आणि संरक्षणाच्या नुकसान करण्याबाबतच्या करण्यात, आलेल्या तक्रारींची चौकसी करणे.

३. अनुसुचित जातींच्या आर्थिक व सामाजिक सुधारणासाठी योजना आणण्यांमध्ये प्रत्यक्ष सहभागी होणे आणि सल्ला देणे आणि त्यांच्या सुधारणाचा आढावा घेणे.

४. ज्या संरक्षक पध्दतीचा वापर चालू असेल त्यांचा आढावा घेऊन तो अहवाल राष्ट्रपतीना सादर करणे.

५. अशा अहवालामध्ये परिणामकारक उपायांची शिफारस करणे की ज्यामुळे संरक्षक उपाययोजनांची अमंलबजावनी परिणामकारक होईल तसेच इतर शिफारसी संरक्षण सामाजिक व आर्थिक उन्नती व विकास, अनुसुचित जातींचा विकास झपाटयाने होईल, या सुचना केंद्र किंवा राज्याला करणे.

६. अशाच प्रकारची इतर कार्य जी संरक्षण, आर्थिक व सामाजिक उन्नती झपाटयाने होऊन अनुसुचीत जातीचा विकास होईल तसेच वाटल्यास राष्ट्रपती त्या संदर्भात एखादा नियम करू शकतील.

० **आयोगाचे अधिकार :**

ज्यावेळी आयोग एखादया तक्रारिची चौकशी करीत असेल किंवा एखादया प्रकरणाची चौकशी करीत असेल तेव्हा त्याला दिवाणी न्यायालयाप्रमाणे अधिकार असतील.

१. एखादया व्यक्तीस हजर होण्यासंबंधी आदेश देणे, भारतातील कोणत्याही भागातुन त्याची शपथेवर तपासणी घेणे.

२. कोणत्याही कागदपत्रांचा शोध घेणे आणि त्याची उत्पादन प्रक्रिया तपासणे.

३. प्रतिज्ञापत्रावर पुरावे घेणे.

४. कोणत्याही न्यायालयातुन किंवा कार्यालयाकडून सामाजिक कागदपत्रे किंवा त्यांची सत्यप्रत्र मागविणे.

५. कागदपत्राची व साक्षीदारांची तपासणी करण्यासाठी आयोगास पाठविणे.

६. राष्ट्रपती देतील असे कोणतेही दुसरे प्रकरण.

० **अनुसुचित जमातींसाठी राष्ट्रीय आयोग :**

## १०.१७ अनुसुचित जमातींसाठी राष्ट्रीय आयोगाची कार्ये

१. अनुसुचित जातिंच्या संरक्षणासाठी असलेल्या तरतुदींचे कार्य योग्य प्रकारे होत आहे किंवा नाही याबाबत संशोधन करणे (या तरतुदी भारतीय राज्य घटनेने, दिलेल्या आहेत त्यात विविध तरतुदी उदा. शिक्षणविषयक, आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि नौकरी सेवा यांचा समावेश होतो.)

२. अनुसुचित जमातींच्या हक्क व संरक्षणाबाबत तक्रारींची चौकशी करणे.

३. राज्य किंवा केंद्र पातळीवर अनुसुचीत जातीची सुधारणेतील प्रगतीचे मुल्यमापन करणे, त्यांच्या साठीच्या आर्थिक व सामाजिक सुधारनाकरीता योजना आखण्यात भाग घेणे व त्या संदर्भात सल्ला देणे.

४. राष्ट्रपतीना वार्षिक अहवाल सादर करणे तसेच आवश्यकता वाटल्यास इतर वेळीही अनुसुचीत जमातीसाठीच्या संरक्षण तसेच आर्थिक आणि सामाजिक सुधारणांसाठीच्या ज्या योजना असतील त्यांची अमलबजावणी व्यवस्थित होत आहे किंवा याचा अहवाल पाठविणे तसेच अशा योजनांच्या परिणामकारक अमलबजावणीसाठी उपाय योजना सुचविणे.

५. अनुसुचित जमातींसाठीच्या संदर्भातील इतर कार्य करणे.

६. अनुसुचित जमातीसाठीच्या संरक्षण सुधारणा, प्रगती आणि भल्यासाठी आयोग खालील प्रकारची इतर कार्ये करू शकतो.

- अनुसुचीत जमातीच्या छोटया जंगलामध्ये राहत असतील ती जागा त्यांना कायमस्वरूपी मिळविण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे.
- नियमाप्रमाणे अनुसुचित जमातींच्या खनीज संपत्ती, पाण्याचे स्त्रोत वगैरे यावर हक्क राहील.
- अनुसुचित जमातींच्या सुधारणेसाठी उपाययोजना केल्या पाहिजेत आणि त्यांच्यासाठी कायमस्वरूपी उत्पन्नाची साधने उपलब्ध करून दिली पाहिजेत.
- अनुसुचित जमातीच्या मोठमोठया सुधारनेच्या प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या असतील त्यांच्या पूर्नवसनासाठी प्रयत्न करणे.
- अनुसुचित जमाती त्यांच्या मातृभुमिपासून दुरावल्या जाणार नाहीत, यासाठी उपाय योजना तयार केल्या पाहिजेत आणि ज्या जमाती आगोदरच दुरावल्या असतील त्यांच्या पूर्नवसनासाठी प्रयत्न केले पाहिजेत.
- अनुसुचित जमातींचे जास्तीत जास्त सहकार्य व त्यांचा सहभाग, जंगले आणि सामाजिक वनीकरण यांच्या संवर्धनासाठी करून घेतला पाहिजे.
- अनुसुचित जमाती जी सतत एका जागेवरून दुसऱ्या जागेवर शेती करण्याची पध्दती अवलंबितात ती पध्दती बंद करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत म्हणजे त्यांची स्वतःची, जमिनीची आणि पर्यायाने पर्यावरणाची अवनती थांबेल.

**आपली प्रगती तपासा.**

१. आरक्षण निती यावर टीपा दया.

२. अनुसुचित जातीसाठी राष्ट्रीय आयोगाचे कार्य कोणती ते लिहा.

## १०.१८ सारांश (Summary)

जर अनुसुचित जातीना विद्रोह करण्यासाठी तयार व्हायाच असेल, जस कि ते अनुभवात की हिंसे शिवाय आपला आवाज ऐकला जात नाही, तेव्हा राष्ट्राला यांच्यासाठी खुप मोठी किंमत चुकवावी लागेल, आमचे सरकार आणि जणतेला हया लोकांना सन्मानाचे जीवन जगण्यासाठी चांगले व्यवहाराची संधी दयावी लागेल. अशा प्रकारे आरक्षणाचे चांगले आणि वाईट परिणामावर चर्चा करून चांगले काही प्राप्त होणार नाही. यांच्यामुळे समस्या आणखीनच गंभीरही होईल आणि देशाचे तुकडे होतील. शक्ती प्राप्त अभिजन, सरकार, राजनैतिक दल आणि जनतेला कारणे शोधण्यासाठी खोलात जावे लागेल, का आरक्षण स्पष्ट रूपाने आवश्यक झाले आहे. आणि हया घातक प्रथेला समाप्त करण्यासाठी काय करने आवश्यक आहे.

## १०.१९ शब्दार्थ : (Glossary)

१. साम्यवाद : समानतेला महत्व देणे, समानता असावी असे मानने.
२. धर्मनिरपेक्षवाद : सर्व धर्म समान, कुठल्याच एका धर्माला महत्व न देणे.
३. विलेहवाट : नाहिंसे करणे, संपूर्ण नष्ट करणे.
४. स्थित्यंतरः बदल, परीवर्तन
५. प्रतिके : खुन, चिन्ह
६. संक्रमण : एकाकडून दुसऱ्याकडे जाणे, एकापिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जाणे.
७. मृत : डोळ्याने दिसनारे, स्पर्श जाणवने
८. विवेकहीन : काहीच समजत नसने, जाणिव नसने.
९. अविश्वासार्ह : चुकीची माहिती, खरे नसने.

## १०.२० प्रश्न : (Questions)

१. आधुनिकता म्हणजे काय ? आधुनिकतेचे स्पष्टीकरण दया.
२. परंपराची व्याख्या दया. आणि परंपरेचे विश्लेषण करा.
३. आधुनिकता आणि परंपरा यातील फरक स्पष्ट करा.
४. अनुसुचित जाती आणि जमातीसाठी पंचवार्षीक योजनेत विकासाची योजना यावर विवेचन करा.

❖❖❖❖

# विभाग - २

# ११

# विकासाची माहिती करून घेणे
# (Understanding Development)

**घटक रचना :**

११.० उद्दिष्टये (Objectives)
११.१ प्रस्तावना (Introduction)
११.२ मूलभूत संकल्पना : सामाजिक परिवर्तन (Basic Concepts: Social Change)
११.३ सामाजिक परिवर्तनाचा अर्थ, व्याख्या, उत्क्रांती वाद आणि विकास (Meaning Definition, Evolution Growth and Development of Social Change)
११.४ सामाजिक परिवर्तनाचे घटक / कारणे / तत्वे / कारके (Facts or Causes of Social Change)
११.५ सामाजिक परिवर्तनाची वैशिष्टये (Characteristics of social change)
११.६ सामाजिक परिवर्तनातील अडथळे (Obstactes in social change)
११.७ सारांश (Summary)
११.८ प्रश्न (Questions)
११.९ संदर्भ ग्रंथ (References Books)

## ११.० उद्देश (Objectives)

१) विद्यार्थ्यांना विकासाबाबात माहिती करून देणे.
२) सामाजिक परिवर्तनाची उत्क्रांती विकासाची माहिती करून घेणे.
३) सामाजिक परिवर्तनाचे घटक, वैशिष्टये, अडथळे यांची माहिती जाणून घेणे.

## ११.१ प्रस्तावना (Introduction)

गेल्या अर्धशतकातील प्रमुख संकल्पना पैकी विकास ही एक संकल्पना आहे. रेमण्ड विलियम्स आपल्याला सांगतात त्याचप्रमाणे जरी विकास (डेव्हलपमेंट) शब्द इंग्रजी भाषेमध्ये सतराव्या शतकाच्या मध्यापासून समाविष्ट होता. तरी सुध्दा विकासाचा सिध्दांत प्रामुख्याने दुसऱ्या महायुध्दांनंतर अस्तित्वात आला.

विकास हया शब्दाच्या अनेक उपयोजनांचा आढावा घेताना विलियम्सने दाखवले आहे की, विकास घडून येण्याच्या संकल्पनेशी संबंधित शब्दांचा आधुनिक व सर्वात रंजक वापर हा आर्थिक बदलाच्या स्वरूपाशी संबंधित संकल्पनांशी जोडला गेलेला आहे. विकासाच्या संकल्पनेचा उगम कसा झाला? हयाचा आणि ही संकल्पना ज्या बौध्दिक आणि ऐतिहासिक पार्श्वभूमीवर वापरली जाताना आढळते. तिचा उगम कसा झाला? हयाची चर्चा या प्रकरणा मध्ये करण्यात आलेली आहे.

परिवर्तन हा शब्द आपल्या नेहमीच्या परिचयाचा आहे. परिवर्तन म्हणजे बदल होय. दैनंदिन जीवनात अनेक गोष्टींमध्ये बदल आढळतो. पूर्वी गोष्ट ज्या स्थितीत होती त्या स्थितीत नसणे म्हणजे त्यात बदल होणे होय. परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे. निसर्गाच्या संदर्भात बदल किंवा परिवर्तन हा शब्द आपण नेहमीच वापरतो.  काल खूप थंडी नव्हती. परंतु आज मात्र कडक थंडी आहे. याचाच अर्थ कालच्या नैसर्गिक वातावरणात बदल किंवा परिवर्तन झाले असे आपल्याला सांगायचे असते. नैसर्गिक परिस्थतीमध्ये सतत परिवर्तन होत असते. पावसाळा, हिवाळा आणि उन्हाळा असे निसर्गाचे ऋतुचक आहे. या ऋतुचक्रामुळे नैसर्गिक वातावरण परिवर्तन आढळून येते.

निसर्गाप्रमाणेच मानव समाजात देखील परिवर्तन होत असते. मानव समाज हा पूर्णपणे स्थिर नाही तर काळानुसार मानव समाजात परिवर्तन घडून येते. सुप्रसिध्द ग्रीक विचारवंते ॲरिस्टॉटल यांनी मानव ही समाजशील प्राणी आहे असे म्हटले आहे. मानव हा समाजशील प्राणी तर आहेच परंतु त्याच प्रमाणे तो परिवर्तनशील देखील आहे. मानवी समाजाचे परिवर्तनशीलता हे महत्वाचे असे एक वैशिष्टय आहे. मानवी समाजाच्या परिवर्तनाची प्रक्रिया सतत सुरू असते. मानव समाजाच्या आचार-विचार, संस्था, संघटना, जीवनपध्दती इत्यादी मध्ये सतत परिवर्तन होत असते. या परिवर्तनाच्या प्रक्रियेमुळेच मानव समाज रानटी अवस्थेतून आजच्या प्रगत अवस्थेत येऊन पोहोचला आहे. त्यामुळे मानवी समाजच्या दृष्टीने परिवर्तनाची प्रक्रिया अत्यंत महत्वाची आहे.

अमेरिकन समाजशास्त्रज्ञ डॉ. हॅरी जॉन्सन यांच्यामते, कोणत्याही समाजात दोन प्रकारच्या प्रक्रिया सातत्याने सुरू असतात. १) समाजव्यवस्थेत स्थर्ये प्रदान करणारी प्रक्रिया आणि २) समाजव्यवस्थेत परिवर्तन घडवून आणणारी प्रक्रिया. समाजव्यवस्थेत स्थर्ये प्रदान करणाऱ्या प्रक्रियेत सामाजिकरण आणि सामाजिक नियंत्रण यांचा समावेश होतो. सामाजिकरणाच्या प्रक्रियेतून त्या समाजातील मूल्ये, वर्तनप्रकार गरज भागाविण्याच्या पध्दतीने अंतरीकरण करण्याचे प्रयत्न केले जातात. त्याच प्रमाणे सामाजिक नियंत्रणाच्या माध्यमातून समाजसंमत वर्तनाचे पालन करण्यासाठी सदस्यांवर दबाव आणला जातो. अशाप्रकारे सामाजिकरण आणि सामाजिक नियंत्रणाद्वारे समाजात स्थैर्य ठेवले जाते.

समाजव्यवस्थेचे स्थैर्य टिकवून ठेवण्याच्या दृष्टिने सामाजिकरण केले जाते. परंतु सामाजिकरण करत असताना आई वडील मुलांना जाणीवपूर्वक विद्यमान समाजरचने पेक्षा भविष्यकालीन समाजाला सुसंगत अशी मुल्ये आणि वर्तनप्रकार शिकवितात. याचाच अर्थ त्यांच्या आई वडिलांना त्यांने जे शिकविले ते ते आपल्या मुलांना जसेच्या तसे शिकवीत नाहीत. म्हणजे मुलांचे सामाजिकरण करीत असताना. आई वडील त्यांना नविन गोष्टी सुध्दा शिकवितात. त्यामुळे सामाजिक परिवर्तनाचे बीजारोपण सामाजिकरणाद्वारे केले जाते. म्हणूनच सामाजिकरण सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेला साह्य करीत असते.

समाजशास्त्राचे जनक ऑगस्ट कॉम्ट यांनी समाज परिवर्तन दर्शविणाऱ्या "विकासाच्या अवस्था किंवा तीन अवस्थांचा नियम" हा सिध्दांत मांडला. कॉम्टच्या मते मानवी समाजाचा विकास हा क्रमशः धर्मशास्त्रीय, आध्यात्मिक आणि प्रत्यक्षवादी या तीन अवस्थातून झाला आहे. हर्बर्ट स्पेन्सर यांनी समाजात सजातीयतेकडून विजातीयते कडे बदल होत असल्याचे स्पष्ट केले. सुप्रसिध्द विचारवंत कार्ल मार्क्स यांनी "द्वंद्वात्मक भौतिकवाद" या आपल्या जगप्रसिध्द सिध्दांताद्वारे समाजात परस्पर विरोधी विचारंच्या संघर्षामधून सामाजिक परिवर्तन घडून येते असे स्पष्ट केले आहे. त्यांच प्रमाणे एडवर्ड टायलर थॉर्सटीन वेल्बन ऑगबर्न सोरोकिन इत्यादि समाजशास्त्रज्ञांनी सामाजिक परिवर्तनाच्या संदर्भात वेगवेगळे सिध्दांत मांडून सामाजिक परिवर्तनाची मीमांसा केली आहे.

## ११.२ मूलभूत संकल्पना ; सामाजिक परिवर्तन (Basic Concepts: Social Change)

**विकास संकल्पनेचा उगम :**

अगदी सुरूवातीच्या वापरामध्ये विकासाची संकल्पना विघटन किंवा तुटणे मोडणे हयाचा विरूध्दार्थी शब्द म्हणून वापरली गेली. रूपकाप्रमाणे अठराव्या शतकामध्ये त्या संकल्पनेचा विस्तार झाला आणि त्यामध्ये मानवी मनाच्या क्षमताचे विकसन करव्याचा भाव समाविष्ट झाला. सामान्य बोली भाषे मध्ये विकास म्हणजे अशी प्रक्रिया की ज्याद्वारे एखादी वस्तू किंवा एखादे शरीर ह्यांच्या क्षमता व्यक्त होतात. जो पर्यंत नैसर्गिक संपूर्ण पूर्ण स्वरूपातील क्षमता प्राप्त होत नाहीत. तो पर्यंत ही प्रक्रिया सुरु होत असते. अशा प्रकारे त्या संकल्पनेचा पहिला प्रमुख विस्तार नवीन जीवशास्त्रामध्ये झाला आणि तो उत्क्रांतीशी संबंधीत संकल्पनेच्या जवळ असणारा जाणारा होता. म्हणून ही संकल्पना रूपक प्रकारे वनस्पती आणि प्राण्यांच्या नैसर्गिक वादीचे स्पष्टीकरण वापरली गेली हया रूपकांमध्ये विकासाचे उदिष्ट आणि पुढे जाऊन त्याची कार्यपध्दती दर्शविणे शक्य झाले.

अठराव्या शतकाच्या शेवटच्या पंचवीस वर्षामध्ये ह्या जीवशास्त्रीय रुपकांचे सामाजिक चौकटीमध्ये रुपांतर झाले. तसेच वॉल्फ (१७५९) आणि डार्विन (१८५९) हयांच्या मध्ये संजीवाच्या आस्तित्वाच्या सुयोग्य प्रकारच्या बदलाच्या संकल्पनेमधून अधिक परिपर्ण प्रकाराच्या बदलाकडे जातांना विकासाच्या संकल्पनेचा उदय झाला. अठराव्या शतकाच्या मध्यमा मध्ये विशिष्ट उत्क्रांत होत जाणाऱ्या टप्पांमधून जाणाऱ्या समाजाची संकल्पनेचा म्हणून विकास ही संकल्पना व्यक्त झाली आणि तिची व्याख्या साकार होणे अशी केली गेली प्रगतीची संकल्पना हया व्याख्येमध्ये समाविष्ट केलेली होती. ह्या कालखंडामध्ये वैज्ञानिकांद्वारे विकास आणि उत्क्रांती हया संकल्पना समानार्थी संकल्पना म्हणून वापरल्या जात होत्या.

**विकासाची बौद्धिक पार्श्वभूमि :**

आपण पाहतो की एकोणविसाव्या शतकाच्या शेवटी विकासाच्या संकल्पनेमध्ये अनेक प्रकारचे भिन्न अर्थ एकत्रित केले होते. हया प्रश्नासोबत समाजशास्त्राचा पाया घालणारी महान व्यक्ती त्यांच्या भिन्न मार्गानुसार जोडल्या गेल्या होत्या. विकासाच्या व्यापक चौकटी मध्ये ऑगस्ट कॉम्टच्या सामाजिक स्थिरत्वाच्या आणि सामाजिक बदलाच्या संकल्पनामुळे काही समस्या निर्माण झाल्या. दुरखाईमच्या यांत्रिक आणि सेंद्रिय स्थिरतेच्या संकल्पनामुळे ही काहीसे तसेच झाले. ह्या समस्येचे चित्र मार्क्सने अधिक वास्तव प्रकारात मांडले आणि विकासाच्या

सिध्दांताच्या उन्नतीमध्ये आणि त्याचा खोलवर विस्तार होण्यामध्ये मूलभूत स्वरूपाचे योगदान दिले.

किंबहूना मार्क्सच्या मांडणीतील विकास हा एक प्रमुख घटक बनला. त्याने समान अशा आवश्यक असलेल्या नैसर्गिक नियमानुसार विस्तारणारी ऐतिहासिक प्रक्रिया म्हणून विकासाचा उल्लेख केला. इतिहासाची हेगेलची संकल्पना आणि उत्क्रांतीची डार्विनची संकल्पना हया दोन्हींची एकत्र मांडणी वैज्ञानिक युगाची पहाट होण्याच्या मार्क्सच्या काळात केली गेली.

प्रगती, उत्क्रांती, परिपक्वता हया सारख्या शब्दांच्या समूहासोबत विकासाला जोडणाऱ्या उपरिहार्य संबंधाना समजून घेण्यास आपण सुरूवात केली. विकास नेहमीच एक अनुकूल घटक दर्शवतो. साध्याकडून गुंतागुंतीकडे जाणारे पाऊल कमसरतेकडून श्रेष्ठते कडे आणि वाईटाकडून चांगल्याकडे जाण्याचा प्रवास दर्शवतो. हा शब्द हे दर्शवतो की, व्यक्ती किंवा एखादी गोष्ट चांगल्या प्रकारे कार्यरत आहे. कारण आवश्यकता अटळ वैश्विक नियम ध्यायाच्या जाणिवे मध्ये एका इच्छित ध्यैयाच्या दिशेने आगेकूच करून आहे. एका शतकापूर्वी पर्यावरणशास्त्राचा जनक हेलेक्नि दिलेल्या शब्दाचा अर्थ आजही टिकून आहे. विकास हा इथून पुढील काळात असा जादूचा शब्द असेल जो आपल्या भोवती असलेल्या सर्व गूढ गोष्टींचे (समस्यांचे) समाधान करेल किंवा कमीत कमी त्यांचे कसे समाधान करावे. ह्या बदल आपल्याला मार्गदर्शन करेल.

काळाच्या ओघात विकास सर्व मानवी समाजांची एक आवश्यकता आणि अनिवार्य भवितव्य म्हणून बघितला जाण्यास सुरूवात झाली. सामाजिक जीवनाचे कित्येक प्रकार असताना ही जो एक प्रकार उत्पादनाची औधोगिक पध्दती - सामाजिक उत्क्रांतीच्या एकरेषीय पध्दतीचा अंतिम टप्पांची व्याख्या ठरला. अशा प्रकारे पाश्चात्य संकल्पना मध्ये इतिहासाची पुर्नरचना करण्यात आली. विकासाच्या हया रूपकामुळे इतिहासाच्या पाश्चात्य वंशावळीला (उत्तराखडयाला) जागतिक वर्चस्व प्राप्त झाले आणि त्यामुळे भिन्न-भिन्न संस्कृतीतील लोकांची त्यांच्या सामाजिक जीवनाचे प्रकार निश्चित करण्याची संधी संपुष्टात आली.

असे असले तरीही हया ठिकाणी आपल्याला विकासाच्या मांडणीचे युरोपकेंद्रीत स्वरूप लक्षात ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे पृथ्वीवरील दोन तृतीयांश लोकांसाठी विकास हया शब्दाचा सकारात्मक अर्थ - जो त्याच्या सामाजिक निर्मितीतून दोन शतकांनी उगम पावला ते कसे नाही. ह्याची आठवण देणारा आहे. तो एक अनिष्ट अपमानजनक परिस्थितीचा निदर्शक आहे. त्यापासून सुटका होण्यासाठी त्यांना इतरांचे अनुभव आणि स्वप्नांचा अंगीकार करावा लागेल.

वूल्फगँग जाख्सने संपादित केलेल्या विकास शब्दकोष १९९२ मध्ये पहिल्यांदा प्रकाशित झाला. त्यांने शेवटच्या ४० वर्षाना विकास युग म्हणून संबोधित केले आहे. आणि त्याच वेळेस हे युग आता समाप्तीच्या जवळ येत आहे. आणि त्याचा अस्त होण्याची वेळ झालेली आहे. असेही म्हटले आहे.

**विकासाची कारकींद :**

वूल्फगँग सॉच्स मते ट्रूमनद्वारे विकासाच्या संकल्पनेचे तिच्या इतिहासामध्ये अत्यंत नाटयमय आणि विलक्षण परिवर्तन झाले होते. आणि आधुनिकतावादी सैद्वांतिकां द्वारे म्हणजेच तिच्या पहिल्या प्रणे- त्यांद्वारे तिचा आणखीनच विपर्यास करण्यात आला जेव्हा त्यांनी विकासाला

आर्थिक वादीच्या बरोबर आणून ठेवले. ह्या विचारवंतासाठी विकास म्हणजे अविकसित प्रदेशातील प्रति व्यक्तिमागे असलेली उत्पन्नाची वाढ होय. १९५५ मधील लेवीसचे प्रतिपादन पाहिले. हे समजून घेतले पाहिजे की, आमच्या साठी मुख्य घटक वितरण नसून वाढ आहे. विकासाशी संबंधित जागतिक पानावरील विचार प्रक्रिये मध्ये असलेल्या आर्थिक वाढीवर असलेला मुख्य भर दर्शवते. उल्लेखनीय आहे. या गोष्टीवर डाव्या बाजूकडे (साम्यवादाकडे) रूची असलेल्या पॅल बारान सारख्या अर्थशास्त्रज्ञाला आणि वॉल्टर रोस्टोव्ह ह्या साम्यवादी नसलेला जाहिर नामाच्या लेखलासारखा आधुनिकतावादी सौद्वांनिकरण आर्थिक वाढीला दिले जाणारे हे महत्व पटत होते.

तरीसुध्दा पन्नासच्या दशकाच्या शेवटी आपल्या विकासाला फक्त आर्थिक वाढीपासून वेगळे करण्याचा प्रयत्न दिसतो. पहिल्या संयुक्त राष्ट्र - विकास दशकाच्या (१९६०-७०) कृती प्रस्तावामध्ये नमूद केले गेले आहे की, विकसनशील देशांची समस्या फक्त वाढ ही नाही तर विकास आहे. (त्यामध्ये पुढे म्हटले गेले होते.) विकास म्हणजे वाढ अधिक बदल त्यानुसार बदल हा सामाजिक सांस्कृतिक आणि आर्थिक तसेच गुणात्मक आणि संख्यात्मक ही असतो. लोकांचे राहणीमान सुधारणे ही गोष्ट सर्वात महत्वाची असली पाहिजे.

हळुहळु होत असलेल्या हा बदल असूनसुध्दा पहिल्या संपूर्ण संयुक्त राष्ट्र-विकास दशकामध्ये विकासाला अनेक टप्यांपासून जाणारा आर्थिक वाढीचा स्पष्ट असा मार्ग म्हणूनच समजण्यात आले. सामाजिक घटकांना आर्थिक घटकांशी जोडणारा एकत्रीकरण विकास संशोधन शब्द राहिला. १९६३ मध्ये संयुक्त राष्ट्र सामाजिक विकास संशोधन संस्था स्थापन झाल्यानंतर १९६० च्या दशकात नंतर मान्य केलेला सामाजिक विकास काही प्रमाणात आर्थिक भरभराटीचे भाकित आणि काही प्रमाणात त्यासाठीचा नैतिक आधार आणि त्यामध्ये अंतभूर्त असलेले परिश्रम अशा प्रकारे समजला गेला.

तरीसुध्दा साठच्या दशकाच्या शेवटी आर्थिक वाढीच्या टोकाच्या आग्रहाच्या विरोधात अनेक गोष्टी घडण्यास सुरुवात झाली. त्या काळाच्या धोरणातील व पध्दतीमधील कमतरता दशकाच्या आरंभीच्या स्थितीपेक्षा अधिक उघड होती. एकत्रीकरणाची मागणी करणारे घटक अधिक व्यापक झाले होते आणि जलद भरभराटीमुळे असमानते मध्येही वाढ होते. हे स्पष्ट झाले होते. त्यामुळे त्यावेळी अर्थशास्त्रज्ञ हे सामाजिक घटकांना सामाजिक अवरोध म्हणून जास्त प्रमाणात बंधन होते. कल्पनाच्या पातळीवर त्यावेळी विकासाच्या आर्थिक व्याख्येच्या मुखवटया विरूध्द अधिक सर्वसाधारण विरोधी सुर होता आणि त्याने त्याच्या उदिष्टांना कमी किंवा आधिक प्रमाणात संबंधीत नसलेल्या संख्यात्मक निकर्षापुरते मर्यादीत केले.

जागतिक अर्थव्यवस्थेतील अधिक गरीब प्रदेशाच्या विकासाच्या संदर्भात १९८० च्या दशकाला हरवलेले दशक म्हणून ओळखले जाते. म्हणजे कर्जाच्या संकटाने त्यांना मोठया प्रमाणात मागे आणले तरीही आपल्याला हे समजून उत्पन्नात घट झाली असली तरी त्या उलट तसेच दक्षिण आणि पूर्व जागतिक अर्थव्यवस्थेशी अधिक निगडीत झालेले होते. दक्षिण आशियाशी देशांसह त्यांनीही मध्यपूर्वेतील तेल फुगवटयाचा (बूम) लाभ मिळाला होता.जे की त्या काळातील सर्वाधिक भरभराट असलेले व्यापार क्षेत्र होते. पॅसिफिक आशियायी देशांनी मध्ये पुर्वेतील देशांना श्रमशक्तीची निर्यात केली ज्यामधून पॅसिफीक आशियायी देशांना तुलनेने कमी झळ वसली ह्याचे एक कारण म्हणजे १९७० च्या दशकामध्ये निर्यात सेवाकर असलेला त्याच्या कर्जाचे प्रमाण दक्षिण अमेरिकन देशाच्या अर्धे होते. त्यांना लाभलेल्या भुराजवलिय अनुकूलते

बरोबरच नवीन चलन केंद्रीत जागतिक अर्थव्यवस्थे मध्ये त्या कर्जाच्या कमतरते बाबत (क्रेडिट कॉट्रॅक्शन) कमी संवेदनशील होते असे असले तरी सुध्दा विकसित उत्तर आणि अविकसित दक्षिण ह्यामधील दरी रूदांवतच गेली आहे. आंद्रे गुर्डल फ्रॅंकसहित आधुनिकतावादाचे टीकाकार ह्यांच्यामते हा उत्पादनाच्या जागतिक व्यवस्थेमध्ये (जागतिकीकरणे) तिसऱ्या जगातील देशाच्या वाढत्या एकत्रीकरणाचा (त्याची कमतरता किंवा अपूर्णता नाही) परिणाम आहे ज्यामुळे घटना अशा प्रकारे घडल्या.

१९९०च्या दशकामध्ये विकास प्रकल्प अधिक टिकेचा विकास ठरला आणि तिसऱ्या जगातील देशामधील सदस्य देशांमध्ये त्याची विश्वासाहिता बऱ्याच प्रमाणात कमी झाली. त्याला मिश्र प्रमाणात यश मिळाले आणि त्याच्या मुख्य विषयाला केंद्रीत करण्याबद्दल वाढती प्रतिक्रिया आहे. जगाच्या काही भागांमध्ये वांशिक किंवा सांस्कृतिक जाणीवेच्या चळवळीची त्यांच्या राजकीय दाव्यांना पुनःमांडण्यास सुरूवात केली आहे. तसेच औपचारिक आर्थिक संबंधाच्या पलिकडे वैकल्पिक उपजीविकेसाठीच्या धोरणांना आखण्यासाठी चळवळीचे प्रमाण वाढत आहे. त्याचा उद्देश समुदायाच्या उपजिवेकेचे नवीन पर्याय शोधणे किंवा आधुनिक वाणिज्य व्यवस्थेमध्ये विशेष प्रकारे पुडे असलेल्या जुन्या जीवनशैलीना नव्याने समोर आणणे हाही आहे. हया चळवळी विकास प्रकल्पाच्या ध्येयांमधील विश्वास कमी झाल्याचे दर्शवितात.

**आपली प्रगती तपासा : (Check your progress)**

१. विकास संकल्पनेचा उगम आणि विकासाची बौध्दिक पाश्र्वभूमी स्पष्ट करा.

**विकासाचे परिणाम :**

संयुक्त राष्ट्रे आणि विकासाच्या आराखडयाच्या (इस्टाब्लिशमेंट) सुरूवातीच्या इतर संस्थानी जगतल्या देशांची तीन गटांमध्ये वर्गवारी केली आहे. विकसित देश, विकसनशील देश आणि कमी विकसित देश. विकास आराखडयाच्या सुरूवातीला समीक्षकांनी हया विभागणीला १९६० च्या दशकाच्या उत्तरार्धात विकसित आणि अविकसित देश (अंडर-डेव्हलप्ड) हयापुरते मर्यादित करण्याची संकल्पना मांडली. त्यांच्यामते, मागासलेले किंवा गरीब देश वसाहतवादाच्या काळातील प्रक्रियेमध्ये त्यांची लूट झाल्याने व राष्ट्रीय आणि आंतर राष्ट्रीय पातळीवर चालू असलेल्या भांडवलशाहीच्या जाचक शोषणामुळे त्या परिस्थितीला पोहले होते. अविकसितता ही विकासाची निष्पती होती. १९६० मध्ये उत्तर गोलार्धातिल देश दक्षिण गोलार्धातील देशापेक्षा २० पट अधिक श्रींमत होते. आणि १९८० मध्ये ते ४६ पट अधिक श्रीमंत झाले.

वोल्फगॅंग सॉच्स निरीक्षक हया टीकेवर आक्षेप घेतात आणि दावा करतात की, टीकात्मक प्रकारे न मांडता ते हया दृष्टिकोनाचा विरोध करताना दिसतात. विकासाच्या दिशाहीन आणि ढोंगी अशा पाश्चात्य धुरिणांवरील त्यांच्या परिणामकारक टीकेमुळे ते फक्त विकासाच्या रूपकाला एक जालीम स्वरूप देण्या मध्येच यशस्वी झाले आहेत.

उत्तरेचे दक्षिण बदलचे धोरण ज्यामुळे ओळखले जाते. त्या सौहार्द, भ्रष्टाचार शोषण ह्यांच्या मिश्रणाची मूलभूत चौकट देण्याचे कोम विकासाने केले असे सॉच्सचे मत आहे. तसेच त्याचा दावा आहे की, ज्या ऐतिहासिक परिस्थितीमुळे ही कल्पना प्रत्यक्षात उतरली, ती स्थिती संपुष्टात आलेली आहे. पारंपारिक मानवाला आधुनिक मानवामध्ये बदलणारा विकास प्रकल्प अयशस्वी ठरला आहे. त्याच्या उलट, त्यामुळे मानवी समाजांमध्ये आणि समाजांतर्गत फार मोठया प्रमाणात विविधतेची हानी झाली आहे. आजच्या काळातील व्यापारी देश (राज्य व्यवस्था) आणि विज्ञान ही जागतिकीकरण घडवणारी प्रचंड शक्ती आहे. औधोगिक वाढीवर आधारित समाज ह्यांचे अनेक उपयुक्त पर्याह हया वाढत्या एकसुरी संस्कृतीने संपुष्टात आणले आहेत. आणि अत्यंत वेगळे असलेले भविष्य रचनात्मक प्रकारे हाताळण्याच्या मानवी क्षमतेला धोकादायकरीत्या कमकुवत केले आहे.

**आपली प्रगती तपासा : (Check your progress)**

१. विकासाचे परिणाम स्पष्ट करा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## ११.३ सामाजिक परिवर्तनाचा अर्थ, व्याख्या उत्क्रांतीवाद आणि विकास : (Meaning, Definition, Evolution Growth and Development of Social Change)

समाजशास्त्रात सामाजिक परिवर्तनाची संकल्पना विशेष महत्वाची असून ती एका निश्चित अर्थाने वापरली जाते. सामाजिक परिवर्तनाच्या संदर्भात समाजशास्त्रज्ञांनी काही व्याख्या दिल्या आहेत. या व्याख्या लक्षात घेतल्यानंतरच सामाजिक परिवर्तनाचा अर्थ अधिक स्पष्ट होईल.

**११.३.१व्याख्या :**

१) **हॅरी जॉन्सन :** मूलभूत अर्थाने, समाज संरचनेतील बदल म्हणजेच सामाजिक परिवर्तन होय. ("In its basic sense social change means change in social structure") - (Harry Johnson)

२) **किंग्जले डेव्हिस :** सामाजिक परिवर्तन म्हणजे सामाजिक संघटनात अर्थात समाजाच्या संरचना आणि प्रकार्यात झालेला बदल होय.

३) **मॅकआयव्हर आणि पेज :** समाजशास्त्रतज्ञ म्हणून आपली विशेष अभिरूची ही सामाजिक संबंधाशी आहे. केवळ या सामाजिक संबंधातील बदलास सामाजिक परिवर्तन असे म्हणतात.

४) **गिलिन आणि गिलिन :** सामाजिक परिवर्तन म्हणजे स्वीकृत जीवन प्रणालीतील परिवर्तन होय. मग ते परिवर्तन भौगोलिक परिस्थिती, सांस्कृतिक घटक, लोकसंख्येची रचना किंवा विचार प्रणालीत झालेला असो, हे परिवर्तन किंवा आविष्कार कोणत्याही रीतीने समुहाअंतर्गत झालेले असते.

हरी जॉन्सन आणि डेव्हिस यांनी सामाजिक संरचनेतील बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन असल्याचे स्पष्ट केले आहे. तर मॅक आयव्हर आणि पेज यांनी सामाजिक संबंधातील बदलास सामाजिक परिवर्तन म्हटले आहे. गिलिन आणि गिलिन यांनी स्वीकृत जीवन प्रणालीतील परिवर्तन सामाजिक परिवर्तन मानले आहे. वरील सर्व व्याख्यांच्या अध्ययनावरून हे स्पष्ट होते की, समाजाच्या संरचनेतील परिवर्तन म्हणजे सामाजिक परिवर्तन होय.

हॅरी जॉन्सनच्या मते, कोणत्याही वस्तुंच्या विविध भागांमध्ये असलेल्या पुष्कळशा स्थिर स्वरूपाचे परस्परसंबंध म्हणजे त्या वस्तूची संरचना होय. याचाच अर्थ वस्तूंचे अनेक भाग किंवा घटक असून त्यांच्यात निश्चित स्वरूपाचे संबंध असतात. कोणत्याही वस्तूप्रमाणेच समाजाची रचना सुध्दा काही घटकांनी मिळून झालेली असते. या समाजसंरचनेच्या घटकात परिवर्तन झाले की, समाजाच्या संरचनेत देखील परिवर्तन घडून येते.

समाजशास्त्राच्या शब्दकोशात समाजसंरचनेची व्याख्या करण्यात आली आहे. या व्याख्येनुसार कोणत्याही समाजिक समूहाच्या अंतर्गत व्यवस्थेचा प्रस्थापित प्रकार म्हणजे समाजरचना होय. समूहाच्या सदस्यांचा परस्परांशी आणि खुद्द समुहांशी असलेल्या समुच्चयाच्या स्वरूपाचा समाजसंरचनेत अंतर्भाव होतो. यावरून हे स्पष्ट होते की, कोणत्याही समाजाच्या विविध भागांच्या परस्परसंबंधाचा स्थिर स्वरूपावरच त्या समाजाची संरचना किंवा व्यवस्था अवलंबून असते. त्यामुळे समाजाच्या विविध भागांच्या परस्परसंबंधाच्या स्वरूपात बदल झाला की, समाजसंरचनेत बदल होतो. म्हणजेच सामाजिक परिवर्तन घडून येते.

सामाजिक संरचनेचे भूमिका, उपगट प्रमाणके आणि मुल्ये हे चार प्रमुख घटक असून ते परस्परसंबंधित आहेत. या घटकांतील परिवर्तनाचा प्रभाव सामाजिक संरचनेवर पडून सामाजिक परिवर्तन घडून येते. सामाजिक संरचनेच्या घटक तत्वाच्या आधारे सामाजिक परिवर्तनाचे विश्लेषण हॅरी जॉन्सन यांनी 'Sociology - A Systematic Introduction' या ग्रंथात पुढील प्रमाणे केले आहे.

### १) सामाजिक मुल्यातील बदल (Change in Social Values) :

सामाजिक संरचनेच्या घटक तत्वामध्ये मुल्याचा अंतर्भाव होतो. समाजात प्रचलित असणाऱ्या अत्यंत व्यापक प्रमाणकांना मूल्ये म्हणतात. मुल्य हे एक प्रकारचे मापदंड असते. यांच्या आधारावर योग्य किंवा अयोग्य, चांगले किंवा वाईट, चूक किंवा बरोबर असे वर्तनाच्या संदर्भात मूल्यांकन केले जाते. मुल्ये ही समाजाकरिता आदर्शात्मक असतात. त्यांचा आणि भूमिकांचा जवळचा संबंध असतो. समाजातील व्यक्तींनी मुल्यानुसारच वर्तन करावे अशी समाजाची अपेक्षा असते.

सामाजिक मूल्ये बदलत असतात. परंतु मूल्यांमध्ये अल्पकाळामध्ये परिवर्तन होत नाही. त्याकरिता बऱ्याच दीर्घकाळाची आवश्यकता असते. जेव्हा मुल्यात परिवर्तन होते तेव्हा व्यक्तींना परिवर्तीत मुल्यानुसारच वर्तन करावे लागते. अशा वेळी समाजात देखील परिवर्तन घडून येते.

## २) संस्थात्मक परिवर्तन : (Institutional Change) :

समाजातील विवाहसंस्था, कुटुंबसंस्था, राज्यसंस्था इत्यादी सामाजिक संस्थात परिवर्तन घडून आल्यास, समाजात देखील परिवर्तन घडून येते. विशिष्ट संबंधाचे निर्धारण करणाऱ्या प्रमाणकांची सापेक्षत; स्थिर व्यवस्था म्हणजे संस्था होय. संस्थात्मक परिवर्तनामुळे संघटना, भूमिका आणि आशयामध्ये देखील परिवर्तन होत असते.

विवाहसंस्थेमधील बहुपत्नी विवाहा ऐवजी एकपत्नी विवाहाची पध्दत अस्तित्वात येणे, कुटुंब संस्थेतील संयुक्त कुटुंबाचे विघटन होउन विभक्त कुटुंब पध्दती निर्माण होणे किंवा हुकूमशाही ऐवजी लोकशाही पध्दती निर्माण होणे ही सर्व सामाजिक संस्थेतील परिवर्तनाची उदाहरणे होत. संस्थात्मक परिवर्तनामुळे समाजात सुध्दा परिवर्तन घडून येते.

## ३) मालकी हक्क व पुरस्कार वितरण परिवर्तन (Change in Distribution of Possession and Rewards) :

मालकी हक्क व पुरस्कार वितरण व्यवस्थेत परिवर्तन झाल्यास समाजात देखील परिवर्तन घडून येते. समाजव्यवस्थेच्या संरचनात्मक आणि उपसंरचनात्मक अशा पैलूंमध्ये फरक केला जातो. संरचनात्मक पैलूंमध्ये बदल न होता उपसंरचनात्मक पैलूंमध्ये देखील बदल घडून येत असतो. पुरस्कार, सवलती आणि मालकी हक्क यांचे वितरण हा समाजव्यवस्थेच्या या उपसंरचनात्मक पैलूंपैकी एक पैलू होय. उदा. एकाधिकारशाही निर्माण झाल्यास त्यामुळे मालकी हक्कांवर परिणाम होतो. अशा प्रकारे मालकी हक्क व पुरस्कार यांच्या वितरण प्रणालीत परिवर्तन झाल्यास सामाजिक संरचनेत परिवर्तन होते. म्हणजेच सामाजिक परिवर्तन घडून येते.

## ४) भूमिका धारकांमधील परिवर्तन : (change in personnel)

समाजाचा किंवा कोणत्याही संघटित समुहाचा एक व्यवस्था म्हणुन विचार केल्यास प्रत्येक सदस्याचा भूमिकाधारक म्हणून विचार करता येईल. काही काळानंतर भूमिका धारकांमध्ये सुध्दा बदल होत असतो. जसे व्यक्ती वृध्द झाल्यास अथवा मृत्यु पावल्यास त्या व्यक्तीची जागा दुसरी व्यक्ती घेते. म्हणजेच भूमिका धारकांमध्ये बदल होतो. भूमिका धारकांमध्ये परिवर्तन झाल्यास त्यांच्या कार्यक्षमतेमधील फरक लक्षात येतो.

उदा. एखादा संस्थेचा जुना अध्यक्ष बदलवून नवीन व्यक्ती अध्यक्ष झाली आणि नवीन अध्यक्ष अधिक कार्यक्षम असेल तर त्यामुळे त्या संस्थेच्या कार्यप्रणालीवर त्याचा परिणाम होतो. अशाप्रकारे भूमिकाधारकांमधील बदल हा पर्यायाने मुल्ये आणि प्रमाणकांना प्रभावित करणारा ठरल्यामुळे सामाजिक संरचनेत परिवर्तन होते आणि त्यामुळे समाजात परिवर्तन होते.

## ५) भूमिकाधारकांच्या क्षमता व अभिवृत्ती मधील परिवर्तन :

भूमिका धारकांमधील परिवर्तन आपण लक्षात घेतले. ज्याप्रमाणे भूमिकांधारकामध्ये होणाऱ्या बदलाचा संबंध हा संरचनात्मक परिवर्तनाशी आहे. तोच संबंध भूमिका धारकांच्या क्षमता व अभिवृत्ती यांच्या मध्ये होणारे परिवर्तन आणि संरचनात्मक परिवर्तन यात आहे. भूमिकां धारकांमधील क्षमता आणि अभिवृत्तीमधील बदल हा संरचनात्मक नाही. परंतु ते संरचनात्मक परिवर्तनाचे एक कारण आहे. कोणतीही व्यवस्था ही त्या व्यवस्थेत सहभागी होणाऱ्या व्यक्तींच्या कार्यक्षमतेवर व अभिवृत्तीवर अवलंबून असते. त्यामूळेच भूमिकाधारकांच्या क्षमता आणि अभिवृत्तीमध्ये बदल किंवा फरक झाला तर त्याचा परिणाम व्यवस्थेवर होऊन परिवर्तन घडून येते.

अशाप्रकारे हॅरी जॉन्सन यांनी सामाजिक संरचनेतील परिवर्तन म्हणजे मुल्ये, संस्था, मालकी हक्क व पुरस्कार वितरण, भूमिका धारकांच्या क्षमता व अभिवृत्तीतील परिवर्तन होय. असे प्रतिपादन केले आहे.

**आपली प्रगती तपासा : (Check your progress)**

सामाजिक परिवर्तनाचा अर्थ व व्याख्या सांगा .

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

### ११.३.२उत्क्रांती (Evolution) : डार्विन (Darwin) :

यांनी सर्वप्रथम जैविक उत्क्रांतीचा सिध्दांत (Biological Evolution) मांडला. डार्विनच्या उत्क्रांतीवादाचा समाजशास्त्रज्ञांनच्या विचारावर देखील प्रभाव पडला. त्यामुळे काही समाजशास्त्रज्ञांनी सामाजिक उत्क्रांती (Social Evolution) बदल आपले विचार मांडलेत. Evolution हा इंग्रजी शब्द लॅटिन भाषेतील Evovere या शब्दापासून बनला आहे. या शब्दाचा अर्थ विकसित होणे (To Develop) किंवा प्रकट करणे असा आहे. Evolutionया शब्दासाठी मराठी मध्ये उत्क्रांती असा शब्द वापरण्यात येतो. उत्क्रांती ही संज्ञा वाढ (Growth)या संज्ञेपेक्षा अधिक व्यापक आहे. कारण वाढ संज्ञेत फक्त संख्यात्मक बाजूवर भर दिला आहे. तर उत्क्रांतीमध्ये आंतरिक बाजूवर भर दिला जातो.

उत्क्रांती म्हणजे मंदगतीने (हळूवार) होणारे परिवर्तन होय. यामध्ये त्या समाजातील सुप्त आंतरिक वैशिष्टयांचा विकास होतो. हर्बर्ट स्पेन्सर, एडवर्ड टायलर, मार्गन इत्यादी समाजशास्त्रज्ञांनी उत्क्रांती बाबत सिध्दांत मांडले आहेत. स्पेन्सरने तर सामाजिक उत्क्रांतीचे चार नियम सांगितले आहेत.

१) सामाजिक उत्क्रांती हे नैसर्गिक विकासाच्या नियमांचे एक सांस्कृतिक किंवा मानवी स्वरूप असते.
२) ज्याप्रमाणे नैसर्गिक विकास होतो. त्याचप्रमाणे सामाजिक विकास होतो.
३) सामाजिक उत्क्रांती ही एक मंदगतीने होणारी प्रक्रिया आहे.
४) सामाजिक उत्क्रांती प्रगतिशील असते.

स्पेन्सर यांच्या मते, उत्क्रांतीमध्ये पदार्थ अनिश्चित, असंबध्द समानतेकडून निश्चित सुसंबध्द भिन्नतेकडे परिवर्तित होतात. समाजाच्या बाबतीत साध्या अवस्थेकडून गुंतागुंतीच्या अवस्थेकडे स्थित्यंतर होत जाते. हे होत असताना केवळ आकारात बदल होत नसून समाजाच्या संरचनेमध्ये देखील बदल होत जातात. मार्गनने कुटुंबाची उत्पत्ती स्वैराचार अवस्थेकडून एक विवाह कुटुंबाच्या अवस्थेप्रत झाली असल्याचे स्पष्ट केले आहे.

उत्क्रांती या प्रकारच्या परिवर्तनातून समाजातील परिवर्तनाची दिशा स्पष्ट होते. समाजातील मंद गतीने, निरंतर आणि दिशेने होणारे परिवर्तन उत्क्रांती वरून लक्षात येते. विशेष म्हणजे अशाप्रकारच्या परिवर्तनासाठी दीर्धकाळाची आवश्यकता असते.

**आपली प्रगती तपासा : (Check your progress)**

१. सामाजिक परिवर्तनातील उत्क्रांतीची माहिती लिहा.

---

---

---

---

### ११.३.३क्रांती (Revolution) :

उत्क्रांतीमुळे समाजात परिवर्तन येत असते. परंतु हे परिवर्तन मंदगतीने घडून येते. त्याचप्रमाणे सुधारणा, प्रगती आणि विकासाच्या माध्यमातून देखील मंदगतीने परिवर्तन होत असते. या सर्व प्रकारांपेक्षा क्रांती हा सामाजिक परिवर्तन प्रकार मात्र आपल्या वैशिष्टयांमुळे वेगळा आहे. क्रांतीद्वारे समाजात अकस्मात, त्वारित आणि आमुलाग्र स्वरूपाचे परिवर्तन होत असते. प्रस्थापित सामाजिक व्यवस्थेला बदलून नवीन सामाजिक व्यवस्था निर्माण करण्यासाठी क्रांतीकारी चळवळी प्रयत्न करीत असतात. क्रांतीकारी चळवळीमागे एक निश्चित विचार प्रणाली असते. बहुसंख्यक लोक हक्कांपासून वंचित असणे, क्रांतीकारी संघटित समूह, प्रभावी विचार प्रणाली आणि क्रांतीकारी नेतृत्व या गोष्टीमुळे क्रांती घडुन येण्यास विशेष मदत होते. क्रांती राजकीय किंवा सामाजिक असो क्रांतिचा केवळ समाजाच्या एका विशिष्ट क्षेत्रावरच प्रभाव पडत नाही. तर समाजाच्या इतर क्षेत्रावर देखील त्याचा परिणाम होत असतो. क्रांती ही लोकशाही मार्ग आणि हिंसात्मक मार्ग अशा दोन्ही मार्गाने घडवून आणली जाते.

फ्रान्समध्ये १७८९ मध्ये क्रांती घडून आली या क्रांतीने फ्रान्समधील राजेशाही व्यवस्था नष्ट करून स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या तत्वांवर आधारित असलेली लोकशाही स्वीकारली. या क्रांतीचा फ्रान्सच्या समाजजीवनावर फार मोठा परिणाम झाला. या क्रांतीमुळे फ्रान्समध्ये आमूलाग्र असे सामाजिक परिवर्तन घडून आले. मार्क्सच्या क्रांतीकारी विचारप्रणालीवर आधारित लेनिनने रशियात १९१७ मध्ये क्रांती केली. या क्रांतीमुळे राशियातील समाजात त्वरित परिवर्तन घडून आले. क्रांती ही अचानक किंवा अकस्मात घडून येत असली तरी क्रांतीसाठी आवश्यक असलेली पार्श्वभूमी निर्माण करावी लागते. तरच समाजात क्रांती घडून येते. क्रांती सहज घडून येते असे नाही. क्रांतीला प्रस्थापित लोक सतत विरोध करीत असतात. कारण समाजव्यवस्थेशी प्रस्थापित लोकांचे विशिष्ट हितसंबंध असतात. त्यामुळे त्यांना कोणतेही परिवर्तन नको असते.

थोडक्यात क्रांती हा सामाजिक परिवर्तनाचा एक महत्वाचा प्रकार आहे. क्रांतीचा मानवी जीवनावर फार मोठा प्रभाव पडत असतो. त्यामुळे समाजात त्वरित व्यापक परिवर्तन घडून येते.

**आपली प्रगती तपासा : (Check your progress)**

१. सामाजिक परिवर्तनातील क्रांती विषयी माहिती लिहा.

___

___

___

___

### ११.३.४प्रगती : (Progress) :

सामाजिक परिवर्तनाचा प्रगती हा सुध्दा एक महत्वाचा प्रकार आहे. प्रगतीमुळे सामाजिक परिवर्तन घडून येते. Progredior या लॅटिन शब्दापासून झीर्सिशी हा शब्द बनला आहे. प्रगती म्हणजे समाज स्वीकृत ध्येयांच्या दिशेने गाठलेला पुढचा टप्पा होय. लम्ले (Lumely) यांच्या मते, प्रगती परिवर्तन होय. परंतु हे परिवर्तन कोणत्याही दिशेने होत नसून इच्छित किंवा मान्य दिशेने होणारे परिवर्तन होय. (Progress in change, but is change in adesired or approved direction) तर मॅकऑव्हर यांच्या मते, प्रगती हा संज्ञेने केवल दिशेचाच बोध होत नाही. तर ती अंतीम ध्येयाकडे घेऊन जाते. (By Progress we imply not merly direction, but towards some final goal.)

प्रगतीच्या संज्ञेमध्ये दोन गोष्टी मुख्य आहेत. १) ध्येयाचे स्वरूप २) त्या ध्येयापासून आपले अंतर; अशा प्रकारे प्रगती म्हणजे भौतिक आणि नैतिक अशा दोन्ही प्रकारची समृध्दी होय. उत्क्रांती द्वारे केवळ परिवर्तन सूचित केले जाते. ते परिवर्तन चांगले अथवा वाईट असून शकते. परंतु प्रगती ही नेहमी चांगली असते. कारण सांस्कृतिक मूल्याने मान्यता दिलेल्या दिशेने झालेले परिवर्तन म्हणजे प्रगती होय. प्रगती म्हणजे उन्नतीशील परिवर्तन होय. एखादा समाज प्रगत होत आहे किंवा नाही हे त्यासमाजाचे मान्य केलेल्या मुल्यांच्या संदर्भात मुल्यामापन करून सांगता येते. ज्यावेळी विकास अथवा उत्क्रांती ही अपेक्षित दिशेने होत जाते. तेव्हा त्या उत्क्रांतीला प्रगती म्हणतो येते. प्रगती जाणीवपूर्वक केली जाते. एखाद्या विशिष्ट क्षेत्रात नियोजनबध्द रीतीने प्रयत्न करून प्रगती साध्य केली जाते. प्रगतीत बदलाची गती मंद असते. या उलट क्रांती मध्ये बदलाची गती ही तीव्र असलेली आढळून येते.

प्रगतीची वैशिष्टये ही पुढील प्रमाणे सांगता येतील.

१) प्रगती परिवर्तन आहे. परंतु हे परिवर्तन कोणत्या तरी विशिष्ट दिशेने असते.

२) इच्छित ध्येयाची पूर्ती करणाऱ्या परिवर्तनाच्या अवस्थेला प्रगती म्हणतात.

३) प्रगती ही सामुहिक असते.

४) प्रगतीकरिता इच्छा आणि संकल्प आवश्यक असते.

५) प्रगतीची संकल्पना परिवर्तनशील आहे ज्यास आज प्रगतीचे प्रतीक समजले जाते ती उद्या पतनाचे प्रतीक बनू शकते.

प्रगतीच्या विरूध्द असणारी संज्ञा म्हणजे अधोगती होय. अधोगती (Regress) ही संज्ञा देखील परिवर्तन दर्शक आहे. प्रगती म्हणजे समाजाची इच्छित ध्येयाकडे वाटचाल होय.

तर अधोगती म्हणजे समाजाची ध्येयाच्या विरूध्द दिशेने होणारी वाटचाल होय. व्यक्तीने समाजाच्या प्रमाणकां विरूध्द वर्तन केले तर ते विचलित वर्तन होय. त्या विचलित वर्तनास अधोगती म्हटले जाते. सामाजिक संबंधावर नियंत्रण ठेवणारी शक्ती ज्यावेळी प्रभावी नसते. त्यावेळी विचलन होते. प्रमाणक शून्यता हे अधोगतीचेच उदाहरण होय. अधोगतीच्या परिस्थितीत समाजातील विविध घटक आपली समाजात सामाजिक समस्या वाढतात. अधोगती ही केवळ मानवनिर्मित कारणामुळेच घडून येत असते असे नाही तर अनेकदा प्रतिकूल नैसर्गिक कारणांमुळे सुध्दा अधोगती घडून येते.

**आपली प्रगती तपासा : (Check your progress)**

सामाजिक परिवर्तनातील प्रगती विषयी माहिती लिहा.

---

---

---

---

**११.३.५विकास (Development) :**

मानव हा समाजशील प्राणी आहे. त्याच प्रमाणे तो विकासशील आहे. मानवाला विकास हवा असतो. तो विकासाच्या दिशेने वाटचाल करीत असतो. त्यामुळे मानवी समाजाचा विकास झालेला आढळतो. विकासाच्या माध्यमातून मानवी समाजात परिवर्तनाची प्रक्रिया निरंतर सुरू आहे. समाज हळूहळू सभ्यतेच्या उच्च अशा अवस्थेकडे जातो. त्यामुळे समाजाचा विकास घडून येतो.

सर्व समाजाचा विकास घडून येत असला तरी सर्वच समाजात एकाच दिशेने विकास घडून येईल असे नाही. समाजापरत्वे विकासाचा स्तर हा वेगवेगळा असतो. त्यामुळे जगातील सर्वच समाजाचा एकसारखा विकास घडून येतो. तर काही समाजाचा विकास लवकर घडून येतो. तर काही समाजात विकासाची प्रक्रिया अतिशय मंद असते. आदिवासी समुदायात विकासाची गती मंद आहे. तर त्या तुलनेत शहरी समुदायात विकासाची गती ही जास्त आहे. असे असले तरी प्रत्येक समाज हा विकासाच्या दिशेने वाटचाल करीत असतो. त्यामुळे सामाजिक परिवर्तन घडून येते.

सामाजिक परिवर्तनाचा विकास आणि प्रगती या दोन्ही प्रकारांमध्ये बरेच साम्य आहे. अनेक लोक विकास आणि प्रगती यामध्ये भेद करीत नाहीत असे असले तरी या दोन्ही प्रकारांमध्ये फरक आहे.

**आपली प्रगती तपासा : (Check your progress)**

सामाजिक परिवर्तनातील अभिप्रेत असलेल्या विकासा बाबत आढाव द्या.

---

---

---

---

### ११.३.६प्रक्रिया (Process) :

समाजात सतत चालणारी क्रिया म्हणजे प्रक्रिया होय. सामाजिक परिवर्तन ही एक प्रक्रिया मानण्यात आली आहे. कोणत्याही समाजात सुरूवातीपासून अस्तित्वात असलेल्या शक्ती आणि बाह्य शक्तीच्या प्रभावामुळे एका विशिष्ट पध्दतीने बदल होत असतो. हा बदल एका अवस्थेकडून दुसऱ्या अवस्थेप्रत जाणारा असतो. परंतु हया अवस्था प्रगत, अप्रगत, एकीकरणात्मक, विघटनात्मक सहकार्य-संघर्षात्मक अशा कोणत्याही प्रकारच्या असू शकतात.

दोन संस्कृती मधील व्यक्तीचे परस्पर संबंध असल्यास त्यांच्यात सामाजिक संबंध निर्माण होतात. जर त्यांच्यात स्नेह आपुलकीचे संबंध असतील तर संघटनात्मक प्रक्रिया सुरू होते. या उलट विरोध असल्यास ती संघर्षात्मक प्रक्रिया होईल. अनेकदा दुर्बल समुह किंवा संस्कृतीला शक्तीशाली समुहाशी किंवा संस्कृतीशी तडजोड करावी लागते. वेगवेगळया समुहात स्पर्धा, सहकार्य, संघर्ष, एकात्मता इत्यादी प्रक्रिया आढळतात. परिवर्तनाच्या प्रक्रियेचे एक महत्वाचे वैशिष्टये म्हणजे एक क्रिया झाल्यानंतर दुसऱ्या क्रियेची सुरूवात होते. अशाप्रकारे परिवर्तन हे काही काळ सतत सुरू असते. परंतु प्रक्रियेमधील बदल किंवा परिवर्तनाची कारणे निश्चितपणे सांगणे कठीण असते.

सामाजिक परिवर्तनाच्या उत्क्रांती, क्रांती, प्रगती, विकास, प्रक्रिया या प्रकाराप्रमाणेच अनुकूलता आणि सुधारणा हे देखील सामाजिक परिवर्तनाचे प्रकार आहेत.

**आपली प्रगती तपासा : (Check your progress)**

सामाजिक परिवर्तनशील प्रक्रिया बाबत माहिती लिहा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## ११.४ सामाजिक परिवर्तनाचे घटक किंवा कारणे / तत्वे / कारके (Facts or causes of social change) :

समाजात कोणतेही परिवर्तन आपोआप होत नाही. सामाजिक परिवर्तनाच्या कारणांचे विश्लेषण करताना गिलिन आणि गिलिन यांनी भौगोलिक परिस्थिती, सांस्कृतिक घटक, लोकसंख्येची रचना किंवा विचार प्रणालीतील बदलातून सामाजिक परिवर्तन घडूम येते असे प्रतिपादन केले आहे. मॅकआयव्हर आणि पेज यांनी जैविक कारक, तांत्रिक कारक आणि सांस्कृतिक कारकांमुळे सामाजिक परिवर्तन होत असल्याचे स्पष्ट केले आहे. आगबर्न यांनी सांस्कृतिक कारकांमुळे सामाजिक परिवर्तन होत असल्याचे स्पष्ट केले आहे. ऑगबर्न यांनी सांस्कृतिक पाश्चायन (Cultiral Lag) हा सिध्दांत मांडून तांत्रिक कारणांमुळे सामाजिक परिवर्तन घडून येते असे स्पष्ट केले आहे. हॅरी जॉन्सनने समाज व्यवस्थेतील कारणे, सामाजिक वातावरण आणि गैरसामाजिक वातावरण या तीन कारकांमुळे सामाजिक परिवर्तन होत असल्याचे नमूद केले आहे.

**सामाजिक परिवर्तनाचे घटक किंवा कारणे :**

१) भौगोलिक घटक (Geographical Factor)
२) लोकसंख्या घटक (Demographical Factor)
३) जैविक घटक (Biological Factor)
४) आर्थिक घटक (Economic Factor)
५) तांत्रिक घटक (Technical Factor)
६) सांस्कृतिक घटक (Cultural Factor)

### १) नैसर्गिक किंवा भौगोलिक किंवा पर्यावरण घटक : (Geographical Fact or Natural Factors) :

नैसर्गिक किंवा भौगोलिक घटक हा सामाजिक परिवर्तनाचा एक महत्वाचा घटक आहे. हॅरी जॉन्सन यांनी वातावरणाचे सामाजिक वातावरण (Social Environment) आणि गैर सामाजिक वातावरण (Non-Social Environment) असे दोन प्रकार सांगितले आहेत. नैसर्गिक किंवा भौतिक घटकांचा समावेश गैरसामाजिक वातावरणात होतो. कोणताही मानवी समाज एका विशिष्ट भौगोलिक प्रदेशात वास्तव्य करतो. भौगोलिक वातावरणाचा मानवी जीवनावर सतत परिणाम होत असतो. भौगोलिक वातावरणात भूमि, टेकडया, पर्वत, पाऊस, नघा, तलाव, समुद्र, वृक्षवेली, प्राणी, थंडी, उष्णता आणि अन्य घटकांचा समावेश केला जातो. या भौगोलिक घटकांद्वारे मानवी जीवनाचे निर्धारण केले जाते. असे भौगोलिक निर्धारणवाद्यांचे मत आहे. हिप्पोक्रेटीस (Hippocractes)मॉण्टेस्क्यू (Montesquieu) बकल (Buckle) हंटिंग्टन (Hunttington) रेटजल (Ratzel) लेप्ले (Leplay) कुमारी सेम्पल (Miss Semple) इत्यादीनी भौगोलिक निर्धारणवादाचे समर्थन केले आहे. या विचारवंतानी भौगोलिक घटकांनाच मानवी जीवन, संस्कृती आणि सभ्यतेचा आधार मानला आहे. त्यांच्या मते कोणत्याही देशाच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय आणि सांस्कृतिक जीवनाचा प्रत्येक पैलू हा देशाच्या भौगोलिक वातावरणाद्वारे निश्चित होतो.

भौगोलिक वातावरणात देखील बदल होतो. भौगोलिक घटकांच्या संदर्भात दोन प्रकारे परिवर्तन घडून येते. १) ऋतुचक्रानुसार होणारे परिवर्तन आणि २) आकस्मिक परिवर्तन. आकस्मिक परिवर्तनाची गती ही विलक्षण असते. आकस्मिक परिवर्तनालाच भौगोलिक उत्पाद असे देखील म्हटले जाते. भौगोलिक उत्पादामध्ये भूकंप ज्वालामुखी वादळे, दुष्काळ, महापूर इत्यादीचा समावेश होतो. भौगोलिक उत्पातामुळे प्राणहानी आणि वित्तहानी होते. या उत्पातांना बहूसंख्य लोक देवीकोप समजतात. भौगोलिक संकटामुळे मानवांची अपरिमित हानी होते. २ सप्टेंबर १९६२ मध्ये पश्चिम ईराणमध्ये फार मोठया प्रमाणात भूकंप झाला होता. नोव्हेंबर १९७० मध्ये पूर्व पाकिस्तान (बांगलादेश) भीषण वादळ आले होते. त्यामध्ये लाखो लोक मृत्युमुखी पडलेत. महाराष्ट्रात उस्मानाबाद आणि परभणी जिल्हयात जानेवारी १९९४ मध्ये भूकंप होऊन फार मोठया प्रमाणात प्राणहानी आणि वित्तहानी झाली होती. या घटनांचा मानवी जीवनावर विपरीत परिणाम होतो. हजारो लोक मृत्युमुखी पडतात. कुटुंबाची वाताहत होते. अपंग, रोगी निराधार लोकांची संख्या वाढते.

भौगोलिक संकटावर मात करण्याच्या दृष्टिने मानवाने अनेक उपाय योजना केल्या आहेत. महापुरामुळे होणारी हानी टाळण्यासाठी धरणे बांधणे, ओलिताच्या सोयी करणे, वृक्षांची

लागवड करणे इत्यादी उपाययोजना करण्यात आल्या आहेत. भूकंपापासून होणारी हानी टाळण्याच्या दृष्टीने देखील मानवाने वेगवेगळे उपाय शोधलेत. एकंदरीत भौगोलिक आपत्तीपासून बचाव करण्याच्या दृष्टीने मानवाने विशेष प्रयत्न केलेत. त्यातून मानवाचा विकास घडून आला आहे. निवासस्थान, खानपान, वेशभूषा, धार्मिक आचार, संकेत आणि प्रथा परंपरा इत्यादी भौगोलिक घटकांमध्ये परिवर्तन झाल्यास मानव समाजात देखील परिवर्तन घडून येते. म्हणून भौगोलिक घटक हा सामाजिक परिवर्तनाचा एक महत्वाचा घटक मानण्यात आला आहे.

### २) लोक संख्यात्मक घटक (Demographic Factor) :

सामाजिक परिवर्तनाचा लोकसंख्यात्मक घटक हा एक महत्वाचा घटक आहे. लोकसंख्यात्मक घटकांमध्ये लोकसंख्येचा आकार, स्त्री-पुरूषांचे प्रमाण, मुले, तरूण आणि वृध्दांचे प्रमाण, लोकसंख्येचे धनत्व, लोकांचे आर्युमान, जन्म-मृत्युदर, व्यक्तींची कार्यक्षमता, लोकसंख्येचे स्थानांतरण इत्यादी गोष्टींचा समावेश होतो. या लोकसंख्यात्मक गोष्टींमध्ये बदल झाल्यास त्याचा परिणाम समाजावर देखील होत असतो.

लोकसंख्येत वृध्दी झाल्यास लोकसंख्येचा प्रश्न निर्माण होऊन त्याचा प्रभाव समाजावर पडतो. त्यातून विविध समस्या निर्माण होतात. भारतात लोकसंख्या वृध्दीचा ज्वलंत प्रश्न निर्माण झाला आहे. त्यातून प्रदूषण, बेकारी, गरिबी, कुपोषण, गलिच्छ वस्त्या इत्यादी अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. माल्थस यांचे लोकसंख्या संदर्भात विचार प्रसिध्द आहेत. माल्थसच्या मते, लोकसंख्या वृध्दी मध्ये देशात उपासमार, रोगराई, दारिद्र्य, बेकारी इत्यादी अनेक समस्या निर्माण होतात. त्यामुळे लोकांचे स्वास्थ बिघडते. त्यांचा राहणीमानाचा स्तर घसरतो. या सर्व गोष्टीमुळे व्यक्तीगत विघटन कौटुंबिक विघटन आणि सामाजिक विघटनास अप्रत्यक्षपणे प्रोत्साहन मिळते. लोकसंख्या वृध्दीमुळे सामाजिक संरचना आणि संघटनामध्ये विशेष परिवर्तन घडून येते.

लोकसंख्येच्या जन्म आणि मृत्युदराचा देखील समाजावर परिणाम पडतो. जर देशातील जन्मदरात घट आणि मृत्युदरात वाढ झाली. तर त्या देशाच्या लोकसंख्येत घट होऊन समाजातील कार्यशील व्यक्तीचे प्रमाण कमी होते. उपलब्ध असलेल्या नैसर्गिक साधनांचा पुरेपुर उपयोग करता येत नाही. त्यामुळे देशाची आर्थिक परिस्थिती खालावते.

लोकसंख्येतील घट आणि वृध्दीचा प्रभाव लोकसंख्येच्य रचनेवर सुध्दा पडतो. लोकसंख्येच्या रचनेत परिवर्तन झाल्यास त्याचा सामाजिक जीवनावर परिणाम होतो. जर वृध्द आणि मुलांची संख्या अधिक असेल तर आर्थिक उत्पादन कमी होईल. कारण तरूण लोकांचा उत्पादन कार्यात फार मोठा वाटा असतो.

बाहेरील देशातील लोकांचे देशात आगमन किंवा देशातील लोकांचे इतर देशात स्थलांतर होणे या दोन्ही गोष्टींचा समाजावर परिणाम होऊन सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक परिवर्तन घडून येते. भारताची फाळणी झाल्यामुळे पश्चिम आणि पूर्व पाकिस्तानातून जवळपास ८९ लाख शरणार्थी भारतात आले होते. त्यामुळे देशाच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात परिवर्तन घडून आले. अमेरिकेचा शोध लागल्यानंतर युरोपातील लोक अमेरिकेचा शोध लागल्यानंतर युरोपातील लोक अमेरिकते गेले. अलीकडे विधाविभूषित लोक अमेरिकेत स्थायिक होत आहेत. त्यामुळे उच्च शिक्षण प्राप्त केलेल्या संशोधक डॉक्टर, इंजिनियर या लोकांच्या ज्ञानाचा फायदा देशाला होत नाही. पर्यायाने

भारताच्या विकासाला अधिक गती येत नाही. लोकसंख्येतील धनत्वामुळे काही समस्या निर्माण होतात. तर कधी त्यातून गतिशीलतेस प्रेरणा मिळते.

लोकसंख्येच्या वृध्दीमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांवर उपाय योजना करण्यासाठी नवनवीन संशोधन करण्याची प्रेरणा लोकांना मिळाली. त्यातून मानवी ज्ञानात वाढ झाली. अल्पवयात विवाह करणे, जास्त अपत्यांना जन्म देणे इत्यादी पारंपारिक विचारात देखील बदल झाला. स्त्रियांना समाज जीवनात महत्व प्राप्त झाले. कमी अपत्य असल्यास त्यांना चांगले शिक्षण देणे, प्रभावी सामाजिकरण करणे, इत्यादी गोष्टींना लोक मान्यता देऊ लागले. त्यामुळे समाजाचा विकास होण्यास मदत झाली.

अशाप्रकारे लोकसंख्येची वृध्दी, जन्मदर आणि मृत्युदर लोकसंख्येची रचना, लोकसंख्येचे स्थलांतर, लोकसंख्येचे घनत्व इत्यादी लोकसंख्यात्मक पैलूतील बदलामुळे सामाजिक जीवनात देखील परिवर्तन घडून येते.

### ३) **जैविक घटक (Biologocal Factor) :**

जैविक घटकांमुळे सामाजिक परिवर्तन घडून येते. जैविक घटकांत आनुवांशिकता वंश आणि लोक संख्या यांचा समावेश होतो. जैविक प्रक्रियेत त्या संक्रमणाच्या नियमानुसार मागील पिढीतील अनुवांशिक गुण पुढील पिढीकडे संक्रमित केले जातात. या संक्रमण प्रक्रियेत काही गुणांचे हनन होते. त्याचा परिणाम पुढील पिढीच्या शारीरिक लक्षणावर पडतो. त्यामुळे मुले आईवडीलसारखी नसतात. त्याच्या शारीरिक लक्षणांमध्ये फरक आढळतो. शारीरिक लक्षणासोबतच व्यक्तीच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो. म्हणून मागील पिढीप्रमाणे नवीन पिढी राहीलच असे नाही. परिणामतः समाजजीवनात परिवर्तन होते.

वंश ही एक जैविक संकल्पना आहे. अनुवांशिक स्वरूपाच्या शारीरिक लक्षणांमुळे विशेषत्व पावलेल्या लोक समुदायास वंश असे म्हणतात. वंश श्रेष्ठ त्याच्या भावनामुळे वंशद्वेष, वांशिष तणाव, वर्गसंघर्ष इत्यादी अनेक सामाजिक प्रश्न निर्माण होतात. वंशद्वेष, वांशिक तणाव आज ही काही समाजात आढळतो. निग्रो आणि श्वेत वंशामधील लोकांचा संघर्ष सर्वभुत आहे. वांशिक संघर्षामुळे समाज जीवन विशेष प्रभावित होत असते. अशाप्रकारे सामाजिक जीवनात परिवर्तन घडून आणणारा जैविक हा एक घटक आहे. जैविक घटकांमुळे होणारे परिवर्तन हे दीर्धकाळाच्या संदर्भातच स्पष्ट करता येते.

### ४) **आर्थिक घटक (Economic Factor) :**

आर्थिक घटक सुध्दा सामाजिक परिवर्तनाचा एक घटक आहे. आर्थिक सुधारणांमुळे त्या समाजाच्या सामाजिक संस्था, परंपरा, रीतिरिवाज आणि लोकरूढीमध्ये फार मोठया प्रमाणात परिवर्तन घडून येते. भारतात औधोगिक विकास झाल्यामुळे सामाजिक संरचनेत महत्वाचे परिवर्तन घडून आले आहे. व्यक्तीच्या आर्थिक परिस्थिती मध्ये बदल झाल्यास, त्यांच्या सामाजिक संबंधामध्ये देखील बदल होतो.

कार्ल मार्क्सने सामाजिक परिवर्तनात आर्थिक घटक महत्वाचा मानला आहे. कार्ल मार्क्सच्या मते, उत्पादन साधनामध्ये परिवर्तन झाल्यास सामाजिक संस्था, सामाजिक संबंध यामध्ये फार मोठया प्रमाणात परिवर्तन घडून येते. यावरून हे स्पष्ट होते की, आर्थिक घटक हा देखील सामाजिक परिवर्तनाचा एक महत्वाचा घटक आहे. आर्थिक घटकात परिवर्तन झाल्यास त्याचा परिणाम सामाजिक जीवनावर पडुन समाजात आमुलाग्र परिवर्तन घडून येते.

## ५) तांत्रिक घटक (Technological Factor) :

आधुनिक काळात तांत्रिक घटक हा सामाजिक परिवर्तनाचा एक महत्वाचा घटक आहे. तांत्रिक घटकांमुळे औधोगिक प्रगतीस चालना मिळते. उत्पादन, व्यापार, दळणवळणाच्या तसेच इतर क्षेत्रात क्रांती घडून येते. नागरी समुदायातील लोकसंख्येत फार मोठया प्रमाणात वाढ होते. त्यामुळे व्यक्तिगत आणि अनौपचारिक संबंध ठेवणे कठिण होते. सामुदायिक जीवन संपुष्टात येऊन दुय्यम समुह अस्तित्वात येतात आणि औपचारिक संबंधाला महत्व प्राप्त होते. शहराच्या विकासाबरोबर गुन्हेगारी, बालगुन्हेगारी, गालिच्छ वस्ती, वेश्या व्यवसाय, संघर्ष इत्यादी अनेक समस्या निर्माण होतात. तांत्रिक विकासामुळे संपत्ती आणि गुणकौशल्ये यांना मात्र महत्व प्राप्त होते. परिणामतः व्यक्तीवादास प्रौत्साहन मिळते.

शहरात मोठेमोठे कारखाने निर्माण झाल्यास कारखान्यात काम करण्यासाठी खेडयातील लोक शहरात येतात आणि शहरात जागा आणि घराच्या समस्या निर्माण होतात. औधोगिकरण आणि नागरीकरणाच्या प्रभावामुळे संयुक्त कुटुंबाचे विघटन होऊन विभक्त कुटुंब पध्दती अस्तित्वात येते.

सामाजिक आणि कौटुंबिक जीवनाप्रमाणे धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनावर तांत्रिक घटकाचा प्रभाव पडलेला आढळतो. तांत्रिक विकासामुळे मानवाच्या ज्ञानात भर पडली. शास्त्रीय विचारांना विशेष महत्व प्राप्त झाले. धर्मासंबंधीचा विश्वास, श्रध्दा, देवी शक्ती, लोकरूढी, रितीरिवाज, परंपरा इत्यादी गोष्टी देखील प्रभावित झाल्या. व्यक्ती प्रत्येक गोष्टींचा शास्त्रीय दृष्टिकोनातून विचार करू लागली. विविध धर्माचे लोक एकाच कारखान्यात काम कारतात. कॉलनी मध्ये वास्तव्य करतात. त्यामुळे एकमेकांना समजून घेण्याची संघी मिळाली. संकुचित धार्मिक वृत्ती नष्ट होऊन तांत्रिक घटकांमुळे सांस्कृतिक क्षेत्रात देखील महत्वाचे परिवर्तन घडून आले असल्याचे जाणवते.

अशाप्रकारे तांत्रिक घटकाचा मानवी समाजावर फार मोठा प्रभाव पडून समाजाच्या सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक क्षेत्रात फार मोठे परिवर्तन होते.

## ६) सांस्कृतिक घटक (Cultural Factor) :

प्रत्येक समाजाची एक विशिष्ट संस्कृती असते. समाजाच्या संस्कृती मध्ये भौतिक आणि अभौतिक गोष्टींचा समावेश होतो. परंतु एडवर्ड टायलर, सोरोकिन मॅकआयव्हर इत्यादी समाज शास्त्रज्ञांनी संस्कृतीमध्ये अभौतिक गोष्टीला महत्व दिले समाजाचा एक सदस्य म्हणून व्यक्ती जे ज्ञान, विश्वास, कला, नीतित्वे कायदे, सवयी आणि इतर क्षमता प्राप्त करतो. त्या सर्वाच्या एकत्रीकरणास टायलरने संस्कृती म्हटले आहे. म्हणजेच संस्कृतीमध्ये ज्ञान, विश्वास, कला, नीतित्वे आणि मूल्ये यांचा समावेश होतो. संस्कृतीच्या या घटकात परिवर्तन घडून आल्यास त्याचा परिणाम सामाजिक जीवनावर होतो आणि सामाजिक परिवर्तन घडून येते.

तांत्रिक घटकात परिवर्तन झाल्यास, लोकांचे आचार-विचार, मूल्ये, विश्वास, संस्था, संघटना देखील प्रभावित होतात. असे मत मॅक आयव्हर यांनी मांडले. तांत्रिक घटकांचा स्वीकार करायचा किंवा नाही. हे मात्र त्या समाजाच्या सांस्कृतिक घटकांवर अवलंबून असते. म्हणूनच तांत्रिक गोष्टींचा स्वीकार सर्व समाजात सारख्या प्रमाणात झालेला आढळून येत नाही. तांत्रिक घटकांचा स्वीकार केल्यानंतर सुध्दा त्याचा सामाजिक जीवनावर एक सारखा परिणाम होत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे त्या समाजातील सांस्कृतिक घटक होय. विशिष्ट सांस्कृतिक

घटकांमुळे विशिष्ट प्रकारच्या आर्थिक, राजकीय, सामाजिक संस्था निर्माण होतात. मॅक्सवेबरने भांडवलशाहीच्या उदयाकरिता विशिष्ट सांस्कृतिक नीतितत्वे कारणीभूत असल्याचे स्पष्ट केले आहे. मॅक्स वेबरच्या मते, प्रोटेस्टंट पंथातील नीतितत्वे ही भांडवलशाहीच्या विकासाकरीता अनूकूल होती. म्हणून प्रोटेस्टंट पंथ असलेल्या हॉलेंड इंग्लंड, अमेरिका इत्यादी देशात भांडवलशाहीचा विकास झाला. परंतु इटली, स्पेन इत्यादी देशात कॅथालिक पंथाचे लोक असल्यामुळे तेथे भांडवलशाहीचा विकास झाला नाही. म्हणजेच एखाद्या समाजात कसे परिवर्तन येईल हे त्या समाजाच्या सांस्कृतिक घटकांवर बऱ्याच प्रमाणात निर्भर असते.

समाजाची संस्कृती ही स्थिर स्वरूपाची वाटत असली तरी दीर्घकाळाचा विचार केल्यास कोणतीही संस्कृती ही स्थिर नाही. नव-नविन शोधामुळे संस्कृती मधील घटकांमध्ये परिवर्तन घडून येते. त्यांचप्रमाणे एका संस्कृतीचा संबंध दुसऱ्या संस्कृतीशी आल्यामुळे त्या दोन्ही संस्कृतीमध्ये काही बाबतीत बदल घडून येतो. परंतु कोणत्याही संस्कृतीत सहजपणे बदल घडून येत नाही. त्याकरिता सुरूवातीला विरोध होतो. परिवर्तन घडवून आणण्यासाठी सामाजिक, सांस्कृतिक चळवळी निर्माण होतात. आधुनिक काळात तर संस्कृतीच्या परंपरागत मुल्यांमध्ये विशेष बदल झाल्याचे आढळून येते. परंपरागत मुल्यांऐवजी नवीन मुल्ये आस्तित्व आलीत. आधुनिक काळात अनेक धर्माच्या, संस्कृतीच्या लोकांचा परस्पर संबंध आल्यामुळे देखील सांस्कृतिक मुल्यांमध्ये बदल घडून आला आहे.

समाजाच्या संस्कृतीमध्ये म्हणजेच सांस्कृतिक घटकांत परिवर्तन झाल्यास त्याचा परिणाम सामाजिक जीवनात होतो आणि त्यातून सामाजिक परिवर्तन घडून येते. ऑगबर्नने सुध्दा स्पष्ट केले आहे की, समाजाच्या भौतिक, सांस्कृतिक मध्ये लवकर परिवर्तन होते. त्यामानने अभौतिक संस्कृति मध्ये लवकर परिवर्तन घडून येत नाही. भौतिक संस्कृति मध्ये परिवर्तन झाल्यामुळे विलंबाने का होईना परंतु अभौतिक संस्कृति मध्ये देखील परिवर्तन होत असते. म्हणून सांस्कृतिक घटक हा सामाजिक परिवर्तन घडवून आणणारा एक अतिशय महत्वाचा घटक आहे.

भोगोलिक लोकसंख्या जैविक, आर्थिक, तांत्रिक, सांस्कृतिक या घटकांमुळे सामाजिक परिवर्तन घडून येते. या घटकांप्रमाणेच मानसिक प्रेरणा, शिक्षण, सामाजिक गतिशिलता, व्यवसाय इत्यादी काही कारणांमुळे सुध्दा सामाजिक परिवर्तन घडून येते. सामाजिक परिवर्तनास केवळ कोणता एक घटक जबाबदार नसून या विविध घटकांमुळे सामाजिक परिवर्तन घडून येताना दिसते.

**आपली प्रगती तपासा : (Check your progress)**

सामाजिक परिवर्तनाची व्याख्या सांगून सामाजिक परिवर्तनाचे घटक / कारणे / तत्वे / कारके स्पष्ट करा.

---

---

---

---

## ११.५ सामाजिक परिवर्तनाची वैशिष्टये (Characteristics of Social Change) :

सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया ही अतिशय गुंतागुंतीची आहे. कारण सामाजिक परिवर्तन सर्वत्र सारख्याच स्वरूपात घडून येत नाही. परिवर्तन हे गतिशील त्याच प्रमाणे अतिशय मंद देखीळ असू शकते. परिवर्तनास वेळ आणि काळाचे बंधन नसते. सामाजिक परिवर्तन ही एक सापेक्ष संकल्पना आहे. ते परिस्थिती आणि स्थानानुसार वेगवेगळे असते. परिवर्तन या संकल्पनेमुळे समाजातील परिवर्तन चांगले-वाईट, नियोजित किंवा स्वाभाविक एकरेषात्मक किंवा चक्रावर, तात्कालिक किंवा कायम स्वरूपाचे आहे. याविषयी कोणताच बोध होत नाही. म्हणूनच परिवर्तन ही एक तटस्थ संकल्पना आहे असे मानले जाते. मुर (W.E.Mure) यांनी आधुनिक समाजाचा संदर्भात सामाजिक परिवर्तनाची पुढील काही वैशिष्टये सांगितली आहे.

### १) सार्वभौमिकता (Universality) :

सामाजिक परिवर्तन प्रत्येक समाजात घडून येते. कोणताही समाज हा स्थायी नसतो. आदिवासी समाज आणि आधुनिक समाज हया दोन्ही समाजात परिवर्तन आढळून येते. दोन्ही समाजातील परिवर्तनाचे स्वरूप हे मात्र सारखे नसते कारण सामाजिक, सांस्कृतिक, तांत्रिक, जैविक, भौगोलिक इत्यादी घटकांमुळे परिवर्तनांचे स्वरूप हे वेगवेगळया प्रकारचे असते. म्हणून आदिवासी समाजात तांत्रिक घटकांचा अभाव असल्यामुळे त्या समाजातील परिवर्तनाची गती मंद असते. याउलट, आधुनिक समाजात मात्र तांत्रिक प्रगत विचार प्रणालीमुळे जलद परिवर्तन घडून येते परिवर्तन हे सर्व मानवी समाजात आढळून येते. त्यामुळे सामाजिक परिवर्तन हे सार्वभौमिक असते.

### २) सामाजिक परिवर्तन सामुदायिक परिवर्तन (Social Change is community change) :

सामाजिक परिवर्तन म्हणजे एका व्यक्तीच्या जीवनातील किंवा काही व्यक्तींच्या जीवन प्रतिमानातील परिवर्तन नाही तर सामाजिक परिवर्तन म्हणजे संपूर्ण समुदायाच्या जीवनातील परिवर्तन होय. थोडक्यात परिवर्तन हे वैयक्तिक स्वरूपाचे नसून सामाजिक असते.

### ३) अपरिहार्य (Inevitably) :

परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे. सामाजिक परिवर्तन ही एक स्वाभाविक घटना आहे. हे सामाजिक परिवर्तन हे टाळता येत नाही. समाजात कोणत्या ना कोणत्या कारणामुळे बदल घडून येणे अपरिहार्य असते.

### ४) गतिभिन्नता (Unequal Speed) :

सर्वच समाजात परिवर्तन होत असते. परंतू सर्व समाजातील परिवर्तनाची गती सारखी नसते. समाजपरत्वे सामाजिक परिवर्तनाची गति भिन्न असते. काही समाजात परिवर्तन अत्यंत मंदपणे घडून येते तर काही समाजात परिवर्तन हे जलद गतीने होत असते. म्हणून गतिभिन्नता हे सामाजिक परिवर्तनाचे एक वैष्टिये आहे.

### ५) तुलनात्मक (Comparability) :

सामाजिक परिवर्तन हे सहजपणे लक्षातयेत नाही. कोणतेही दोन समुदाय समुह किंवा समाजाची तुलना केल्यास कोणत्या समुदाय समूह किंवा समाजात परिवर्तन झाले हे लक्षात येते. उदा. नागरी समुदाय आणि आदिवासी समुदायाची तुलना केल्यास असे आढळून येते की,

आदिवासी समाजाच्या तुलनेत नागरी समुदायाची परिवर्तनाची गति अधिक जास्त असते. यावरून हे स्पष्ट होते की दोन समाजाची तुलना केल्याशिवाय कोणत्या समाजात विशेष परिवर्तन घडून आले हे लक्षात येत नाही.

### ६) अचूक भविष्यवाणी अशक्य (Definite Prediction is not Possible) :

सामाजिक परिवर्तनाच्या संदर्भात अचूक भविष्यकथन करणे अशक्य आहे. कारण सामाजिक परिवर्तनाच्या संदर्भात असा कोणताही नियम नाही की ज्यामुळे निश्चित भविष्यकथन करता येईल फक्त ऐवढेच सांगणे शक्य आहे की, सामाजिक आंदोलनामुळे एखादी समस्या नष्ट करता येईल. किंवा औधोगिकरण आणि नागरीकरणांमुळे परिवर्तनाची गती वाढेल. परंतु भविष्यकाळात सामाजिक संबंधाचे निश्चित स्वरूप काय असेल हे सांगणे कठीन आहे. त्याचप्रमाणे आपले आदर्श मुल्य, मनोवृत्ती, कोणती असेल हया बाबत भविष्यकथन करणे अशक्य आहे.

### ७) अमुर्तता (Abstract) :

व्यक्ती म्हणजे समाज नाही तर सामाजिक संबंधाची व्यवस्था म्हणजे समाज होय. सामाजिक संबंध हे अमूर्त अदृश्य आणि मनोमन आकलन होणारे असतात. सामाजिक मूल्ये, प्रमाणके ही अमूर्त असतात. त्यामुळे सामाजिक मूल्ये, प्रमाणके आणि सामाजिक संबंध यामध्ये होणारे परिवर्तन देखील अमूर्त असते. म्हणून सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप अमूर्त असते.

**आपली प्रगती तपासा :** (Check your Progress)

सामाजिक परिवर्तनाच्या व्याख्या सांगून सामाजिक परिवर्तनाचे वैशिष्टये / लक्षणे स्पष्ट करा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ११.६ सामाजिक परिवर्तनातील अडथळे (Obstacles in Social Change) :

समाजिक परिवर्तनाच्या अभ्यास करताना समाजशास्त्रज्ञांना असे आढळून आले आहे की, सर्व समाजात परिवर्तनाची गती सारखी नसते. कारण प्रत्येक समाजातील परिस्थिती परिवर्तनाकरिता अनुकूल नसते. काही अशी तत्वे असतात की ज्यामुळे परिवर्तनास प्रोत्साहन मिळत नाही सामाजिक परिवर्तनाकरिता जर समाजात अनुकूल वातावरण किंवा परिस्थिती असेल तर परिवर्तन घडून येण्यास मदत होते. याउलट परिवर्तनास विरोध करणारे घटक समाजात असतील तर परिवर्तन घडवून आणणे कठीण असते. सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत बाधा निर्माण करणारे घटक हे पुढीलप्रमाणे आहेत.

१) **परंपराप्रियता :** माणूस हा परंपराप्रियता असते. कारण परंपराचा मानवी जीवनांवर विशेष प्रभाव आढळतो. परंपराचा लोक अंधप्रवृत्तीने स्वीकार करतात. परंपरेचे साहित्य, कला, वेशभूषा, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक इत्यादी सर्वच क्षेत्रात प्राबल्य आढळते. परंपरेच्या विरूध्द वर्तन करण्यास व्यक्ती सहजपणे तयार नसते. काही परंपरा हया कालबाह्य

झालेल्या असतात. तरी देखील समाज त्या परंपरा सोडून द्यायला तयार नसतो. यातूनच सामाजिक परिवर्तनास विरोध केला जातो. जुने ते सोने, अशी मानसिकता यातून निर्माण होते.

२) **अज्ञान :** अज्ञानतेमुळे लोक सामाजिक परिवर्तनास विरोध करतात अज्ञानते मधूनच अनेक खोटया समजूती अंधश्रध्दा निर्माण होतात. त्यामुळे मानव वस्तूनिष्ठ विचार करू शकत नाही. ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न केला जात नाही. उलट योग्य आणि उचित गोष्टींना विरोध केला जातो. अज्ञानामुळे समाज स्थितीशिल बनतो. भारतात शिक्षणाचा अभाव असल्यामुळे मानव संकुचित वृत्तीचा बनतो आणि आपली जीवन पध्दती हीच चांगली आहे. असा त्याचा विश्वास असतो. त्यामुळे समाज जीवनात परिवर्तन करण्यास तो अनुकूल नसतो.

३) **सवयी :** मानव हा सवयीचा गुलाम असतो. अंगवळणी पडलेल्या सवयी सोडण्यास तो तयार नसतो. विशिष्ट प्रकारचे वर्तन पुन:पुन्हा करण्यांची प्रवृत्ती म्हणजे सवय होय. सवयामुळे वर्तनाला दृढता येते. सवयी व्यक्तींना सुरक्षितता प्रदान करतात. त्यामुळे नवीन गोष्ट स्वीकारण्यास व्यक्ती नकार देते. व्यक्ती सवयीचा ते इतका गुलाम होते की, एखादी नवीन गोष्ट त्याला पटत असेल, तरी ती गोष्ट तो स्वीकारीत नाही. म्हणून सवयीमुळे सामाजिक परिवर्तन होण्यास अडथळा निर्माण होतो.

५) **नवीन शोधांना विरोध :** ज्या समाजमध्ये नवीन शोधाला विरोध होतो. त्या समाजात परिवर्तन घडून येत नाही. रूढीप्रिय, परंपराप्रिय आणि जुन्या गोष्टींना चिकटून राहणाऱ्या समाजात नवीन शोधांना विरोध होतो. त्यामुळे नवीन शोध लावण्यास प्रेरणा मिळत नाही. नवीन शोध हे धर्माविरूध्द मानले जातात. नवीन शोधांना विरोध करण्याची प्रवृत्ती असलेल्या समाजात परिवर्तनास चालना मिळत नाही. कारण ज्या शोधामुळे समाजात परिवर्तन घडून येणार असते. त्या शोधनांच विरोध केला जातो. त्यामुळे सामाजिक परिवर्तनांमध्ये अडथळा निर्माण होतो.

५) **संशय ;** संशय म्हणजे नवीन गोष्टी विषयी त्या गोष्टींच्या परिणामाबाबत असलेली अनिश्चिततेची भावना होय. काय होईल ? कसे होईल ? त्याचे परिणाम वाईट तर होणार नाही ना ? इत्यादी अनेक प्रश्न संशयातून निर्माण होतात. संशयाची वृत्ती नवीन काही स्वीकारण्यास विरोध करते. संशयी स्वभावाचे लोक कोणतेही वर्तन करण्यास तयार नसतात. कारण नवीन गोष्टीबद्दल ते सांशक असतात. संशयाची भावना प्रगतीला मारक असते. ते बाबत अनेक प्रश्न ते उपस्थितीत करतात. म्हणून संशयाची भावना ही परिवर्तनामधील एक अडथळा होय.

६) **व्यक्तिगत स्वार्थ :** प्रचलित समाजव्यवस्ता ज्या लोकांचे हितसंबंध जोपासले जातात ते लोक केवळ आपल्या व्यक्तिगत स्वार्थाकरिता नवीन परिवर्तनाचा स्वीकार करीत नाही. कारण परिवर्तन घडून आल्यास त्यांच्या व्यक्तीगत स्वार्थाची पूर्ती करणे शक्त नसते. ज्या गोष्टींमध्ये काही लोकांचे हितसंबंध जोपासले जातात. त्यागोष्टी मध्ये बदल करण्यास त्यांचा विरोध असतो. अशाप्रकारे केवळ आपल्या हितसंबंधासाठी लोक परिवर्तनाला विरोध करतात.

अशा प्रकारे सामाजिक परिवर्तनास बाधा आणणारे काही घटक आहेत. ज्यामुळे परिवर्तनामध्ये अडथळा निर्माण होतो. परंतु अशी कितीही विरोधी तत्वे किंवा अडथळे असले तरी परिवर्तनाची प्रक्रिया ही थांबत नाही. परिवर्तनाची प्रक्रिया निरंतर सुरू असते. परंतु या अडथळ्यामुळे जलद गतीने परिवर्तन घडून येत नाही. परिवर्तनाची गती मंद होते ही गोष्ट नाकारता येत नाही.

**आपली प्रगती तपासा :** (Check your Progress)

सामाजिक परिवर्तनातील अडथळे / अडचणी प्रश्न कोणते ते सांगा .

## ११.७ सारांश (Summary) :

परिवर्तन हा निसर्गाचा गुणधर्म आहे. कोणतीही गोष्ट मूर्त किंवा अमूर्त असो ती जशीच्या तशी रहात नाही. तसाच समाजही परिवर्तनशील आहे. बदल जरी स्वाभाविक असला तरी समाज स्थिरता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतो. पारंपारिक समाजात परिवर्तन मंद गतीने होते तर उदा. आदिवाशी व ग्रामीण समाज ह्या उलट शहरी समाजात परिवर्तनाचा वेग जास्त असतो.

परिवर्तन म्हणजे कोणत्याही वस्तूत माणसांन समूहात परिस्थितीत काळानुसार बदल होतो. ते परिवर्तन होय. जे काल होते ते आज नाही आणि जे आज आहे ते काही काळाने तसेच राहत नाही ही स्थिती म्हणजेच परिवर्तन.

परिवर्तन ही सार्वत्रिक घटना आहे ती अमूर्त आहे. तिचे स्वरूप सामूहिक असते. ती काळानुसार घडते. परिवर्तनाबाबत विशिष्ट भविष्य करता येत नाही.

## ११.८ प्रश्न (Question) :

१) सामाजिक परिवर्तनाचा अर्थ व व्याख्या सांगून उत्क्रांती वाढ आणि विकास हया संकल्पना स्पष्ट करा.

२) सामाजिक परिवर्तनाचे घटक / कारके / तत्वे / कारणे सांगा.

३) सामाजिक परिवर्तनाची व्याख्या सांगून सामाजिक परिवर्तनाचे वैशिष्टये सांगा.

४) सामाजिक परिवर्तनातील अडथळे स्पष्ट करा.

५) सामाजिक परिवर्तनाच्या मूलभूत संकल्पना सांगा

## ११.९ संदर्भ ग्रंथ (Reference) :

१) डॉ. प्रदीप आगलावे, समाजशास्त्र, श्री साईनाथ प्रकाशन - नागपूर

२) प्रा. ए.वाय.कोंडेकर, समाजशास्त्र, फडके प्रकाशन - कोल्हापूर

❖❖❖❖

# १२

# सैद्धांतीक दृष्टीकोन
# १. आधुनिकीकरण सिद्धांत

**घटक रचना :**

१२.१ प्रस्तावना (Introduction)
१२.२ आधुनिकीकरण अर्थ
१२.३ आधुनिकीकरणाची व्याख्या
१२.४ आधुनिकीकरण सिद्धांताची मूलतत्वे
१२.५ रोस्टोवचा आधुनिकीकरण सिद्धांत
१२.६ डॅनिअल लर्नर यांचे पारंपारिक समाज परिवर्तन संदर्भातील आधुनिकीकरण सिद्धांत
१२.७ आधुनिकीकरण सिद्धांताचे गुण - दोष
१२.८ सारांश (Summary)
१२.९ सराव प्रश्न (Question)
१२.१० संदर्भ ग्रंथ (Reference List)

## १२.१ प्रस्तावना : (Introduction)

साधारणतः १९६० च्या दशकात पाश्चात्य देशामध्ये आधुनिकीकरणाची प्रक्रिया जोर धरु लागली. यंत्रोत्पादन पद्धती व तंत्रज्ञानाने समाजाच्या सर्वच क्षेत्रात अतिशय जलद गति प्रगती होवू लागली. समाजाच्या सर्वच पातळीवर लक्षणिय बदल झाले. त्यामुळे या बदलांचा अभ्यास करण्यासाठी सर्वच सामाजिक शास्त्रांनी सुरुवात केली.

१९६० च्या दशकात आधुनिकीकरणाच्या संदर्भातील सैद्धांतीक दृष्टिकोन पाश्चात्य व भांडवलशाहीच्या बाजूचा होता. विकसनशील देशांचे पाश्चात्यीकरण होण्याच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणून आधनुनिकीकरण प्रक्रिया अभ्यासाला जात होती. अगदी सुरुवातीस आधुनिकीकरण सिद्धांत दोन स्वतंत्र व परस्पराशी जोडल्या जाणाऱ्या शाख्यांच्या माध्यमांतून होत होता. एक - उत्क्रांतीचा शास्त्रीय सिद्धांत यामध्ये कॉम्ट, डुरखाईम व इतरांचा समावेश होतो. समाज निश्चित विहोने उत्क्रांत होतो या विचाराने प्रभावित होवून आधुनिकीकरण सिद्धांत मांडला. दुसरा - कार्यवादी सिद्धांत टॉलकॉट पार्सन्स यांनी हा सिद्धांत मांडला. मानवी समाज हा एक व्यवस्था आहे. अनेक संस्थाच्या माध्यमातून एक संरचना तयार होते. त्यातून सामाजिक कार्य घडते असा विचार मांडण्यात आला.

दुसऱ्या महायुद्धा नंतर मोठया प्रमाणात संपूर्ण जगभर व्यवस्था बदल पहावयास मिळाला. जागतिक पातळीवर संस्था संघटनाची स्थापना करण्यात आली. जागतिक धोरणे निश्चित करण्यात आली. विकसनशील देशांनी नविन आर्थिक धोरणे निश्चित करुन आर्थिक विकासासाठी निश्चित दिशा निर्धारित केली. त्यामुळे आधुनिकीकरणाची प्रक्रिया जोर धरु लागली. संपूर्ण जग गतिशील विकास प्रक्रियेत ओढले गेले.

## १२.२ आधुनिकीकरणाचा अर्थ

आधुनिकीकरण ही विकासाची गतिशिल प्रक्रिया आहे. यामध्ये असक्षम राज्य, अविकसित राज्याचे रुपांतर औधोगिकीकरण झालेल्या सक्षम, सक्रिय विकसित राज्यात करण्याची प्रक्रिया आहे. पारंपारिक समाजापासून समाज बदलत जातो असे सूचित करणाऱ्या विकास विषयक प्रक्रियेला आधुनिकीकरण असे म्हणतात. शहरीकरण व औधोगिकरण हे आधुनिकरण प्रक्रियेचा परिणाम आहेत.

## १२.३ आधुनिकीकरणाची व्याख्या :

### १. विल्बर्ट मूर :

आधुनिकीकरण म्हणजे पारंपारिक किंवा आधुनिक काळापेक्षा मागास समाजाचे तंत्रज्ञानावर आधारित व संघटित समाजामध्ये होणारे संपूर्ण परिवर्तन आहे. ज्यामुळे विकसित समाज ओळखला जातो.

### २. डॅनिअल लर्नर :

आधुनिकरण ही सामाजिक बदलाची प्रक्रिया; ज्यामध्ये विकास हा आर्थिक घटक असतो, अशी आधुनिकतेची व्याख्या केली आहे.

आधुनिकीकरणाची प्रक्रिया सामाजिक व आर्थिक विश्लेषणावर आधारित संशोधित करुन आधुनिकीकरण सिद्धांत मांडण्यात आले. वसाहतवादीच्या प्रभावाने अस्तित्वात आलेली आधुनिक क्षेत्र तसेच पारंपारिक क्षेत्राचा विकास या दोन्ही दृष्टीकोनातून आधुनिकीकरण सिद्धांत मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला.

## १२.४ आधुनिकीकरण सिद्धांताची मूलतत्वे

१. आधुनिकीकरण समाजात विशेष प्रकारची संरचना असल्याचे विश्लेषण करते.
२. आधुनिकीकरण सिद्धांत भांडवलशाही व्यवस्थेचा व बदलांच्या प्रक्रियांचा विशेष अभ्यास करते.
३. श्रम, भांडवल, बाजारपेठ, तंत्रज्ञान दर्शवणारी प्रक्रिया आहे.
४. नोकरशाही व्यवस्थेला आधुनिकीकरण सिद्धांतात अधोरेखित करण्यात आलेले आहे.
५. अधिकार तत्वावर आधारित राजकिय व्यवस्थांच्या वाढीचा अभ्यास या सिद्धांतात करण्यात येतो.
६. आधुनिकरण सिद्धांतात लोकशाही प्रक्रियेचा अभ्यास करण्यात येतो.

७. आधुनिकरणाचा सिद्धांत व्यक्तिवाद सुद्धा भर देतो. व्यक्ती व व्यक्तीचे सर्व सामाजिक, आर्थिक व राजकिय विकासाच्या केंद्रस्थानी असल्याचे मानले जाते.

८. आधुनिकरणाचा सिद्धांत सामाजिक प्रगतीच्या सर्वपातळीवरील संकल्पनेवर आधारीत विश्लेषण केले जाते.

## १२.५ रोस्टोवचा आधुनिकीकरण सिद्धांत

वॉल्ट रोस्टॅव एक आर्थिक इतिहासतज्ज्ञ होते. त्यांना अमेरिकासाठी आर्थिक सल्लागार म्हणून काम केले आहे. आर्थिक वाढीमधील टप्पे समाजवादी नसलेला जाहिरनामा हया त्यांच्या १९६० मध्ये प्रकाशित झालेल्या पुस्तकामध्ये आधुनिकीकरणाच्या दृष्टिकोनातील भांडवलवादाकडे झुकणारी वैचारिक दिशा स्पष्टपणे दिसते. त्यांच्या सिद्धांताचे प्रतिमान नव उत्क्रांतवादी स्वरूपाचे होते. आधीच्या अवस्थेतून समाज व्यवस्था विशिष्ट क्रमानुसार बदलते व विकसित होतो रोस्टोवचे आधुनिकीकरणांच्या सिद्धांतचे प्रतिमान ब्रिटिश औधोगिक क्रांतीवर आधारित होते.

रोस्टोवच्या मते, बदलाच्या प्रक्रिया सोप्या असतात. पुढील पाच विकासाचे प्रतिमान वापरुन आर्थिक विकासासह शाश्वत विकास प्राप्त करने शक्य होते. त्यांनी सूचवलेल्या आर्थिक वाढीच्या पाय प्रकांरामध्ये किंवा टप्पात सर्व समाजांची विभागणी केली जाऊ शकते.

### १) पारंपारिक समाजाचा टप्पा :

या आवस्थेत उत्पादनाची पद्धती पारंपारिक होती. कृषी व अविकसित तंत्रज्ञानावर आधारित व्यवसाय किंवा आर्थिक घटक निर्धारित होते. कुटुंब व नाते संबंध महत्वाचे होते.

### २) प्रगतीच्या उंबरठयाचा काळ :

या कालावधित नव तंत्रज्ञानाचा उगम झालेला होता. समाजातील अर्थ व्यवस्था पारंपारिकतेकडून आधुनिकतेकडे वाटचाल करत होती.

### ३) प्रगतीची अवस्था :

या अवस्थेत पारंपारीक समाजव्यवस्था झपाट्याने बदलते. नविन तंत्रज्ञान, औधोगिकरण, नागरीकरण या प्रक्रिया झपाटयाने समाजव्यवस्था बदलून टाकतात.या प्रक्रियेची सुरुवात इंग्लड, अमेरिका, फ्रान्स, रशिया नंतर चिन, जापान भारतात पसरली. १९६० नंतर संपूर्ण जग या प्रक्रियेच्या आधिन झाले आहे.

### ४) परिपक्व अवस्थेचा टप्पा :

या टप्पात विकसित होणारी अर्थव्यवस्था सर्व आर्थिक प्रक्रियांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करते. सकल घरगुती उत्पादन (G.D.P.)१० ते २० टक्कांमध्ये असलेल्या उत्पादनाचा वापर गुंतवणूकीमध्ये केला जातो.

### ५) उच्च ऊर्जेचा वापर (कंझम्शन) :

शेवटच्या टप्पामध्ये आर्थिक क्षेत्रात आधाडीवर असलेल्या कंपन्या सामान ग्राहक समाजामध्ये आणि सेवां क्षेत्रामध्ये असलेल्या आढळतात. सामाजिक कल्याण व सामाजिक

सुरक्षेसाठी आर्थिक संसाधने आरक्षित केली गेली आहेत. कल्याकारी राज्याचा उदय झाला आहे.

रोस्टोवने आधुनिकीकरणाच्या सिद्धांतास एक गतिशील (डायनॅमिक) सिद्धांत म्हणून विचार करतात. त्यांच्या मते हा सिद्धांत फक्त आर्थिक घटकांशीच संबंधीत नाही तर सामाजिक निर्णय व सरकारच्या धोरणाशी सुद्धा संबंधीत आहे.

## १२.६ डॅनिअल लर्नरयांचे पारंपारिक समाज परिवर्तन संदर्भातील आधुनिकीकरण सिद्धांत

डॅनिअल लर्नर यांनी पारंपारिक समाजाचे परिवर्तन - १९५८ या आपल्या ग्रंथात पूर्वकडील देशांमधील आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेचे मुल्यमापन केले आहे. विकसनशील देशाचे नमुना सर्वेक्षण करुन आधुनिकरण सिद्धांत मांडला आहे.

लर्नर यांच्या मते आधुनिकीकरण ही एक जागतिक प्रक्रिया आहे. व ती संपूर्ण जगात सारख्याच प्रकारे घडते. लर्नर यांच्यामते समाजमधील संस्थात्मक बदला बरोबर व्यक्तिमत्व बदलांमुळे ही आधुनिकीकरण प्रक्रिया घडून येते. गतीमान व्यक्तीमत्वाचा विकास (मोबाईल पर्सनालिटी) विकास हा आधुनिकीकरण प्रक्रियाचा मुख्य घटक मानला आहे. लर्नर आपल्या सिद्धांतात पारंपारिक व आधुनिक असे गट करतो. साक्षरता, प्रसार माध्यमे, शहरीकरण इ. आधुनिकीकरणाचे घटक मांडले जातात. त्याच बरोबर सामाजिक व वैयक्तिक पातळीवर विचार केला गेला आहे.

## १२.७ आधुनिकीकरणाच्या सिद्धांताचे गुण-दोष :

आधुनिकरणाच्या सिद्धांताची समिक्षा करताना गुण बरोबर दोषाचा विचार करणे क्रमप्राप्त आहे. १९६० नंतर जगामध्ये झपाट्याने विस्तारलेली आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेने संपूर्ण जगाची सामाजिक, आर्थिक, व्यवस्था झपाट्याने बदलून टाकली. आधुनिकीकरणाच्या सिद्धांताची जमेची कमकुवत बाजू पुढील प्रमाणे-

१) आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेने संपूर्ण व्यवस्था बदलली आहे. अनेक देश विकसित झाले त्यामुळे विकसित झालेल्या देशांनी अविकसित देशावर आपला ताबा मिळवण्याचा प्रयत्न केला. संपूर्ण अर्थव्यवस्ता स्वतःच्या ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न झाला. त्यामुळे अवलंबिताचे प्रमाण वाढले (डिवेडन्शी थिअरी)

२) विकसित देशांच्या पातळीवर येण्यासाठी विकसनशील देश त्यांच्या सामाजिक राजकीय, आर्थिक संरचनाना पुढे नेण्यासाठी धडपड करतात. पण असे करतान विकसीत देशांच्या आधीन होण्याचा धोका संभवतो.

३) आधुनिकीकरण ही संकल्पना पाश्चात देशातून झालेली आहे. त्यांचा निश्चित आधार भांडवलशाही आहे. त्यामुळे भांडवलशाहीचा प्रसार आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेबरोबर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## १२.८ सारांश (Summary)

आधुनिकीकरणाची संकल्पना दुसऱ्या महायुद्धा नंतर उदयास आली. विकसित समाजाने सामाजिक, भौतिक व संस्कृतिक दृष्टिने मागासलेल्या जगाला बदलण्याची क्षमताच्या गृहीकाचा संच म्हणजे आधुनिकरण सिद्धांत होय. पारंपारिक समाज जेव्हा मोठया आधुनिक समाजाच्या संपर्कात येतील तेव्हा त्यांच्यामध्ये विकासाची प्रक्रिया अधिक गतिमान होईल. मुळातच आधुनिकीकरणाच्या सिद्धांताची मांडणी बदल व परिवर्तनाच्या स्वरुपात केली आहे. १९६० नंतरच्या जागतिक आर्थिक वृद्धीच्या अवस्थांचा विचार आधुनिकीकरण सिद्धांतात झाला आहे.

## १२.९ संदर्भ ग्रंथ (Reference List)

- डॉ. बोबडे प्रकाश (संपादक) : आर्थिक विकास, परिवर्तन मानवी हक्क
- प्रसाद गोपीकृष्ण, विकास का समाजशास्त्र, रावत पब्लिकेशन -जयपूर, नई दिल्ली - १९९९.

## १२.१० प्रश्न :

१) आधुनिकीकरण म्हणजे काय ?आधुनिकीकरण सिद्धांताची तत्वे सांगा.

२) रोस्टोच्या सिद्धांताचे सविस्तर विश्लेषण करा.

३) आधुनिकीकरणाचे गुण-दोष सविस्तर सांगा.

❖❖❖❖

# १३

# सैद्धांतीक दृष्टिकोन
# २ अवलंबन सिद्धांत
# (Deoendency Theory)

**घटक रचना**

१३.१ प्रस्तावना (Introduction)
१३.२ अवलंबन सिद्धांत (Deoendency Theory)
१३.३ गुंडर फ्रँक जागतिक व्यवस्था सिद्धांत
१३.४ इमॅन्युअल वॉलरस्टाईन जागतिक व्यवस्था सिद्धांत
१३.५ सारांश (Summary)
१३.६ संदर्भ ग्रंथ (Reference List)
१३.७ प्रश्न (Questions)

## १३.१ प्रस्तावना (Introduction)

१९५० व १९६०च्या दशकात प्रसारित झालेली विकासाशी संबंधीत व्यवस्था दर्शविण्यासाठी अवलंबन सिद्धांत वापरला जाते. अवलंबन सिद्धांतामूळे विकासाच्या संदर्भातील एक अधिक सर्वसामान्य दृष्टिकोन आकारला आला. अवलंबन सिद्धांत व जागतिक अविकसित सिद्धांत यामध्ये बऱ्याच बाबतीत साम्य आहे. विकासाचा अभाव ही अवलंबन सिद्धांताशी जोडली गेलेली महत्वपूर्ण संकल्पना आहे. तिसऱ्या जगाचे वैशिष्टये असलेल्या गरीबी, आर्थिक दौर्बल्य स्थितीचे वर्णन करण्यासाठी वापरण्यात आलेली संकल्पना आहे. विकसीत देशाच्याकडून झालेल्या वर्णन ही अवलंबीता सिद्धांतामध्ये मांडण्यात आले आहे.

विकासाच्या अभावाचा सिद्धांत मुख्यतः आर्थिक संरचनेशी संबंधित आहे. परंतु काही प्रमाणात तो आधुनिकीकरणाच्या सिद्धांताला आवाहन व विकासाचे समाजशास्त्र म्हणून विकसित झाला. तिसऱ्या जगातील विकासाचे स्पष्टीकरण हा सिद्धांत करतो.

## १३.२ अवलंबित्वाचा सिद्धांत (Deoendency Theory)

विकसित भांडवलशाही देशांनी पुढे आणलेल्या विकासाचे गुण विशेष अगदी सुरुवातीपासूनच परावलंबाच्या संरचनेत बंदिस्त असलेले होते. हे परावलंबन विकसित भांडवलशाही देश व विकसनशील देशामधील परस्पर संबंधा मध्ये अस्तित्वात होते. दुसऱ्या

महायुद्धानंतर विकसनशील देशामध्ये आधुनिकीकरण प्रक्रिया वेगाने सुरु झाली. पण या देशांची मुख्य समस्यां ही होती की, औधोगिकरणाचे कार्यक्रम चालवण्यासाठी ते भांडवल निर्मान करण्यासाठी सक्षम नव्हते. त्यासाठी त्यांना पारंपारिक कृषी व्यवस्था बदलून व्यापारी कृषी द्वारे भांडवल उभा करणे गरजेचे होते. या प्रक्रियेमुळे ग्रामीण समाजव्यवस्थेत मोठे स्थित्वतरे निर्माण झाली.

औधोगिकरण प्रक्रियेचा वापर करुन अनेक देशांनी उत्पादन वाढवले पण जागतिक बाजारपेठेत उत्पादनाचे दर घसरले व उद्योग कोलमडून गेले याला कारण बाजारपेठेतील वाढलेले उत्पादन ऐवढेच नव्हते तर विकसित देशाची स्वयंपूर्णत हे कारण होते. संपूर्ण जागतिक बाजारपेठा व आर्थिक सत्ताकेंद्र विकसित राष्ट्राच्याकडे असल्याने विकसनशील व अविकसित राष्ट्रांना त्यांच्यावर अवलंबून राहावे लागते आले. विकसनशील देशांमधील उत्पादनाच्या, औधोगिकीकरणांच्या प्रक्रियेला पुर्नजीवित करणारे (ईसीएलए) धोरण राबवण्यात आले. या धोरणाने विकसनशील देशांना थोडा आधार मिळाला पण विकसीत राष्ट्रांनी आपले भांडवल या देशामध्ये गुंतवण्यास सुरुवात केली. ज्यामुळे नव-वसाहतवादच सुरुवात झाल्याचे अनेकांनी मते नोंदवली.

अशा प्रकारे आधुनिकीकरणाच्या सिद्धांताच्या दात्यांच्या विरोधात टोकाला जाऊन विकसित झालेल्या अवलंबित्वाच्या सिद्धांताने पश्चिमेच्या बरोबर येण्याबद्दल विकसनशील देशाना सक्षम म्हणून पाहिले. आधुनिक भांडवलशाही देशांच्या अर्थव्यवस्थेमधील आर्थिक हितसंबंध प्रबल व ज्याच्यावर वर्चस्व आहे. असे ह्यांच्यातील आर्थिक हितसंबंध हवे त्या प्रमाणे सक्षम होते.

## १३.३ गुंडर फ्रँक जागतिक व्यवस्था सिद्धांत :

फ्रँक यांच्या मते भांडवलवादाच्या इतिहासात विकसनशीन देशांसाठी जे वसाहतवादाचे व साम्राज्यवादाने केले ते फक्त अनिर्बंध लालच, लुट व शोषण नव्हते तर त्या देशांमध्ये भांडवलशाहींची एक प्रक्रिया होती. जिने विकसनशील देशांच्या सातत्यपूर्ण व अनिर्बंध शोषणासाठीची संरचना उभी केली. फ्रँक भांडवलशाहीला जागतिक व्यवस्था मानतात. ज्यामध्ये विकास व विकासाची कमतरता ह्यांना विनिमयाची एक व्यवस्था किंवा संबंधाचे प्रकार म्हणून स्पष्ट करतात. फ्रँक हे महानगर, उपनगर या क्षेत्राची निगड विकासाच्या प्रक्रियेचा अभ्यास करतात.

फ्रँक म्हणतात की, विकासाच्या अभावाचा सिद्धांताचा अभ्यास करताना विकसनशील देशाचा अभ्यास करावा त्या आधारे दिसून येईल की देशांची विकासाच्या अभावायी अवस्था त्यांच्या भांडवलशाही देशासोबतच्या साम्राज्यवादी संबंधामूळे आहे.

## १३.४ वॉलरस्टाईन जागतिक व्यवस्था सिद्धांत :

वॉलरस्टईनने जगाला भौगोलिक सीमा व स्वतंत्र देशांच्या पलीकडे अस्तित्व असलेली व मोठया प्रमाणात आर्थिक प्रक्रियांवर आधारित एक घटक व्यवस्था म्हणून पाहीले आहे. वॉलेरस्टईन १५व्या शतकात भांडवलशाही अस्तित्वात आल्याचे सांगतात. भांडवलशाहीचे मुख्य तत्व आधिकाधिक नफा मिळवणे हेच होते.

वॉलेरस्टईन यांनी मांडलेले जागतिक व्यवस्थेचा सिद्धांत जागतिक श्रम विभागणी आहे. ज्यामुळे विविध सांस्कृतिक व्यवस्था एका अर्थव्यवस्थेत एकत्र झाल्या आहेत. जागतिक व्यवस्था हे एक परस्पर - अवलंबून असलेल्या देशांची व्यवस्था आहे. हे देश राजकिय व आर्थिक संबंधानी एक- मेकांशी जोडलेले आहेत. सुधारीत दळण-वळण व संचार साधनामुळे जागतिक व्यवस्था विस्तारित होत आहे.

## १३.५ सारांश (Summary)

विकासाच्या अभावाचा सिद्धांत अवलंबित्वाचा व जागतिक व्यवस्था सिद्धांत एकमेकांच्या शाखा आहेत. भांडवलशाही, विकसनशील, अविकसीत अशा तीन विभागनीवर हया सिद्धांताची रचना करण्यात आली आहे. विकसित भांडवलशाही देश नव साम्राज्यवादी आहेत असे हया सिद्धांतातून स्पष्ट होते. जागतिक व्यवस्था सिध्धांत भांडवल व्यवस्था परिवर्तनावर प्रकाश टाकते तर विकसनशील देश हे विकसित देशांवर अवलंबून असल्याचे अवलंबीत सिद्धांत स्पष्ट करतो.

## १३.६ संदर्भ ग्रंथ (Reference List)

1) Alavi Hameza and Shahin Teador, Introduction to the Sociology of Developing Societies.

2) Harrisan David, Sociology of Modernisation and Development, Heritage Publishers, New Delhi.

इंटरनेट स्रोत
www.aabss.org.

## १३.७ प्रश्न (Questions)

१) अवलंबिता सिद्धांतावर सविस्तर चर्चा करा.

२) विकासाच्या अभाव व जागतिक व्यवस्था सिद्धांतावर सविस्तर लिहा.

❖❖❖❖

# १४

# सैद्धांतीक दृष्टिकोन
# ३ - नविन खुली अर्थव्यवस्था व उदारीकरण

**घटक रचना**

१४.१ प्रस्तावना (Introduction)
१४.२ नविन खुली अर्थव्यवस्था व उदारीकरण
१४.३ उदारीकरणाची वैशिष्टये
१४.४ सारांश (Summary)
१४.५ संदर्भ ग्रंथ (Reference List)
१४.६ प्रश्न (Questions)

## १४.१ प्रस्तावना (Introduction)

१९३९ ते १९४५ या काळात दुसऱ्या महायुद्धामुळे अमेरिके व्यतिरिक्त इतर राष्ट्रांची अपरिमित आर्थिक हानी झाली होती. जपान, इटली यासारख्या देशांनी तर ऱ्हासाची पायरी गाठली होती. जागतीक बहुतेक देशांची अर्थव्यवस्था पूर्णपणे मोडकळीस आली होती. अशा वेळी अर्थव्यवस्थेला स्थैर्य आणून देण्यासाठी सामूहीक सहकार्याची गरज भासली. यातून १९४६ साली जागतिक बँक व आंतराष्ट्रीय नाणेनिधी या जागतिक स्थरावरील आर्थिक संस्था निर्माण झाल्या. तसेच १९४८ साली व्यापार व जकात विषयक करार करण्यात आला. आर्थिक स्थैर्याच्या दृष्टिकोनातून जागतिकीकरणाची ही भूमिका महत्वपूर्ण मानली आहे.

## १४.२ नविन उदारीकरण धोरण :

१९८०च्या सुमारास पाश्चिमात्य देशातील अर्थव्यवस्था भरभराटीला आली. आशिया, दक्षिण अमेरिका, खंडातील विकसित व अर्धविकसित राष्ट्रांमध्ये अतिरिक्त भांडवल गुंतवण्यासाठी पाश्चिमात्य राष्ट्रांतील कंपन्या उत्सुक होत्या. या राष्ट्रात भांडवल गुंतवून नैसर्गिक साधनसंपत्ती वापरण्यास व बाजारपेठावर ताबा मिळवून आधिकाधिक नफा मिळवण्याचा या कंपन्याच्या दावा होता. पाश्चात्य राष्ट्राच्या हितसंबंध जोपासण्याच्या दृष्टिकोनातून तेथील प्रशासकांनी जागतिकीकरण, उदारीकरण व्यापारासाठी खुले क्षेत्र धोरणांचा पुरस्कार केला. या धारणाच्या पूर्ततेसाठी विकसित राष्ट्रानी पुढाकार घेतला त्याच बरोबर दबाव तंत्राचा वापर करुन अनेक राष्ट्रांशी करार करुन घेतले. भारताने १९९१ साली या करारावर सहया करुन नविन उदारीकरनाचे धोरण स्विकारले.

## १४.३ उदारीकरणाची वैशिष्टये :

### १) परस्पर संपर्कात वाढ :

जागतिकीकरण, उदारीकरण मुक्त व्यापार (L.P.G.) या धोरणामुळे जागतिक राष्ट्रांमधील संपर्काचा विस्तार झाला. परस्परांच्यातील सर्वच क्षेत्रातील देवाण-धेवाण सुलभ व शक्य झाली. संपर्क क्रांतीमुळे माहितीचे जाळे पसरले आहे. व्यापाराबरोबर सामाजिक व सांस्कृतिक देवाण-घेवाण वाढली आहे. संपूर्ण जग अत्यंत वेगाने जवळ आले. अविकसित राष्ट्रे विकसित राष्ट्राच्या संपर्काने विकासाकडे झपाटयाने अग्रेसर होत आहेत.

### २) विज्ञान - तंत्रज्ञानाचा वाढता वापर :

जागतिकीकरणामुळे संपर्कक्षेत्र वाढली त्याच बरोबर उदारीकरणामुळे विज्ञान-तंत्रज्ञानाची ही देवाण-घेवाण वाढली आहे. जागतिक कंपन्याचे प्रमाण दिवसेन दिवस वाढत आहे. मुक्त अर्थव्यवस्थेमुळे राष्ट्रीय सीमा अस्पष्ट झाल्याने तंत्रज्ञान विविध देशात पोहचणे सहज झाले आहे.

### ३) दृढ व्यापारी संबंध :

जागतिकीकरणामुळे जागतिक बाजारपेठा सर्व राष्ट्रांना खुल्या झाल्या. दोन राष्ट्रात व्यापार संबंध अधिक बळकट होण्यास मदत झाली. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या विकासामुळे जग अधिक जवळ आहे.

### ४) विकासाची संधी :

जागतिकीकरणामुळे अविकसित व अर्धविकसित राष्ट्रांना विकासाची समान संधी प्राप्त झाली. छोटे देश देखील आंतराष्ट्रीय व्यापारात आपले स्थान निश्चित करु लागले. बऱ्याच देशांनी आपला विकास साधण्याचा प्रयत्न करुन यश मिळवले व स्वावलंबी बनले.

### ५) नव वसाहतवादाचा उदय :

जागतिकीकरणामुळे बडया राष्ट्रातील मोठया कंपन्यांनी बाजारपेठा काबीज केल्यामुळे देशामधील दरी वाढत असल्याचे दिसते. श्रीमंत राष्ट्र आर्थिक सत्ता केंद्र बनत आहेत. त्यामुळे विकसनशील व अविकसित राष्ट्रे आधिकाधिक गरीब बनत आहेत. नवा वसाहतवाद उदारीकरणामुळे निर्माण झाला आहे.

## १४.४ सारांश (Summary)

दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिकीकरण, उदारीकरण मुक्त अर्थव्यवस्था या प्रक्रिया एक गरज म्हणून समोर आल्या. जागतिकीकरणाचा जवळ - जवळ सर्वच राष्ट्रांनी पुरस्कार केला. या प्रक्रियामुळे जागतिक विकास प्रक्रियेला कमालीची गती प्राप्त झाली. सर्व राष्ट्रांना विकसाची समान संधी प्राप्त झाली. अविकसित राष्ट्र विकासाच्या प्रक्रियेत आली.

असे असले तरी पाश्चात्म भांडवलशाही देश व विकसित देशच आर्थिक सत्ता केंद्र बनले. अधिक नफा मिळवण्याच्या हव्यासासाठी अविकसित व विकसनशील राष्ट्रांचे शोषन होवू लागले. आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या नावाने नवा वसाहतवाद छूप्या मार्गाने सुरु झाला आहे. या नव

वसाहतवादास थांबवून राष्ट्रा-राष्ट्रामधील समतेचा व समस्त मानवजातीच्या कल्याणाचे मार्ग मोकळे करता येतील.

## १४.५ स्वाध्याय / प्रश्न (Questions)

१. उदारीकरण म्हणजे काय ? उदारीकरणाच्या जागतिक परिणामावर चर्चा करा.

२. भारताने स्विकारलेल्या १९९१ च्या नविन आर्थिक घोरणाचे परिणाम थोडक्यात सांगा.

❖❖❖❖

# १५

# विकासाची प्रक्रिया : संघर्ष आणि प्रतिसाद (विस्थापन, पुर्नवसन आणि पर्यावरण)

# (Process of Development - Crisis & Responses)

**घटक रचना :**

१५.१ उद्दिष्टये (Objectives)
१५.२ प्रस्तावना (Introductions)
१५.३ विकास, विस्थापन, पुर्नवसन व्याख्या
१५.४ विकास आणि विस्थापनाची समस्या
१५.५ विस्थापन आणि पुर्नवसन (Displacement & Rehabilition)
१५.६ स्थलांतर आणि पुर्नवसन (Issue of land displacement & Rehabilitation)
१५.७ पुनर्वसनासाठी उपायोजना (Rehabilitation)
१५.८ पर्यावरण (Environment)
१५.९ पर्यावरणाची अवनिती (Environmental Degradation)
१५.१० पर्यावरणातील असंतूलन
१५.११ सारांश (Summary)
१५.११ प्रश्न (Questions)

## १५.१ उद्दिष्टये (Objectives)

१. विकास, विस्थापन आणि पुर्नवसन जाणून घेणे
२. पुर्नवसनाच्या अडचणी उपाययोजना जाणून घेणे
३. पर्यावरण, त्यांचा होणारा ऱ्हास जाणण्यासाठी

## १५.२ प्रस्तावना (Introductions)

भारत जगातील महासत्ता बनण्याचे स्वप्न पहात आहे. त्यासाठी तेथील जनतेचे राहणीमान अत्यंत सुखप्रद असले पाहिजे. सर्व सुखसोयी मिळाल्या पाहिजेत. त्यासाठी संपूर्ण भारतीयांच्या सर्व गरजा पूर्ण केल्या पाहिजेत. त्यासाठी उत्पादन वाढविले पाहिजे. कारखाने

काढले पाहिजेत. तसेच अनेक प्रकल्प राबवून भारताचा विकास घडवून आणला पाहिजे. विकास म्हटंल की वीजनिर्मिती आवश्यक आहे. त्यासाठी प्रकल्प राबविलजात आहे. भारतात वीजनिर्मिती अत्यंत कमी आहे. वीजेची मागणी जास्त आणि निर्मिती कमी आहे त्यासाठी अनेक प्रकल्पच राबविले जातात. भारतासारखा देशात वीज प्रकल्पच राबविले जात नाहीत तर विकासाच्या दृष्टीने अनेक प्रकल्प राबवण्यात येत आहेत.

विकासाच्या दृष्टीने अशा प्रकल्पाचे काही राज्यात मोठ्या प्रमाणात स्वागत केले जाते तर काही राज्यात अशा प्रकल्पात मोठ्या प्रमाणात विरोध केल जात आहे. जेथे विविधतेल धोका म्हणून पर्यावरणातज्ञांनीही या प्रकल्पाल विरोध केल यातून स्थानिक पर्यावरणतंज्ञानी प्रकल्प चळवळ मोठ्या प्रमाणात उभी केली.

काही राज्यात या अंदोलनामूळे प्रकल्प योजना अर्धवट राहिल्या तर काही प्रकल्प कायमचे बंद पडले तर काही योजना दुसऱ्या राज्यात स्थालंतरीत करावे लागले. या प्रकल्पामूळे जे विस्थापीत झाले. त्यांचे पुनर्वसन केले जाते.

## १५.३ विकास, विस्थापन व पुर्नवसन : व्याख्या :

**विकास :**

सुरुवातील विकास म्हणजे केवळ आर्थिक विकास समजल होतो. विकासाचा अर्थ आर्थिक विकास आणि सामाजिक परिवर्तन यांच्यातील संबंधाचा अभ्यास होईपर्यंत कायम होतो. त्यानंतर विकास संकल्पनेत मानवी जीवनाच्या विविध पैलूचा समावेश होऊ लागला. विकास म्हणजे, समाजाने उपेक्षित दिशेकडे केलेले परिवर्तन होय.

विकास म्हणजे केवळ आर्थिक वृध्दी किंवा प्रगती एवढेच अभिप्रेत नाही तर माणसांचा (समाजाचा) विचार विकासात होतो.

विकास म्हणजे केवळ राष्ट्रीय उत्पन्नात वाढ नसून गरीब व श्रीमंत राष्ट्रातील वंचित वर्गाची सर्वांगिण उन्नती होय.

मानवी विकास साधण्यासाठी अनेक योजना प्रकल्प राबविले जातात. अशा वेळेस ज्या लोकांच्या जमिनी, शेती घेतली जाते. अशा लोकांना विस्थीत असे म्हणतात.

**विस्थापन म्हणजे :**

१) विस्थापन म्हणजे नेहमीच्या किंवा योग्य भूभागावरून दुसरीकडे स्थंलातर धेणे.

२) कोणतेही संकट असो मानवनिर्मित किंवा नैसर्गिक असो त्याचा सामान्य लोकांवर मोठया प्रमाणावर परिणाम होतो. त्यात मानव व वित्तहानी मोठया प्रमाणावर होतो. संकटानंतर त्या लोकांच्या विस्थापनाची समस्या निर्माण होते.

**पुनर्वसन म्हणजे :**

१) पुनर्वसन म्हणजे लोकसंस्थेची एका क्षेत्रातून दुसऱ्या क्षेत्रात नियोजनाच्या आधारावर बदली करणे होय.

२) एका विशिष्ट क्षेत्रात राहत असलेल्या कुटुंबाचे स्थानंतर करून दुसऱ्या नियोजीत क्षेत्रात वसाहत स्थापन करणे व त्या लोकांच्या सामाजिक, आर्थिक गरजा व इतर सेवा पूर्ण करणे म्हणजे पुनर्वसन होय.

३) पुनर्वसनाची संज्ञा ही शिक्षण, भौतिक कार्ये, मानसिक समायोजन, सामाजिक अनुकुलता, व्यावसायिक योग्यता, यांच्याशी विशेषत्वाने संबंधीत असलेल्या सेवांशी संबंधीत असते.

विकास विस्थापन आणि पुनर्वसन या तिन्ही घटक एकमेकांधारीत आहेत. विकास साधताना ज्या लोकांना विस्थापीत व्हावे लागते त्यांचे पुनर्वसन करावे लागते अन्यथा प्रकल्प चळवळी वाढीस लागतात.

## १५.४ विकास आणि विस्थापनाची समस्या :

भारतासारख्या विकसनशील देशात मागील अनेक पंचवार्षिक योजनांमधून सर्व क्षेत्रांच्या विकासावर भर देण्यात आलेल आहे. विकास करणे ही अपरिहार्य प्रक्रिया आहे. परंतू ही प्रक्रिया राबवताना त्यातून होणारी प्रगती आणि नुकसान या दोन्ही गोष्टी लक्षात ध्यावा लागतात.

या बाबतीत ठवक दोन विचार प्रवाह दिसून येतात

१) एका विचार प्रवाहानुसार विकास करावयाचचा झाल्यास नैसर्गिक संपत्ती आणि मानवांच्या सांस्कृतिक जीवनाचे नुकसान होणार हे गृहीत धरले पाहिजे. परंतू ह्या तोटयापेक्षा लाभाचे प्रमाण जास्त असते हे सुध्दा लक्षात घेणे आवश्यक आहे.

२) दुसऱ्या विचार प्रवाहानुसार विकास जरुर करावा विकासाला विरोध नाही. परंतू ज्या विकास योजनांमुळे जमिन, जंगल आणि पाण्याची / जलची अपरिमीत हानी होत असेल त्या परिसरातील मानवी जीवत धोक्यात येत असेल तर अशा योजनांच्या आखणीचा पुर्नविचार करावा जेणेकरून विस्थापितांचा प्रश्न निर्माण होणार नाही, तसेच त्यातून शाश्वत/चिरंजीवी विकास साध्य होईल. एक प्रकारे विकासवादी आणि पर्यावरणवादी यांच्यात हा वाद चाललेल आढळतो. पर्यावरणवादी विस्थापितांचा प्रश्न/समस्या सोडविण्यासाठी शासनाकडे सतत तगादा लावीत आहेत. त्यांच्या मते विस्थापीतांचा प्रश्न सोडाविणे ही एक शासनाची मोठी जबाबदारी आहे.

विस्थापनातून खालील समस्या निर्माण झालेल्या दिसून येतात.

१) कुटूंब उध्वस्त घेते.

२) गाव किंवा परिसर विकास क्षेत्राखाली येणार हे कळताच लोकांमध्ये ताणतणाव निर्माण होतो. त्याचा परिणाम लोकांच्या शारीरिक आणि मानसिक स्वास्थावर होतो.

३) विस्थापीत लोकांना योग्य तो मोबदल न मिळाल्यास अशा संकट ग्रस्त व्यक्ती आत्महत्या ही करतात.

४) अशा व्यक्ती परंपरागत रोजगारात मूकतात तर नविन रोजगारात त्यांना जम बसविणे कठिण जाते. अशा व्यक्तींना आपल्या जीवनावश्यक गरजाही त्यांना पूर्ती करणे शक्य नसल्याने दारिद्र्यांचे प्रमाण वाढलेली दिसून येते.

५) विस्थापीत समस्यांमूळे बेरोजगारीची समस्याही मोठया प्रमाणात वाढत असलेली दिसून येते. आदिवासी, ग्रामिण भागातील विस्थापीताचे प्रमाण जास्त आहे अशा गावातील लोकांचे रोजगार बुडतात नविन रोजगार लवकर व मिळाल्याने बेरोजगारीची समस्या मोठया प्रमाणात उद्‌भवते.

६) आदीवासी आणि ग्रामिण घटकांमध्ये विस्थापीतांचे प्रमाण जास्त आहे. त्यांना योग्य तो मोबदला किंवा सुविधा न मिळाल्याने त्यांच्या दैनंदिन गरजा इतर कारणांसाठी जसे विवाह, मूत्यु, सण इ. साठी सावकाराकडून कर्ज काढावे लागते त्यामुळे कर्जबाजारीपणा सारखी समस्या वाढलेली दिसून येते.

७) विस्थापीतांना दुसऱ्या ठिकाणी स्थानांतरीत केले जाते. काही ठिकाणी त्यांचे स्थानांतरीत केले जाते त्या वातावरणाशी तडजोड करणे कठिण जाते. त्यापेक्षा वेगळी गोष्ट म्हणजे या विस्थापितांचा स्थानिक लोकसहजपणे स्विकार करीत नाहीत. त्यामूळे स्थानिक आणि विस्थापीत यांच्या संघर्ष निर्माण होतो.

८) विस्थापीतांना परंपरागत व्यवसाय सोडून नविन व्यवसाय स्विकारणे सहज शक्य होत नाही.

९) या विकासामूळे निसर्गाची मोठया प्रमाणावर हानी होते. नद्या नाले याचा प्रवाह बदलतो. नदयातील पाण्याची पातळी कमी होते.

अशा प्रकारे समाजावर आणि पर्यावरणावरही या विस्थापनामूळे समस्या निर्माण होतात.

## ११.५ विस्थापन आणि पुर्नवसन (Displacement and Rehabilition) :

समाजाच्या स्थायित्व विकासाबरोबर जुळलेले असते. भटक्या समुदायाचा सांस्कृतिक आणि सभ्यतेचा विकास त्या प्रमाणात घडलेला दिसत नाही. समुदायाच्या विशिष्ट भूभागावरच समाजाचा विकास झालेल दिसून येतो. तर नियोजीत विकास प्रक्रियेत समुदयाचे स्थायित्व धोक्यात येते. त्या समुदयातील लोकांना शतकानुशतकांची घरेदोर, चीजवस्तू, जमीन, सांस्कृतिक वारसा यातून दूसरीकडे वस्ती करावी लागते.

“विस्थापन म्हणजे नेहमीच्या किंवा योग्य भूभागावरुन दुसरीकडे स्थलांतरीत करणे/होणे.”

विस्थापनाची समस्या ही जागतिक आहे. भारतात स्वातंत्र्योतर काळात विस्थापनाचा प्रश्न निर्माण झाला. लोक स्वच्छेने विस्थापीत होत नाहीत तर विकासासाठी किंवा निसर्गाच्या अवकपेमूळे समाजावर विस्थापीत होण्याची वेळ येते. अशा लोकांना लाभाची अपेक्षा असते. नियोजनरित्या त्यांचे पुनर्वसन करने आवश्यक असते.

**विस्थापनाची कारणे (Causes of Displacement)**

१) **भूकंप :** तीव्र स्वरूपांच्या भूकंपामूळे मोठया प्रमाणात संपत्ती व प्राणहानी / जिवीत हानी होते. घरेदारे पडतात. सर्व सुखसोयी नष्ट होतात. लोकांना बेघर व्हावे लागते. काही वेळा त्याच ठिकाणी किंवा वेगळया ठिकाणी वस्ती करावी लागते. लोक मोठया प्रमाणात होणाऱ्या भूकंपामूळे या नैसर्गिक आपत्तीमुळे विस्थापीत होताना दिसतात. उदा. कच्छ मधील वारंवार होणारा भूकंप, त्याच बरोबर वादळे, महापूर, ज्वालामूखी अशा नैसर्गिक संकटामुळे विस्थापनाचा प्रश्न निर्माण झालेला दिसून येतो.

२) **औदयोगिक वसाहती :** विकास प्रक्रियेत औदयोगिक वसाहती निर्माण केल्या जातात. त्यात अवजड उदयोग खनिजांचे उत्खलन इ. चा समावेश असतो. त्या भूभागावर राहणाऱ्या लोकांना दुसऱ्या ठिकाणी हलविण्यास येते. उदा. ओरिसा राज्यातील कोरापूर जिल्हातील अल्युमिनियम उदयोगासाठी १५ गावातील ६१० कुंटूबांना विस्थापीत व्हावे लागले.

३) **राजकीय कारणे :** सांप्रदायिक संघर्षाप्रमाणेच देशाची फाळणी, बांगलदेशाची निर्मिती, चिनने तिबेटवर केलेला कब्जा अशा घटनांमधून मोठया प्रमाणात विस्थापितांचा वर्ग निर्माण झाल. आजही अशा विस्थापित भारतात ठिकठिकाणी वसलेले दिसून येतात.

४) **सुरक्षित वन प्रकल्प :** पशूपक्ष्यांचे, प्राण्यांचे अस्तित्व घोक्यात येऊ नये. त्यांचे अस्तित्व नष्ट होऊ नये म्हणून काही जंगले राखीव ठेवण्यात येतात. त्या भूभागावर राहण्याच्या लोकांना विस्थापीत व्हावे लागते.

५) **मोठी धरणे :**शासनाने ओलीताची सोय पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, उदयोग धंदयासाठी लागणार पाणी, पुराचे नियंत्रण करण्याच्या हेतूने नदयावर धरणे बांधण्याची प्रक्रिया सुरु केलेली आहे. मोठया धरणांमूळे विस्थापनाची समस्या जास्त जटिल झालेली आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) विस्थापित होण्याची विविध कारणे सांगा

## ११.६ स्थलांतर आणि पुर्नवसनाचा प्रश्न (Issue of land displacement and Rehabilitation)

मानवाने स्वतःच्या विकासासाठी, कल्याणासाठी सुखसमृध्दीसाठी निसर्गावर सातत्याने आक्रमण केलेले आहे. नैसर्गिक साधन संपत्तीचा स्वतःच्या फायदयासाठी मोठया प्रमाणात वापर केलेले आहे. नदयांवर मोठमोठी धरणे बांधून पाण्याचा वापर जलसिंचत आणि जलविद्युत निर्मितीसाठी केलेल आहे. मानवाने आपल्या लौकीक प्रगतीचे दयोतक म्हणून लोह पोलाद,

सिमेंट, खत कारखाने, औषणीक केंद्रे सुरु केली. जंगलची अक्षरच कतल करुन शेत लगवडीखालि योग्य अशी जमीन तयार केली. विकासामूळे मानवाने हवा, मृदा व पाणी यांचे प्रदूषण केले आहे. पर्यावरणाचे संतूलन बिघडविले. विकासाचा पर्यावरणावर झालेला परिणाम पुढील प्रमाणे आहे.

**जमिनीचा वाढता वापर :**

वाढत्या नागरीकरणांमुळे आणि औदयोगिकीकरणामुळे जमिनीचा तुटवडा निर्माण झालेला आहे. शहरांचा विस्तार अत्यंत मोठया प्रमाणात होत आहे. अशा या मोठया शहरात लोकसंख्येचे प्रमाणही वाढले आहे. ग्रामिण भागातील लोक शहराकडे नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने स्थलंतर करीत आहे. त्यामूळे शहरालगतची शेतीची पिकांची जमीन आता बिगर शेतीत रुपांतरीत होत असून जमिनीचे प्लॉट्स पाडून त्यावर मोठमोठया गगनचुंबी इमारती उभारल्या जात आहेत. प्रदूषणाच्या नियंत्रणाखाली शेतजमिनीचे हिरवे पट्टे, आजूबाजूला असलेली जंगले महत्वाची भूमिका बजावीत होती. मात्र मानवाने स्वतःच्या फायदयासाठी निसर्गावर आक्रमण करुन मोठया प्रमाणावर जंगलतोड केली. शेतजमीनीचा वापर आज इमारतीची बांधणी, मोठमोठया औदयोगिक वसाहतीची निर्मिती. विमानतळांची उभारणी यासारख्या कार्यासाठी केली जात आहे. शहरागत लगत असलेल्या शेतजमीनीच वापर भाजीपाल, फळफळावळे यांचा लगवडीसाठी केल जात असे. मात्र आज वाढत्या लोकसंस्थेच्या निवासाची गरज भागाविण्यासाठी आज या जमिनी वापरात आणल्या जात आहेत तसेच शेती करण्यापेक्षा विविध शेतीपूरक व्यवसाय करण्याकडे लोकांचा कल वाढत आहे. जमिनीच्या किंमती देखील भरमसाठ वाढल्याने शेतजमिनीची मालकी असणारे लोक चटकन पैसा मिळतो म्हणून जमिनी विकत आहेत. कोरडवाडू जमिनी धरणामूळे लगवडीखाली आणण्यात येत असल्या तरी धरण उभारणीमूळे जंगलाची हानी झालेली आहे. आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानामूळे आज कोणती खनिजसंपत्ती कुठे उपलब्ध आहे याची माहिती मिळते. याचा उपयोग करुन अनेक ठिकाणी खाणकाम सुरु झाले. खाणीच्या आसपासच्या प्रदेशात मोठमोठे उदयोग, व्यवसाय सुरु झाले. एका बाजून विकास झाल हे वास्तव आहे तर दुसऱ्या बाजूला पर्यावरणाची झालेली हानी ही भिषण वास्तव नाकारता येत नाही.

मानवाच्या अतिरिक्त सुधारणेच्या हण्यासापोटी पर्यावरणाची कधीही भरुन न येणारी हानी होत आहे. या पर्यावरणाच्या ऱ्हासाला मानवच कारणीभूत आहे. त्याचे परिणामही मानवालच भोगावे लागतात. चांगले पर्यावरण ही मानवाची आधुनिक व महत्वाची गरज आहे. घातक पर्यावरणामुळे मानवी जीवनात धोका निर्माण होतो. पर्यावरणाच्या वाढत्या ऱ्हासामूळे लोकांच्या जीवनमानावरही विपरीत परिणाम झालेला आहे.

काही लोकांना आपल्या गावापासून, खेड्या पासून, जन्मभूमिपासून विस्थापित होण्याची वेळ येते त्यासाठी मानवनिर्मित तसेच नैसर्गिक कारणे ही कारणीभूत ठरतात. उदा. दुष्काळ, महापूर येणे ही नैसर्गिक कारणे आहेत तर मोठ मोठी धरणे, मोठ मोठी पाटबांधारे प्रकल्प, मोठे औदयोगिक कारखाने ही मानव निर्मित कारणे आहेत.

काही वेळा पर्यावरणातील बदलामूळे ही लोकांना विस्थापीत व्हावे लागते.

**पुर्नवसन : Rehabilitation :**

पुर्नवसन हा नव्याने निर्माण झालेल सामाजिक प्रश्न आहे. मोठ मोठी प्रकल्प उभारणीमूळे हा प्रश्न निर्माण होतो. मोठमोठी धरणे, मोठे विजप्रकल्प अणू भटयांची उभारणी इ.

कारणांमूळे हा प्रश्न निर्माण झाला आहे. लक्षावधी लोकांना या कारणांमूळे जगात विस्थापीत व्हावे लागत आहे. अशा विस्थायीतांचे पुर्नवसन करणे हा त्यांचा हक्कच आहे. ज्या प्रकल्पामूळे योजनेमूळे लोक विस्थापीत होत असतील तर त्या प्रकल्पांचा फायदा त्या विस्थापीतांना मिळाला पाहिजे. त्यांना राहण्यासाठी पुर्नवसन करणे गरजेचे असते. शेतीसाठी दूसरीकडे जमिन देणे, शेतीसाठी पाण्यासारख्या सुविधा पुरविणे गरजेचे असते.

पुर्नवसनाच्या हक्कासाठी खालील तत्वाची अमलबजावणी करणे गरजेचे आहे.

- विस्थापितांचे पुर्नवसन करणे ही त्या राज्यसरकारची जबाबदारी आहे.
- पुर्नवसनास प्रथम प्राधान्य देऊन ठराविक वेळेत पुर्नवसन प्रक्रिया पूर्ण करावयास हवी.
- स्थलांतरीतांच्या मागण्या ऐकून घेतल्या जाव्यात व मान्य केलेल्या मागण्यांची पूर्तता विनातकार करावी.
- पुर्नवसन प्रक्रियेवरती लक्ष ठेवण्यासाठी सामाजिक संस्थाना उदयुक्त करावे.

१९५० नंतर २५ लाख लोक विस्थापीत झाले त्यापैकी ५०% लोकांचे पुर्नवसन करण्यात आले. आणि अजुनही ५०% विस्थापीतांचे पुर्नवसन झालेली नाही. त्यामध्ये आदीवासी आणि ग्रामीण लोकांची संख्या सर्वाधिक आहे. उदा. ग्रामिण भागात, आदीवासी भागात धरणे बांधण्याचा निर्णय घेतला जातो. त्या आदीवासी, ग्रामिण जनतेचा व्यवसाय, नोकरी, घरांची तसेच आर्थिक मदत देण्याचे आश्वास दिले जाते. परंतू एकाही गोष्टींची पूर्तता केली जात नाही. त्यामूळे कितीतरी विस्थापीत लोकांनी आत्महत्या केलेल्या होत्या. पुर्नवसन म्हणजे विस्थापितांचे दुसऱ्या क्षेत्रात नियोजन पध्दतीने स्थानांतरीत करणे होय.

विस्थापितांचे पुर्नवसन करत असताना काही महत्वाच्या गोष्टी लक्षात घेतल्या जातात.

- त्यांच्या राहण्याची समस्या सोडवण्यासाठी त्यांना चांगली घरे बांधून दयावीत.
- विस्थापीतांना योग्य चांगल्या सोयी सुविधा पुरविल्या पाहिजेत. उदा. पाणी, विज, इत्यादी.
- विस्थापीतांच्या मूलांसाठी आंगणवाडी, शाळा, आरोग्य विषयक सुविधा निर्माण करुन दयावात.
- विस्थापीतांना योग्य असा मोबदल देण्यात यावा. आर्थिक नुकसान भरुन देण्यात यावे.
- व्यवसाय, नोकरीसाठी आर्थिक मदत दयावी.

### विस्थापीतांच्या पुर्नवसनासाठी येणाऱ्या अडचणी :

विस्थापितांचे पुर्नवसन करणे शासनाची जबाबदारी असते. या शासनात काम करणारे नोकर हे विस्थापीत नसतात. त्यांना या विस्थापीतांचे प्रश्न समस्या समजावून घेणे जमत नाही. या समस्यांविषयी ते अत्यंत कोरडे असतात. विस्थापीतांच्या प्रश्ना विषयी त्यांना काही नसते. आरामात ते आपले काम दिरंगाईने करतात. त्यामूळे विस्थापीतांच्या पुर्नवसनासंबंधी तप्परता दाखले जात नाही.

विस्थापीतांच्या जमिनी, प्रकल्पांसाठी घेतल्या जातात. परंतू या ठिकाणी २०, २० वर्षे झाली तरी ती योजना पूर्ण केली जात नाही. काहीवेळेस तो प्रकल्प अर्धवट राहिल जातो. त्यामूळे विस्थापीतांना त्यां जमिनीचा योग्य तो आर्थिक मोबदल मिळत नाही. किंवा कोणताही फायदा त्यांना होत नाही.

**आपली प्रगती तपासा**

१ स्थलांतर आणि पुर्नवसन यांचा सहसंबंध स्पष्ट करा.

## १५.७ पुर्नवसनासाठी उपाय : Rehabilitation :

देशाचा विकास धडवून आणण्यासाठी मोठमोठे प्रकल्प व उदयोगधंदे स्थापन करावे लागतात. त्यात सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील कारणाने रस्ते, रेलवे, धरणे बांधणे, यांचा समावेश होतो. ज्या परीसरात या योजना व प्रकल्प उभारण्यात येतात तेथील जमिनी सरकारचा ताब्यात घ्याव्या लागतात. त्यात अनेक गावे, खेडी, आदीवासी वस्ती, शेतजमिनी व घरे यांच्यावर प्रतिकूल परिणाम होतो. तेथील लोक विस्थापीत होतात. त्यांचे योग्य त्या ठिकाणी पुर्नवसन करने आवश्यक असते. पुर्नवसन योग्यरित्या व्हावे यासाठी सरकारने काही आवश्यक कायदे केलेले आहेत.

**पुर्नवसन म्हणजे :**

१. पुर्नवसन म्हणजे लोकसंख्येची एका क्षेत्रातून दुसऱ्या क्षेत्रात नियोजनाच्या आधारावर बदली करणे होय.

२. एका विशिष्ट क्षेत्रात राहत असलेल्या कुटुंबाचे स्थलांतर करुन दुसऱ्या नियोजीत क्षेत्रात वसाहत स्थापन करणे व त्या लोकांच्या सामाजिक, आर्थिक गरजा व इतर सेवा पूर्ण करणे म्हणजे पुर्नवसन होय.

३. स्ट्रासराबर्ट : यांच्या मते पुर्नवसनाची ही संज्ञा शिक्षण, भौतिक कार्य, मानसिक समायोजन, सामाजिक अनुकुलता, व्यावसायिक योग्यता यांच्याशी विशेषत्वाने संबंधीत असलेल्या सेवांशी संबंधीत असतो.

**पुर्नवसना संबंधी उपाय :**

पुर्नवसन योग्य रीतीने व्हावे लागते. त्यासाठी उपाययोजना काय करता येतील ते पुढील प्रमाणे.

१) **घरे :** विस्थापीत लोकांना आपले परंपरागत रहात असलेले घर, जागा व गाव सोडावे लागते पण प्रत्यक्षात नविन जागी राहण्यास लोक सहजरित्यां तयार होत नाहीत. म्हणून नविन जागा राहण्यासाठी मोफत व मोठी घरे देणे गरजेचे असते. शिवाय राहण्यासाठी घरे बांधून देणे गरजेचे असते.

२) **जमिनी :** विस्थापीत लोकांच्या उदर निर्वाहासाठी त्यांना शेती करण्यासाठी जमिनी उपलब्ध करुन द्याव्या लागतात. कारण ग्रामिण भागात बहुतांश लोक शेती व्यवसाय करीत असतात. त्यांना शेतीयोग्य जमिनी मोफत उपलब्ध करुन देणे पुर्नवसनात अपेक्षीत असते.

३) **भरपाई वेळेवर देणे :** गावातील लोकांची शेती व इतर व्यवसाय प्रकल्पासाठी सरकार जमा करते तेव्हा ते स्थिर संपत्तीला मुकतात त्यासाठी विस्थापीतांच्या संपत्तीचे योग्य मूल्यमापन करुन लगेचच त्यांना नुकसान भरपाई मिळणे आवश्यक असते. उदा. असे आहेत की अनेक प्रकल्प राबवले जातात. १०, १५ वर्ष झाले तरी त्यांना नुकसान भरपाई दिली जात नाही. त्यांचे आर्थिक नुकसान होते. पर्यायाने अनेक समस्यांना त्यांना तोंड दयावे लागते.

४) **नागरी सोई पुरविणे :** विस्थापीत गावात लोकांना केवळ जमीन उपलब्ध करुन व घरे बांधून चालत नाही तर त्या गावात रस्ते, वीज, सांड पाण्याची सुविधा, पिण्याचे पाणी, समाज मंदीर, स्मशान भूमी, बससाठी थांबा, खेळण्याचे मैदान, शाळा इमारत, दवाखाना या सर्व नागरी सुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत.

५) **इतर सुविधा :** प्रकल्पग्रस्त म्हणून त्याच प्रकल्पात उदयोगात कुटूंबातील एकास नोकरी देणे, शाळा, महाविद्यालयात मोफत शिक्षण राखीव जागा या सारख्या सुविधा देणे गरजेचे असते.

पुर्नवसन करताना वरील उपाययोजना करणे गरजेचे असते. कारण लोकांमधील समस्या व त्यांच्यातील असंतोष कमी होईल. विकास प्रकल्पामूळे बाधीत होणाऱ्या लोकांचे पुर्नवसन काही काळमर्यादीत होण्यासाठी महाराष्ट्र राज्य पुर्नवसन प्राधीकरण स्थापन केले आहे. या प्राधीकरणा आधारे विस्थापीतांचे पुर्नवसन केले जाते.

विस्थापित व त्यांचे पुर्नवसन काही उदाहरणे

**विस्थापित**

| अ.क्र. | प्रकल्प | एकूण नावे | संस्था |
|---|---|---|---|
| १ | तुंगभद्रा सिंचन प्रकल्प (कर्नाटक १९४१) | ६३ | ४००० |
| २ | दामोदर खोरे (पश्चिम बंगाल) | ३२ | ४५०००<br>१३००० लोक |
| ३ | राष्ट्रीय ॲल्युमिनियम प्रकल्प (ओरिसा) | १५ | ६१० कुटुंब |
| ४ | राहुरकेल स्टील प्रकल्प | ३२ | १५५९० लोक |
| ५ | हेवी इंजिनिअरींग कॉर्पोरेशन (रांची) | २५ | - |
|  | भारतात व्याघ्र प्रकल्पासाठी १५ क्षेत्र सुरक्षित | ६७७ | - |

याशिवाय विदर्भ, पेयप्रकल्प, भंडारा गोसी प्रकल्प सरदार सरोवर (नर्मदा) याशिवाय पास्को प्रकल्प, सिंगूर प्रकल्प, वेदांता प्रकल्प, जैतापूर प्रकल्प या अशा सारखे प्रकल्प राबविले जात आहेत. या प्रकल्पा बरोबरच प्रकल्पासाठी जन आंदोलन ही वाढत आहेत.

**आपली प्रगती तपासा.**

१) पुर्नवसनच्या विविध उपाययोजनाचा आढावा घ्या.

## १५.८ पर्यावरण (Environment)

पर्यावरण मानवाला लाभलेली दैवी देणगी आहे. हवा, पाणी, अन्न, वस्त्र, निवारा या सर्व मानवाच्या मूलभूत गरजा पर्यावरण पूर्ण करते. मानवी जीवन समृध्द, आणि सुखी बनवते. जो पर्यंत पर्यावरण सुरक्षित आहे तो पर्यंत मानवी जीवन ही सुरक्षित असते. त्यामुळे पर्यावरण आणि लोकसंख्या परस्परपूरक असतात. जो पर्यंत लोकसंख्या पर्याप्त असते तो पर्यंत पर्यावरण ही सुरक्षित असतो. माणूस पर्यावरण जपतो. शुध्द हवा, पाणी, जंगले ही विकास पूर्व अवस्थेत माणसाची उपजीविकेची साधने असतात. मात्र वाढत्या लोकसंख्ये बरोबर केवळ निसर्गाने पुरविले उपजीविकेची साधने अपूरी पडू लागतात. जंगले तोडून मानवी वस्त्या वाढू लागतात कारखान्याची घुराडी, लहानमोठी वाहने. शहरात २४ तास धूर ओकत असतात. रासायनिक कारखाने, भरवस्तीत रसायनांचा पाऊस पाडतात. लोक शुध्द हवेला देखील पारखे होतात. गर्दी, गोंगाट, अवजड वाहने, यंत्रे यांचा खडखडाट इ. मूळे ध्वनी प्रदूषण निर्माण होते. पर्यावरण समतोल ढळतो. जंगल तोडीमूळे पर्जन्यमान अनियमित होते. जमीनीची धूप होते. जमिनीचा सुपीक मातीचा वरचा भर पावसाच्या पाण्याबरोबर वाहून जातो. जमिनीची उत्पादकता कमी होते. जे पर्यावरण मानवात जीवन दायी ठरणाऱ्या पर्यावरणाचा वाढत्या लोकसंख्येच्या हातून ऱ्हास होऊ लागतो. मानवी जीवन दु:खी होऊ लागते.

**जागतिक अहवाल :** जागतिक विकास अहवाल १९९७ मध्ये जागतिक पर्यावरणाच्या अध:पतनाबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली आहे. आज प्रदूषित पर्यावरण ही जागतिक विकासातील सर्वात मोठा अडसर आहे. वातावरणातील ऋतुमानातील बदल ही सर्वाधिक चिंतेची बाब बनली आहे. येत्या १०० वर्षात भूपृष्ठावरिल तापमान १.५ ते ६.३ डिग्री फेरन हाईटने वाढेल आणि समुद्राची पातळी ६ ते ३८ इंचानी वाढेल असा तज्ञाचा अंदाज आहे. असे घडल्यास वारंवार महापूर आणि वादळे होतील. वारंवार दुष्काळ पडतील. हे जागतिक पर्यावरणात्मक संकट आहेच. जैविक विविधतेचा नाश, आणि आंतरराष्ट्रीय जल संरक्षण या देखील जागतिक पर्यावरणाच्या समस्या आहेत. स्थानिक पातळीवरील पर्यावरणात्मक समस्या आहेत. जल आणि वायू प्रदूषणाच्या जंगल तोड आणि जमिनीची धूप होण्याच्या या समस्या आता कोणताच देश आंतराष्ट्रीय सहकार्याशिवाय सोडवू शकणार नाही.

अवजड उदयोगधंदे, खाणी, राखीव जंगले आणि मोठया धरणांमूळे विस्थापीत झालेल्या लोकांचे पुर्नवसन करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यातल्या त्यात विस्थापितां मध्ये धरणग्रस्तांची संस्थ्या सर्वाधीक आहे. त्यामध्ये आदीवासी आणि ग्रामिण लोक जास्त आहे. १८९४ मध्ये धरणग्रस्तांच्या भूसंपादनाचा कायदा करण्यात आला. १९८४ मध्ये या कायदयात दुरुस्ती

करण्यात आली. या कायदयान्वये धरणाच्या परीक्षेत्रातील प्रभावीत जमिनीचा मोबदल देण्यास सरकार बांधील आहे. शासनाने पुर्नवसनसाठी मोठया प्रमाणावर प्रयत्न करीत असतानाही १९५० नंतर २५ लाख लोक विस्थापीत झालेले दिसून येते. त्यातील ५० % लोकांचे पुर्नवसन करण्यात आले आहे. तर अजुनही ५०% विस्थापीतच आहेत. त्यात ४०% आदीवासी आहेत.

पुर्नवसन म्हणजे विस्थापितांना दूसऱ्या क्षेत्रात नियोजन बध्द स्थानांतरित करणे होय.

पुर्नवसनात
१) विस्थापीत लोकसंख्येचा समावेश असतो.
२) पिडीत भूभागावरुन सुरक्षित भूभागाकडे स्थानांतरित केले जाते.
३) हे स्थानांतरण नियोजित असावे .

अशा प्रकारे विस्थापितांचे पुर्नवसन केले जाते. किंवा त्या प्रमाणे प्रयत्न केले जातात. शासन तसेच काही स्वेच्छा संघटना हा प्रयत्न करतात.

**आपली प्रगती तपासा.**

टिप दया १) पर्यावरण

---

---

---

---

## १५.९ पर्यावरणाची अवनती (Environmental Degradation)

पर्यावरण अवनती किंवा ऱ्हास म्हणजे मानवी क्रियामूळे जैविक प्रक्रियांनी पर्यावरणाऱ्या परिस्थितीत निर्माण केलेला बिघाड होय. औदयोगिक क्रांती, आधुनिक प्रगती, नागरीकरण, शास्त्रीय संशोधनात वाढ, लोकसंख्येतील प्रचंड वाढ व विकास तसेच तंत्रज्ञानातील जीवघेणी स्पर्धा इ. विविध घटक पर्यावरणाच्या अवनतीला कारणीभूत आहेत.

पर्यावरणातील जैविक घटकापैकी सर्वांत बुध्दीमान घटक म्हणजे मानवप्राणी होय. मानवानेच आपल्या बुध्दीमतेचा साह्याने पर्यावरणात बदल घडवून आणणे. पर्यावरणाची अवनती म्हणजे नैसर्गिक साधन सामग्रीचा मोठया प्रमाणावर होणारा वापर. उदा. हवा, पाणी, मृदा यांच्या अतिवापरांन परिसंस्था व वन्यप्राणी यांचा मोठया प्रमाणावर विनाश झाल्याने पर्यावरणाची होणारी हानी होय. नैसर्गिक साधन सामग्रीचा मोठया प्रमाणावर अवैध वापर केल जातो. त्यावेळी पर्यावरणाचा ऱ्हास किंवा अवनती होत असते.

पर्यावरणाची अवनती ही नैसर्गिक किंवा मानवामूळे होत असते. कधी कधी मानवी किंवा इतक्या प्रचंड प्रमाणात विस्तृत प्रमाणात घडत असतात की त्यामूळे पर्यावरणाचा ऱ्हास जागतिक पातळीवर घडून येतो. त्यात ओझोन वायूचा भर नष्ट होणे, उर्जा स्त्रोतांचा ऱ्हास, वालंवटीकरण अणुस्फोटामूळे होणारा संहार इत्यादी जागतिक पातळीवरही घटना घडताना दिसतात.

१) **निसर्गाची हानी :** मोठमोठया धरणांमूळे त्या परिक्षेत्रातील जमिन, जंगल, वृक्ष, पशुपक्षी, प्राणी या च्यावर विपरीत परिणाम झाले. बुडीत क्षेत्रातील जंगले नष्ट झाली त्या भागात राहणारी श्वापदे इथेतिथे आश्रय शोधू लागते. कृमी, पशू पक्ष्यांचे आश्रमस्थान नष्ट झाले. जैवविविधता नष्ट झाली. नैसर्गिक संपत्तीचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले.

२) **नदयांचे प्रवाह :** नदयांवर मोठी धरणे बांधल्यामूळे त्यांचे नैसर्गिक प्रवाह बदलले. ज्या नदयांना बाराही महिने पाणी होते त्यामूळे नदीकाठी वसलेल्या गावांना हे पाणी पुरविले जाई. तसेच या नदयांमधून बांधकामासाठी रेती ही उपलब्ध होत असे. नदीच्या खोऱ्यातील विहीरीच्या पाण्याची पातळी कायम असे. परंतू धरणामूळे विशिष्ट भूभागावर पाण्याचा साठा झाला. नदीच्या प्रवाह बंद झाल. नदीच्या प्रवाहात गाळ साचून उधळपणा आला लोकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न उद्‌भवलपर्यायाने हरितावर परिणाम झाल.

३) **पुराचे वाढते प्रमाण :** मोठया धरणांतून पावसाळ्यात पाण्याचा साठा वाढत जातो. विशिष्ट मर्यादेपर्यंत साठा झाल्यानंतर पाणी सोडले जाते. त्यातून पूराचा धोका निर्माण होतो. दुसरे म्हणजे नदीच्या पात्रात गाळ साचल्यामूळे आलेल्या उघळपणामूळे पुरांचे प्रमाण वाढते.

४) **दलदलीकरण आणि लवणीकरण :** मोठया धरणात पाण्याचा साठा वाढत जातो. विशाल क्षेत्रात पाणी पसरते. त्यातून दलदल निर्माण होते. सतत पाण्याच्या साठयामूळे त्या क्षेत्राचे लवणीकरण होणे म्हणजेच स्तर वाढतात. अशी जमीन पीकांसाठी उपयोगी पडत नाही.

५) **भूकंप :** मोठया धरणात साठवलेल्या पाण्याचा प्रचंड दाब त्या भूक्षेत्रावर पडते. अशा भूप्रदेशात भूकंप होण्याची शक्यता जास्त असते. कोयना परिसरात होणारे भूकंप हे पाण्याच्या वाढत्या दाबामूळे होतात हे कारण सांगितले आहे.

**आपली प्रगती तपासा**

१) पर्यावरणाच्या अवनितीस कारणीभूत कारणांचा थोडक्यात आढावा ध्या.

---

---

---

## १५.१० पर्यावरणातील असंतूलन

१) **वाढती जंगल तोड :** विकासाच्या नावाखाली मानवाने निसर्गावर आक्रमण करुन मोठया प्रमाणावर जंगलतोड केली. स्वातंत्र्य प्राप्ती नंतर रेल्वेमार्ग बांधणी तसेच रेल्वे मार्गाचा विस्तार यासाठी मोठमोठी जंगले उध्वस्ता करण्यात आली. जंगलपासून मिळणाऱ्या लाकडाचा वापर रेलवेच्या स्लिपरसाठी करण्यात आल. तसेच इतर जंगले तोडून अनेक योजना प्रकल्प राबविले जातात. भारतात जंगलाचे प्रमाण फक्त १२ % इतकेच उरलेले आहे. ही जंगले म्हणजे मानवात जीवन देणारी जीवनदाता आहेत. ही मानव मात्र या जंगलाचा नाश करीत आहे. त्यामूळे संपूर्ण मानवजातीतून धोका निर्माण झाला आहे.

२) **स्थानांतरीत शेती :** प्राचीन कालापासून मानव पारंपारीक शेती करीत आहे. ती स्थानांतरीत म्हणजेच बदलती म्हणजेच झूम शेती होय. झूम शेती म्हणजे आजूबाजूची जंगलातील झाडे तोडून ती जाळले जातात त्याची राख जमिनीवर पसरवून त्यावर शेती केली जाते. या शेतीसाठी मोठया प्रमाणावर जंगले तोडली जातात. त्याचा परिणाम पर्यावरणावर पडतो व पर्यावरणाचे संतूलन बिघडते.

३) **विकास योजना :** जंगलमधून रस्ते, महामार्ग, रेल्वेमार्ग, विदयुत प्रकल्प, धरणे, शहरे, कालवे, आणि औदयोगिक वसाहती यासारखे प्रकल्प उभारताना बेसुमार जंगलतोड केली जाते. जंगलाच्या करण्यात येणाऱ्या विनाशामूळे जवळपासच्या लोकांना चारा, वैरण, सरपण, लाकूड अशा वस्तू मिळत नाहीत. उदा. तेहरी प्रकल्प राबवण्यात आला त्यासाठी ४६०० हेक्टर क्षेत्रातील जमिन/जंगले पाण्याखाली गेली. त्यामूळे सुमारे ४००० कुंटूबे विस्थापीत झाली. या विरोधात अंदोलन करण्यात आले. स्थानिक ९० % लोकांना रोजगार मिळाला. प्रकल्पग्रस्तांना आर्थिक मोबदला मिळाला. परंतू पर्यावरणाची मोठया प्रमाणात हानी झाली. पर्यावरणाचे संतूलन बिघडले.

४) **इंधनासाठी लाकूड :** भारतात इंधनासाठी मोठया प्रमाणात लाकूड वापरले जाते. अविकसीत देशांमध्ये जवळपास ८५% लाकूड इंधनासाठी वापरले जाते. भारतात दरवर्षी १०-१५ लाख हेक्टर जंगले इंधनाची गरज पूर्ण करण्यासाठी तोडली जातात. जंगलतोडींचा परिणाम पर्यावरणावर होतो. पाऊस, कमी पाऊस, दुष्काळ यासारख्या नैसर्गिक संकट निर्माण होतात.

**व्यापारी व औदयोगिक क्षेत्रातील मागणी :**

औदयोगिक क्षेत्रात पेटया बनवण्यासाठी, क्रेटस वेस्टनासाठी, फर्निचर बनविण्यासाठी, काडयापेटया बनविण्यासाठी, कागद निर्मितीसाठी व प्लायवूड तयार करण्यासाठी लाकडाचा मोठया प्रमाणावर उपयोग केल जातो. त्यामूळे मोठया प्रमाणावर वृक्षतोड केली जाते. कागद उदयोगात देखील लाकूड मोठया प्रमाणावर वापरले जाते. ५१% बांबू कागद उदयोगात वापरला जातो. उदा. आसाममध्ये ५२ कारखाने आहेत. या कारखान्यात लाकडाची गरज लागते. त्यावेळेस आजूबाजूच्या जंगलाची तोड करून करून लाकडे कारखान्यात पुरविले जातात.

या वरील कारणां बरोबरच इतर कारणांमूळेही जंगलचा मोठया प्रमाणात ऱ्हास होतो. जसे की वाळवीच्या प्रादूर्भावाने ही झाडे वाळून जातात. तसेच झाडांवर पडणारे रोग, पूर, वणवा या सारख्या कारणांमूळेही जंगलचा ऱ्हास होतो. आज कोणतेही झाड तोडण्यापूर्वी जंगल अधिकारीची परवानगी ध्यावी लागते. परंतू तरीही काही व्यक्ती परवानगी न घेता मोठया प्रमाणात वृक्ष तोड करतात.

५) **नैसर्गिक साधनसंपत्तीचा ऱ्हास :** निसर्गाने मानवासाठी विविध प्रकारची नैसर्गिक साधनसामग्री उपलब्ध करून दिली आहे. आणि याच नैसर्गिक साधनसामग्रीच्या साहयाने आपल्या बुध्दीकौशल्याने स्वःताचा विकास घडवून आणला. आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून मानवाने अमर्याद प्रमाणात साधनसंपत्तीचा उपयोग केला आणि राहणीमान उंचावले मानवाने जास्तीत जास्त साधनसंपत्तीची उपयोग करावयास सुरुवात केली. उदा. उर्जा, विज निर्मितीसाठी, खनिजतेल, खनिजवायू, कोळसा, दगडी कोळसा यांचा अमर्याद वापर सुरु केला. असेच जर मानवाने अमर्याद साधनसंपत्तीचा वापर सुरु केला तर भविष्यात खनिज साठे संपुष्टात येतीत असे भविष्य शास्त्रज्ञांनी वर्तवले होते. लोकसंख्येत होणाऱ्या वाढीमूळे - विज,

पाणी, जमिन, अन्नधान्य यांची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी मानव सतत जंगले तोडीत आहे. जंगलचा नाश करीत आहे. पाण्यासारख्या साधनसंपत्तीचा वापर जलसिंचन, जलविद्युत, प्रकल्प यासाठी केल जातो. परंतू बऱ्याच ठिकाणी पाण्याची टंचाई निर्माण झालेली आहे. थोडक्यात खनिज तेल, खनिजवायू, दगडी कोळसा ही नैसर्गिक संपत्ती जरी मुबलक प्रमाणात उपलब्ध असल तरी त्याला मर्यादा आहेत. याकडे मानवाने आजपर्यंत विशेष गांभीर्याने लक्ष दिलेले नाही.

६) **प्रदूषण :** मानवाने आपल विकास साधनाना प्रदूषणासारख्या समस्या निर्माण केल्या. मोठया प्रमाणावर झालेल्या औदयोगिकीकरणामूळे हवा, पाणी, ध्वनी व मृदा यांच्या प्रदूषणात वाढ झाली. सांडपाण्याची विलहेवाट लावताना नदी व समुद्रात तसेच जमिनीवर मोठया प्रमाणात पाणी सोडले जाते. कारकान्यातील मोठमोठया धुराडंयातून अनेक धातक वायू हवेत सोडले गेले. हवे मध्ये सोडलेल्या घातक वायूमूळे वातावरणातील ओझोनचा थर कमी झालेल दिसून येतो. त्याचा परिणाम मानवी आरोग्यावर झालेल दिसतो. उदा. श्वसनाचे आजार, त्वचेचे विकार यांचे प्रमाण वाढलेले आहेत.

तसेच सांडपाणी, रासायनिक मिश्रीत पाणी नदया समुद्रात सोडल्यामुळे मोठया प्रमाणात जलप्रदूषण झाले.

७) **सागरी ऱ्हास :** पृथ्वीवरील सजींवाच्या अस्तित्वासाठी पाणी अतिशय महत्वाचे आहे. परंतू आधुनिक काळात सागराची अवनती होत आहे ती मानवनिर्मित आणि नैसर्गिक अशा दोन्ही प्रकारे होते या अवनतीचे प्रमाण ८०% आहे. त्याचे महत्वाचे कारण म्हणजे उदयोगधंदयामधून बाहेर पडणाऱ्या सांडपाण्यामूळे ही अवनती होते. घनकचरा, वीजनिर्मिती प्रकल्पामूळे जल प्रदूषण होते. त्याच प्रमाणे किरणोत्सारी टाकाऊ पदार्थाच्या निरनिराळया मार्गानेही जलप्रदूषण होते. अशा प्रकारच्या जलप्रदूषणामूळे सागरी अवनती होते.

## १५.११ सारांश (Summary)

मानवी विकास साधन असताना मोठमोठे प्रकल्प व उदयोगधंदे स्थापन करावे लागतात. त्यात सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील कारणाने रेल्वे, रस्ते, धरणे वांधणे यांचा समावेश होतो. ज्या परिसरात या योजना किंवा प्रकल्प उभारण्यात येतात तेथील जमिनी सरकारला ताब्यात ध्याव्या लागतात. त्यात अनेक गावे, खेडी, आदीवासी वस्ती, शेतजमिनी व घरे यांच्यावर प्रतिकूल परिणाम होतो. तेथील लोक विस्थापीत होतात. त्यांचे योग्य त्या ठिकाणी पुर्नवसन करणे आवश्यक असते. विस्थापनांची अनेक कारणे आहेत. नैसर्गिक आणि मानवनिर्मित कारणांमूळे समाज, समूह, खेडी, गाव विस्थापीत होतात. त्यांचे पुर्नवसन केले जातात.

## १५.१२ प्रश्न (Questions)

१) विस्थापनाच्या समस्यांचा आढावा घ्या.

२) पुर्नवसनासाठी योजलेल्या उपाय योजनांची सविस्तर माहिती घ्या.

३) पर्यावरणाच्या अवनितीस कारणीभूत कारणांचा आढावा घ्या.

❖❖❖❖

# १६

# विकासाची प्रक्रिया : संघर्ष आणि प्रतिसाद (विरोधी चळवळी)

# (Resistance Movements)

**घटक रचना :**

१६.१ उद्दिष्टये (Objective)
१६.२ प्रस्तावना (Introduction)
१६.३ पर्यावरणातील संघर्ष / अडथळे : पर्यावरणातील बदल आणि हरितगृह परिणाम (Climate change & loss of green cover)
१६.४ अन्नधान्य विषयक समस्या (Food crisis)
१६.५ विरोधी चळवळची माहिती
१६.६ पोस्को चळवळ / प्रकल्प - पोस्को (Posco movement)
१६.७ वेदांता चळवळ / प्रकल्प (Vedanta movement)
१६.८ सिंगूर चळवळ / प्रकल्प (Singur movement)
१६.९ जैतापूर चळवळ / प्रकल्प (Jaitapur movement)
१६.१० सारांश (Summary)
१६.११ प्रश्न (Questions)

## १६.१ उद्दिष्टये (Objective)

१) पर्यावरणातील अडथळे जाणून घेणे.
२) पर्यावरणाच्या प्रकल्पाची माहिती होते.
३) प्रकल्प आणि विरोधी चळवळी जाणून घेण्यासाठी.

## १६.२ प्रस्तावना (Introduction)

विकास साधण्यासाठी केंद्र सरकार व राज्य सरकार तसेच भारतीय आणि अभारतीय कंपन्या अनेक योजने अंतर्गत प्रकल्प राबवितात. त्या प्रकल्पासाठी लागणारी जमिन संपादीत केली जाते. किंवा ज्या ठिकाणची जमिन शेती योग्य नसेल त्या जमिनीचा वापर प्रकल्पासाठी

केला जातो. तर शेतकऱ्यांकडून, आदीवासीकडून किंवा ग्रामिण लोकांकडून प्रकल्पासाठी जमिन घेतली जाते. अशा लोकांना योग्य तो मोबदलही दिल जातो. तर काही वेळेस प्रकल्प राबवताना जंगले, दऱ्या, खोरे, डोंगर कपारी तोडून प्रकल्प राबवण्याचा प्रयत्न केला जातो. यामूळे पर्यावरणात धोका निर्माण होतो. पर्यावरणाचे संतूलन बिघडते. पर्यावरणाच्या ऱ्हासाला सुरुवात होते. म्हणून पर्यावरण बचाव समिती किंवा पर्यावरणतज्ञ अशा प्रकल्पाला विरोध करतात.

प्रकल्प राबवताना सेझ अंतर्गत म्हणजेच ज्या जमिनीवर शेती केली जात नाही किंवा जी जमिन शेती योग्य नाही अशी जमिन विशेष आर्थिक स्तराचा (सेझ) चा वापर करुन जमिन संपादीत केली जाते व त्यावर प्रकल्प उभा केल जातो.

प्रकल्प राबवताना कंपनी किंवा प्रकल्पधारी शेतकऱ्यांकडून, आदीवासीकडून जबरदस्तीने जमिन बळकावून प्रकल्प उभा करतात. अशावेळेस स्थानिक लोकंच या प्रकल्पात विरोध करतात. त्याच्या विरोधात चळवळ उभी करतात. अशा प्रकल्पामूळे अनेक ठिकाणाच्या शेती उत्पादनात धोका निर्माण झाल आहे. शेती उत्पादन घटले आहे. तर शेती मालावर विपरीत परिणाम झालेला दिसून येतो. म्हणून स्थानिक लोक अशा प्रकल्पाला विरोध करतात.

## १६.३ पर्यावरणातील संघर्ष /अडथळे : पर्यावरणातील बदल आणि हरितगृह परिणाम (Climate change and loss of green cover)

भूपृष्ठावरुन उत्सर्जित होणारी उण्णता वातावरणामूळे एकदम उत्सर्जित होत नाही. पृथ्वीभोवती हरितगृहाचे काम करते. अन्यथा उत्सर्जनाने पृथ्वीवरील सर्व उष्णता निघून जाऊन पृथ्वीचे तापमान खाली गेले असते. वातावरणाऱ्या या संरक्षक कवचाच्या परिणामास हरितगृह परिणाम असे म्हणतात. तथापी वातावरणात प्रदूषण वाढत आहे. नैसर्गिक वायूप्रमाणे विचलित झाले आहे. कार्बन-डाय-ऑक्साइड ($CFC_S$) व तत्सम वायूचे प्रमाण वाढत असल्याने हरितगृह घटना विकृत होत आहे. हरितगृह वायू उत्सर्जना बाबत जगातील प्रमूख राष्ट्राचा सहभाग वाढल आहे. हे लक्षात येते. याचा परिणाम हरितगृह कार्यावर होत असल्याचे दिसून येते. १९९० पासून वातावरणातील परिणाम पृथ्वीवर प्रकर्षाने जाणवू लागले तर २१ व्या शतकापासून पृथ्वीच्या सरासरी तापमानात वाढ झालेली दिसून येते. उष्णता वाढलेली दिसून येते. पावसाचे प्रमाण कमी झालेले आढळते. वातावरणातील बदलत्या तापमानामूळे निसर्गचक्रही बदलले आढळते.

विविध उदयोगधंदे, कारखानदारीतल्या वायु उत्सर्जनात $CO_2$, CO, $N_2O$, $CFC_3$ असतात हे वायू इनफा रेड किरणांचे शोषण करतात. गेल्या दोन-तीन दशकांत सुर्यप्रकाशांनीक उष्णतारक्षक वायूचे हे प्रमाण वेगाने वाढत असल्याचे जाणवते आहे. या वायूचे तपांवरातील वाढत्या प्रमाणाचा काल असाच सुरु राहिला तर पृथ्वीच्या वातावरणात मोठे बदल मानवी व्यवस्थांवर आघात होऊन असंतूलन वाढेत.

अशा प्रकारे वातावरणातील बदलामूळे नैसर्गिक असे की मानव निर्मित असे वातावरण मोठया प्रमाणात बदल होत आहे त्याचा परिणाम मानव तसेच प्राणीमात्रावर मोठया प्रमाणावर होत असल्याचे जाणवले पर्यावरणात अडथळा निर्माण करणारे अनेक उदयोगधंदे, कारखाने निघत आहे निर्माण होत आहेत. त्यामूळे पर्यावरणाला धोडा निर्माण होऊन पर्यावरणाचे संतूलन बिघडलेले आहे.

## १६.३ अन्नधान्य विषयक समस्या (Food Crisis)

विकसनशील देशांमध्ये अन्नधान्य विषयक समस्या हा एक चिंतेचा विषय आहे. अलीकडच्या काळात या समस्येचे स्वरुप आणखीच तीव्र झाले आहे. भारतासारख्या विकसनशील देशामध्ये सुमारे ५० % पेक्षा अधिक लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. तसेच शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असल्याचे मानते जाते. असे असूनही स्वातंत्र्योत्तर काळात पायाभूत क्षेत्राचा तसेच उदयोगाचा विकास झाल. मात्र शेती क्षेत्राकडे म्हणावे तसे लक्ष देण्यात आले नाही. शेती क्षेत्रातील आदान-प्रदान गुणोत्तर व्यस्त झालेले असून अजून भारतात अन्नधाण्याची समस्या निर्माण झालेली आहे.

## १६.४ भारतातील अन्नधान्याची समस्या / तुटवडा :

१) अन्नधान्य तुटवडा : भारताने विविध क्षेत्रात विकास साधला असल तरी सर्वसामान्य लोकांच्या अन्नधान्याच्या गरजेची पूर्तता करण्यात शासनात तसेच प्रशासन यंत्रणेला म्हणावे तसे यश आलेले नाही. मोठया प्रमाणावर अन्नधान्याच्या भावात झालेल्या वाढीमूळे समाजातील सर्वसामान्य घटकांना गहू, तांदूळ, डाळी, खादयतेल यासारख्या जीवनावश्यक वस्तू खरेदी करणे परवडत नाही काहीवेळा व्यापारी वर्ग अन्नधान्याची कृत्रिम टंचाई निर्माण करतात. अशा परिस्थितीत त्या वस्तूची किंमत वाढत जाते. उदा. काही काळापूर्वी तूरडाळीचे दर १०० रु. प्रतिकिलोपर्यंत वाढलेले होते. प्रत्यक्षात मागील हंगामात तूरडाळीच्या उत्पादनात घट झाली होती. ही जरी वास्तवता लक्षात घेतली तरी अगदी डाळीची उपलब्धता नव्हती अशी परिस्थिती नव्हती मात्र व्यापारी वर्गाने कृत्रिम टंचाई निर्माण करुन तूरडाळी सारखी जीवनावश्यक वस्तू जास्त दराने विकण्यास सुरुवात केली. शेतीक्षेत्रातून येणारा शेतमाल हा थेट ग्राहकांपर्यंत पोहचत नाही. यात मध्यस्थ अडतेच जास्त असतात व मूळ किंमतीपेक्षा जास्त किंमतीला वस्तू ग्राहकांना खरेदी कराव्या लागतात. या वास्तवतेमूळे काही वेळा ग्राहक देखील अतिशय महाग असलेल्या वस्तू खरेदी करण्याचे नाकारतात. शेतकरी वर्ग देखील आपल्या उत्पादनात बाजारपेठेत उठाव नाही म्हणून संबंधीत वस्तूचे उत्पादन करण्याचे टाळतात. अन्नधान्यांची समस्या निर्माण होण्यास सार्वजनिक वितरण व्यवस्था देखील काही प्रमाणात कारणीभूत आहे. रेशनकार्डावर देखील आवश्यक त्या वेळी आवश्यक गोष्टी उपलब्ध करुन दिल्या जात नाहीत. तसेच दुकानदार देखील उपलब्ध असलेल्या वस्तू सरकारने ठरवून दिलेल्या किंमतीपेक्षा जास्त दराने विकतात. वस्तूपेक्षा काळाबाजार करतात.

**२) आधुनिकतंत्रपध्दतीने निर्माण केलेले अन्नधान्य व त्याचे दुष्परिणाम :**

आधुनिक काळात शेती तंत्रज्ञानात बदल झालेल असून अत्याधुनिक तंत्राच्या साह्याने उत्पादन घेतले जाते. शेतकरी वर्ग शेतीसाठी आधुनिक तंत्राचा वापर करत असलेले दिसून येतात. जमीनीची उत्पादकता वाढविण्यासाठी रासायनिक खतांचा मोठया प्रमाणावर वापर, सुधारीत बियाणे, किटकनाशक यांचा मोठया प्रमाणात वापर केला जात असल्याने शेती क्षेत्रातील उत्पादन वाढले मात्र पिकांचा कस मात्र कमी झाला. अन्नधान्यात दर्जात घसरण झाले. बऱ्याच वेळा रासायनिक खतांच्या अधिक वापरांमूळे पिकांवर दुष्परिणाम झालेले आढळून आले आहे. उदा. एखादया पिकांवर अतिरीक्त रासायनिक खतांचा आणि किटक नाशकांना वापर केल्याने ते पिक नष्ट होते. अशा विविध कारणांमूळे अन्नविषयक समस्या अधिकच तीव्र होते. तसेच आधुनिक तंत्रज्ञानामूळे जमीनीची सुपिकताही कमी झालेली दिसून येते.

३) **दुर्बळ घटकांची अन्नविषयक समस्या :**

भारताने आपल्या राज्यघटनेत दुर्बळ घटकांना पूर्ण सरंक्षण दिले जाईल असे जाहीर केलेले असले तरी अनूसूचित जाती-जमाती, आदीवासी या वर्गाला पुरेसे अन्न मिळत नाही. दररोज आवश्यक असलेल्या २२५० कॅलरीज देखील मिळत नाही. त्यामुळे कुपोषणाची समस्या निर्माण झालेली आहे. भारतातील मेळघाटात राहणाऱ्या व्यक्तींना पुरेसा आहार मिळत नसल्याने तेथे कुपोषणाची समस्या निर्माण झालेली आहे. अन्नधान्याची समस्या भारतात मोठ्या प्रमाणात आहे. त्याच प्रमाणे जगात देखील ही समस्या जाणवते. उदा. आफ्रिकेतील इथिओपिया या राष्ट्रात शेती अविकसीत असून अन्नधान्याची गरज पूर्ण करण्यासाठी इतर आफ्रिकन राष्ट्रावर अवलंबून रहावे लागते. मात्र पायाभूत सुविधांचा अपुरा विकास तसेच दळणवळण साधनांचा अभाव यामूळे अन्नधान्याच्या आयातीत अनेक प्रश्न निर्माण खालेले आहेत. त्यामूळे इथिओपिया सारख्या राष्ट्रात अन्नधान्याची मोठ्या प्रमाणावर टंचाई निर्माण झालेली होती.

४) **शासनांची असफलता :** विकसनशील देशांमधील सरकारी धोरणांची विफलता हे सुध्दा अन्नधान्य विषयक समस्यांची तिव्रता वाढविण्याचे एक कारण आहे. उदा. अन्नधान्यांचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने भारताच्या शेती मंत्राल्याने अनेक वेळेस शेतीविषयक धोरण घोषित केलेले असले तरी त्यात गरजेनुसार बदल करण्यात आलेले नाहीत. शेतमालाला कापूस व ऊस यांचा वगळता कमी किंमत देण्याचे सरकार वारंवार टाळते. तसेच ज्या किंमती निश्चित केलेल्या आहेत. त्यापेक्षाही कमी किंमतीत शेतकऱ्यांना आपल शेतमाल विकावा लागतो. फळफळावळांची निर्यात करुन परकीय चलन मिळविण्याचे धोरण शासनाने आखलेले असले तरी प्रत्यक्षातील वस्तूस्थिती वेगळीच दिसते शासनाने शेतमालविषयी निश्चित असे कोणतेही धोरण आखलेले नसल्याने त्याचा फटका शेतकरी वर्गाला बसलेल आहे व अन्नधान्याची समस्या निर्माण झालेली आहे.

भारतात स्वातंत्र्योत्तर काळानंतर लोकसंख्या मोठया प्रमाणात वाढली. वाढत्या लोकसंख्येच्या अन्नधान्याच्या गरजा मात्र पूर्ण केल्या जात नसत. १९५१ पर्यंत भारताची लोकसंख्या ३६ कोटी होती. २०१२ च्या जणगणनेनुसार १२१ कोटी वाढली आहे. अशा या वाढत्या लोकसंख्येत अन्नधान्य विषयक पुरवठा करणे गरजेचे असते. परंतू वाढत्या लोकसंख्येला अन्नधान्यांचा पुरवठा होणे शक्य नसल्याने अन्नधान्याचा तुटवडा निर्माण होतो.

अन्नधान्य पुरवठाच्या व्यवस्थेत देशातील एकूण लोकसंख्येत संख्यात्मक व गुणात्मक हण्टया पुरेशा प्रमाणात अन्नधान्य पुरविणे आभिप्रेत असते. अन्नधान्याच्या अपुऱ्या पुरवठयाने शारीरिक वाढीचा वेग मंदावतो. आरोग्य घसरते उच्च मूत्युदर कमी शारीरिक हालचाली आणि कमी उत्पादकता या सारख्या समस्या निर्माण होतात. म्हणूनच लोकसंख्या वाढीबरोबर अन्नधान्य पुरवठा वाढणे अनिवार्य असते. सरकारने अन्नधान्य पुरवठ्याचे नियोजन करताना लोकसंख्या शास्त्राचा आधार ध्यावा लागतो. एखादया देशातील अन्नधान्याचे उत्पादन हे देशातील जनतेला पुरेसे असेलच असे नाही. अशा स्थितीत अन्नधान्यांचा तुटवडा असलेल्या देशांना इतर देशांवर अवलंबून राहावे लागते. बरीच अविकसीत किंवा अर्धविकसीत राष्ट्रे आंतराष्ट्रीय संस्थाच्या मदती शिवाय देशातील अन्नधान्यांची वाढती मागणी पूरी करु शकत नाहीत म्हणून लोकसंख्या मंडळ आणि संयुक्त राष्ट्र संघटनेतील लोकसंख्या विभाग अविकसीत राष्ट्रांना अन्नधान्यांची चांगली मदत करता यावी. या साठी लोकसंख्या वाढ आणि अन्नधान्य पुरवठा यांचा अभ्यास करणे.

**आपली प्रगती तपासा :**

अन्नधान्य विषयक समस्यांचा थोडक्यात आढावा घ्या.

## १६.५ विरोधी चळवळीची माहिती

औदयोगिक क्रांती नंतर कारखानदाराची विकास झाला. लोकसंख्यावाढ झपाटयाने झाली तसेच वाहतूकीच्या साधनांचा विकास झाला. त्यामूळे जगात सर्वत्र नैसर्गिक संपत्तीचा ऱ्हास होऊ लागला. निसर्गाचे संतूलन बिघडले त्यामूळे पर्यावरण विषयक अनेक समस्या निर्माण झाल्या.

तसेच मानवी विकास साधण्यासाठी अनेक प्रकल्प राबविले जात आहेत. त्या प्रकल्पाचा पर्यावरणाला मोठा धोका निर्माण झाला आहे. संपूर्ण जगात सामाजिक, मानवी विकास साधण्यासाठी अनेक प्रकल्प राबविले जात आहेत. त्यामूळे जगात पर्यावरणाची समस्या मोठया प्रमाणात निर्माण झाली. जागतिक प्रदूषण वाढले. पर्यावरणाचा ऱ्हास मोठया प्रमाणात होत आहे. पर्यावरणातील असंतूलन वाढले. पर्यावरणातील असंतूलनामूळे पर्यावरणीय समस्या निर्माण झाल्या. संपूर्ण जागतिक स्तरावर पर्यावरणाचे संवर्धनासाठी प्रयत्न करण्यास येत आहेत. संवर्धनासाठी पर्यावरण तज्ञ, पर्यावरणप्रेमी, स्वंयसेवी संस्था कार्यरत आहेत. विरोध दर्शविण्यासाठी पर्यावरण विरोधी चळवळी सुरु आहेत.

भारतात अनेक प्रकल्प उभे केले जात आहेत. उदा. पोस्को प्रकल्प ओरिसा, वेदांता - गोवा, ओरिसा सिंगूर, पश्चिम बंगाल, आणि जैतापूर - कोकण असे नविन प्रकल्प उभे केले जात आहेत. या प्रकल्पाला स्थानिक लोकांनी आणि पर्यावरण वादयांनी मोठया प्रमाणात विरोध केल आहे. या विरोधाचे रुपांतर चळवळीत झाले आहे. परिणामी काही प्रकल्प अर्धवट अवस्थेत आहेत. तर काही प्रकल्प बंद करावे लागले तर काही प्रकल्प स्थलांतरीत करावे लागले. तर या प्रकल्पाचा सविस्तर अभ्यास करु या.

## १६.६ पोस्को चळवळ (Posco Movements)

दक्षिण कोरीयातील पोहांग स्टील कंपनी (पोस्को) ही जगातील अग्रेसर उत्पादकापैकी एक कंपनी आहे. या प्रसिध्द कंपनीने ज्या ठिकाणी मूबलक प्रमाणात लोहखनिज उपलब्ध आहेत. अशा ठिकाणी पोस्को कंपनीने आपली कंपनी उभी केली. जून २००५ ला या कंपनीने ओरिसा येथे स्टिल कंपनी स्थापण्यासाठी प्रयत्न केल. ऑगस्ट २००५ ला ओरिसामध्ये ही स्टिल कंपनी रजिस्टर करण्यात आली. ओरिसामध्ये लोहखनिजांची स्वाली मुबलक असल्याने पोस्को कंपनीने ही कंपनी स्थापन केली. ओरिसा राज्यातील जगतसिंगपूर, जिल्हातील परादीपजवळ हा प्रकल्प

उभारण्याने कंपनीने ठरविले. कंपनीने २००५ साली सरकार बरोबर हा प्रकल्पा संबंधीत करार ही केला. त्यानूसार दरवर्षी सुमारे १२  दशलक्ष टन पोलाद उत्पादन करणाऱ्या या प्रकल्पासाठी सुमारे ५१ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक ही कंपनी करणार होती. या प्रकल्पामूळे स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध होणार होता. पोस्को कंपनी व भारत सरकार यांच्यात या प्रकल्पा संबंधीत जो करार झालेल होता. त्या करारानुसार कंपनी विस्थापितांचे पुनर्वसन व रोजगार देण्याबाबत बंधनकारक होती.

पोलद प्रकल्पासाठी पॉस्कोल सुमारे चार हजार एकर जमीन लागणार होती. त्यापैकी ३ हजार ५६२ एकर जमिन शासनाकडून तर ४३८ एकर जमिन खाजगी मालकीकडून मिळविले जाणार होती. नंतर या कंपनीने ५१२ एकर जमिन प्रकल्पासाठी मिळविले.

सरकारने या प्रकल्पात (एसईझेड) म्हणजे विशेष आर्थिक क्षेत्राचा दर्जा दिलेला होता. म्हणजेच कोणत्याही खाजगी कंपनीत निर्यात योग्य वस्तू व सेवा यांचे उत्पादन करण्यासाठी विशेष आर्थिक क्षेत्राची स्थापना केली जाते. प्रत्येक एस.ई.झेड साठी एक विकास आयुक्त नेमून त्याच्या देखरेखी खाली त्याचे कार्य केले जाते. एस.ई.झेड मधील सर्व उदयोग प्रदूषणाविरहीत असतील अशा प्रकारची तरतूही एस.ई.झेड च्या आहेत.

या पोस्को कंपनीत एस.ई.झेड चा दर्जा मिळाल्याने या पोस्को कंपनीत स्वायत्ततेचे अधिक अधिकार मिळाले.

**ओरिसा राज्यातील परादीप शहराची परिस्थिती :**

ज्या ठिकाणी हा प्रकल्प उभारण्यात येणार होता. त्यांच्या आजूबाजूच्या परिसरातील जमिन सुपीक आहे. त्या ठिकाणी पानमेळे मोठया प्रमाणात आहेत. तसेच तेथील जमिनीवर मोठया प्रमाणात भात व काजूचे पिक घेतले जाते. त्या उत्पादनामधून स्थानिक लोकांना शाश्वन उत्पादन मिळते. निरंतर उत्पादन मिळते. रोजगार उपलब्ध होतो. अलीकडेच त्या ठिकाणी मत्सयव्यवसाय मोठया प्रमाणात चालत आहे. या प्रकल्पामूळे या शाश्वत रोजगार मोडीत निघणार. म्हणून स्थानिक लोकांनी या प्रकल्पाला विरोध सुरु केला.

**प्रकल्प धारक विरोधी प्रकल्पग्रस्त :**

या स्थानिक लोकांचे असे म्हणणे आहे की या प्रकल्पासाठी जी जमिन घेत आहेत. त्यासाठी जो मोबदला दिल जातो. तो अत्यंत कमी आहे. तो मोबदला कायमस्वरूपी ही नाही आणि जे काही जमिनीतून उत्पादन घेतात ते शाश्वत आहे म्हणून या प्रकल्पात विरोध केल जात आहे. या जमिनीधारक म्हणजेच आदिवासीनी या प्रकल्पाला मोठया प्रमाणात विरोध दर्शाविल आहे. या विरोधाला चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले. कंपनीने (पोस्को) विरोधकांना वेठीस धरले. त्या दोधांमध्ये वारंवार हल्ले होत आहेत. मारामारी होत आहे. त्यासाठी पोलीस फौज ही मागवण्यात आली होती. पोलिसांनी हा संघर्ष थांबविण्यासाठी गोळीबारही केला. त्यानंतर २९ नोव्हे २००५ ला असेच अंदोलन झाले. चकमकीत ३० जण जखमी झाले. नंतर तेथील आदीवासीनीं जशास तसे उत्तर देण्यासाठी कंपनीच्या ४ लोकांना ओलीस ठेवले. त्या ओलिसाच्या सुटकेसाठी पोलिसानी आदिवासीबरोबर करार करावा लागला. त्या करारानुसार कंपनीचे अधिकारी किंवा नोकरदार तेथे येणार नाहीत असे लिहून दयावे लागले. नंतर कंपनीच्या ४ जणाची सुटका करण्यात आली. त्यापूर्वी या आंदोलनाच्या चळवळीचा नेता अभय साहू याला सामाजिक गुन्हेगार म्हणून अटक करण्यात आले होती. कारण अभय साहू हा पोस्को प्रतिरोध

संग्राम समितीचा (Posco Pratiradh Sangram Samiti - PPSS) मुख्य नेता होता. कंपनी आणि स्थानिक यांच्यातील विरोध पराकोटील गेलेला होता. स्थानिकांचा विरोध, आंदोलने, तसेच कंपनीची अनियमितता या गोष्टीमूळे ओरिसातील पोस्को प्रकल्प अखेर बंद पडला.

**कर्नाटक :** पोस्को कंपनीने कर्नाटक मधील बेंग्लोर येथे पोस्को कंपनी स्थापन केली. त्याबाबत पोस्को कंपनीने कर्नाटक सरकार बरोबर बोलणी केली. बेंगलोर शहर कर्नाटकातील पर्यटन स्थळ म्हणून प्रसिध्द आहे. निसर्गाचे देण असलेले हे शहर कर्नाटकातील महत्वाचे एक शहर आहे. जून २०११ ला पोस्को कंपनीने कर्नाटक सरकार सोबत काही अर्धवट बोलणी करुन प्रकल्पा बाबत माहिती दिली. हा प्रकल्प राबवताना जास्त उत्पादन आणि कमी परिणाम हे तत्व लक्षात घेऊन राबविल जात आहे. असे पोस्को कंपनीने सांगितले. फिनिक्स तंत्रज्ञानाचा वापर करुन दर वर्षी ६ MMT स्टीलचे उत्पादन काढले जाईल तर त्याचा पर्यावरणावर कमी परिणाम होईल हे सांगण्यात आले. त्या प्रकल्पासाठी आजूबाजूच्या गदग, बागलकोट, रायचूर, विजापूर आणि यादगिर राज्यातून जमिनी मिळविल्या.

कर्नाटक सरकार आणि पोस्को कंपनीने ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी या प्रकल्पासाठी घेतल्या जातील अशाना विश्वासात घेऊन त्याची योग्य बाजारभावाने किंमत लावून त्या जमिनी मिळवल्या. तसेच पर्यावरणविषयीही दक्षता घेऊन हा प्रकल्प बेंग्लोर मध्ये राबविला जात आहे.

### आपली प्रगती तपासा.

टिप लिहाः पोस्को चळवळ

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## १६.७ वेदान्ता चळवळ (Vedanta Movement)

**वेदान्ता चळवळ :** गोवा हे राज्य पर्यटन म्हणून विकसीत झाले आहे. गोव्याचा समुद्र किनारा, नारळी फोफलीची झाडे गोव्याचा निसर्गरम्य परिसर यामूळे देशातील परदेशातील पर्यटक गोव्याकडे आकर्षित होतात. पर्यटनातून गोवा राज्यात मोठ्या प्रमाणात महसूल मिळतो. एका बाजूला गोव्या निसर्गाचे देणे लाभले आहे तर गोव्याच्या डोंगरात खनिजाच्या खाणी आहेत. त्यावर अनेक मोठया उदयोग कंपन्याचा डोळा आहे. तिथे नविन उदयोगधंदे काढण्यासाठी अनेक देशी, परदेशी उदयोगपती प्रयत्नशील आहेत.

गोव्यात मूळची धेंपो कंपनी आहे. ती गोव्यातील खाणीमधून संपत्ती काढते. त्यामूळे निसर्गरम्या गोव्याच्या परिसराला धोका निर्माण झाल आहे. हे डोंगर पोखरून खाणी शोधताना निसर्गाला हानी पोहचत आहे. त्यातच या धेंपो उदयोग समूहाने गोव्यातील आपल्या सर्वच्या सर्व ९१ खनिज खाणी सेझा गोवा कंपनीला विकून टाकल्या त्यामूळे स्थानिक आणि पर्यावरण

वादयांनी अशी भिती व्यक्त केले की गोव्यातील पर्यावरण अणखीनच बिघडेल. धेंपो कंपनीने सेझा कंपनीला जरी आपल्या खाणी विकल्या असल्या तरी या खाणी लंडनस्थित असलेल्या वेदांता रिसौस कंपनीचे त्यावर नियंत्रण असणार होते. म्हणजेच गोव्याचे पर्यावरण लंडनच्या वेदान्ता कंपनीच्या हातात होते.

**पर्यावरणाचा शत्रू :** वेदांन्ता कंपनीमूळे गोव्याच्या मूळ पिकांवर परिणाम होतो तसेच काजू सारखे पीक नामशेष होत आहेत. असे स्थानिक लोकांचे म्हणणे आहे तसेच नारळांचे उत्पन्न ही झपाटयाने घटत आहे कारण हा परिसर लाल मातीच्या ढीगाऱ्यांनी आणि धुळीने माखल्याने मूळच्या उत्पन्नावर त्याचा विपरीत परिणाम झाल्याने स्थानिक लोकांचे म्हणणे आहे तसेच या वेदांता समूहामूळे पर्यावरणात धोका निर्माण झाल आहे म्हणून या प्रकल्पात (खनिज) स्थानिक पर्यावरण बचाव समितीने या उदायोगाला मोठया प्रमाणात विरोध केला आहे. अशाच प्रकारे जर डोंगरातील खाणी खोदून संपत्ती काढली जात असले तर गोव्याचे निसर्ग सौंदर्य लोप पावेल.

**स्थानिकांचा विरोध :** पर्यावरणात हानीकारक असलेल्या या प्रकल्पाला स्थानिक लोकांचा विरोध आहे. स्थानिक लोकांच्या मते धेपोंच्या खाणीचा ताबा लंडन स्थित वेदांता कडे गेल्यामूळे गोव्यात या कंपनीची ताकद वाढेल आणि गोव्यातील राजकीय आणि आर्थिक समीकरणे बदलली तसेच खाण प्रदूषण विरोधात लोकांची चळवळ उभी केली.

**ओरिसातही वेदांता :** ओरिसा सरकारने वेदांता कंपनीने ओरिसा येथे विद्यापीठ स्थापन करण्यासाठी परवानगी दिली. गरीब शेतकरी, विशेषत्वाने आदीवासीकडून बळजबरीने जमिनी घेऊन त्या कंपनीत दिल्या असा आरोप ओरिसा सरकारवर केला जातो. ओरिसा येथे कंपनीत विदयापीठ स्थापन करण्यासाठी सुमारे सहा हजार एकर जमीन दिली. वास्तविक पाहता कोणतेही विद्यापीठ स्थापन करताना २०० एकर जमिन पुरेशी होते. परंतू ओरिसा सरकारने वेदांताला सहा हजार एकर जमिन दिली. या व्यवहारात सर्वोच्य न्यायालयाने हस्तक्षेप केल तेव्हा हा प्रकार थांबला. विद्यापीठाच्या नावाखाली घेतलेली जमिन त्यावर विद्यापीठ स्थापन करुन उरलेल्या जमिनीवर वेदांता बॉक्साईटची खाण सुरु करणार आहे. या प्रकल्पात स्थानिकांचा विरोध आहे.

वेदांन्ता कंपनी गोव्याची असो की ओरिसाची त्या कंपनीने आपल्या प्रकल्पासाठी स्थानिकांच्या जमिनी बळजबरीने मिळविल्या तसेच ज्या जमिनी ताब्यात घेतल्या त्याचा योग्य मोबदल या प्रकल्प ग्रस्ताना दिल नाही. प्रकल्पग्रस्तांचे योग्य असे पुर्नवसन केले नाही. अशा अनेक कारणांमूळे स्थानिकांनी, विस्थापीतानी आणि पर्यावरण वादयांनी या प्रकल्पास मोठया प्रमाणात विरोध केला आहे.

### आपली प्रगती तपासा

वेदान्ता प्रकल्पासाठी येणाऱ्या अडचणी/समस्यांचा आढावा घ्या.

## १६.८ सिंगूर चळवळ / प्रकल्प (Singur Movement)

भारतातील नॅनो कंपनीने (टाटा नॅनो) ने पश्चिम बंगाल मधील हुगळी जिल्हातील सिंगूर येथे टाटा नॅनो प्रकल्प (छोटी कार) उभे करण्याचा प्रयत्न केला. पश्चिम बंगालची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट होती. बेकारी, दारिद्र्य, मूत्युचे जास्त प्रमाण अशा सारख्या समस्या जास्त होत्या. म्हणून टाटा कंपनीचे प्रमूख रतन टाटाने सिंगूर येथे हा प्रकल्प राबवण्याचा प्रयत्न केला. प्रकल्पाविषयी टाटाने पश्चिम बंगालच्या सरकारशीही बोलणी केली. त्या प्रकल्पासाठी टाटा कंपनी १००० करोड खर्च करणार होती.

**पश्चिम बंगालचा विकास :** हा प्रकल्प जर पश्चिम बंगाल मध्ये राबविल गेल असला तर पश्चिम बंगालचा विकास मोठया प्रमाणात झाल असता. पश्चिम बंगालच्या आर्थिक समस्या कमी झाल्या असल्या. या प्रकल्पासाठी स्थानिक लोकांकडून जमिन कंपनीला हवी होती. सिंगूर तसेच पश्चिम बंगालच्या शेतकरी आधिच गरीब छोटे शेतकरी होते. थोडया जमिनीचे मालक होते. आणी पश्चिम बंगाल मधील तृणमूल पक्षाच्या नेत्या या ममता बॅनर्जीनी असे शेतकऱ्यांना अश्वासन दिले होते की शेतीसाठी सर्व सोयी सुविधा पुरविण्यात येतील आणि ज्यांच्या कडे शेत जमिन नाही त्यांना जमिनी दिल्या जातील. परंतू ज्यावेळेस नॅनो प्रकल्प पश्चिम बंगालमध्ये राबविण्याचे ठरविले त्यावेळेस ममता बॅनर्जीनी त्या प्रकल्पाला फार मोठा विरोध केला.

**या प्रकल्पाला विरोध :** ममता बॅनर्जीनी या प्रकल्पासाठी शेतकऱ्यांना जमिनी देऊ नका. “जमिन वाचवा” असा संदेश दिला. ममता बॅनजीना पर्यावरण बचाव अंदोलनच्या नेत्या मेथा पाटकर, अनुराधा तलवार, अरुधंती रॉय यांनीही पाठिबां दिला. तसेच या प्रकल्पाविरोधात स्थानिक लोकही या चळवळीत मोठया प्रमाणात सामिल झाले.

प्रकल्प विरोधी चळवळीला जोर चढला. ममता बॅनर्जीने या प्रकल्पाला विरोध केल्याने स्थानिक लोक ही या चळवळीत मोठया प्रमाणात सामिल झाले. शेवटी रतन टाटानी कलकत्यास प्रेस कॉन्फरन्स घेऊन पश्चिम बंगालमधील सिंगूर येथून हा प्रकल्प हळविला जाईल. असे २३ सप्टेंबर २००८ ला जाहीर केले आणि लवकरच हा प्रकल्प गुजरात येथे पुर्नवस्थापीत करण्यात येईल. असे सांगण्यात आले. टाटा नॅनो चे मुख्य रतन टाटाच्या या निर्णयाचे गुजरात चे मुख्यमंत्री श्री नरेंद्र मोदी नी या प्रकल्पाचे गुजरात मध्ये मोठया प्रमाणात स्वागत केले जाईल असे सांगितले आहे. म्हणून हा प्रकल्प शेवटी सिंगूर येथून हटवून गुजराथ येथे प्रस्थापित केला गेला.

**प्रकल्पामूळे सिंगूरची (पश्चिम बंगालची) होणारी प्रगती :** हा प्रकल्प जर पश्चिम बंगालमध्ये राबविल गेल असता तर पश्चिम बंगालचा आर्थिक विकास मोठया प्रमाणात झाल असता तर बेरोजगारांना नोकऱ्या मिळाल्या असत्या प्रकल्प ग्रस्तांचे पुर्नवसनाचे रतन टाटांनी अश्वासन दिलेले होते. ज्याच्या जमिनी प्रकल्पासाठी घेतल्या होत्या त्यांना जमिनीच्या योग्य मोबदला दिला जाईल. असेही सांगण्यात आले होते. तरीही पर्यावरणतंज्ञानी, राजकीय नेत्यांनी व स्थानिक लोकांनी या प्रकल्पाला मोठया प्रमाणात विरोध केला. शेवटी हा प्रकल्प गुजरात मध्ये हलविण्यात आला.

**आपली प्रगती तपासा :**

टिप दया : सिंगूर प्रकल्प

## १६.९ जैतापूर चळवळ / प्रकल्प (Jaitapur Movement)

भारत महासत्ता होण्याचे स्वप्न पाहात आहे. या महासत्ता बनणाऱ्या भारता समोर आज अनेक समस्या आहेत. त्यातील प्रमूख समस्या म्हणजे विजेची टंचाई होय. कोणताही व्यवसाय असो, कारखाने असो की, कंपनी सर्वांसाठी विजेची गरज असते. कुणीही व्यक्ती असो की समाज असो सर्वांनच आज विजेची गरज आहे. आधुनिक काळात विजेशिवाय कोणतीही गोष्ट होत नाही. आधुनिक काळात तर दिवसेंदिवस विजेची मागणी वाढत आहे. वाढत्या मागणी बरोबर विज पुरविणे भारता सारख्या देशात शक्य नाही. तिच परिस्थिती महाराष्ट्र राज्याचीही आहे. महाराष्ट्रालाही विजेची टंचाई मोठया प्रमाणावर जाणवते आहे. विजेच्या निर्मितीसाठी अनेक योजना आज राबंवल्या जात आहेत. अशाच प्रकारचा एक प्रकल्प कोकणात आज राबवण्यात येत आहे.

तो म्हणजे जैतापूर येथे वीजनिर्मिती प्रकल्प राबविल जात आहे. विद्युतरुपी उर्जानिर्मिती करताना अनेक पध्दतीचा वापर करून टप्पा टप्पाने वीजे मध्ये वाढ केली जात आहे.

भारतात आज एकूण वीजनिर्मितपैकी २/३ वीजनिर्मिती ही कोळसा आणि नैसर्गिक वायू द्वारे निर्माण केली जाते. सौरउर्जेद्वारेही वीज निर्मिती केली जाते. परंतू ही सौरउर्जा प्रकल्प राबवणे ही महागडी व्यवस्था आहे.

**जैतापूर अणूवीज प्रकल्पाचे स्वरुप :**

जैतापूरला अणुविज प्रकल्प राबविण्यासाठी भारत सरकारने पाऊल उचलले आहे. प्राचीन काळापासून विजेचे महत्व पटवून देण्यात आलेले होते. भविष्यात विजेची टंचाई मोठया प्रमाणात निर्माण होईल. असे भविष्यही वर्तवण्यात आले होते आणि आज भारतात सर्वत्र विजेची टंचाई जाणवत आहे. महाराष्ट्रात तर ६,८ तास लोडशेंडींगला लोकांना सामोरे जावे लागत आहे. या लोडशेडींगच्या तावडीतून महाराष्ट्राला मुक्त करण्यासाठी कोंकण येथील जैतापूर येथे अणूउर्जा प्रकल्प उभारण्यात आला. भविष्यातील विचार करता अणुवीज ही सर्वात फायदेशीर पध्दत आहे. म्हणून संपूर्ण जगभर विविध देश हे पारंपारीक वीजनिर्मिती बरोबरच अणुवीज निर्मितीत टप्पा-टप्पाने वाढ करीत आहेत. असाच भारतातील महाराष्ट्र राज्यातील कोंकण भागातील जैतापूर येथे अणूवीज प्रकल्प राबवण्यात येत आहे. या प्रकल्पात पर्यावरणवादयांनी विरोध केला आहे. कारण या प्रकल्पामूळे समुद्राचे पाणी तापेल, मासे मरतील, शेवाळ वाढणार नाही, झाडावर विपरीत परिणाम होईल. जैतापूरातील एकूण १० हजार मेगावॅटच्या सहा

अणुभट्टया प्रत्यक्षात जवळजवळ तीस हजार मेगावॅट उष्णता निर्माण करणार व ग्लोबल वार्मिंगचा धोका वाढणार अशी भिती पर्यावरणावादयांना वाटते. म्हणून या पर्यावरण वादयांनी या प्रकल्पास विरोध केला.

या प्रकल्पात पर्यावरण वादयांबरोबरच स्थानिक लोकांचाही विरोध आहे. कारण गोव्यातील धेंपो प्रकल्प, वेदान्त प्रकल्प असे पर्यावरणास धातक आहेच तसेच त्याच्या सारखाच पर्यावरणाला घातक हा जैतापूरचा प्रकल्प आहे.
खालील विविध कारणामूळेही या प्रकल्पाला विरोध केला जात आहे.

१) भूमिसंपादन करताना त्याला बाजारभावाने किंमत न देता म्हणजे योग्य तो मोबदल त्यांना मिळेलच असे सांगता येत नाही.
२) कोकणसारख्या निसर्गरम्य परिसराला या प्रकल्पाचा धोका निर्माण होईल.
३) कोकणातील काजू आणि आंबा पिकावर त्याच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होईल.
४) या प्रकल्पाचा सुपीक जमीनीवर परिणाम होऊन शेती उत्पादनावर विपरीत परिणाम होईल.
५) कोकणातील जैव विविधतेचा ऱ्हास होईल.
६) ग्लोबल वॉर्मिंगची समस्या तीव्र होत जाईल.
७) विस्थापन आणि पुर्नवसनाची समस्या निर्माण होईल.
८) स्थानिक लोकांना याचा फायदा होईलच असे नाही.
९) कोकणातील जीवनमानावर विपरीत परिणाम होईल.
१०) या प्रकल्पामूळे अनेक संसर्गजन्य आजार निर्माण होतील.

पर्यावरणवादी संघटनाकडून आणि स्थानिक लोकांकडून वरील विविध कारणांमूळे या प्रकल्पाला विरोध केल जात आहे.

या प्रकल्पाला जरी मोठया प्रमाणात विरोध होत असल तरीही भारताने फ्रेंच कंपनीच्या साह्याने हा प्रकल्प पूर्ण करण्यात येईल असे सांगितले. भारताते फ्रेंच कंपनीने उत्पादीत केलेल्या सहा अणूभट्टया वापरुन रत्नागिरी जिल्हातील जैतापूर येथे ९९९० मेघा वॅट क्षमतेचा देशातील सर्वात मोठा अणूवीज प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्याची प्रतिबध्दता भारत व फ्रान्स या देशानी व्यक्त केली.

भारत सरकारने असे प्रतिपादन केले की अणूउर्जा प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल. जैतापूर प्रकल्पासाठी फ्रान्सची अव्हेरा कंपनी अणूभट्टाया पुरविणार आहे. त्यासाठीचा ९.३ अब्ज डॉलरचा प्राथमिक करार २०१० मध्ये फ्रान्सशी करण्यात आलेल होत. त्याच काळात जपानमधील फूकूशिमा अणूभट्टी प्रकल्प पूर्णपणे मोडकळून पडला. त्यामूळे भारतीय पर्यावरणतज्ञांनी जपानच्या अणूभट्टीचे उदाहरण देऊन जैतापूरच्या वीज प्रकल्पाला विरोध केला.

हा प्रकल्प राबविण्यासाठी स्थानिक लोकांना विश्वासात घेऊन स्थानिक लोकांचे प्रश्न समजावून घेऊन त्यांच्यासाठी केलेल्या उपायांची माहिती दिली पाहिजे. जैतापूर प्रकल्पासाठी फ्रेंच कंपनी (E.P.R.) युरोपियन प्रेशराईल्ड रिॲक्टर या तंत्रज्ञानाचा अवलंब करणार आहे. हे

तंत्रज्ञान शक्तीशाली, भूकंप, त्सुनामी, समुद्राच्या उंच लाटा यासारख्या नैसर्गिक अरिस्टांचा सामना करण्यासाठी कणखर (सक्षम) आहे. फ्रान्सच्या अणूउर्जा आयोगाचे अध्यक्ष तसेच भारतीय अणूउर्जा आयोगाचे अध्यक्ष डॉ. श्रीकुमार बैनर्जी यांनी सांगितले.

## १६.१० सारांश (Summary)

पोस्को, वेदांता, सिंगूर आणि जैतापूर प्रकल्पाचा सविस्तर माहिती पाहिली. या वरुन असे लक्षात येते की या चळवळीत पाठिंबा देणारे आणि चळवळीला विरोध करणारे असे दोन गट आपणास पहावयास मिळतात. कोणताही प्रकल्प राबवताना तो प्रकल्प कसा आहे. कोणासाठी आहे आणि त्याचा फायदा कोणाला कसा मिळणार आहे. हे जो पर्यंत स्थानिकांना विश्वासात घेऊन सांगितले जात नाही. तो पर्यंत अशा प्रकल्पाला विरोध होत राहणार.

गरीब या प्रकल्पामूळे शेतकऱ्यांना आपल्या जमिनी गिळीकृत होण्याची भिती असते. ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी प्रकल्प उभारणीसाठी घेतल्या जातात. त्यांना त्या जमिनीचा योग्य मोबदल दिला पाहिजे. सध्याच्या जमिनीत बाजारभावाने किंमत दिली पाहिजे. कोणतीही कंपनी असो स्थानिकांबरोबर त्यांच्या फायदयासाठी (जनतेच्या) करार, समझौता केला पाहिजे.

कोणताही प्रकल्प राबवताना कोणत्याही पर्यावरणात तसेच स्थानिक लोकांना त्यांच्या शेतील, पूरक व्यवसायात कोणताही धोका निर्माण होणार नाही याची दक्षता प्रकल्पधारकांनी घेतली पाहिजे.

प्रकल्प राबवला तरच त्या त्या भागाचा, राज्याचा पर्यायाने राष्ट्राचा विकास मोठया प्रमाणात होईल. अन्यथा अनेक समस्या निर्माण होतील. प्रकल्पाची ही पार्श्वभूमी समजावून न घेता फक्त विरोध करावा हे ही योग्य नाही. सर्वांगिण विकासाची बाजू जाणून विकासाच्या प्रकल्प उभारणीसाठी स्थानिक लोकांनीही सहकार्य केले पाहिजे.

## १६.११ प्रश्न (Questions)

१) पर्यावरणातील अडथळयांची थोडक्यात चर्चा करा.

२) टाटा नॅनो प्रकल्प गुजराथ येथे स्थलांतरीत करावा लागला ? का ?

३) प्रकल्पाला होणारा विरोध त्याची कारणे सांगून त्यावर उपाययोजना सुचवा.

❖❖❖❖

# १७

# विकासाचा वैकल्पिक दृष्टिकोन भाग - १
# निरंतर /शाश्वत विकास
# (Sustainable Development)

**घटक रचना :**

१७.१ उद्दिष्टये (Objects)
१७.२ प्रस्तावना (Introduction)
१७.३ शाश्वत विकासाचा अर्थ / संकल्पना (Meaning / Concept of sustainable Development)
१७.४ शाश्वत विकासाच्या व्याख्या / संज्ञा (Definitation of Sustainable Development)
१७.५ शाश्वत विकासाचे स्वरुप (Nature of Sustainable Developement)
१७.६ शाश्वत विकासाचे उद्देश (Aims of Sustainable Development)
१७.७ शाश्वत विकासाचे महत्व / गरज (Importants needs sustanianble Developement)
१७.८ शाश्वत विकासाचे घटक / आधार
१७.९ शाश्वत विकासाचा वस्तुनिष्ठ अभ्यास (Case studies of sustaninable Development)
१७.१० सारांश (Summary)
१७.११ प्रश्न (Questions)
१७.१२ संदर्भ सुची (Reference List)

## १७.१ उद्दिष्टये : (Objective)

- शाश्वत विकासा व्यापक अर्थ जाणून घेता येईल.
- निरंतर विकासाचे स्वरूप आकलन होण्यास मदत होईल.
- शाश्वत विकासाचे ज्ञान करुन घेता येईल.
- शाश्वत विकासाचे महत्व ओळख करुन घेण्यास मदत होईल.
- शाश्वत विकासाचे विविध घटक आकलंन करुन उपयोजन करता येईल.
- निरंतर विकासाचा सामाजिक वस्तुस्थितीचा बोध होईल.

## १७.२ प्रस्तावना : (Introduction)

आर्थिक उद्दिष्टये साध्य करतांना पर्यावरणाचा विचार न करता केवळ आर्थिक विकासाच्या प्राप्तीसाठी पर्यावरणाचा अतिरिक्त वापर केला जातो. यामूळे अनेक समस्या निर्माण होऊ शकतात. चांगल्या पर्यावरणामूळे समृध्द आरोग्य आणि समतोल आर्थिक विकास मानवाला शाश्वत आणि चिरकाळ टिकणाऱ्या विकासाकडे घेवून जातो. तसेच भविष्यातील जिवन उज्जवल होते. लोकसंख्या नियंत्रणामूळे नागरिकरणाला निर्बंध होतो. विविध समस्या मर्यादा पडतात. जलसंपदेचे संरक्षण करुन प्रत्येक नागरिकाना पिण्याचे शुध्द पाणी उपलब्ध करुन देणे. शेती विकासामधून अन्नधान्यात वाढ करून दारिद्रय कमी करणे ही कार्य शाश्वत विकासामधून साध्य होते. शाश्वत विकास दारिद्रय कमी करुन गरीब आणि श्रीमंत यांच्यातील दरी कमी करणे. मानवी राहणीमान उंचावणे, आर्थिक विकास करणे, लोकसंख्या, शिक्षण, आरोग्य शिक्षण, व्यायवसायीक शिक्षण यासारख्या विषयावर भर देणे हा शाश्वत विकासाचा आधार आहे. शाश्वत विकास व्यक्तीगत आणि सामुदायीक स्वरुपाचा विचार करतो. शाश्वत विकासाची गरज आर्थिक विकासाबरोबर पर्यावरणाचे संरक्षण आणि सामाजिक न्याय यांच्याशी संबंधीत आहे. यामूळे शाश्वत विकास समाजाच्या सर्व समादेशक विकासाचा विचार करतो. आरोग्य, शिक्षण, रोजगार, राहणीमान या गोष्टी साध्य करताना पर्यावरणाचा समतोल निर्माण करणे ही प्रत्येक व्यक्तीची जबाबदारी आहे.

आधूनिक काळात आर्थिक विकासाचा संबंध पर्यावरणाशी जोडला जातो. कारण पर्यावरणाच्या हानिमधून जंगलतोड, नैसर्गिक साधनसंपत्तीचा ऱ्हास होतो. पृथ्वीवरील पर्यावरण कायम सुरक्षित ठेवायचे असेल तर नैसर्गिक साधनसंपत्ती जतन करणे आवश्यक आहे. निसर्गामधून लाकूड, खाद्यपदार्थ औषधी वनस्पती, कंदमूळे, फळे, डिंक, मध या वस्तू मिळत होत्या. परंतू आधूनिक काळामध्ये जंगलाचा ऱ्हास झाल्यामूळे साधन संपत्तीचा तूटवडा भासू लागला आहे. यामूळे आर्थिक विकासावर वाईट परिणाम होतांना दिसतो. हे मानवाच्या लक्षात आल्यानंतर निसर्गाचे सौंदर्य टिकवून शाश्वत विकासाला सुरक्षित विकास असेही म्हटले जाते. मानवाने एक झाड तोडले तर दूसरे झाड रोपण करावे अशी शाश्वत विकासाची संकल्पना आहे. जागतिक वृक्षारोपण व वन संवर्धन कार्यक्रम सर्वत्र मोठया प्रमाणात करुन वनक्षेत्राचा विकास करावा.

आर्थिक विकास साधताना नैसर्गिक घटकावर कोणताही दूष्परिणाम होणार नाही. याची काळजी ध्यावी. अशा परिस्थितीत जो विकास साधला जातो त्याला शाश्वत चिरंजीवी कायम आणि सुरक्षित विकास असे म्हणतात. नैसर्गिक घटकांमध्ये वाढ करुन त्यांचे प्रमाण अधिकाधीक निर्माण करुन आर्थिक विकास निर्माण करणे गरजेचे आहे. असाच विचार घेवून युरोपातील वनअधीकाऱ्याने जंगले टिकविण्याचे भूमिका घेवून शाश्वत या शब्दाचा प्रयोग केला आणि जंगल संवर्धन संकल्पना युरोपामध्ये विकसित झाली. शाश्वत विकास हि संकल्पना जन्माला आली.

## १७.३ शाश्वत विकासाचा अर्थ/संकल्पना (Meaning/Concept of Sustainable)

जगातील भविष्याचा विकास करुन पर्यावरण निसर्ग संवर्धन आणि वर्तमान काळातील गरजा यांच्यातिल समन्वय निर्माण करुन भविष्यातील मानव जातीच्या गरजा पूर्ण होतील आणि

पर्यावरणाचा विकास होईल. अशी नियोजनात्मक शाश्वत विकासाची संकल्पना आहे. शाश्वत विकासाची संकल्पना मूळातच जगा आणि जगू दया या विचार धारेशी संबंधीत आहे. पर्यावरण व आर्थिक विकास म्हणजेच सुरक्षित विकास होय. पर्यावरण हा सामाजिक जिवनाचा एक भविभाज्य घटक आहे. म्हणून विनाशकारी वृत्तीचा नाश करणे सजिवाचे संवर्धन करणे, सहकार्य सेवाभाव आणि एकमेकांना मदत या मधून तडजोड करणे शांतता आणि आरोग्य समृध्दीसाठी निसर्गाचे सहकार्य घेणे, यामूळे सामाजिक जिवनामध्ये मानवता समता आणि विश्वबंधूता जागृत होवून शाश्वत विकासाला चालना मिळेल कोणत्याही स्थानाचा विकास कोणत्याही योजना आमलात आणताना पर्यावरण संवर्धन व पर्यावरण विकास यांचा विचार होणे आवश्यक आहे. अन्यथा राबविलेली योजना अधूरी कल्याणकारी ठरेल हा शाश्वत विकासाचा मुख्य विचार आहे. पर्यावरण आणि आर्थिक प्रगतीचे महत्व जाणून घेण्यासाठी जागतिक पर्यावरण आयोगाने १९८७ साली, वृटलॅन्ड अहवाल सादर केला आहे. त्यानूसार शाश्वत विकासाची संकल्पना अधिक स्पष्ट होते.

**आपली प्रगती तपासा.**

शाश्वत विकासाची संकल्पना सांगा.

## १७.४ शाश्वत विकासाची व्याख्या किंवा संज्ञा : Defination of sustainable Development

### १७.४.१ वृटलॅन्ड अहवाला प्रमाणे :

"शाश्वत विकास म्हणजे जो सध्याच्या गरजा पूर्ण करतो व भविष्य काळातील पिढयासाठी पुरेशा प्रमाणात नैसर्गिक साधन संपत्तीचे जतन करतो. नैसर्गिक साधन संपत्तीचे संवर्धन करतो व पुढच्या पिढयांची काळजी घेवून वर्तमान काळात वापर करतो आणि भविष्य काळासाठी शिल्लक ठेवण्याचा प्रयत्न करतो."

### १७.४.२ जागतिक पर्यावरण व विकास आयोग् :

"यांच्याप्रमाणे भविष्यकाळातील पिढयांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी पर्यावरणाचा क्षमता कायम टिकवून पर्यावरणाचा ऱ्हास न करता वर्तमान पिढयांच्या गरजा पूर्ण करणे म्हणजे शाश्वत विकास होय."

### १७.४.३ हॉर्थडेड यांच्य प्रमाणे :

"शाश्वत कृषी व्यवस्था येथील मानवी उपयुक्तेच्या घटकांची ओळख करुन त्यांचे जतन करणे आणि पर्यावरणाचे संरक्षण करणे हा मानवी व्यवहार शाश्वत विकासाचा आहे."

**१७.४.४ पॅरिस मंकडण आणि बियरबार यांच्या मते :**

"सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थेतील उद्देशान पूर्ण करण्यासाठी शिक्षण आणि आरोग्याच्या दर्जा सुधारुन मानवी राहणीमानाला सुधारण्यासाठी साधन संपत्तीचा अपव्य न करता केलेला वापर म्हणजे शाश्वत विकास होय."

**१७.४.५** "देशातील उपलब्ध साधन संपत्तीचा सामाजिक गरजा पूर्ण करण्यासाठी नियोजनबंध वापर करुन भविष्याच्या सामाजिक गरजापूर्ण होतील याचा विचार करुन केलेले कोणतेही सुधारात्मक बदल म्हणजे शाश्वत विकास होय."

शाश्वत विकास ही संकल्पना जगातील मानव जातीच्या कल्याणसाठी निर्माण केलेली आहे. सर्वसामान्यपणे कोणताही मानव आजच्या प्रश्नाकडे लक्ष देवून कार्यात्मक उपाय आखतो. परंतू शाश्वत विकास ही संकल्पना मानवी कल्याणासाठी कायम आणि चिरकाळ टिकणाऱ्या घटकासाठी आहे. पर्यावरणा बरोबर खनिज संपत्ती पाणी, सौरऊर्जा, पवनऊर्जा, मानवी संवर्धन (श्रम शक्ती), शिक्षण संकृती हे घटक बदलत्या परिस्थितीनुसार शाश्वत विकासामध्ये समाविष्ट होतात.

**आपली प्रगती तपासा.**

शाश्वत विकासाची व्याख्या दया.

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

## १७.५ शाश्वत विकासाचे स्वरुप (Nature of Sustainable Development)

पर्यावरण विकास आणि आर्थिक विकास हे परस्परांशी धनिष्ठ जोडलेले घटक आहे. निसर्गाच्या नियमामध्ये राहून आर्थिक विकास साधने जगा आणि जगू दया. ही वैशाविक विचार धारा म्हणून शाश्वत विकासाकडे पाहिले जाते. शेतीमध्ये रासायनिक खते, रासायनिक किटकनाशके यांचा वापर करुन शेती उत्पादन टाळावे नैसर्गिक पध्दतीने जैविक खते उत्पादनामध्ये वापरावी ज्यामुळे शेतीची सुपिकता कायम राहिल वृक्षारोपन आणि वृक्षसंवर्धन योजना आमलात आणावी शेतीमध्ये कायम एकच पिक घेवूनही शेतीच्या भोवताली कडू निंबाची झाडे, शेतीसाठी उपयुक्त ठरतात. जंतूनाशकासाठी ती अतिशय उपयुक्त आहे. खनिज संपत्ती पाणी जमिन यांचा ऱ्हास होणार नाही. आणि वर्तमानातील लोकांना गरजा पूर्ण करण्यासाठी उपयोग होईल आधुनिक काळामध्ये मानवी साधनामध्ये काही घटकांना दुर्लक्षीत केले जाते. त्यापैकी स्त्रियांना जन्मापासून अनेक संकटाचा सामना करावा लागतो. स्त्रि आणि पुरुष भेद करुन स्त्रि गर्भाच्या जन्मात अडथळा निर्माण केला जातो. यामूळे स्त्रियांचे प्रमाणे कमी होवू लागले

आहे. भविष्यात याची समस्या निर्माण होईल. भारतामध्ये आदिवासी दलित आणि दारिद्रयरेषे खालील लोकांना अन्न, वस्त्र, निवाऱ्याच्या अभावामूळे श्रमशक्तीवर वाईट परिणाम होवून राष्ट्रीय उत्पादनात घट होते. म्हणून सार्वजनिक विकासाबरोबर सामाजिक मागास गटाचे संवर्धन आणि संरक्षण मानवतेच्या दृष्टीकोनातून करणे गरजेचे आहे. मानवाने समुद्र, नदया, डोंगर, या सारख्या नैसर्गिक संपत्तीचे प्रदूषण होणार नाही. किंवा अपव्यय होणार नाही. याची काळजी घेणे आवश्यक आहे. विकसनशील देशामध्ये गरिबीचा तर विकसीत देशामध्ये प्रदूषणाचा गंभीर प्रश्न, ध्वनीप्रदूषण , जमीन प्रदूषण या समस्या विकसीत क्षेत्रांमध्ये महत्वाच्या आहेत. म्हणून महत्वपूर्ण उद्देशाने सर्वव्यापी घटकाचा शाश्वंत विकास ही संकल्पना दिवसेन दिवस महत्वाची होताना दिसतआहे. म्हणून शाश्वत विकासाचा अभ्यास व्यापक होताना दिसतो.

**आपली प्रगती तपासा.**

१) शाश्वत विकासाचे स्वरुप सांगा.

## १७.६ शाश्वत विकासाचे उद्देश (Aims of Sustainable Development)

### १७.६.१ पर्यावरणाचे संरक्षण :

मानवी जिवनातील विविध गरजांचा पूरवठा नैसर्गिक पर्यावरणामधून केला जातो. मानवी गरजांच्या मागण्या लक्षात घेता. पर्यावरणाचा अपव्यय जास्त होतो. उदा. जमिन, जंगल, अन्न-धान्य इत्यादी. यामूळे पर्यावरणाचे संरक्षण करुन मानवी जिवनाचा विकास करण्यासाठी शाश्वत विकास उपयुक्त ठरतो. म्हणून नैसर्गिक पर्यावरणाचे संवर्धन करण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकांची आहे. यांचे शिक्षण शाश्वत विकास देतो.

### १७.६.२ मुलामुलींचे भविष्य घडविणे :

देशातील प्रत्येक मुलामुलींचे उज्वल भविष्य निर्माण करण्याचा उद्देश शाश्वत विकासाचा आहे. त्यामधून मुलांना उत्तम शिक्षणाची संधी, रोजगार, यांचा पुरवठा करुन देशातील भावी नागरिकांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी मुलामुलींमध्ये जातीधर्मा मध्ये भेद-भाव न करता प्रत्येक मुलामुलींना आपले भविष्य उज्वल करण्याची संधी शाश्वत विकासामधील दिली जाते.

### १७.६.३ पिढयांन पिढया नैसर्गिक समाधनांना वारसा देणे :

नैसर्गिक साधनसंपत्ती ही देशातील चीरकाळ टिकणारी कायम स्वरुपी संपत्ती आहे. म्हणून आजच्या समाजाने पुढच्या पीढीला नैसर्गिक संवर्धनाचा वारसा देणे गरजेचे आहे. संत तुकाराम महाराज म्हणतात, ''वृक्षवल्ली आम्हा सोयरे'' या संदेशामधून आध्यात्मिक ज्ञानाबरोबर

नैसर्गिक साधन संपत्तीचे संवर्धन करण्याचा वारसा पुढच्या पिढीला आध्यात्मीक स्वरुपातून सांगीतला जाता. तसेच शाश्वत विकासाचा उद्‌देश नैसर्गिक संवर्धनाचा वारसा पुढच्या पिढीला देणे हा आहे.

### १७.६.४ मुलभूत गरजा भागावून आर्थिक विकास करणे :

शाश्वत विकासाचा प्रमुख उद्‌देश मानवी गरजा पूर्ण करणे हा आहे. गरजापूर्ण करतांना औदयोगिक विकासामधून निसर्गाचा ऱ्हास न होता. आर्थिक विकास साधने हा शाश्वत विकासाचा उद्‌देश आहे. प्रत्येक मानवाला अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य यासारखे मुलभूत गरजा पूर्ण करताना समान संधी देवून आर्थिक विकासांचे उदिष्टये साध्य करणे आवश्यक असते म्हणून गरजापूर्ती बरोबर आर्थिक विकास ही भूमिका शाश्वत विकासाची आहे.

### १७.६.५ नैसर्गिक, भौतिक आणि मानवी संपत्तीचे रक्षण :

शाश्वत विकासामध्ये नैसर्गिक संपत्ती बरोबर भौतिक संपत्तीचेही संरक्षण महत्वाचे आहे. कारण मानवाने भौतिक संपत्ती म्हणून कारखाने, वाहने, इमारती, उपकरणे, रेल्वे, विमान यासारखी भौतिक साधन संपत्तीही राष्ट्राच्या विकासासाठी महत्वाची असते. म्हणून भौतीक संपत्तीचे संवर्धन आवश्यक आहे. मानवी संसाधन हा घटक अतिशय महत्वाचे आहे. विकासाची संकल्पना मानवी कल्याणाला डोळयासमोर ठेऊन निर्माण केली असते. सर्वसाधनाचा उपभोग घेण्यासाठी मानवी संपत्तीचे संर्वधन होणे गरजेचे आहे. म्हणून आदिवाशी, दलित, अपंग, स्त्रिया आणि इतर मानवी घटकांचे संरक्षण होणे आवश्यक आहे. अन्न, वस्त्र, शिक्षण, आरोग्य, आणि सामाजिक दर्जा देवून मानवी संपत्तीचे संवर्धन करण्याचा उद्‌देश शाश्वत विकासाचा आहे.

### १७.६.६ भविष्याकरीता नैसर्गिक संपत्तीचे जतन :

औदयोगीक विकास करताना नैसर्गिक साधन-संपत्तीचे भविष्यातील पिढयांसाठी जतन करुन ठेवणे कोणतेही विकासाची योजना राबवत असताना नैसर्गिक साधनसंपत्ती भविष्याकरिता जतन करुन ठेवणे हा उद्‌देश शाश्वत विकासाचा आहे. नदया, डोंगर, समुद्र किनारे, जंगल, जमिन, यासारख्या नैसर्गिक घटकांचे जतन करावे त्याच बरोबर खनिज संपत्तीचा वापर करतांना केवळ आजच्या गरजांच्या विचार न करता भविष्यातील समाजासाठी काही नैसर्गिक घटक जतन करुन ठेवावेत हा चिरंतर विकासाचा एक उद्‌देश आहे.

### १७.६.७ उत्तम आरोग्य :

नैसर्गिक साधन संपत्ती उत्तम आरोग्याच्या दृष्टीकोनातून महत्वाची आहे. औषधी वनस्पती शुध्द हवा, कंदमूळे, अन्न धान्य हे सर्व निसर्गाच्या सानिध्यातून मिळत असते. आरोग्याकरीता नैसर्गिक घटकांचे संवर्धन महत्वाची आहे. भारतीय समाजाच्या विविध घटकांमध्ये दारिद्रयाचे प्रमाण अधिक आहे. जिवनावश्यक वस्तूचा पुरवठा होवू शकत नाही. यामूळे आरोग्य सुविधापासून वंचीत रहावे लागते. विशेषतः आदिवाशी, अनुसुचित जाती जमाती, अपंग, स्त्रिया, ग्रामीण समाज यांच्या आरोग्याच्या अनेक समस्या आहेत. तर शहर क्षेत्रामध्ये हवा पाणी आणि ध्वनी प्रदूषणामूळे सामाजिक आरोग्याला धोका निर्माण होत आहे. म्हणून विकासाच्या सोयी-सुविधा आमलात आणताना मानवी आरोग्याची काळजी घेणे हा शाश्वत विकासाच्या उद्‌देश आहे.

### १७.६.८ उदयोगांचा विकास :

बदलत्या परिस्थितीनुसार समाजाच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी औदयोगिक विकास महत्वाचा आहे. औदयोगिक विकास करत असताना पर्यावरणाचे संवर्धन खनिज संपत्तीचा ऱ्हास शेती क्षेत्राचे नुकसान हवा, पाणी यांचे प्रदूषण यांची काळजी घेवून नवनवीन उदयोग निर्माण करुन आधूनिक समाजाच्या वाढत्या गरजा पूर्ण कराण्यात ज्यामूळे नैसर्गिक परिस्थितीला कोणतीही हानी न पोहचता मनुष्य बळाचे संवर्धन होईल. आणि मानवी गरजापूर्ण होतील असा औदयोगिक विकास अपेक्षित आहे. हा उद्देश डोळयासमोर ठेवून चिरंतर विकास करत रहावे.

### १७.६.९ जागतीक सामजंस्य :

जगा आणि जगू दया या भावनेतून शाश्वत विकासाची संकल्पना निर्माण झालेली आहे. जगातील प्रत्येक सामाजिक घटकाला जगण्याची संधी उपलब्ध करुन देणे यासाठी जागतीक देवा-घेवाण व्यापार, सहकार्य या भावना समोर ठेवून विकसित राष्ट्रांनी विकसनशील राष्ट्र आणि गरिब राष्ट्र यांचे शोषन न करता सहकार्याच्या भावनेने अन्नधान्य औषधोपचार, शिक्षण, संस्कृती यांचे देवाग-धेवाण करुन सहकार्याची भावना ठेवावी. भूकंप, सुनामी, चक्रीवादळ, महापूर, दुष्काळ, रोगराई, युध्द यासारख्या नैसर्गिक आपत्तीच्या वेळी मानवतेच्या दृष्टीकोनातून अन्नधान्य, आरोग्य आणि इतर जीवनावश्यक वस्तूचा मदतीच्या दृष्टिकोनातून पुरवठा करणे, ज्यामूळे विश्वबंधूत्व, मानवता, या संकल्पनेचे महत्व वाढेल. संपूर्ण मानव जात, एकच आहे. गरीब, श्रीमंत, काळा, गोरा किंवा विविध राष्ट्र असा भेद न राहता जागतिक सामजस्य निर्माण करण्याचा शाश्वत विकासाचा उद्देश आहे.

### १७.६.१० लोकशिक्षण :

शाश्वत विकासाची संकल्पना मानव जातीच्या कल्याणाकरीता आहे. याची अमलबजावणी करण्याची जवाबदारी प्रत्येक मानवाची आहे. परंतू या लोकांना शाश्वत विकासाची संकल्पना उद्देश महत्व कार्य या बद्दल जनजागृती करण्याची जबाबदारी प्रशासन, प्रसारमाध्यमे आणि प्रत्येक नागरीक यांची आहे. सामाजीक जनजागृतीतून निसर्गाचे संवर्धन मानवी कल्याण जगा आणि जगू दया हा विचार प्रत्येक मानवात रुजवण्याची जबाबदारी स्विकारुन शाश्वत विकास करणे महत्वाची आहे. म्हणून विकासाचे फायदे-तोटे निसर्गाचे महत्व आणि मनुष्य बळाचे संवर्धन याविषयी जनजागृती करुन लोक शिक्षण देण्याचा उद्देश शाश्वत विकासाचा आहे.

वरील विविध प्रकारचे उद्देदश डोळयासमोर ठेवून नैसर्गिक संवर्धन, मनुष्य बळाचे संवर्धन प्रत्येक सजिवाला जगा आणि जगवा यासारखे काही महत्वपूर्ण उद्देदश घेवून शाश्वत विकासाची संकल्पना आधूनिक काळामध्ये निर्माण झाली आहे. यामूळे जगातील संपूर्ण मानवजातीचा आणि भविष्यात येणाऱ्या मानव जातीच्या गरजा पूर्ण करुन कल्याण करणारी चिंरतर विकासाची संकल्पना निर्माण झालेली आहे.

**आपली प्रगती तपासा.**

शाश्वत विकासाचा एक प्रमुख उद्देश लिहा.

## १७.७ शाश्वत विकासाची गरज / महत्व (Importants / Needs of Sustaniable Development )

आधूनिक काळामध्ये आर्थिक विकासाबरोबर पर्यावरण आणि निसर्गाच्या संवर्धनाची महत्व लक्षात घेवून मानवी कल्याणाच्या विविध गरजा कशा पूर्ण करण्यात याचा वस्तू स्थितीमध्ये विचार करुन ही संकल्पना निर्माण झालेली आहे. अशा या शाश्वत विकासाचे औदयोगिक विकासामध्ये कोणते महत्व आहे. याची थोडक्यात ओळख पुढीलप्रमाणे करुन घेता येईल.

### १७.७.१ पर्यावरणात्मक प्रश्न :

औदयोगिक क्रान्तीनंतर मोठ-मोठ भांडवली उदयोग निर्माण झाले. केवळ नफ्याचा उद्देश डोळयासमोर ठेवून भरमसाठ उत्पादन केले जावू लागले. या आधूनिक उद्दयोगामधून जमिन, जंगल, पाणी, नदया, हवा यांचे प्रदूषण केले गेले. यामूळे निसर्गाला धोका निर्माण होवून मानवा बरोबरच विविध पशु, पक्षी, आणि जिव जंतू यांचे जिवन धोक्यात येवू लागले. तसेच नैसर्गिक साधन संपत्ती भरमसाठ प्रमाणात वापरली जावून खनिज संपत्ती संपन्याचा धोका निर्माण झाला. उदा. पेट्रोलियम पदार्थ, दगडी कोळसा इत्यादी. यामूळे विश्वातील सजिव सृष्टीला धोका निर्माण होवू नये म्हणून शाश्वत विकासाची संकल्पना प्रत्येक मानवाने जिवनात अवलंबकरण्याची गरज आहे. ज्यामूळे कोणतेही पर्यावरणाचे प्रश्न निर्माण होणार नाही. याची काळजी घेवून आर्थिक, औदयोगिक, सामाजिक, सांस्कृतिक विकास करावा.

### १७.७.२ मानवी मर्यादा :

मानवाने नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपयोग करुन वैज्ञानिक आणि तांत्रीक विकास केला. परंतू नैसर्गिक साधन संपत्तीचा अतिरिक्त वापर करुन प्रदूषणाचा धोका निर्माण केला. मानवाने एक गरज पूर्ण करण्यासाठी नवीन तंत्र किंवा शोध लावला. त्यापासून दूसरी समस्या निर्माण होते. उदा. शेती उत्पादन वाढवण्यासाठी रासायनिक खतंचा शोध लावला. खतांचा अतिरिक्त वापरामूळे जमिनीची सुपीकता कमी होते. यामूळे आधूनिक विकास करतांना निसर्गाची हानी होणार नाही याची काळजी घेण्यासाठी शाश्वत विकासाचे महत्व वाढताना दिसते.

### १७.७.३ विकासाचे मुल्य :

औदयोगिक विकास केवळ मानवी गरजा आणि बाजारातील मागणी यांच्यावर अवलंबून न राहता विकास प्रक्रियेमधून कोणतेही दुष्परिणाम होणार नाहीत आणि पर्यावरणाचे जतन होईल असा विकास हा सर्व श्रेष्ठ मुल्यांक असणारा विकास होय. औदयोगिक विकासांचा पर्यावरण

आणि सजिव सृष्टी यांचे संवर्धन करणारा विकास असावा. नैसर्गिक साधन संपत्तीचा अपव्ययन करता मानवी गरजा पूर्ण करण्याची क्षमता असणारा कोणताही आर्थिक विकास, गुणात्मक विकास होवू शकतो. ज्यामूळे पर्यावरणाचे सांतत्य आणि मानवी गरजा यांचा विचार करावा. उदा. एखादे धरण बांधत असताना अनेक गावे आणि शेत जमिनी यांचे विस्थापन होणार नाही याची काळजी घेवून शेतीचे आणि पिण्याचे पाणी पूरवठा करणारे धरण बांधले जावे.

### १७.७.४ साधन संपत्तीचा गैरवापर :

निसर्गाच्या सानिध्यात असणारी संपत्ती वापरात आाणून आर्थिक विकास केला जातो. ज्यामूळे पाणी, शेती, वृक्षतोड, खनिज संपत्ती यांचा अपव्यय केला जातो. ज्यामूळे इतर सामाजिक घटकाला त्याचा तुटवडा भासण्याची शक्यता असते. उदा. शेझ प्रकल्पासाठी अनेक लागवडीखालील जमिनी औदयोगिक विकासासाठी हस्तातरील झाल्या आणि ज्यांकडे पारंपारीक शेती उदयोग करणाऱ्या शेतकऱ्यांना भूमिहीन होण्याची वेळ आली. असा कोणताही दुष्परिणाम होणार नाही, याची काळजी घेवून नैसर्गिक संपत्ती भविष्यातील मानव जातीच्या कल्याणासाठी उपयोगात येईल मानव नैसर्गिक संपत्तीचा कमीत-कमी वापर करुन जास्तीत जास्त वर्तमान काळातील गरजा पूर्ण होतील हा विचार शाश्वत विकासाचा आहे.

### १७.७.५ साधन संपत्तीचे शोध आणि मापन :

समाजा मध्ये निर्माण झालेल्या विविध समस्या आणि गरजा पूर्ण करण्यासाठी नैसर्गिक साधन संपत्ती उपयोगात आणता येईल यांचा शोध घेणे आवश्यक आहे. परंतू गरजा पूर्ण करतांना संपत्तीचे सर्वेक्षण महत्वाचे आहे. ज्यामुळे उपलब्ध नैसर्गिक संपत्ती नष्ट होईल याची काळजी घेणे गरजेचे आहे. जंगल, पाणी, हवा या घटकांचा मानवी गरजांसाठी उपयोग केला जातो. उदा. मानवाच्या दैनदिंन गरजापूर्ण करतांना लाकूड हा घटक सर्वाधिक वापरात आगला जातो. ज्वलन, फर्नीचर, कागद आणि इतर शोभेच्या वस्तू तयार करण्यासाठी तसेच शेती क्षेत्र वाढविणे, रस्ते बांधणे, ईमारती, उदयोग निर्माण करण्यासाठी जंगलाची कत्तल केली जाते. यामूळे पावसाचे प्रमाण कमी होते. पशुपक्षांच्या समस्या निर्माण होतात. यामूळे अनेक पशुपक्षाची जाती नष्ट होवू लागले आहेत. वाघांची संख्या बोटावर मोजण्याइतकी राहिली आहे. पावसाचे प्रमाण कमी झाल्यामूळे शेती पिकावर परिणाम झाला आहे. उदयोग, पिण्याचे पाणी यांची समस्या निर्माण होवू लागली आहे. यामूळे निसर्गातील प्रत्येक घटकांचा वापर करताना काळजी घेणे गरजेचे आहे. यासाठी शाश्वत विकासाला महत्व आले आहे.

वरील विविध दृष्टिकोनातून अभ्यास केल्यास आधूनिक काळात औदयोगिक आणि आर्थिक विकास शाश्वत विकास करणे महत्वांचे वाढू लागले असे दिसून येते.

### आपली प्रगती तपासा

शाश्वत विकासाची महत्व सांगा

_______________

_______________

_______________

_______________

## १७.८ शाश्वत विकासाचे घटक

सामाजिक आणि आर्थिक विकास हा शाश्वत विकास आहे. यासाठी पुढील काही शाश्वत विकासाचे घटक अभ्यासाने महत्वाचे आहे.

### १७.८.१ पर्यावरणात्मक घटक :

विकासाच्या नावाखाली साधनसंपत्तीचा मोठया प्रमाणात वापर केला जात आहे. यामूळे पर्यावरणाचे नुकसान होत आहे. मानवाकडून नैसर्गिक संपत्तीवर आक्रमण होत आहे. वनस्पती, प्राणी, खनिजे, वायू, सुर्यप्रकाश, पाणी, जमिन हे घटक धोक्यात येवू लागले आहेत. शाश्वत विकासाने नैसर्गिक घटकांचा अपव्यय थांबवून कमीत-कमी वापरामध्ये जास्तीत-जास्त गरजा पूर्ण करुन भविष्यासाठी नैसर्गिक साधनांचे जतरन करावे. हा घटक शाश्वत विकासाचा प्रमुख घटक आहे. निसर्गाचे प्रदूषण न होता उत्तम वातावरण निर्माण करुन मानवी गरजा पूर्ण करणारा विकास महत्वाचा आहे. विशेषतः खनिज संपत्तीचा साठा मर्यादित असतो. त्याची वाढ होवू शकत नाही. म्हणून खनिज तेल, खनिज वायू, दगडी कोळसा आणि इतर खनिज पदार्थ, कट-कसरीने नियोजन पूर्वक वापरात आणावेत हा शाश्वत विकासाचा महत्वपूर्ण घटक आहे.

### १७.८.२ सामाजिक घटक :

विकसनशील राष्ट्रामध्ये दारिद्रयाची समस्या गंभीर आहे. विशेषतः भारतामध्ये समाज विविध जाती-धर्मा मध्ये विभागलेला आहे. यापैकी काही घटकांना भरपूर साधन संपत्ती, सेवा-सुविधा आणि सामाजिक दर्जा प्रधान केला आहे. अनुसुचित जाती, आदिवासी, अपंग, यासारख्या आर्थिक दृष्टया आणि सामाजिक दृष्टया दूरलक्षित घटकाला अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजापासून वंचीत रहावे लागते. अन्न पाण्यावेण्या उपासमारीची समस्या उद्‌भवते बेकारी, दारिद्र्य, रोगाराई, कुपोषण, उपासमारी, अंधश्रध्दा, निरक्षरता यासारख्या अनेक समस्यांनी ग्रासलेल्या सामाजिक घटकांना, सामाजिक न्याय आणि मानवतेच्या दृष्टिकोनातून जगण्याचा अधिकार देण्याक्षणि शाश्वन विकासाच्या माध्यमातून अन्न, वस्त्र, निवारा, रोजगार, शिक्षण आणि सामाजिक समता मिळवून देणे हा शाश्वत विकासाचा एक प्रमूख आधार आहे. ज्यामूळे गरिब, श्रीमंत, वर्ण, धर्म, जात, स्त्रि-पुरुष, अपंग असा कोणताही भेद न करता शाश्वत विकास अपक्षीत आहे.

### १७.८.३ आरोग्यात्मक घटक :

पर्यावरणाच्या ऱ्हासांमूळे आरोग्याची समस्या निर्माण होते. गरीब श्रीमंत असा कोणताही भेद न करता प्रत्येक समाजाला आरोग्य विषयक समस्येला सामोरे जावे लागते. ज्या राष्ट्राची आरोग्य परिस्थिती विकसित असते. ते राष्ट्र प्रगत राष्ट्र म्हणून ओळखले जाते. कारण आरोग्यत्वा दूष्परिणाम रोजगारावर (श्रमावर) पडत असतो. रोजगाराच्या अभावामूळे उत्पादनावर परिणाम होवून दरडोई उत्पन्न घटते. यामूळे राष्ट्रीय उत्पादनात घट होवून देशाच्या विकासावर परिणाम होतो. म्हणून आरोग्य संवर्धन हा घटक शाश्वत विकासाचा आहे. शुध्द हवा, शुध्द पाणी, सकस आहार, निरोगी वातावरण हे आरोग्यसाठी उपयुक्त असते. हे केवळ पर्यावरण संवर्धनामुळेच शक्य आहे. तसेच आरोग्यसाठी विविध औषधोपचार, तज्ञ, डॉक्टर्स आणि कर्मचारी वर्ग यांची आवश्यकता असते. गरीब वर्गाना आरोग्याच्या, सेवा, आर्थिक दृष्टया न परवडण्याच्या असतात. म्हणून त्यांना औषधोपचार आणि शस्त्रक्रियेसाठी सवलत आणि मोफतीच्या दरात सेवा उपलब्ध करुन आरोग्य निवारण करावे. वेळोवेळी आरोग्य तपासणी

प्रतिबंधात्मक लस आणि आरोग्य विषयक प्रसार आणि प्रचार करुन सामाजिक आरोग्य सुधार करणे हा शाश्वत विकासाचा एक महत्वपूर्ण घटक आहे.

### १७.८.४ शैक्षणिक घटक :

मानवी जिवनाच्या सर्वांगीण विकासाची गुरुकिल्ली म्हणून शिक्षणाकडे पाहिले जाते. शिक्षणामुळे आज्ञनाचे ज्ञानात रुपांतर करुन मानवी गरजा पूर्ण करण्याचे साधन शोधून देणारे एक तंत्र म्हणून पाहिले जाते. आधूनिक काळामध्ये शिक्षणाचा प्रचार आणि प्रचार होवून विविध शाखा आणि विभाग निर्माण झाले आहेत. मुलांच्या जन्मापासून शिक्षणांला प्रारंभ होतो. सामाजिक नैतिक व्यवहारिक तात्वीक  असे विविध शैक्षणिक पैलू आहे. भारता मध्ये शिक्षण ही विशिष्ट सामाजिक घटकांची मतेदारी मानली होते. यामुळे सामान्य समाज शिक्षणापासून दूरावला गेला यामुळे वर्षानुवर्षे विकासापासुन  दूरक्षित समाज मागे राहिला म्हणून शाश्वत विकासा मार्फत दलित, आदिवासी, स्त्रिया, अंध-अपंग आणि इतर दूरलक्षित घटकांला शिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन देवून सामाजिक न्याय निर्माण करणे गरजेचे आहे. ज्यामुळे देशाचा सर्वांगीण विकास होईल.

### १७.८.५ आर्थिक घटक :

दैनदिंन जिवनामध्ये आवश्यक असणाऱ्या विविध गरजा पूर्ण करतांना आर्थिक घटकांवर अवलंबून राहावे लागते. यामूळे संपत्तीची साधने किंव्हा रोजगार महत्वाचा असतो. आर्थिक विकास साध्य करताना देशातील मूलभूत सेवा सुविधां विकास होणे गरजेचे असते. ज्यामुळे रोजगारा मध्ये वाढ होईल. शेती क्षेत्राचा विकास मूभलक पाणीपुरवठा रस्ते, दळण-वळण आणि तंत्रज्ञान हे घटक विकासाच्या दृष्टीकोनातून अतिशय महत्वाचे आहेत. यामूळे नवीन उदयोगाचा विकास होतो. कच्चा मालाचे पक्का मालात रुपांतर केले जाते. आणि मानवी गरजा बाजार पेठेत विक्रीसाठी ठेवले जाते यामधून रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होतात. ज्यामुळे देशाची आर्थिक समृध्दी होते. परंतू आर्थिक विकास करतांना पर्यावरणाचा कमीत कमी वापर करुन पर्यावरणाचे संवर्धन करुन आर्थिक विकास साधणे. हा शाश्वत विकासाचा एक प्रमूख घटक आहे. ज्यामूळे देशाच्या सर्वांगीण विकासाची संधी निर्माण होईल. असा विकास शाश्वत विकासाला अपेक्षीत आहे.

### १७.८.६ साधन संपत्तीचे संवर्धन :

शाश्वत विकासाचा एक महत्वपूर्ण घटक म्हणजेच उपलब्ध असणारी साधनसंपत्ती जतन करणे हा आहे. ज्यामुळे देशातील खनिज संपत्ती, जल संपत्ती, वनसंपत्ती, खनिज संपत्ती आणि बुध्दीमत्ता या सर्वांचे जतन करणे यामुळे देशात कोणत्याही प्रकारच्या समस्या निर्माण होणार नाही. याची काळजी घेणे. ज्यामुळे देशातील उपलब्ध साधन संपत्ती आणि मानवी गरजायांचे नियोजन करुन भविष्याचा विचार करुन नैसर्गिक संपत्तीचे जतन हा शास्वत विकासाचा आधार आहे. यामधील मनूष्य बळ विकास करुन सर्वांगीण विकासाचा एक प्रमुख आधार महत्वाचा आहे. ज्यामुळे देशातील विविध प्रकारच्या समस्येमधून मानवी गरजा पूर्ण करणारा एक मार्ग शोधण्याचे काम शाश्वत विकासाचे आहे. ज्यामुळे देशाला एक आदर्श आणि उत्तम विकास ज्या दृष्टिकोनातून सर्वांगिण विकास निर्माण करणे हा शाश्वत विकासाचा एक आधार आहे.

**१७.८.७ लिंगभेदाची जाणीव :**

स्त्रि-पुरुषाचे तुलना करताना क्रिया जिवशास्त्रीय नियमानुसार प्रजोत्पादन आणि बालसंगोपन यांचीशी संबंधीत आहे. यामुळे कुंटुंबचा एक प्रमुख आधार स्त्रिला मानले आहे. बालक दिर्ध काळ आईच्या सानिध्यात राहते. त्यामुळे मुलांवर सर्वात जास्त प्रभाव आईचे असतात. भारतामध्ये पुरुषप्रधान संस्कृतीनुसार विवाहानंतर मुलगी मुलाच्या घरी जाते. यामुळे आई-वडीलांच्या घरी मुलीला विशेष महत्व दिले जात नाही. संपत्तीचा वारसदार मुलाला ठरविले जाते. पुढे काळाच्या ओधात स्त्रियांवर धार्मिक, सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक निर्बंध काढून चूल आणि मूल या घटकात बंदिस्त ठेवले. म्हणून भारतीय स्त्रियाची आधोगती झाली. यामुळे वर्षानुवर्षे पुरुष वर्गाने स्त्रि-वर्गात अत्याचार केले. मारझोड, छेडछाड, छळवाद, अपहरण, बलात्कार, घटस्फोट, हुंडा, वैश्या व्यवसाय, बालविवाह यासारख्या अनेक समस्यांना स्त्रियांना सामोरे जावे लागते. महात्मा जोतिबा फूले राजाराम मोहनराय आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्री विकासाला वाचा मोडून यामुळे आज स्त्री पुरुषाच्या बरोबरीने कार्यकरताना दिसते. आधूनिक काळामध्ये स्त्रि पुरुष विषम प्रमाणात स्त्रियाकडे पाहण्याचा दृष्टिकोीन स्त्रि भ्रृण हत्या विनयभंग, बलात्कार यासारख्या अनेक घटना घटताना दिसतांत. शाश्वत विकास या आधुनिक विचारानुसार समतेचा दर्जा प्रदान करुन मानतेच्या दृष्टीकोनातून स्त्रियांना आर्थिक, सामाजिक, आधिकार मिळणे, गरजेचे आहे. ज्यामुळे संपूर्ण समाजाचा शाश्वत विकास होय.

**आपली प्रगती तपासा.**

शाश्वत विकासाचे विविध घटक कोणते आहे.

____________________

____________________

____________________

____________________

## १७.९ शाश्वत विकासाचे मुल्यमापन / वस्तुनिष्ठ अभ्यास (Case Studies)

शाश्वत विकासाची संकल्पना वनसंघर्षनामधून निर्माण झाली आहे. यामध्ये पर्यावरणाचे संरक्षण आणि पर्यावरणाचा विकास हे विचार महत्वाचे आहे. यामधून आर्थिक विकास पर्यावरण विकास आणि सामाजिक गरजा या दृष्टिकोनातून शाश्वत विकासाचा अभ्यास केला जातो. जंगलामधून खाद्य पदार्थ औषधी वनस्पती, कंदमूळे इत्यादीचे प्रमाण घटताना दिसते. कारण आर्थिक विकासासाठी पर्यावरणाचा ऱ्हास करून मोठ-मोठे कारखाने आणि प्रकल्पाची उभारणी केली. जाते. यामूळे पर्यावरण हा सजिव सृष्टिचा एक प्रमुख आधार आहे. अशा पर्यावरणाचे जतन करून मानवी घटकाचा विकास करुन आर्थिक प्रगती करणे ही एक शाश्वत विकासाची विचारधारा आहे.

विकसनशील राष्ट्रामध्ये शाश्वत विकासाची संकल्पना थोडी वेगळी आहे. आर्थिक विकास कमी असल्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास कमी प्रमाणात होतो. परंतु दारिद्रपरेषेची प्रमाण

खुपच जास्त आहे. बेरोजगारी, निरक्षरता, आरोग्य, उपासमारी आणि अंधश्रध्दा या समस्या भयानक आहेत. यामूळे विकासाच्या प्रक्रियेपासून हा गरिब घटक वंचीत राहिलेला आहे. पिढयानंपिढया दारिद्रयामध्ये जीवन जगणाऱ्या लोकांना अन्न, वस्त्र, आणि निवारा यासाठी संघर्ष करावा लागतो. यामूळे शिक्षण आरोग्य यासमस्येचा संबंध येत नाही. देशातील बहुसंख्य मनुष्यबळ विकसित प्रक्रियेपासुन दूर असल्यामुळे विकसनशील राष्ट्रांची प्रगती होवू शकत नाही. म्हणून यांचा पुरवठा करुन मनुष्य बळांचा उत्पादन कार्यासाठी उपयोग करुन घेणे.

आशिया खंडातील बहुसंख्ये देशांमध्ये स्त्री-पुरुष भेद करुन स्त्रियांना मूलभूत अधिकारापासून वंचीत ठेवले आहे. सामाजिक, आर्थिक, राजकिय, शैक्षणिक या सोयी सुविधापासुन स्त्रि वर्गाना दूर ठेवले आहे. पुरुषांच्या प्रभावामुळे स्त्रियांना हिन दर्जा देवून लैंगिक भेदभाव केला जात आहे. यामूळे गर्भजल परिक्षा, स्त्रि गर्भपात, मुलिंचे कुपोषण आणि शिक्षणापासुन वंचीत यामुळे स्त्रि पुरुष प्रमाणात फरक होवू लागला आहे. भविष्यात स्त्रि-पुरुष प्रमाणात फरक निर्माण झाल्यास अनेक समस्या निर्माण होवू शकतात. बलात्कार, छेडछाड, अपहरण किव्हा वेळ पडल्यास बहुपतीत्वाची परिस्थितीही निर्माण होवू शकते. म्हणून स्त्रि वर्गाचे संवर्धन हाही घटक शाश्वत विकासामध्ये समावेश होतो.

## १७.१० सारांश (Summary)

शाश्वत विकास ही एक नवीन विचारधारा जगामध्ये निर्माण झाली आहे. आर्थिक उदिष्टये साध्य करतांना पर्यावरणाचा विचार न करता केवळ आर्थिक विकासाच्या प्राप्तीसाठी पर्यावरणाचा अतिरिक्त वापर केला जातो. यामूळे अनेक समस्या निर्माण होवू शकतात चांगल्या पर्यावरणामूळे समृध्द आरोग्य आणि समतोल आर्थिक विकास मानवाला शाश्वत आणि चिरकाळ टिकणाच्या विकासाकडे घेवून जातो. तसेच भविष्यातील जीवन उज्वल होते. लोकसंख्या नियंत्रणामूळे नागरिकरणाला निरबंध होतो. विविध समस्या मर्यादा पडतात. जलसंपदेचे संरक्षण करुन प्रत्येक नागरिकांला पिण्याचे शुध्द पाणी उपलबध करुन देणे. शेती विकासामधून अन्नधान्यात वाढ करुन दारिद्रय कमी करणे ही कार्य शाश्वत विकासामधून साध्य होते. शाश्वत विकास दारिद्रय कमी करुन गरीब आणि श्रीमंत यांच्यातील दरी कमी करतो. यासाठी नैसर्गिक साधन संपत्तीचा नियोजनात्मक उपयोग करुन मानवी राहणीमान उंचावणे आर्थिक विकास करणे, लोकसंख्या शिक्षण, आरोग्य शिक्षण, व्यावसायीक शिक्षण यासारख्या विषयावर भर देणे हा शाश्वत विकासाचा आधार आहे. शाश्वत विकास व्यक्तीगत आणि समुदायीक स्वरुपाचा विचार करतो. शाश्वत विकासांची गरज आर्थिक विकासाबरोबर पर्यावरणाचे संरक्षण आणि सामाजिक न्याय यांच्याशी संबंधीत आहे. यामूळे शाश्वत विकास समाजाच्या सर्वसमावेशक विकासाचा विचार करतो. अन्न, आरोग्य, शिक्षण, रोजगार, राहणीमान या गोष्टी साध्य करतांना पर्यावरणाचा समतोल निर्माण करणे ही प्रत्येक व्यक्तीची जबाबदारी आहे. वर्तमानाच्या गरजाबरोबर भविष्याचाही विचार शाश्वत विकासामध्ये आहे.

## १७.११ प्रश्न (Questions)

१ शाश्वत विकासाचा अर्थ सांगून शाश्वत विकासाची गरज स्पष्ट करा.

२ शाश्वत विकासाच्या व्याख्या दया आणि शाश्वत विकासाचे घटक विषद करा.

३ शाश्वत विकासाचे विविध उद्देश लिहा.

४ शाश्वत विकासाचे आधूनिक काळातील महत्व सांगून घटक स्पष्ट करा.

५ टिपा लिहा.

१ शाश्वत विकासाची संकल्पना

२ शाश्वत विकासाच्या वस्तूनिष्ठ अभ्यास

३ शाश्वत विकासाचे महत्व

४ पर्यावरण आणि शाश्वत विकास

## १७.१२ संदर्भसूची (Reference List)


1) India Human Development Report 2011. Towards Social inclusion.

2) The gender and environment debate lessons from India (1997) - B. Agarwal

3) The Environment Development Debate in India. Economic and Political Weekly 45(42) 2010 - J. Ramesh

४) समाशजास्त्र डॉ. शैकेजा माने– निराळी प्रकाशन - पूणे

५) मानवी साधन संपत्तीचा विकास - स्मिता जोशी - आणि विद्या म्हस्के - प्रगती बुक्स प्रा.लि.पुणे

६) विकासाचे अर्थशास्त्र आणि कृषि प्रा. अपेक्षा जाधव - निराली प्रकाशन पुणे

७) समाजशास्त्र विश्वकोश - हरिकृष्ण रावत -रावत पब्लिकेशन, जयपूर


❖❖❖❖

# १८

# विकासाचा वैकल्पिक दृष्टिकोन भाग - २
# स्त्रिवादी दृष्टिकोन
# (Feminist Approach)

**घटक रचना :**


१८.१ उद्दिष्टये (Objective)

१८.२ प्रस्तावना (Introduction)

१८.३ स्त्रिवादी विविध दृष्टिकोन (Feminist Approach)

१८.४ स्त्रियांच्या अयोग्यता / लिंग विषमता

१८.५ स्त्रियांचा दर्जा सुधारणा

१८.६ स्त्रि विकासाच्या समस्या

१८.७ घरगुती आणि प्रजोत्पादन कार्यातील स्त्री भूमिका (Women's Role in the House hold Reproductive Sphere)

१८.८ भौतिक व सांस्कृतिक संबंधातील स्त्रियांचे स्थान

१८.९ संशोधन आणि ज्ञान उत्पादन तंत्रातील स्त्री योगदान

१८.१० सारांश (Summary)

१८.११ अभ्यासाचे प्रश्न (Questions)

१८.१२ संदर्भ सुची (Reference List)


## १८.१ उदिष्टये (Objective)

- स्त्रिवादी विचारांची ओळख करुन देण्यास मदत होईल.
- स्त्रि-पुरूष दर्जातील असमनतेचा आकलन होण्यास मदत होईल.
- स्त्रि विकासाच्या चर्चे मधून ज्ञान मिळण्यास मदत होईल.
- स्त्रियांची उत्पादनातील विविध भूमिकांचे उपयोजन होईल.

## १८.२ प्रस्तावना (Introduction)

स्त्रि विकास ही काळाची गरज आहे. नैसर्गिक दृष्टया स्त्रि आणि पुरूष जीवनजगण्यासाठी एकमेकास पुरक आहेत. म्हणून सामाजिक विकासाबरोबर स्त्रि विकास होणे

गरजेचे आहे. रुढी परंपरेप्रमाणे आधुनिक काळामध्ये लिंग भावाचा भेद करुन स्त्रियांना विकासापासून वंचीत न ठेवता स्त्रि विकासाला समान संधी मिळवून देणे हा स्त्रि विकास विषयक दृष्टिकोनाचा उद्देश आहे. स्त्रियांना परंपरे प्रमाणे हीनदर्जा न देता तिच्या व्यक्तीमत्वाचा विकास होईल असे सामाजिक वातावरण निर्माण करण्याची आवश्यकता आहे. आज अनेक स्त्रिया पुरुषाच्या बरोबरीने विविध क्षेत्रात कार्यरत आहे. त्यांनी प्रोत्साहन देवून इतर स्त्रियांनाही विकास प्रक्रियेत येण्याची संधी उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे.

स्त्रि-पुरुष भेद करुन आर्थिक निर्बंध लादून स्त्रियांना संपत्तीपासून उपेक्षीत ठेवले होते. जिवन जगण्यासाठी लागणाऱ्या अन्न, वस्त्रासाठी ही पुरुषांवर अवलंबून रहावे लागते. अशा स्त्रिया शैक्षणिक आणि औदयोगिक क्षेत्रामध्ये प्रगती करुन रोजगार आणि विविध व्यवसाय करुन आर्थिक कमाईवर स्वावलंबी झाल्याच्या दिसतात. परंतू काही ठराविक स्त्रिया स्वावलंबी झाल्यामुळे संपूर्ण स्त्रि जातीची आर्थिक समस्या संपणार नाही.

स्त्रि ही मानव आहे हा विचार करुन मानवतेचा दर्जा देणे आवश्यक आहे. पण इतिहासात स्त्रिया बाबत असे सांगीतले जाते स्त्रिची छळवणूक, पिळवणूक पूर्वी पासून चालत आली आहे. स्त्रि म्हटले की तिचा हिन दर्जा तिची अवहेलना अपमान मारहान जसे की दावणीला बांधलेले जनावर होय, या पध्दतीने तिला वागवणूक दिली. स्वातंत्र्य समता, बंधूता, सामाजिक न्याय या मानवी मुल्यापासून तिला अनेक वर्षे वंचीत ठेवले गेले. परंतू स्त्रियांच्या हक्कापासून दूर ठेवने हे मानवतेच्या दृष्टीकोनातून चांगले नाही. असे सांगणारा विचार म्हणजेच स्त्रि वाद होय. या विचार धारे मध्ये सावित्रीबाई फूले, पंडिता रमाबाई, ताराबाई शिंन्दे, महात्मा ज्योतीबा फूले, छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांच्या हक्कासाठी चळवळ उभी केली त्यास स्त्रिवादी चळवळ असे म्हणतात येईल जागतिकीकरण विज्ञानवाद पाश्चीमात्मयकरण आधुनिकीकरण यामुळे स्त्रिवादी विचारांना चालना मिळाली. रुढी परंपरेने स्त्रियांना मुलभूत हक्कापासून वंचीत ठेवले होते. पुरुष प्रधान संस्कृतीचा प्रभाव असल्यामुळे स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन भोगवादी स्वरुपाचा निर्माण झाला होता. ही परिस्थिती बदण्याची गरज आहे. समानतेचा दर्जा देवून महिला विकासाची आवश्यकता आहे. यासाठी संत तुकाराम, वर्धमान महाविर, गौतम बुध्द यांनीही अध्यात्मीक विचारातून नैसर्गिक शिकवण स्त्रि उध्दाराबद्दल दिलेले आहे. यामूळे स्त्रि-पुरुष भेदवर मोठी चर्चा होवूण स्त्रियांना समानतेचा दर्जा देण्याचा विचार स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी तरतूदी केली आहे. यामूळे स्त्रियांना आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि राजकिय अधिकार मिळालेले आहे. यामूळे स्त्रियांचे उन्नतीचे मार्ग मोकळे होवू लागले आहेत. भारतामध्ये जातीवाद, लिंगवाद, वंशवाद, त्याचप्रमाने स्त्रिवाद विरोध हा स्त्रि शोषणाचा विरूध्द विचार सांगणारा एक प्रवाह आहे. तसेच उध्दार मतवाद, मार्क्सवाद, समाजवाद या मध्येही स्त्रि विषयक दृष्टिकोनाचे चर्चा करण्यात आली आहे. यामूळे स्त्रि आणि पुरुष यांच्यातील दरी कमी करण्याचा प्रयत्न होवू लागले आहेत. औदयोगिक क्षेत्रामध्ये स्त्रि योगदान दिवसेन दिवस वाढतांना दिसत आहे.

## १८.३ विविध स्त्रिवादी दृष्टिकोन (Feminist Approach)

### १८.३.१ उदारवाद :

उदारवादी विचाराची सुरुवात १८ शतकाल झाली त्याकाळात बुध्दीप्रमान्यवाद आणि तात्विक विचाराला सुरुवात झाली. या कालावधीन स्त्रियांना अनिष्ट चालीरिती असून मुलींना

समानतेचा दर्जा प्रधान करावा. या बाबत अनेक विचारवंतानी आपले विचार मांडले. मेरीव्हिकॉन्ट यांनी स्त्रियांच्या हक्का विषयी समर्थन करणारे पुस्तक प्रसिध्द केले. स्त्रियांना समाजात मान, सन्मान, भावना आणि बुध्दिमत्ते विषयक विचार मांडले स्त्रियांना आरोग्य, स्वातंत्र्य इत्यादी यावर अधिकार देवून स्त्रि विकास करावा. रुसो सारख्या थोर विचारवंतानी स्त्रि-पुरुष विषमतेवर झोड उठवली तर एमीलडर खाईम यांच्या मते, स्त्रि-पुरुष भेदभाव शिक्षणाचा विकास करण्याचे विचार मांडले. आधूनिक काळात उदारमतवादी विचारसरणीमध्ये ज्युसी बनॉर्ड या लेखीकेने विवाह संस्थेमुळे स्त्रियांना दुय्यम दर्जा प्राप्त झाला. असे म्हटले आहे. बेटी प्री डन्ट यांनी स्त्रिवादाचे गूढ यावर एक ग्रंथ प्रसिध्द केला. यामध्ये मध्यम वर्गीय स्त्रियांच्या समस्या मांडलेल्या आहेत. याच काळामध्ये अमेरिकन स्त्रियांना मोकळा वेळ कशा घालवावा याची तुलना स्त्रिवादी विचाशत केली जाते. भारतीय स्त्रियांना उठल्यापासुन झोपेपर्यंत काय काय करावे लागते याची तुलना स्त्रिवादी विचारात केली जाते. भारतीय समाजामध्ये सती प्रती बंधी, बाल विवाह प्रतिबंध, केशोपण, यासारख्या प्रथ बंद होणून ही कायदयात्मक बदल आवश्यक आहे. स्त्रि आणि पुरुषाच्या श्रमात तफावत असली तरी दोघांना समान दर्जा महत्वाचा आहे असे विचार उदारमतवादी विचारात म्हटले आहे. स्त्रियाच्या प्रत्येक्ष श्रमाचा सन्मान झाला पाहिजे याचा प्रारंभ घरापासून होणे आवश्यक आहे. निवळ पुरुष श्रेष्ठ हा विचार बदलावा समानतेच्या मार्गाने समाजाचा विकास करावा वेळ प्रसंगी कायदयाची मदत ध्यावी लागते आणि स्त्रि-पुरुष समानता निर्माण करावी कसा स्त्रि वादा बाबात उदारमतवादी विचार मानतो.

**१८.३.२ मार्क्सवाद :**

मार्कवादी दृष्टिकोनातून असे म्हटले जाते, कुटुंबाच्या उत्पासनात बदल झाला. तर कुंटुंब व्यवस्था बदलते. कुंटुंब व्यवस्थेची स्त्रिया संबंध धनिष्ठ असल्यामुळे स्त्रियांना सामाजिक दर्जा बरोबर मालमत्ते विषयक अधिकार महत्वाची आहे. स्त्रियाना उपभोगाची वस्तु मुलांना जन्म देणारी मशिन न मानता मानवी जीवनाकडे अस्थीत्वाच्या दृष्टिकोनातून महत्वाची आहे. एक विवाह पध्दत रूढ झाली व राज्य संस्थेचा उदय होवून कायदे निर्माण झाले. आर्थिक दृष्टया स्त्रि-पुरुषांवर अवलंबून असते त्यामूळे मालमत्तेचा हक्क पित्याकडून पुत्राकडे जातो. मालमत्तेवर पुरुषांचा अधिकार असल्यामूळे पुरुषांचे वर्चस्व स्त्रियांवर राहिलेले आहे. त्यामूळे पुरुषांमध्ये आर्थिक सत्ताधीश होण्याची भूमिका वाढली आहे. स्त्रि ही आर्थिक दृष्टया स्वावलंबी झाली तर पुरुषांवर वर्चस्व निर्माण होईल. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत स्त्रि मुक्ती होवून स्त्रि कामगाराची संख्या वाढेल. यामुळे पुरुषांचे वर्चस्व कमी होवून समानता निर्माण होईल. एक विवाह पध्दत रूढ होवून संयुक्त कुंटुंवपध्दती अस्तित्वात येईल. खाजगी मालमत्तेचा अधिकार पुरुषाकडे असल्यामुळे स्त्रियाना नेहमी नमते ध्यावे लागत होते. स्त्रि आर्थिक दृष्टया स्वावलंबी झाल्यास पुरुषांच्या स्वातंत्र्यावर बंधने येतील. भांडवलशाही अर्थ व्यवस्थेत स्त्रि कामगाराची आवश्यकता आहे. कारण उदयोगासाठी जास्तीतजास्त कामगाराची गरज असते. तर उच्च वर्गातील स्त्रिया भांडवलशाहीलांच पोषक कार्य करतील कारण त्यांना पैशाची पारशी गरज नाही. उच्च वर्गीय स्त्रियांना प्रतिष्ठा आपोआप मिळते. स्त्रि जर आर्थिक दृष्टया स्वावलंबी झाल्या तर स्त्रि-पुरुष समानता म्हणजे साम्यवाद आपोआप निर्माण होईल.

**१८.३.३ समाजवाद :**

समाजवाद हा स्त्रि वादाशी विचार मांडणारा एक महत्वपूर्ण दृष्टिकोन आहे. भारतातील बहुसंख्य स्त्रिया स्त्रियावादाच्या पाईक आहेत. समाजवाद म्हणजे मर्क्सवादी विचार मांडणारा एक महत्वपूर्ण दृष्टिकोन होय. स्त्रि शिक्षणाबाबात कार्ल मर्क्स म्हणतो भांडवलवादा मुळे स्त्रियांचे शोषण

झाले आहे. स्त्रियांचा कनिष्ट खाजगी मालमत्तेच्या अधिकारामुळे आणि पितृसत्ताक कुंटुंब पध्दतीमुळे झालेला आहे. समाजामधील उत्पादन अवस्था लैंगीक अवस्था आणि सामाजिककरण अवस्था यातीन महत्वपूर्ण अवस्थेमध्ये स्त्रियांच्या दूबळेपणाची कारणे आहेत. स्त्रियांना दुय्यम दर्जा विषयी मार्कवादी स्त्रिवाद म्हणतो. स्त्रियांचे शोषन कसे होते? स्त्रियांवर अत्याचार का होतात? यास केवळ भांडवल शाही पित्रसत्ताक व्यवस्था जबाबदार आहे. यांनी स्त्रियांचे शोषण केले आणि स्त्रियांना हीनदर्जा दिलेला आहे. तर क्रांतीकारी स्त्रिवाद म्हणतो. स्त्रियाबाबत दडपण टाकण्याची प्रवृत्ती ही सत्ताधिशाची आहे. वरचे लोक खालच्या वर्गातील लोकांवर दबाव टाकतात किंव्हा सत्ताधीश जनतेला दडपतात किंव्हा गोऱ्या वर्णाचे लोक काळया वर्गाच्या लोकांचे शोषन करतात. अशाच पध्दतीने पुरुषाकडून स्त्रियांवर सत्ता गाजवली आहे.

### १८.३.४ स्त्रि मुक्ती चळवळ :

प्रगत राष्ट्रामध्ये स्त्रियांच्या विविध प्रश्नावर चळवळी निर्माण झाल्या. या चळवळींना स्त्रियांच्या विविध समस्येची जाणीव होती. पुरूषांच्या बरोबरीने समतेच्या दर्जा प्राप्त करून देण्यासाठी स्त्रिवादी चळवळी निर्माण झाल्या. सुशिक्षित माता असल्यास कुंटुंबाचा विकास होतो. स्त्रि शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि सामाजिक दर्जा या बरोबर स्त्रियावरील अत्याचारांचे प्रश्न यांतरण विचारात मांडले गेले. यामूळे जगातील प्रत्येक स्त्रि मुक्त झाली पाहिजे. तिला सर्व हक्क मिळाले पाहिजेत मानतेचा दर्जा प्रधान केला पाहिजे यामुळे स्त्रियांचा आवाज खुला करण्यासाठी स्त्रि मुक्ती चळवळीचे योगदान महत्वाचे राहिले आहे. साहित्य प्रसार माध्यमे यांनी स्त्रि दुःख वर वाचा फोडण्यासाठी महत्वाची भूमिका पार पाडली आहे. यामध्ये स्त्रियांच्या दय्यम दर्जा बद्दल प्रश्न घेवून येणाऱ्या अनेक चळवळीमध्ये शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार आर्थिक प्रगती वैज्ञानिक शोध यामूळे स्त्रि चळवळी सक्षम बनली आहे.

### १८.३.५ पुरोगामी दृष्टिकोन :

स्त्रियांच्या सर्वांगीण विकासामध्ये पुरोगामी विचाराचे योगदान महत्वाचे आहे. भारतामध्ये राजाराम मोहन राय, महात्मा फूले, सावित्रीबाई फूले, कॉग्रेंस चळवळ, स्वातंत्र्य लढा, अंधश्रध्दा निर्मूलन समिती, मानवी हक्कस अभियान, दलित चळवळ आणि शासनाच्या विविध योजना यामूळे स्त्रियांच्या पुरोगामी विकासाचा विचार पुढे आला. परंपरेने निर्माण केलेल्या निबर्धांमधून स्त्रि मुक्ती केली गेली.

स्त्रियांच्या विकासाकरीता वरील विविध विचार परंपरेचा मोलाचा वाटा आहे. ज्यांनी स्त्रि-पुरुष विषमतेच्या विरोधात आवाज उठवून स्त्रियांना सामाजिक, मानसिक, आर्थिक नैतिक, राजकिय, अधिकार मिळवून देण्यासाठी महत्वाचे योगदान केलेले आहे.

### आपली प्रगती तपासा

स्त्रि विकासास योगदान करणारे प्रमुख दृष्टिकोन कोणते?

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

## १८.४ स्त्रि अयोग्यता आणि लिंग विषमता

समाजातील पुरुष प्रधान विचार धोरणे स्त्रियांना दुय्यम स्थान देवून स्त्रि विकासाला पुढील प्रमाणे अडथळा निर्माण केला.

### १८.४.१ सामाजिक विषमता :

पुरुष प्रधान विचाराने स्त्रियांना दुय्यम दर्जा देवून स्त्रि पुरुष विषमता निर्माण केली. यामूळे स्त्रियांना हिन मानले गेले. शिक्षणासारख्या मुलभूत घटकांपासून वंचीत ठेवले गेले. यामूळे नोकरी क्षेत्रामध्ये स्त्रियांना कमी महत्व देवून असमान वेतन, कामाचे तास, जबाबदाऱ्या पासून दूर ठेवले गेले. सामाजिक संघटनामध्ये स्त्रियांना दूर ठेवून राज्यसंस्था, धर्मसंस्था आणि अर्थसंस्थेवर प्रभाव निर्माण केला गेला. यामूळे सामाजिक अयोग्यता आणि विकास क्षेत्रापासून दूर ठेवून सामाजिक अयोग्यता मानून स्त्रियांना मूलभूत घटकांपासून दूर ठेवले गेले.

### १८.४.२ कौटुंबिक अयोग्यता :

कुंटुंबामध्ये पुरुषांची उपन्ती म्हणजेच त्याची दासी आहे असे मानले. पुरुषांच्या अगोदर कोणताही मान-सन्मान देण्याचा अधिकार नाही. बालपनी पित्याचा आधार प्रौढपणे पतीचा आधार आणि वृध्दपणे पुत्राचा आधार असा कौटुंबिक दर्जा दिला गेला. बालपनी परक्याचे धन समजून माता-पित्याकडून दुर्लक्ष केले तर सासरी गेल्यानंतर सासरऱ्या मंडळीकडून सुनेचा छळ केला जातो. तर पती निधनानंतर विधवेचे आयुष्य अतिशय कठिण असते. एकंदरीत कुटुंबामध्ये स्त्रियांना अयोग्य दर्जा दिला आहे.

### १८.४.३ आर्थिक विषयमता :

रूढी परंपरेने स्त्रिला पिता आणि पती या दोघांच्याही संपत्तीचा अधीकार नव्हता. विवाहात हुंडा दयावा लागतो. म्हणून कुटुंबातील मंडळीकडून सतत बोलले जाते. तर सासरच्या मंडळीकडून हुंडा कमी आणला म्हणून ऐकावे लागे. नोकरी धंदयासाठी कुटुंबाच्या बाहेर जाण्याचा अधिकार नव्हता. यामुळे आर्थिक दृष्टया पुरूष वर्गावर अवलंबून राहावे लागे. यामूळे आर्थिक दृष्टया, विषमता निर्माण झाली.

### १८.४.४ राजकिय अयोग्यता :

भारतीय स्त्रियांना १९१९ पर्यंत राजकिय अधिकारापासून दूर ठेवले होते. प्रथमाच ब्रिटिश कालामध्ये सुधारणा करुन स्त्रियांना मतदानाचा अधिकार देण्यात आला. तरीही पुरुष दबावाच्या म्हणजेच पती आज्ञेच्या बाहेर जावून स्त्रियां आजच्या आपल्या राजकिय अधिकाराचा उपभोग घेत नाही. स्थानिक स्वराज्यसंस्थेत स्त्रि-आरक्षणामूळे अनेक स्त्रिया राजकिय पदावर आल्या पण त्यांचे अधिकार पती किंव्हा पुत्र वापरत असल्याचे निर्दक्षणास येते. यामूळे स्त्रियांना राजकिय अधिकार मिळूनही त्याचा योग्य वापर करण्याचा अधिकार स्त्रियांना नाही. अप्रत्यक्षपणे पुरुषवर्गांनी राजकिय अधिकार हिरावून घेतले आहे.

### १८.४.५ धार्मिक अयोग्यता :

धार्मिक अयोग्यतेच्या संदर्भामध्ये हिंदू आणि मुस्लीम स्त्रियांना धर्मगुरु होण्याचा अधिकार नाही. यामूळे स्त्रियांना पुजे अर्चमध्ये सहभागी करतानंना केवळ पुरुषांची अर्धांगीणी म्हणूनच उभे केले जाते. धर्माने स्त्रियांवर अनेक निर्बंध काढून पुरुषांची गुलामगिरी करण्यास भाग पाडले आहे. यामूळे धार्मिक दृष्टिकोनातूनही स्त्रियांना कमी महत्व दिलेली आहे.

### १८.४.६ मानसिक दृष्टिकोन :

निर्सगता स्त्रिया, भावनिक, प्रेमळ आणि दयाळू असतात. याचा फायदा घेवून स्त्रियांवर प्रभाव निर्माण करण्याचा प्रयत्न पुरुष वर्गानी शारिरिक दृष्टया दूबळेपणामूळे स्त्रि-पुरुचा सामना करु शकत नाही. यामूळे आपला बळाचा वापर करुन मारझोड भिती या मुळे स्त्रियामध्ये मानसिक न्युनगंड निर्माण होवून परुषांचा प्रभाव स्विकारला आहे. यामुळे स्त्रियांची मानसिक स्थिती विकसीत हवी तशी होवू शकत नाही.

**आपली प्रगती तपासा :**

लिंग विषमता निर्माण होण्यास कोणते घटक जबाबदार आहेत ?

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## १८.५ स्त्रियांचा दर्जा सुधारणा

स्त्रियांचा सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि राजकिय दृष्टिकोनातून दर्जा सुधारण्यासाठी पुढील प्रमाणे काही योजना उपयोगात आणल्या आहेत.

### १८.५.१ समान सामाजिक दर्जा :

स्त्रियांना समान सामाजिक दर्जा मिळवून देण्यासाठी मोठी जनजागृती होत असताना दिसून येते. आज स्त्रिया स्वतंत्रपणे घराबाहेर जावू शकतात. मनोरंजनासाठी सिनेमे पाहू शकतात, विविध दुय्यम संघटनेचे सदस्य बनून सामाजिक कार्यक्रम करु लागले आहेत. स्त्रि-पुरुष बरोबरीने रोजगार करु लागले आहेत. म्हणून काही प्रमाणात विषमता दूर होवून सामाजिक सुधारणा दिसून येते.

### १८.५.२ कौटुंबिक आणि विवाहासंबंधी सुधारणा :

आधुनिक काळामध्ये कुटुंबातील निर्णय स्त्रि-आणी पुरूष हे दोघेही सामूहिक घेतात. बालविवाह कायदा, हिंदू विवाह कायदा, घटस्फोटाचा अधिकार , वारसा अधिकार, हुंडा प्रतिबंध कायदा यासारखे अनेक कायदे करुन कुटुंबात स्त्रिंना अधिकार देण्यात आलेले आहेत. विधवा पुर्नविवाह कायदा, अंर्तजातीय विवाहास मान्यता, पोटगी मागण्याचा अधिकार स्त्रियांना देण्यात आला. यामूळे कुटुंब आणि विवाहाच्या संबंधात स्त्रियांच्या दर्जा सुधारु लागला आहे.

### १८.५.३ शिक्षणाचा अधिकार :

भारतीय रूढी परंपरेने स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार दिला नव्हता. महात्मा जोतिबा फूले आणि सावित्रीबाई फूले यांनी मुंलीची शाळा सुरु करुन स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार दिला गेला. स्वातंत्र्यानंतर स्त्रि शिक्षणाला चालना मिळाली. २००९ मध्ये प्रत्येक मुला मुलींना शिक्षण घेण्याचा घटनात्मक मुलभूत अधिकार दिला आहे. यामूळे स्त्रियांची शैक्षणिक प्रगती होवून उच्च पदस्थ पदावर स्त्रिया विराजमान होताना दिसतात.

**१८.५.४ आर्थिक समता :**

आर्थिक विषमता दूर करण्यासाठी १९५५ च्या हिंदू कोडविला मध्ये स्त्रियांना पती आणि पिता दोघाच्याही मालमत्तेचा अधिकार मिळाला. तसेच पुरुषा प्रमाणे स्त्रियाही नोकरी किंवा व्यवसाय करुन आर्थिक स्वावलंबी होवू लागल्या आहेत. यामूळे पुरुषावर आर्थिक घटकासाठी आधारित राहण्याची गरज नाही. अल्प बचत गट अंतर्गत स्त्रि सबली करण्याची योजना राबविली जाते. दलित आणि आदिवासी स्त्रियांच्या आर्थिक विकासाकरीता अनेक कल्याणकारी योजना राबविला जातात.

**१८.५.५ राजकिय समानता :**

स्त्रियांना भारतीय राज्यघटनेने मतदानाचा अधिकार दिला यामूळे राष्ट्रीय राजकारणापासून स्थानिक राजकारणापर्यंत स्त्रियांच्या भूमिकेला विशेष महत्व आलेले आहे. यामूळे स्त्रियांना पंतप्रधान पदापासून ग्रामपंचायतीच्या सरपंच पदापर्यंत विविध पदे भुसविले आहेत. राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, इंदिरागांधी पंतप्रधान, तर मुख्य मंत्री म्हणूनच जय ललीता, मायावती, राबडीदेवी, उमाभारती यासारख्या स्त्रिया पुढे आलेल्या आहेत.

**१८.५.६ स्त्रि आरक्षण :**

स्त्रियांना शिक्षण, नोकरी क्षेत्रामध्ये आरक्षणांचा अधिकार दिलेला आहे. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेत ५० टक्के पदे स्त्रि वर्गासाठी राखीव असतात. ज्यामुळे स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने शिक्षण रोजगार आणि राजकिय क्षेत्रामध्ये अधिकार मिळाला आहे.

**१८.५.७ घटनात्मक तरतूदी :**

भारतीय राज्यघटनेने स्त्रियांना समानतेचा अधिकार देण्यासाठी अनेक योजना आणि कायदे निर्माण केले आहेत. ज्यामुळे स्त्रियांवर अन्याय होणार नाही. भारतीय राज्यघटनेने समानतेचा अधिकार दिलेला आहे. हिंदू कोडविलातंर्गत स्त्रियांना मालमत्ते विषयक आणि वैवाहिक सुधारना संदर्भातील कायदे गेले आहे. घटस्फोट, पुर्नविवाह, पोटगी, विधवा विवाह, आंर्तजाती विवाह, बालविवाह, यासारखे अनेक कायदे केलेले आहेत. ख्रिश्चन स्त्रियासाठी ख्रिश्चन लॉ, तर मुस्लिम स्त्रियांसाठी मुस्लिम वैयक्तिक कायदा करुन तलाक, मेहरची रक्कम परत आणि पोटगीचा अधिकार दिलेला आहे. आदिवासी स्त्रियांसाठी कश्मिरी लॉ पास केलेला आहे. ७३व्या घटना दुरूस्तीनुसार पंचायत राज कायदा करुन स्थानीक स्वराज्य संस्थेत स्त्रि आरक्षण निर्माण केलेले आहेत. माहितीचा अधिकार तर ग्रामीण स्त्रियांना रोजगार देण्यासाठी ग्रामीण रोजगार हमी योजना (नरेगा) कायदा केलेला आहे. कौटुंबिक हिंसाचार, स्त्रि हिंसाचार, लैंगिक अत्याचार या सारखे अनेक कायदे केलेले आहेत. ज्यामुळे महिला सक्षीमीकरण होवून स्वावलंबी आणि स्वाभिमानी जिवन जगण्यास मदत होईल.

**आपली प्रगती तपासा :**

स्त्रियांचा दर्जा सुधारण्यासाठी काय करणे आवश्यक आहे.

## १८.६ स्त्रि विकासाच्या समस्या

शासनाने विविध योजना आणि कार्यक्रमासाठी आखणी करुनही स्त्रियांना सर्वांधीन विकास शक्य नाही. कारण स्त्रियांच्या आर्थिक विकासाला सामाजिक मानसिकता मदत करत नाही. आजही भारतीय विकासा मध्ये स्त्रियांचे प्रमाण कमी आहे. त्यांना दूर्बल घटल समजून श्रम शक्तीला दुय्यम दर्जा दिला जातो. त्यास पुढील प्रमाणे बाबी जबाबदार आहेत.

### १८.६.१ स्त्रि श्रमाला बाजार मुल्यापासून दुरलक्षीत :

स्त्रियांच्या उत्पादक श्रमाचा विचार केला असता देशातील बहुसंख्य समाज शेतीवर आधारित आहे. शेतीची बहुसंख्य कामे स्त्रियांकडून करुन घेतली जातात. अल्पकधारक शेतीमध्ये कौटुंबिक सदस्यत्व श्रम करतात. परंतू उत्पादन झाल्यानंतर केवळ कुंटुंबाचा प्रमुख या नात्याने पुरुषाचे उत्पन्न म्हणूनच गनले जाते. आणि शेतामध्ये स्त्रियांचे श्रम दूरलक्षीत केले जाते. जवळपास अडीज कोटी पेक्षा जास्त स्त्रिया शेतमजूर आहेत.

### १८.६.२ कमी मजूरी दर :

स्त्रि आणि पुरुषांच्या कामाचे विभाजन करुन पुरुषांच्या मजूरीपेक्षा स्त्रियांची मजूरी यात फरक असतो. औदयोगिक क्षेत्रामध्येही स्त्रियांच्या वेतनाच्या संदर्भात फरक केला जातो. यामूळे स्त्रियांचे आर्थिक शोषन होते.

### १८.६.३ असंघटित क्षेत्रातील स्त्रि कामगार :

असंघटीत क्षेत्रातील कामामध्ये ईमारत बांधकाम, चहाचे मळे, शेती व्यवसाय, घरकाम करणारी स्त्रि (मोलकरनी) रबरी मळे, झाडूवाला, कचरा वेचणारे, भाजीपाला विक्रेने यासारख्या क्षेत्रामध्ये जास्तीत जास्त स्त्रि कामगार असतात. शहरी भागात, खानावळ चालविणे, मेनबत्ती, अगरबत्ती, लोणचे, पापड, मसाले इत्यादी उदयोगामध्ये स्त्रि कामगार श्रम करतात श्रमपेक्षा मजूरी मात्र कमी असते.

### १८.६.४ घरगुती उदयोग :

औदयोगिकीकरणामुळे घरगुती आणि कुटीरदयोग बंद पडले आहेत. सुतार, लोहार, शिंपी वगैरे कारागिर शहराकडे स्थळांतरीत झाले आहे. त्यामूळे पुरुषांच्या रोजगारात गरजा मागणे कठिण असल्यामुळे स्त्रिया ही असे उदयोग करताना दिसतात.

### १८.६.५ अदृश्य कामे :

स्त्रिया कुटुंबातील घरकाम, स्वयंपाक बाल, संगोपन, पाहूनचार आणि घरातील मंडळीची शेवा ही कामे अदृश्य स्वरूपाची आहेत. कारण त्याचे श्रमीक मुल्य दिलेही जात नाही आणि त्यांची गणना श्रमामध्ये होत नाही. यामूळे अशी अनेक कौटुंबिक आणि सामाजिक कामे अदृश्य स्वरूपाची आहेत.

### १८.६.६ स्त्रि श्रमाचे अवमूल्यन नाही :

स्त्रियांनी प्रजोत्पादन बालसंशोधन, स्वयंपाक, घरकाम, या श्रमाचे अवमूल्यंन केले जात नाही. कारण त्यांची बाजारात विक्री होत नाही. जे बाजारात विकले जात नाही त्याचे अवमुल्यन केले जात नाही. म्हणून स्त्रियांच्या या श्रमाचे योग्य मुल्यांकन होवू शकत नाही.

### १८.६.७ महिलांचा दूहेरी संघर्ष :

बहुसंख्य महिलांना रोजगारासाठी घराबाहेर जावे लागते. आणि त्यानंतर आपल्या कुटुंबाची जबाबदारी म्हणून गृहीणी प्रमाणे घरकाम, बालसंगोपन, आणि इतर सदस्यांची सेवा करावी लागते. यामूळे अशा दूहेरी भूमिकेचा मानसीक शारिरिक आणि बौध्दीक तान तनावाला सामोरे जावे लागते.

वरील विविध बाबीमध्ये स्त्रियांच्या श्रमाला दुय्यम दर्जा देवून स्त्रि अवहेलना केलेली आहे. भारतीय स्वातंत्र्या नंतर अनेक विकासाच्या राष्ट्रीय योजना आमलात आजूनही स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य मिळालेले नाही. तरीही स्त्रियत्वा विकासा करीता संघर्ष चालूच आहे.

**आपली प्रगती तपासा :**

स्त्रियांच्या आर्थिक विकासाला अडथळा करणाऱ्या बाबी कोणत्या आहेत.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## १८.७ घरगुत्ती आणि प्रजोत्पादन कार्यातील स्त्रि भूमिका (Women's Role in the House hold Reproductive Sphere)

### १८.७.१ उत्पादक भूमिका :

स्त्रिया रूढी परंपरेने अनेक बंधनामध्ये बंदीस्त होत्या. स्वातंत्र्य, समता, बंधूता या मानवी मूल्यापासून वैचारीक प्रबोधन होवून दूर्बल घटकांना आपली क्षमता सिध्द करण्याचे अधिकार मिळाले. भारतीय संघराज्याने समानतेचा घटनात्मक अधिकार दिल्यानंतर स्त्रियांनी शिक्षण घेवून रोजगार आणि उत्पादन कार्यामध्ये योगदान केले. शेती उदयोग, कारागीरी, हॉटेल व्यवसाय, पर्यटन, व्यापार, दळणवळण यासारख्या क्षेत्रात स्त्रियांचे कार्य महत्वाचे आहे. अविकसित राष्ट्राला विकासाच्या दिशेने स्त्रिया - पुरुषांच्या बरोबरीने उत्पादन आणी शेवा क्षेत्रामध्ये आपले योगदान करतांना दिसतात. यामूळे स्त्रियाही पुरुषांप्रमाणेच उत्पादन क्षेत्रामध्ये योगदान करुन राष्ट्रीय विकासाल आपला महत्वपूर्ण ठसा उमटवतांना दिसतात. ज्यामुळे देशाच्या विविध गरजा पूर्तीमध्ये स्त्रियांचा विचार महत्वाचा आहे. यामूळे स्त्रिया आपली उत्पादक क्षमता सिध्द करताना दिसून येतात.

### १८.७.२ प्रजोत्पादन आणि घरगुती भूमिका :

स्त्रियांना निर्सगतः मादी जातीची जैवीक जबाबदारी दिलेले आहे. गर्भधारना, मुलाला जन्म देने आणि बालसंगोपन या घटकापासून स्त्रि विकास होऊ शकत नाही. या कालावधीन अनेक आरोग्य विषयक समस्येला सामोरे जावे लागते. यामूळे देशातील समान सातत्यामध्ये स्त्रियांचे योगदान महत्वाचे आहे. जन्माला आलेल्या बाळाच्या पालन पोषना बरोबर सरकार करण्याची प्रथम जबाबदारी आईची असते. आईचा स्वभाव आणि विचार नवजात बालकाकडून आत्मसात केले जातात. यामुळे स्त्रियांना व्यापक दृष्टिकोनातून समाजाच्या सर्वांगीण विकासाची

भूमिका पार पाडावी लागते. कारण उदयाचे सामाजिक भविष्य स्त्रि घडवू शकते. असे महत्वाचे स्थान स्त्रियाचे आहे.

बालसंगोपणा शिवाय घरातील विविध कामे स्त्रियांना करावी लागतात. स्वयंपाक बनविणे, कपडे धूणे, घरसाफ करणे, आजारी व्यक्तीची शेवा करणे, निराधाराना आधार देणे, कुटुंबातील प्रत्येक सदस्यत्वा आवडी निवडी आणि विविध गरजांचा पुरवठा करणे यामूळे स्त्रियांना दिवसभर विविध प्रकारची श्रमाची कामे करावी लागतात. परंतू येवढे श्रम करुनही त्याला बाजारमुळे नसल्याने त्याची आर्थिक किंव्हा सामाजिक किंमत होत नाही. यामुळे स्त्रियांना आर्थिक दर्जा मिळत नाही.

### १८.७.३ सामाजिक व्यवसाय भूमिका :

स्त्रियांना समाजातील विविध सण-समारंभ आणि आनंद उत्सोव यामध्ये महत्वाची भूमिका पार पाडावी लागते. यामध्ये नियोजनात्मक आखणी करुन कार्यक्रमाची रुपरेषा सुशोभीकरण स्वागत यासारख्या अनेक सामाजिक कार्यक्रमामध्ये योगदान महत्वाचे असते ज्यामुळे विविध राष्ट्रीय आणि सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये स्त्रियांचा सहभाग दिवसेन-दिवस वाढताना दिसतो. स्त्रि ही पुरुषाप्रमाणे सार्वजनिक व्यवस्थापनाची जबाबदारी स्विकारु शकते. अनेक समारंभ यशस्वी रित्या पार पाडू शकते. ज्यामुळे सामाजिक सांस्कृतिक, धार्मिक, राष्ट्रीय एकात्मते मध्ये स्त्रियाची भूमिका महत्वाची असते. उदा. लता मंगेशकर यांचे "ऐ मेरे वतन के लोगो" हे गीत राष्ट्रीय एकात्मतेची भावना जागृत करते. यासारख्या अनेक स्त्रिया सामाजिक, सांस्कृतीक, समारंभा मध्ये आपले योगदान देताना दिसतात.

**आपली प्रगती तपासा**

स्त्रि विकासातील विविध भूमिका सांगा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## १८.८ भौतिक आणि सांस्कृतिक संबंधातील स्त्रियाचे स्थान

आधुनिक काळामध्ये लैंगीकभाव, विषमता संपवून समानतेच्या दिशेने विविध स्तरावर स्त्रिया विकासाची गती प्राप्त करू लागल्या आहेत. परंतू अद्यापही त्या दिशेने हवी तशी प्रगती झालेली नाही. विकास हा केवळ राष्ट्रीय उत्पादनाच्या आधारे मोजायचा नसतो. सामाजिक प्रगतीचेही मोजमाप होने आवश्यल आहे. असे १९९५ च्या यू.एन.डी.पी. यूनो च्या अहवालानुसार लिंगभाग विषयक निर्देशांक यांचा उपयोग करुन स्विडन, डेन मार्क, नार्वे, यासारख्या राष्ट्राने प्रगती केली आहे. या यादीमध्ये भारत ९९व्या क्रमांकावर आहे. स्त्रि विषयक सक्षमता भारतामध्ये निर्देशांकात दिसून येत नाही. १९१२ च्या जनगणणेनुसार आजही ग्रामीण आदिवाशी मध्यम वर्गीय स्त्रियांची उन्नती करण्यासाठी कठिण परिस्थिती आहे. कारण आजही समाजात हुंडाबळी, स्त्रियावरील अत्याचार, मारहान, छेडछाड, बलात्कार संपलेले नाही.

संघटीत क्षेत्रामध्ये आर्थिक समानता झालेली आहे. तरीही सामाजिक आणि मानसिक परिस्थितीचा अभाव दिसतो. कार्यालयातील अधिकाराकडून कर्मचारी स्त्रियांचे मानसिक आणि लैंगिक शोषन झाल्याची अनेक उदाहरने आहेत. असंघटित क्षेत्रात शेतमजुर, बांधकाम, घरगुती मजूर यामधये स्त्रियांना कमी वेतनावर श्रम करावे लागते. रोजगाराची हमी नसते. विमा नसतो, किंव्हा अपघाती संरक्षणाशी तरतूद नसते. यामूळे असंघटीत क्षेत्रातील स्त्रिया जमीन, घर, ठेकेदार, आणि मालक वर्गाच्या आर्थिक, शारिरिक आणि मानसिक शोषनाला बळी पडतात. यामूळे औदयोगिक आणि तांत्रीक प्रगती होवून ही स्त्रियांचा हवा तसा भौतिक विकास झालेला नाही. अनेक सुशिक्षित स्त्रियांना शैक्षणिक पात्रता असूनही बालसंगोपन आणि घरकामासाठी घरातच राहण्याची वेळ येते. तिच्या शैक्षणिक पात्रतेच्या अनदार करुन निरक्षरतेस समान चूल आणि मूल करण्याची वेळी येते. ग्रामीण आणि आदिवाशी स्त्रियांना मजूरी करुन ही आपली कमाई पतीच्या हातात दयावी लागते. अशा विविध क्षेत्रामध्ये स्त्रियांना आधूनिक काळातही प्रेरक अशी भावना निर्माण करण्याची गरज आहे. आधूनिक युगामध्ये पाश्चात्य विकासानुसार भारतीय समाजाचा विकास करण्याची प्रेरणा निर्माण होणे काळाची गरज आहे.

भारतीय संस्कृति जगामध्ये आदर्श संस्कृति मानले जाते. स्त्रिला आदर्श मानुन दुर्गा, लक्ष्मी, भवानी यांना शक्ती मानून त्यांची भक्ती केली जाते. "स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी" असे आईचे महत्व गुणगाण केले जाते. परंतू त्याच स्त्रिला मूलभूत अधिकारापासून वंचीत करून दूबळे केले जाते. स्त्रियांना अपमानीत केले जाते. सांस्कृतिक क्षेत्रामध्ये नृत्य, गायन, संगीत आणि विविध कलामध्ये स्त्रियांचे योगदान आहे. केशभूषा, वेशभूषा, विणकाम, भरतकाम, पाककृती यामध्ये स्त्रियांनी भरीव कार्य केलेले आहे. नाटक, चित्रपट आणि दूर चित्रवाणि वरील विविध कार्यक्रमामध्ये स्त्रियांचे योगदान महत्वाचे आहे. क्रीडा क्षेत्रामध्येही सानिया मिर्झा, सायना नेहवाल या सारख्या अनेक तरुणींनी आपले जगामध्ये छाप निर्माण केली आहे. जागतिक सौंदर्यस्पर्धेत एशवर्या राय, सुश्मिता सेन, लारा दत्ता या तरुणींनी जागतिक स्पर्धा जिंगलेल्या आहेत. संगीत क्षेत्रामध्ये लता मंगेशकर, आशा भोसले या सारख्या अनेक स्त्रियांचे योगदान आहे. यांची प्रेरणा घेवून सांस्कृतिक क्षेत्रामध्ये प्रगती करताना दिसतात. राहणीमान बोलीभाषा, केशभूषा, वेशभूषा यावर पाश्चत्य संस्कृतीचा प्रभाव निर्माण झालेला आहे. यामूळे स्त्रियांचे सांस्कृतिक प्रगतीमधील योगदान महत्वाची आहे.

**आपली प्रगती तपासा**

स्त्रियांची आजची भौतिक आणि संस्कृतिक स्थिती स्पष्ट करा.

## १८.९ संशोधन आणि ज्ञानउत्पादन तंत्रातील स्त्रि योगदान

जगामध्ये औदयोगिक क्रान्ती होवून अनेक तंत्र-यंत्र शोध लागले. ज्यांनी सामाजिक संशोधनात्मक विचाराची मांडणी करुन ज्ञान उत्पादनात महत्वाचे योगदान केलेले आहे. इरावती

बाई कर्वे यांनी सामाजिक जिवनाचा शास्त्रीय आणि अनुभवात्मक ज्ञानाचे विचार मांडलेले आहे. बहिनाबाई चौधरी या लेखीकेने गावरान भाषा मध्ये वास्तविक जिवन सामाजिक, सांस्कृतिक, व्यावहारिक स्त्री जिवनाच्या विचार मांडलेला आहे. कल्पना चावला, सुनिता विल्यम या भारतीय वंशाच्या स्त्रियांनी नासामध्ये संशोधनात्मक कार्यात आंतनिरीक्षणाचे कार्य करताना योगदान दिलेले आहे. जागतिकीकरणा मध्ये आर्थिक दृष्टिकोनातून वित्तिय व्यवहारासाठी स्त्रियांचे योगदान महत्वाचे आहे. स्त्रियां अभियात्रीकी माहिती तंत्रज्ञान संशोधन आणि शिक्षण या क्षेत्रामध्ये मोलांचे कार्य करतांना दिसतात ज्यामुळे माहिती तंत्रज्ञान केवळ परुष वर्गाची मकेदारी न राहता स्त्रि वर्गाचे योगदानही उल्लेखनीय स्वरूपाचे आहे. जागतिक स्तरावर मेरी क्रॉम्प, ज्युत्सी बनार्ड, बेटी फ्रिडन्ट या सारख्या अनेक स्त्रियांनी ज्ञान उत्पादन प्रक्रियेत मोलांचे योगदान केलेले आहेत. शिक्षण सामाजिक, धार्मिक, राजनैतिक, आर्थिक क्षेत्रामध्ये स्त्रियांचे अनेक विचार सामाजिक विकासाला प्रेरणादायी ठेवलेले आहे. ज्यामुळे समाजाच्या व्यवसाय आणि तांत्रिक विकासामध्ये स्त्रियांचे योगदान महत्वाचे आहे. व्यवसाईक शिक्षण आणि मार्गदर्शन क्षेत्रामध्ये उदयोजकता आणि व्यावसायिक विकास यामध्ये पुरुषाप्रमाणेच स्त्रियांची भूमिका महत्वाची आहे. नॅशनल कॉसल्स फॉर ट्रेनिंग इन हॉकेन्सल्स कोर्से ऑल इंडिया कॉन्सल फॉर टेकनिकल औदयोगिक तंत्र प्रशिक्षण संस्थेमध्ये अनेक तांत्रिक शिक्षण घेण्याच्या तरुणी आहेत. ज्यामुळे भविष्यात संशोधन आणि ज्ञान उत्पादन प्रक्रियेत स्त्रि भूमिका महत्वाची आहे.

**आपली प्रगती तपासाः**

संशोधन आणि ज्ञान उत्पादन तंत्राची चर्चा करा.

## १८.१० सारांश (Summary)

सामाजिक विकासाबरोबर स्त्रि विकास होणे गरजेचे आहे. रुढी, परंपरेप्रमाणे आधुनिक काळामध्ये लिंग भावाचा भेद करुन स्त्रियांना विकासापासून वंचीत न ठेवता स्त्रि विकासाला समान संधी मिळवून देणे हा स्त्रि विकास विषयक दृष्टिकोनाचा उद्देश आहे. स्त्रियांना पंरपरे प्रमाणे हीनदर्जा न देता तिच्या व्यक्तीमत्वाचा विकास होईल असे सामाजिक वातावरण निर्माण करण्याची आवश्यकता आहे. आज अनेक स्त्रियां पुरुषांच्या बरोबरीने विविध क्षेत्रात कार्यरत आहे. त्यांनी प्रोत्साहन देवून इतर स्त्रियांनाही विकास प्रक्रियेत येण्याची संधी उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे.

स्त्रि-पुरुष भेद करुन आर्थिक संपनतेने निर्बंध काढून स्त्रियांना संपत्तीपासून उपेक्षीत ठेवले होते. जिवन जगण्यासाठी लागणाऱ्या अन्न वस्त्रासाठी ही पुरुषांवर अवलंबून रहावे लागत असे अशा स्त्रिया शैक्षणिक आणि औदयोगिक क्षेत्रामध्ये प्रगती करुन रोजमार आणि विविध व्यवसाय करुन आर्थिक कमाईवर स्वावलंबी झाल्याच्या दिसतात. परंतू काही ठराविक स्त्रिया

स्वावलंबी झाल्यामुळे संपूर्ण स्त्रि जातीची आर्थिक समस्या संपणार नाही त्यामूळे प्रत्येक स्त्रिला आर्थिक दृष्टया स्वावलंबी बनवावे लागेल. राजकिय क्षेत्रामध्ये केवळ आरक्षणाचा काम घेवून काही स्त्रिया पद ग्रहण करताना दिसतात. यामूळे संपूर्ण स्त्रि जातीची राजकिय स्त्रि समस्या संपत नाही म्हणून भौतिक, सांस्कृतिक, तांत्रिक, बौध्दिक, राजकिय प्रशासकिय व्यावसायिक, व्यापारी अशा विविध क्षेत्रामध्ये स्त्रियांना संधी देवून स्त्रियांचा सर्वांगीण विकास करुन स्त्रि-पुरुष समानता निर्माण होण्याची गरज आहे.

## १८.११ प्रश्न (Questions)

- स्त्रिवादी विविध दृष्टिकोन स्पष्ट करा.
- स्त्रि-पुरुष विषमता निर्माण करणाऱ्या घटकांची माहिती दया.
- स्त्रियांचा सर्वांगीण विकासासाठी काय करावे याची चर्चा करा.
- स्त्रियांच्या आर्थिक दूबर्लतेचा जबाबदार कारण सांगा.
- आधूनिक काळामध्ये स्त्रि विकास विषयक भूमिकेची चर्चा करा.

**टिपा लिहा:**

१) घरगुती आणि प्रजोत्पादन कार्यातील भूमिका.

२) स्त्रियांचे भौतिक आणि सांस्कृतिक स्थिती.

३) संशोधन आणि ज्ञान उत्पादनात स्त्रि योगदान.

## १८.१२ संदर्भ सूची


१) Engendering Development Limits of Feminist Theories and Justice. EPW 39 (49) - Vidhu Verma (2004)

२) भारतीय समाज आणि सामाजिक समस्या - डॉ. भा. कि. खडसे - हिमालय पब्लिशिंग हाऊस, मुंबई.

३) भारतीय समाज संरचना आणि समस्या - डॉ. प्रदिप आगलावे

४) समाजशास्त्रीय विश्वकोश - हरिकृष्ण रावत - रावत पब्लिकेशन - जयपुर

५) स्त्रिया आणि समान - प्रा. सुहास निर्गुण - प्राची प्रकाशन - मुंबई

६) मानवी साधनसंपत्तीचा विकास - स्मिता जोशी, विद्या म्हस्के - प्रगती बुक्स प्रा.लि.पुणे

७) भारतीय सामाजिक समस्या - डॉ. सुधा कालदाते

८) समाजशास्त्र - डॉ. शैलजा माने - निराली प्रकाशन - पूणे.


❖❖❖❖

# १९

# विकासाचा वैकल्पी / पर्यायी दृष्टीकोन - ३
# समावेश विकास

# Atternative Aproaches to Development
# Inclusive Development

**घटक रचना :**

१९.१ उद्देश (Objective)

१९.२ प्रस्तावना (Introduction)

१९.३ सामाजिक उपेक्षा / बहिष्कार संकल्पना (Exclusion Conceptual)

१९.४ उपेक्षा सिध्दांताची संरचना (Exclusion Theoretical Framework)

१९.५ उपेक्षीतांचे क्षेत्र (Areas of Exclusion)

१९.६ उपेक्षीतांचे वर्ग / घटक (Categories of Exclueal)

१९.७ सकारात्मक प्रक्रियांची गरज / प्रकाश लाऊज / अमर्त्य सेन (Need for Affirmative Action)

१९.७.१ नरेगा राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कायम (NREGA)

१९.७.२ माहितीचा अधिकार (R.T.I.)

१९.७.३ पंचायतराज ७३ घटना दूरूस्ती (Panchyats Raj 73rd Act.)

१९.८ सारांश (Summary)

१९.९ प्रश्न (Questions)

१९.१० संदर्भ ग्रंथ सूची (Reference List)

## १९.१ उद्दिष्टये (Objective)

- सामाजिक उपेक्षित वर्गाच्या विकास अपेक्षा सखोल अभ्यास करणे.
- सामाजिक बहिष्काराची सिध्दांत ओळख कळत घेता येईल.
- बहिष्कृत समाजाचे विविध क्षेत्राचे ज्ञान मिळवता येईल.
- बहिष्कृत सामाजिक घटनांच्या माहिती मिळता येईल.
- सामाजिक अपेक्षित घटकांची उपेक्षा दूर करण्यासाठी करण्यात येणाऱ्या योजनांची माहितीचे आकलन होईल.
- सामाजिक उपेक्षित घटकांबद्दल निर्माण प्रश्नांचे उपयोजन करनावश्यक.

## १९.२ प्रस्तावना (Introduction)

भारतीय समाजात परंपरीक समाजापासून आजच्या स्वातंत्र्य भारतीय समाजापर्यंत दलित आदिवासी स्त्रीया उपेक्षीत राहिल्या आहेत. सामाजिक रूढी परंपराने या सामाजिक घटकाला विकासापासून उपेक्षित केले हा समाजा प्रत्येक मुलभूत गरजा पूर्ण करण्यापासून वंचीत होता. अन्न, पाणी, निवारा सारख्या अति सामान्य गरजा ही पूर्ण होत नव्हे. मनुस्मृती नुसार "दलित अस्पृश्य स्त्री आणि जनावर हे माराचे धनी आहे." याचा आधी या सामाजिक वर्गाला उपेक्षित राहावे लागले होत.

पुढे साधूसंत समाज सुधार विविध धार्मिक आणि सामाजिक प्रबोधन चळवळी बहिष्कृत घटकांच्या विकासाला महत्वपूर्ण ठरल्या आहेत. महात्मा जोतिबा फूले, शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, राजाराम मोहन राय, महादेव रानडे या समाज सुधारकांनी उपेक्षित समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न केला. पुढे भारतीय स्वातंत्र्या नंतर विविध पंचवार्षिक योजना आणि सामाजिक विकासाचे कार्यक्रम आखले गेले. परंतू प्रत्येक्षात हा दिन-दूबळा समाज उपेक्षितच राहिला आहे. आज जग चंद्रावर वस्ती करुन शेती करण्याचे स्वप्न पाहत आहे. परंतू भारतीय उपेक्षित समाज मूलभूत सुविधापासून वंचीत आहे. भारतीय राज्य घटनेने अधिकार देवून ही दूर्बल घटकांपर्यंत ते पोहचले नाही. आरोग्य, निवास, शिक्षण, आहार, रोजगार या मूलभूत गरजा सामान्य वर्गांना देवून मानवी विकास करणे शक्य आहे.

आधूनिक काळात सामाजिक बहिष्कृत वर्गांची सर्वांगीन विकास अपेक्षे प्रमाणे झालेला नाही. सामाजिक रुढी, परंपरा, भाषावाद, प्रांतवाद, धर्मवाद, भष्ट्राचार लोकसंख्यावाढ, जागतिकीकरण या सारख्या अनेक कारणाने उपेक्षीत समाज विकासापासून दूर राहिला आहे. या समस्ये विषयी थोर आर्थिक विचारवंत नोबेल, पुरस्कार, विजेते, अमर्त्य सेन यांची संकल्पना आणि प्रकाश दूर यांचे विवेचन पुढील प्रमाणे अभ्यासता येईल.

## १९.३ सामाजिक बहिष्काराचे किंव्हा उपक्षेची संकल्पना (डॉ. अमर्त्य सेन) (Exclusion Concept - Dr. Amrtya Sen)

सामाजिक बहिष्कार किंव्हा उपेक्षा हा शब्द इंग्रजीतील Social Exclusion Concept या शब्दाचा मराठी अर्थ आहे. यांचे अधिक स्पष्टीकरण Application adn Scrutiny Social Development Papers सादर केले आहे. या मध्ये प्रस्तूत केले आहे. भारतीय स्त्रिया दलित (अस्पृश्य) आदिवासी अल्पसंख्या आणि दूर्बल घटक यांच्या सर्वांगीन विकासासाठी चर्चा करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या प्रबंधामार्फत भारतीय उपेक्षीत घटकाच्या प्रगतीला बाधा निर्माण करणाऱ्या घटकांची चर्चा केलेली आहे. या विचाराची पूढील प्रमाणे माहिती अभ्यासला येईल.

### १९.३.१ मूल्यांकन आणि आकलन कार्य :

डॉ. अमर्त्यासेन यांच्या मते समाजिक बहिष्कार या शब्दाचा वापर सर्व प्रथम रेनेलेनोद यांनी मागील शतकातच केलेला आहे. गरीबी विषयी विचार मांडणारा ग्रंथ लिहिलेला आहे.

सामाजिक आणि आर्थिक शारीरीक आणि मानसिक या समस्येसंबंधी विचार मांडलेले आहे म्हणून फ्रान्स सरकारने रेने यांच्या कार्याचा गौरव करतांना जनगनने मध्ये शारीरिक, मानसीक वृध्द यासारख्या घटकांचा विचार केलेला आहे. त्यांना सुरक्षा कायम रोजगार निवास या सारख्या सुविधा देण्याचे मान्य केलेले आहे. शिक्षण संस्कृती समान कायदा सामाजिक भागीदारी मानवी सन्मान यासारख्या बाबिंकडे दूर्लक्षीत असणारा समाज म्हणजेच समाजिक बहिष्कार होय अशा समाजाचे विचार पूर्वक मूल्यांकन आणि आवलंब होण्याची गरज आहे.

### १९.३.२ दारिद्रय अक्षमता आणि सामाजिक उपेक्षा :

डॉ. अमर्त्य सेन यांच्या मते सामाजिक बहिष्काराला सामाजिक विचाराचा आधार आहे. साहित्य पूरानिक ग्रंथ आणि पारंपारिक प्रवृत्ती यामूळे सामाजिक दारिद्रय आणि अपात्रतेचा निकल लावला गेलेला आहे. सामाजिक विचाराला विचार करुन मानवी विचाराची क्षमता विकसित करण्यासाठी दारिद्र्याचे लक्षणे अभ्यास करुन कमी उत्पन्न घटातील लोकांना नवीन विचार देणे गरजेचे आहे. त्यांच्या उत्पन्नामध्ये वाढ करुन जीवनमान सुधारनेचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. या करीता गरीबीच्या मुळांशी जावून कारणांचा शोध घेणे महत्वाचे आहे.

### १९.३.३ पात्रता अभावासंबंधी उपाय :

सामाजिक बहिष्कार संबंधी क्षमता अभाव आणि अनुभवी सुविधा महत्वाच्या आहेत. सामाजिक जिवनामध्ये पात्रता मिळण्यासाठी संपत्ती हा महत्वाचा आधार आहे. सामाजिक समुदायाला जीवनावश्यक गरजा मिळविण्यासाठी अनेक बिकट परिस्थितीला सामोरे जावे लागते तर स्त्रियांना ध्येह (शारिर) विक्रीसारख्या व्यवसाय करावा लागतो ही लाजिरवानी बाब आहे. बहिष्कृत वर्गाला आपल्या गरजांना पूर्ण करण्यासाठी उपलब्ध व्यवस्थेमधून अनेक कठिण प्रसंगाला सामोरे जावे लागते. अशी चर्चा यासंदर्भात अमर्त्यसेन यांनी केलेली आहे.

### १९.३.४ बहिष्करणाचा अर्थ :

वास्तविक पाहता सामाजिक बहिष्कार सामाजिक परिस्थितीमधून निर्माण झालेला आहे. सामाजिक बहिष्काराचा अर्थ विशिष्ट सेवा सुविधा पासून वंचित करणे हा आहे. हा अर्थ विभिन्न दृष्टिकोनातून सेवा सुविधापासून केलेला आहे. सामाजिक बहिष्कार गटामधून साहित्य, भाषा आणि विचारांची मांडणी झालेली आहे. सामाजिक जीवनामध्ये अनेक अनाऐच्छीक उपसमाजाशी म्हणजे उपाशी लोकांना पर्याप्त भोजन सुविधाचा अभाव यासारख्या घटकाचा विचार या संबंधात केलेला आहे.

### १९.३.५ सामाजिक संबंध :

उपेक्षीत वर्गाला श्रेणी वर्गामध्ये विभागल्यामुळे भेदभावा सारख्या समस्येला सामोरे जावे लागते दलित वर्गाना अपृश्य समजून त्यांचा स्पर्शही विटाळ (वाईट) मानला जात होता. यामूळे सामजिक संबंधावर वाईट परिणाम झाला आहे. वंचीत समाजाला सामाजिक जबाबदारीच्या पदापासून दूर ठेवून केवळ सेवेची कामे करुन घेतली जातात, न तो एक उधार करता आहे नही तो एक ऋण दाता है असे समजून उपेक्षीत समाजाला कर्ज बाजारी केले जाते.

### १५.३.६ सक्रिय आणि निष्क्रीय :

सामाजिक जीवनामध्ये केवळ मतदाना सारख्या गोष्टीसाठी या समाजाच्या उपयोग केला जातो. यासाठी अस्पृशवाशी निर्वाशी शरणार्थ यांना राजकियश्रय दिलेला आहे. रविन्द्रनाथ

टागोर यांच्या दो बिगा जमीन या कवितेमध्ये शेतकऱ्यांच्या आणि भूमिदिनाच्या प्रसंगाचे चित्रण केलेले आहे. अल्पसंख्याक समाजांना निष्क्रीय समजून यांचा बहिष्कारण करण्यात येतो. यामूळे जो समाज सक्रिय आहे त्यांचा विकास होतो जो समाज निष्क्रीय आहे त्यांना विकास प्रक्रियेपासून वंचीत राहावे लागते.

**१५.३.७ सतत बेकारी :**

अमर्त्यासेन यांच्या मते सतत आणि कायम बेकारी हे एक सामाजिक उपक्षेचे कारण आहे. बेरोजगारीमुळे लोकांना जीवनावश्यक सुविधा मिळविणे अशक्य होते. या लोकांना आर्थिक अस्तीत्व नसल्यामुळे आत्मविश्वास गमावलेला असतो. या लोकांना स्वयंः रोजगाराच्या संधी उपब्ध करुन देणे गरजेचे आहे.

**१९.३.८ युरोपीय घडामोडी आणि जागतिक परिवर्तन :**

सामान्य वर्गाला प्रेरीत करण्यासाठी युरोपातील घडामोडी महत्वाच्या आहेत. फ्रेंच राज्यक्रान्ती अमेरिकन स्वातंत्र्य युध्द औदयोगिक क्रांती यामुळे स्वातंत्र्य समता बंधुता सामाजिक न्याय मानवी हक्क याविषयी परिवर्तनीय वारे भारतीय उपखंडामध्ये निर्माण झाले यामुळे सामाजिक उपेक्षीताच्या प्रश्नांना वाचा फूटली. यामुळे भारतीय उपक्षीतांना आशेचा किरण दिसून विकासाची अपेक्षा निर्माण झाली.

**१९.३.९ जागतिक परिवर्तन :**

सामाजिक बहिष्कार साहित्यामध्ये व्यावहारिक आणि क्रमशः घटकांना महत्व दिले जाते. जगामध्ये व्यावहारीक परिवर्तनामध्ये गतिनिर्माण झाली आहे. औदयोगिक विकास व्यापार वाढ जागतिक परिषदा आर्थिक उलाढाली यामुळे जागतिकी करणाचे वारे निर्माण होऊन आर्थिक सामाजिक सांस्कृतिक देवाण-धेवाण होऊ लागली आहे. यामुळे सामाजिक बहिष्कारांच्या भिंती कमी होवून नवीन रोजगार नवीन भागिदारी नविन संघटना निर्माण झालेल्या आहेत.

**१९.३.१० सामाजिक नैतिकता :**

मानवतेच्या दृष्टिकोनातून प्रत्येकाला काही मूलभूत जीवन जगण्याचा नैतिक अधिकार आहे. "जगा आणि जगू दया" यामूळे प्रत्येकाला आपला व्यावसायिक विकास करुन आर्थिक प्रगतीचा अधिकार आहे. यामुळे भारतामधील ही वंचीत वर्गाला समानतेचा दर्जा देणे आवश्यक आहे. म्हणून शिक्षण, आरोग्य, रोजगार या संधी नैतिकतेच्या दृष्टिकोनातून मिळवण्याचा अधिकार बहिष्कृत समाजाला आहे.

**१९.३.११ लोकशाही आणि राजकिय भागीदारी :**

भारतामध्ये लोकशाही शासन प्रणालीचा स्वीकार केल्यामुळे प्रत्येक नागरीकांना काही स्वातंत्र्य आणि अधिकार बहाल केले जातात. यामध्ये मतदानाचा अधिकार हा नागरीकांवर आधारीत असल्यामुळे समाजाच्या प्रत्येक व्यक्तीला राजकीय भागीदारी करण्याचा अधिकार आहे. उपेक्षीत वर्गाचे पक्षिय गट करुन राजकारणा मध्ये सहभागी केले जातात. प्रत्येकाला राजकिय पदे मिळणे महत्वाचे आहे. म्हणून लोकशाहीमध्ये उपेक्षीत वर्गाची भागेदारी महत्वाची आहे.

### १९.३.१२ उपेक्षीतांची विविधता :

उपेक्षीत समाज विविध जाती, वर्ग, भाषा, प्रदेश आणि लिंग भेदामध्ये विभाजाला असल्यामुळे उपेक्षीतांच्या विभाजनाचा परिणाम त्याच्या विकास प्रक्रियेवर होतो. भारत हा विविधतेने विभागला असल्यामुळे बहिष्कृत समाजही वेगवेगळया कारणांने विभागला आहे. आर्थिक दारिद्र्य सामजिक मागासलेपण, सामाजिक निर्बंध यामुळे या समाजाच्या प्रगतीला बाधा निर्माण झाली आहे.

डॉ. अमर्त्यासेन यांनी सामाजिक उपक्षीतांची संकल्पना स्पष्ट करतांना वरील मुदयांची चर्चा केलेली आहे. यामुळे सामाजीक मागासलेपण ची संकल्पना समजून घेण्यास मदत होते.

**आपली प्रगती तपासा.**

डॉ. अमर्त्यासेन यांनी सामाजिक बहिष्कार ही संकल्पना स्पष्ट करा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## १९.४ सामाजिक उपेक्षा / बहिष्कार सिध्दांताची संरचना - प्रकाश लुईस (Exclusion Theoretical Framework - Prakash Lues)

### १९.४.१ सामजिक उपेक्षाचा अर्थ :

भारतीय समाजात भेदभावपूर्ण सामाजिक समुहाचे संरचना आहे. या सामाजिक उपेक्षा हा घटक जबाबदार आहे. सत्ता आणि संपत्तीपासून सामाजिक उपेक्षा वर्गाला दूर केले आहे. समाजातील एका घटकाला सहानूभुती तर दूसऱ्या घटकाला मुलभूत घटकापासून वंचीत अशी परिस्थिती आहे. यामध्ये उपेक्षीत वर्गांना कठीण परिस्थितीला सामोरे जावे लागते. यामधील काही लोक सहन करतात. तिथे वाद विवाद होत नाही. परंतू जे लोक मानवी अधिकार आणि संविधानीक अधिकार मागतात त्यांना आंतकवादी ठरविण्यात येते. विविध समाजामध्ये यास अनुकूलता आणि परिवर्तनाचा स्विकार केला जातो. त्या समाजाला राजकिय अधूनिकीकरण सामाजिक उधारीकरण किंवा आर्थिक विकास होतो. यामूळे राजकारणातील भेदभाव कमी किंव्हा समाप्त घेतात. सामाजिक बहिष्कार म्हणजे मालकी उपयोग आणि साधन संपत्तीवरील नियंत्रणाला विरोध होय. श्रम आणि योग्य लोकांच्या मालकी हक्क सांगण्यासाठी शिक्षण, आरोग्य सार्वजनिक सेवा, मनोरंजन, रोजगार आणि मूलभूत गरजा यावर विशेष लक्ष केंद्रीत करण्याची गरज आहे.

### १९.४.२ सामाजिक बहिष्कार आणि सामाजिक रिक्त स्थाने :

भारतीय समाजामध्ये सामाजिक संस्कृती राजकिय, आर्थिक याक्षेत्रामध्ये योग्य प्रतिनिधित्व आणि भागिदारी यांचा अभाव आहे. प्रगतीच्या अधिकारापासून उपेक्षीत समाजाला वंचीत केलेले आहे. धार्मिक निर्बंध मानवतेला विरोध मानवीय आणि घटनात्मक अधिकारापासून दूर ठेवणे या समाजाच्या सामाजिक, आर्थिक, राजकिय, शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक या सारख्या क्षेत्रामध्ये विकासाच्या संधी देवून उपेक्षीत समाजाचा विकास करणे गरजेचे आहे.

### १९.४.३ सामाजीक परिवर्तनाला विरोध :

भारतीय समाजामध्ये दलित (अस्पृश्य) कनिष्ठ जाती, आदिवाशी जाती - जमाती या अल्पसंख्याक भाषिक अल्पसंख्याक, इतर मागासवर्गीय स्त्रिया, लहान मूळे यांचा उपेक्षीयत समाजामध्ये समावेश होतो. तर शेतकरी, शेतमजूर, मजूर, बालमजूर, घरेलू कामगार, अनौपचारीक क्षेत्रातील कामगार ठेकेदारीतील कामगार, वाजंत्री कामगार, मासेमारी कामगार, ग्रामीण आणि आदिवाशी कामगार, अपंग, वृध्द हे सामाजिक घटक यांच्या परिवर्तनाला तथाकथित समाजात विरोध केला जातो. यामूळे राष्ट्रीय एकात्मता आणि राष्ट्रीय विकासाला विरोध होतो. पर्यायी सामाजिक परिवर्तन घटन नाही.

### १९.४.४ सामाजिक बहिष्काराची मापने :

समाज शास्त्रीय संशोधनात्मक अभ्यासामधून सामाजिक बहिष्काराला अभ्यासले जाते गरीबी आणि मूलभुत गरजांचा अभाव यावर लक्ष केंद्रीय करुन हा विषय अभ्यासला जातो. दक्षिण आशियाई राष्ट्रात बहिष्काराचा समावेश सर्वात अधिक आहे. युरोपीय देशात यांचे प्रमाण कमी आहे. उदा. फ.एन.डी.पी. निर्देशांक सुचिमध्ये बहू आयामी विचार आहेत. फ्रेंचमध्ये ३५ रोजगाराचा समावेश मुल्यांकनात केला आहे. युरोपीय संधामध्ये अशी सांकेतिक तयार करण्याचा प्रयत्न चालू आहे. ब्रिटनमधील टेबर चार्टर (गरिबी) प्रस्ताव करीता विविध ३० देशांची परिभाषीत सामाजिक एकीकरणाचे व्याख्या लक्षात घेतली आहे. भारतामध्ये एक दलित विकास निर्देशांक तयार करण्याचे आवश्यकता आहे. तसेच अल्पसंख्याक समाज आदिवाशी महिला, बालमजूर, भूमिहिन बालमजूर यांचेही विविध निर्देशांक तयार करणे गरजेचे आहे.

### १९.४.५ व्यावसायिक आधारित नाव :

भारतीय समाजामध्ये विविध जाती आहेत प्रत्येक जातील विशिष्ट प्रकारची धारणा म्हणजे जीवन पध्दती ठरवून दिलेले आहे. दलित आणि प्रमुख जाती यांच्यामध्ये सांस्कृतीक भेद आहे. हे चित्र स्पष्ट करण्यासाठी खालील चित्रामध्ये पाहणे गरजेचे आहे. सांस्कृतीक विश्लेषण दलित आणि उच्च जाती यांमधील विश्लेषणांत दलित म्हणजे स्वतःला गलिच्छ धंदा सक्षम, व्यावसायिक मानतात. धंदा म्हणजे चोरी, लूटमार, मेहनतीचा होय आणि परिश्रमाचा इनकार केला आहे. इमानदार चालक परंतू...

दलित जातीला व्यवसाय आणि नावावरुन ओळखले जाते. या दलितांच्या खानपानांवर निर्बंध होते. उच्च वर्गांच्या दयेवरती सेवा चाकरी करुन मिळले ते शिळे, उष्टये, अन्न ग्रहण करणे अशी दलितांची दैंयनिय स्थिती होतो. काळाच्या ओधामध्ये दलित समाजाने परिवर्तन करुन एक नवीन विचारधारा मांडलेली आहे. दलित आणि आदिवाशी यांच्यातील काही तुलनात्मक आकडेवारी पुढील प्रमाणे अभ्यासना येईल.

**दलित आणि आदिवाशी समाजातील संख्यात्मक तक्ता :**

| अनुक्रमांक | घटक (क्षेत्र) | दलित | आदिवासी |
|---|---|---|---|
| १ | लोकसंख्या | ०.०८ | १६.४८ |
| २ | साक्षरता | ५४.६९ | ४७.१० |
| ३ | पुरुष (साक्षरता) | ५९.१० | ६६.६४ |
| ४ | महिला (साक्षरता) | ४१.९० | ३४.७६ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | माध्यमिक शिक्षण | ७९.८८ | ८६.७२ |
| ६ | शेतकरी | २५.४४ | ५४.५० |
| ७ | शेतमजूर | ३२.६९ | ४९.०४ |
| ८ | शेतीसंबंधी व्यवसाय | ८७.०० | ७६.२२ |
| ९ | घरगुती सेवा (पाणी, स्वाच्छालय, विज) | १९.८३ | ६.६२ |
| १० | भारताचे पंतप्रधान | ०.०० | ०.०० |
| ११ | मुख्यन्यायाधिश | ० | ० |
| १२ | राजकिय पक्षाचे प्रमुख | १० | १० |
| १३ | शिक्षकी व्यवसाय | ९.४९ | ७.०३ |
| १४ | दारिद्र्य रेषेखालील | ५६.०० | ५४.०० |
| १५ | सार्वजनिक क्षेत्रातील रोजगार | ८.४१ | ७ |

**संदर्भ :**

डॉ. प्रकाश लूईज यांनी विविध जनगनना अहवाल लागून विश्लेषणात माडंलेले अनुमान.

**१९.४.६ आदिवाशीची धारणा :**

भारतीय समकालिन इतिहासामध्ये आदिवाशी जनजाती एकसंघ ठेवण्यासाठी भारतीय संविधाना द्वारे एक विशिष्ट सूची तयार करुन अनुसूचित जनजातीचा समावेश केलेला आहे. अनुसूचित जनजाती आयोगानुसार वनक्षेत्रामध्ये निवास करणारा वर्गहीन समान समाज इतर समाजापासून दुर असणारा समाजाशी स्वतंत्र्य बोली आणि व्यवसाय प्रणाली संबंधी धारणा जतन करनारा मानवी समुदायास आदिवाशी किंवा जनजाती असे म्हटले जाते. या समजाचे विशेष लक्षण म्हणजे आदिम, स्व-शासन, मांसाहार, नग्न आणि अर्धनग्न पोषाख पारंपारीक संस्कृती आणि राहणीमानाला जपणारा समाज होय. हा समाज इतर सभ्य समाजापासून सामान्य आदिवाशी वातावरणामध्ये स्वतंत्र राहिलेला आहे. भारतीय संस्कृती इतिहास आणि राजसत्तेमध्ये यांचे योगदान होते. संस्कृती, व्यवसाय, राजनिती, संरचना आणि अर्थव्यवसथा या मुख्य धारेपासून अलिप्त राहून समनवादी आणि जाती विरहित समाज व्यवस्था अस्तित्वात होती. अशा या आदिवाशी समाजाच्या प्रगतिचा आढावा घेणारा एक लेखाजोखा.

**१९.४.७ स्त्रिया :**

दलित आणि आदिवासी प्रमाणे स्त्रि वर्गही उपेक्षीत समजला जातो. भारतीय परंपरेमध्ये मनस्मृती विचाराचा प्रभाव असल्यामुळे स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचा दर्जा नाकांरुन स्त्रिला चुल आणि मूल एखादयाच कार्यासाठी बंदिस्त करुन प्रगतीची सर्व द्वारे बंद केली स्त्रियांचे जीवन बालवया मध्ये पिता तरूणवयात मध्ये पती आणि वृध्दकाळा मध्ये पूत्र यांच्या आधारावर जीवन जगावे स्त्रि केवळ पुरुषांची अर्धांगिणी म्हणजेच दासी पुरुषांच्या सेवेसाठी निर्माण झालेली शोभेची बाहूली. प्रत्येक वेळेला स्त्रियांनाच अत्यांचाराला बळी पडावे लागते. राजा महाराजाच्या लढाया मध्ये साधन संपत्ती बरोबर स्त्रियांची आब्रूही लूटली जाई कुटुंबामध्ये स्त्रि हे परक्याचे धन आहे. आपली इब्रत आबादीत राखण्यासाठी लवकरात लवकर विवाह करुन जबाबदारी मधून मोकले होण्यासाठी बाल विवाह प्रथा निर्माण केली. आधूनिक काळामध्येही स्त्रियांना पुरुषांच्या अत्याचारांना बळी पडावे लागते समाजात स्वतंत्रपणे सार्वजनिक ठिकाणी आजही वावरता येत

नाही. विनयभंग छेडछाड, बलात्कार या सारख्या घटनाना सामोरे जावे लागते. म्हणून स्त्रियांना शैक्षणिक प्रगतिची संधी देवून पुरुषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात संधी देणे गरजेचे आहे. आधूनिक काळामध्ये वैज्ञानिक शोधाचा गैरवापर करुन गर्भजल परिक्षण आणि स्त्रि गर्भपात करण्याची एक वाईट दृष्टी समाजात निर्माण झालेली आहे. उच्च शिक्षित डॉ. व्यवसाईकाचा पैशाच्या हाण्यासा पोटी यास अप्रत्यक्ष मदत केली जात आहे. पुरुषाच्या प्रमाणास स्त्रियांची सध्या दिवसेना-दिवस घटत आहे म्हणून प्रत्येक क्षेत्रामध्ये स्त्रियांची भागिदारी वाढविले गरजेचे आहे. भारतीय जनगणना २००१ आणि भारतीय शैक्षणिक सांख्यिक भाराखडा १९९०-९१ नुसार उच्च शिक्षणातील स्त्रियांचे प्रमाण अतिशय धक्का दायक आहे.

**१९.४.८ अल्प संख्याक समाज :**

भारतामध्ये हिन्दू धार्मिय समाज बहूसंख्यीय मानला जातो. या उलट मुस्लीम समुदाय बौध्द समुदाय, ख्रिश्चन समुदाय, शिख समुदया आणि जैन समुदाय यांना अल्प संख्याक मानले जाते. इतर समुदायाच्या तुलनेमध्ये मुस्लीम समुदाय यांचे प्रमाण गरीबी रेषे खाली सर्वात जास्त आहे. केवळ २१ टक्के मुस्लीम समाज सार्वजनिक सेवेचा उपभोग घेतो. बाकी समाज दारिद्र्यांचे जीवन जगतो. मुस्लीम समाजाचा दारिद्र्य रेषेखालील प्रमाण ३९ टक्के आहे. दरडोई उत्पन्न ४४८५ रुपये आहे. त्यामध्ये पुरुषांचे प्रमाण ४८ टक्के तर स्त्रियांचे प्रमाण तर कृषी क्षेत्रामध्ये ८.३ टक्के आहे. तर घरगुती उदयोगामध्ये ४.५ टक्के आहे. तर अशा या मुस्लिम समुदायाचे ही सर्वसाधारण जिवन उपेक्षीत प्रकारचेच आहे. केवळ आदिवाशी आणि दलित यांच्या तुलनेत मुश्लिम समुदाय थोडा सामाजिक दर्जा आहे. परंतू आर्थिक परिस्थिती ही उपेक्षीतच आहे.

डॉ. प्रकाश लूईज यांनी उपेक्षीत समाजाच्या शैध्दांतील अभ्यासामध्ये जात, वर्ग, लिंग, अपंगत्व, धर्म, वय आणि स्थान आदि घटकांवर आधारीत उपेक्षीत समाजाचा संशोधनात्मक अभ्यास केलेला आहे. या उपेक्षीत वर्गाना मुलभूत सेवा-सुविधा आणि मानवतेचा दर्जा प्रधान करण्याची ही वेळ आहे. मानवी हक्क आणि नागरी हक्क आणि मानवी अधिकार बहाल करुन उपजिवेकेच्या मुलभूत सुविधा पुरविणे गरजेचे आहे. भारतीय प्रशासनाने या उपेक्षीत वर्गाची एक निर्देशानात्मक अभ्यास करुन नियोजनात्मक आराखडयातून प्रत्येकाला प्रगतिची संधी उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. रोजगार पिण्याचे पाणी, निवास, आरोग्य, शिक्षण या सारख्या मुलभूत गरजा या सामान्य उपत्तितापर्यंत पहोचणे गरजेचे आहे.

**आपली प्रगती तपासा.**

डॉ. प्रकाश लूईज यांच्या सामाजिक उपेक्षा सिध्दांतातील विविध घटकांची नावे सांगा.

---

---

---

---

## १९.५ सामाजिक उपेक्षीताची क्षेत्र (Areas of Social Exclusion)

### १९.५.१ अन्नधान्य विषयक समस्या :

भारतासारख्या विकसनशील राष्ट्रासमोर अन्नधान्य विषयक समस्या ही एक चिंतेची बाब आहे.अलिकडे उपासमारी आणि कुपोषणाच्या समस्येने भारताला ग्रसले आहे. कृषीप्रधान भारतामध्ये उपासमारीची समस्या हा दुःख विषय आहे. स्वातंत्रोत्तर काळामध्ये मुलभूत सोयी सुविधा विकास करुन अन्न धान्यात वाढ करण्याचा प्रयत्न केला. परंतू भारतामधील अन्न विषयक समस्या सर्वात अधिक आहे. आशियाई देशामध्ये कुपोषणाचे प्रमाण सर्वात जास्त भारतामध्ये आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार भारत हा कुपोषीत बालकांना सर्वात अधिक जन्म देणारा देश आहे. दारिद्रय बालमाता, अशुध्द पाणीपुरवठा, आरोग्य सुविधा यांचा अभाव आहे. सामान्य समाज घटकांना गहू, तांदूळ, दाळी, खाद्यतेल यासारख्या जीवनावश्यक वस्तू खरेदी करणे न परवडणारे आहे. तर कधी-कधी व्यापारी वर्ग कृत्रिम टंचाई निर्माण करतात. यामूळे जीवनावश्यक वस्तूचे भाव वाढतात. भारतीय लोकसंख्या आणि शेतीउत्पादन यांचा मेळ घालण्यासाठी रासायनिक खते सुधारीत बि-बियाने किटकनाशके यांचा वापर केला जातो. परंतू यामूळे जमीनीची सुपीकता कमी होते आणि अन्नधान्याचा दर्जा घसरुन काही लहान-सहान आजाराची शक्यताही निर्माण होते. भारता मधील दारिद्र्या पैकी व्याख्या करताना प्रत्यक्ष व्यक्तीना दररोज २५५० कॅलरीज उष्मांक निर्माण करु शकतील असे अन्न आवश्यक असते ज्या कुटुंबातील अन्न मिळत नाही. दारिद्रय रेषेत गणले जातात. याचे प्रमाण जवळपास ३० ते ३५ टक्के आहे. हे कमी करण्यासाठी शासनाने शेतीसुधारण्याच्या अनेक योजना जाहीर केल्या गरीबांना स्वस्त दरात अन्न-धान्य मिळावे म्हणून रेशनिंग दूकानावर दारिद्रय-रेषेतील लोकांना कमीत-कमी किंमतीमध्ये अन्नधान्याचा पुरवठा श्रावण-बाळ योजना अन्न-पूर्णा योजना अशा विविध योजना आमलात आणून प्रत्येक आम आदमी योजनेतील कुटुंबाना ६०० रु. महिना सबसिडी म्हणून देण्यात येणार आहे. तरीही आज भारतीय अन्न विषयक समस्येचा हवा तसा प्रश्न सुटलेला नाही.

### १९.५.२ आरोग्य विषयक क्षेत्र :

देशातील प्रत्येक व्यक्तीला विविध मुलभूत सेवापैकी आरोग्य सेवा महत्वाची असते. ज्यां देशातील समान निरोगी असतो. तो देश आर्थिक दृष्टया संपन्न असतो. देशातील प्रत्येक व्यक्तीचे आरोग्य समृध्द असावे याची जबाबदारी शासनाची असते. ग्रामीण आदीवाशी क्षेत्रामध्ये आरोग्य सोयी सुविधांचा अभाव असतो. संसर्गजन्य रोगांचा फैलाव होतो. त्यावर प्रतिबंधात्मक उपचार करणारे तज्ञ डॉक्टर नसतात पूर्ण पोषक आहार शुध्द पिण्याचे पाणी, शुध्द ऑक्सीजन आणि मानसिक समाधान याबाबी आरोग्यसाठी चांगले असतात. परंतू भारतीय समाजामध्ये मागास जाती आदीवासी आणि स्त्रियां यांच्या आरोग्याला धोका आहे. रूढी परंपरेने स्त्रियांवर निर्बंध लादल्यामुळे अनेक वाईट परिस्थितीला समोरे जावे लागते. बाळतपणासाख्या नैसर्गिक परिस्थितीमध्ये स्त्रियांचा पूर्नजन्म असतो. परंतू आजही अनेक स्त्रिया दवाखाण्यात बाळत न होता घरगुती पध्दतीने खाजगी सुईनिच्या हातून बाळत होतात याचा धोका माता आणि बाळ या दोघांनही असतो याशिवाय अनेक अंधश्रध्देमुळेही आजार बाळावतात तर काही व्यक्तींना आर्थिक परिस्थितीमूळे आरोग्य सुविधा घेणे शक्य नसते. यामूळे उपेक्षीत वर्गातील लोकांना सर्वसामान्य आजाराबरोबरच कॅन्सर, क्षय, एड्स यासारखे आजार उदभवतांना दिसतात तर एखादा साथीचा रोग निर्माण झाल्यास भारतीय आरोग्य व्यवस्थेला नियंत्रणात आणणे अशक्य

असते. स्वाईन फ्लू, बर्ड फ्लू यासारख्या आजारांसाठी अमेरिके सारख्या देशांची मदत ध्यावी लागते. अनुसूचित जाती जमाती यांची समस्या कठिण आहे. शासनाने आरोग्य विमा दारिद्रय रेषेखालील लोकांना मोफत आरोग्य सुविधा तर राजीव गांधी आरोग्य विम्यातरंगत देशातील कोणत्याही व्यक्तीला आरोग्य उपचारासाठी ५ लाखापर्यंतची मदत केली जाते. परंतू आजही आदीवासी ग्रामीण दारिद्रय रेषेखालील लोक आरोग्य सुविधापासून वंचीत आहेत.

### १९.५.३ शिक्षण :

भारतीय शिक्षण व्यवस्था बदलल्या काळानुसार बदलली गेली. परंपरेनुसार दलित आणि स्त्रियाना शिक्षणा पासून दूर ठेवले होते. महात्मा फूले आणि सावित्रीबाई फूले यांनी समाजातील सर्व जाती धर्माच्या लोकांना शिक्षण देण्याचा प्रारंभ केला. भारतीय स्वातंत्र्यानंतर शिक्षणाच्या सार्वत्रीकरणाचे तत्व राज्य घटनेत समाविष्ट केले. परंतू राज्य कर्त्यांना अपेक्षेप्रमाणे समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत शिक्षण पोहोचवणे शक्य झाले नाही. सामाजिक दृष्टया उपेक्षीत असणारा अनुसूचीत जाती जमाती इतर मागासवर्गीय अल्पसंख्याक अपंग आणि स्त्रिया यांना शैक्षणिक पासून दूर ठेवले गेले. विविध पंचवार्षिक योजना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण प्रौढ शिक्षण, दूर शिक्षण, सर्व शिक्षा अभियान यांतर्गत अनेक उपेक्षीतांना शिक्षणांची संधी उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला गेला. २००१ च्या जनगणनेनुसार १०.२० टक्के एवढे अनुसुचीत जातीचे लोक आहे. अनुसुचीत जातीचे ८४ टक्के लोक आजही ग्रामीण भागात आहेत. त्यांना शिक्षणाच्या सेवेपासून वंचीत राहीले आहेत. आदिवाशी समाजाची ओळख मागास आणि निरंक्षर अशी आहे. दूर्गम भागामध्ये राहत असल्यामुळे शैक्षणिक सुविधा पुरविण्यास अडथळा येतो. दारिद्रयामूळे महागडा शैक्षणिक सुविधा मिळवणे अशक्य आहे. अल्पसंख्याक समाजालाही हव्या तशा सुविधा मिळाल्या नाहीत. मुस्लिम स्त्रियांना अनेक बंधनामध्ये राहून शिक्षण घेणे अशक्य होते. जागतीकीकरण व खाजगीकरणामुळे वंचीत घटकाच्या शैक्षणीक समस्येत पून्हा वाढ झाली. शिक्षणासारख्या मुलभूत सुविधेपासून हा सामाजिक घटक दूर राहिलेला आहे. थोडयाफार प्रमाणात शिक्षणाचा प्रसार झाला. परंतू तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षणाची समस्या निर्माण होवून सुशिक्षित बेकारीचे प्रमाण वाढू लागले. शिक्षण घेवून नोकरी किंवा रोजगार मिळत नसल्यामुळे या तरुणांना दारिद्रयाचेही जीवन जगावे लागते.

### १९.५.४ निवास समस्या :

वंचीत घटकाला दारिद्रयामधून राहून जीवन जगावे लागते. ऊन, वारा, पाऊस यापासून संरक्षण होण्यासाठी सुरक्षित आणि हक्काचा घरकुलांची आवश्यकता असते परंतू अनुसूचीत जाती, जमाती, आदीवाशी आणि दारिद्रय रेषेखाली जीवन जगणाऱ्या लोकांच्या घरांची दयनीय अवस्था असते. कच्ची घरे निष्कृष्ठ राहणीमान कोबंडया, बकऱ्या, गुरे, ढोरे यांचा समावेश असल्यामुळे घरांमध्ये दूर्गंधी असते. आरोग्याच्या दृष्टीकोनातून अशी निवास व्यवस्था धोक्याची असते. हे लोक अशा निष्कृष्ठ घरामध्ये निवास करतात. त्यामूळे अनेक आजारांची लागण होवून त्यांच्या रोजगारांवर दूष्परिणाम होतो. यामुळे वंचीत समाजाला हक्कांची पक्की आणि कायम घरे देण्यासाठी शासनाने घरकूल योजना, इंदिरा आवास योजना, अनुसुचीत जातीसाठी रमाई घरकूल योजना,शहरी दारिद्रय रेषेखालील लोकांसाठी केंद्र शासनाचे वाल्मीकी आंबेकर आवास योजना, मार्फत बहिष्कृत समाजाला घरे देण्याचे नियोजन केले आहे. परंतू प्रत्यक्षात काही ठराविक लोकांनाच या योजनेचा लाभ मिळाला आहे. त्यामध्येही भ्रष्टाचार प्रवृत्तीने बेघराना घरापासून वंचीत केले आहे. शासनाच्या निधी अभावी योजना केवळ कागदावरुनच राहिलेली आहे. तर कधी-कधी गरीब आणि बेबस लोकांनी घरासाठी मिळालेला

निधी सावकाराचे कर्ज मुलामुलींचे विवाह आणि आजारीपण यासाठी खर्च केला आहे. म्हणून या गरीब लोकांचे घरांचे स्वप्न आजही स्वप्नच राहिले आहे.

### १९.५.५ रस्त्या (रस्त्याची समस्या) :

राष्ट्राच्या विकासाकरीता ज्या मुलभूत सेवा-सुविधांची गरज असते. रस्त्ये किंवा वाहतूक हा घटक अतिशय महत्वाचा आहे. सामाजिक विकासासाठी वाहतूकीची साधने महत्वाची असतात. रस्त्ये, रेल्वे, विमान आणि जलमार्ग या चारही प्रकारे दळणवळणाने एकमेकांना जोडून देवाण-घेवाण करणे महत्वाचे असते. ग्रामीण आणि आदिवाशी क्षेत्रांमध्ये असणारा कच्चा माल कारखाने आणि बाजारपेठेसाठी शहराकडे पाठवने अवश्यक असते. ग्रामीण लोकांना आपल्या परिसरामधील नैसर्गिक साधन संपत्ती मध, डिंग, बांबू, मासे, शंख, शिंपले आणि शेती उत्पादन यांची वाहतूक करण्यासाठी रस्त्याची जोडणी आवश्यक असते. भारतामध्ये रस्त्ये प्रत्येक शहरांना जोडण्याचा दूवा आहे. परंतू आज या रस्त्यांची देयनीय अवस्था आहे. प्रवास करतांना प्रत्येक ठिकाणी टोल दयावा लागतो. ग्रामीण भागाना आजही रस्त्ये उपलब्ध नाहीत. वाडया, तांडे, पाडे दूर-दूर पर्यंत पक्क्या रस्त्याची सोय नाही. त्यामूळे भरपूर उत्पादनाच्या सुविधा अजून ही विक्रीसाठी बाजारपेठेत घेवून जाता येत नाही. यामूळे ग्रामीण भागातला शेतकरी, कारागिर, आदिवाशी, मच्छीमार, वाहतूकीच्या सोयी अभावी बाजार पेठेपासून दूरावला गेला आहे. यामूळे आपल्या व्यवसायामधून स्थानिक स्तरावर विकासाची संधी दिसून येते नाही. शासनाने रस्त्ये विकास महामंडळ सार्वजनिक बांधकाम विभाग पंतप्रधान ग्रामीण रस्त्ये सडक योजना या अंतर्गत अनेक रेखांकित कार्यक्रमाची आखणी करुनही दूरलक्षीत क्षेत्रांना जोडल्यास अपयश आले आहे.

### १९.५.६ प्रसारमाध्यम :

सामाजिक विकासासाठी प्रसार माध्यमाची भूमिका महत्वाची असते. सभोवतालच्या सामाजिक परिस्थितीची आवश्यकतेची माहिती इतरापर्यंत पोहचवणे म्हणजे संपर्क होय. आणि त्यासाठी उपयोगात आणली जाणारी साधने म्हणजे प्रसार माध्यमे होय. या प्रसार माध्यमांनाच जनसंपर्क, लोकसंपर्क, समूहसंपर्क माध्यमे मानली जातात. आकाशवाणी, दूरचित्रवाणी, दूरध्वनी, ब्रम्हणध्वनी, चित्रपट, संगणक, इंटरनेट, वर्तमान पत्रे, मासिके, ग्रंथ आणि यासारखी विविध माहिती देणारी साधने आहेत. ही सर्व साधने मनोरंजन साधने म्हणूनही ओळखली जातत सर्वसामान्य वर्गाला ही साधने आर्थिक दृष्टया खरेदी करणे न परवडणारी असतात. प्रसार माध्यमामधून रोजगार, उदयोग, नवीन घडामोडी आरोग्य, बाजारपेठ यातील बदलांची माहिती देतात परंतू दलित, आदिवाशी, अपंग यासारख्या दूबळया वर्गाला यांची सेवा न परवडणारी असते. यामुळे बाह्या जगातील बदलत्या घडामोडीची माहिती उपक्षीतांना मिळत नाही. तसेच प्रसार माध्यमांनीही उपभोक्त्या वर्गाला विचार करुन कार्यक्रम तयार केलेले असतात. त्यामूळे उपेक्षीतांच्या समस्येवर प्रकाश टाकणारा एका दूसऱ्या मनोरंजनात्मक कार्यक्रमाचा अपवाद वगळता सर्व उच्च प्रभूत लोकांच्या जीवनावर आधारीत कार्यक्रमांचा भरणा असतो. यामूळे प्रसार माध्यमाकडूनही उपेक्षीत वर्ग उपेक्षीत राहिला आहे.

**आपली प्रगती तपासा.**

उपेक्षित समाजाच्या विविध क्षेत्राची माहिती दया.

## १९.६ उपेक्षीतांची घटक / वर्ग (Categories of Exclued)

**प्रस्तावना :**

उपेक्षति समाजाचे विविध घटक किंव्हा वर्ग आहेत. दलित आदिवाशी दूर्बल घटक स्त्रियां अल्पसंख्याक वृध्द यासारख्या अनेक घटकांचा उपेक्षीतांच्या वर्गवारीत समावेश होतो. यांची थोडक्यात माहिती पुढील प्रमाणे अभ्यासला येईल.

### १९.६.१ दलित (Dalits / SC)

उपेक्षीत समाजामधील दलित वर्ग हा एक घटक आहे. हिंदू धर्मानुसार वर्ग व्यवस्थेतील शुद्र ज्यांना मनूस्मृतीने अपृश्य मानले जाते. जे संशोधकाच्या मते मूळ निवाशी भारतीय आहेत. भारतीय राज्यघटनेनुसार अनुसूचित जाती म्हणून ओळखले जाते. पारंपारिक समाजव्यवस्थेने जातीमधील सर्वात कनिष्ठ जात मानले होते. आर्थिक, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक निर्बंध लादून गुलामापेक्षाही हीन मानले होते. गुरा-ढोरांना पाणी पीण्याचा अधिकार होता. तो दलित वर्गाना नाकारला होता. इंग्रज आगमनानंतर अनेक सामाजिक चळवळी आणि स्वातंत्र्यानंतर राज्यघटनेने दिलेले अधिकार यामूळे दलित समाजाच्या परिस्थितिमध्ये सुधारणा करण्यासाठी शैक्षणिक सेवा-सुविधाचा मोफत पुरवठा शासकिय नोकऱ्यांमध्ये आणि राजकिय व्यवस्थेत आरक्षण विविध पंचवार्षिक योजनेमधून अनुसूचित जाती-जमातीच्या विकासाकरीता नियोजन केले जाते. रोजगार, स्वयंरोजगार, गृह निर्माण, शैक्षणिक सुविधा, सामाजिक समानता अपृश्यतानिवारण कायदा यासारख्या योजना अमलात आणून सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक प्रगती करण्याचा प्रयत्न केला. परंतू अपेक्षीत विकासाची गती न येण्यामागे अनेक कारणे आहेत. धर्मा धंतता, जातीभेद, भ्रष्टाचार यासारखे वाईट प्रवृत्तीमुळे दलित समाज ग्रामीण भागात दारिद्र्याचे जीवन जगतांना दिसतो.

### १९.६.२ आदिवाशी (Tribals / ST)

दऱ्या-खोऱ्यामध्ये वास्त्यव्य करणारा मागास आणि निरंक्षर समाज अशी आदिवाश्यांची ओळख आहे. भारतीय राज्यघटनेमध्ये अनुसूचित जमातीमध्ये आदीवाशी वर्गाचा समावेश आहे. इतर सर्वसामान्य समाजापेक्षा आदिवास्यांची स्वातंत्र्य जीवन शैली असते. प्रगत जगापासून आपले अस्तीत्व वेगळे जपण्याचा प्रयत्न करतात. अनेक रुढी, परंपरा आणि अंधश्रध्दा हा यांच्या जीवनाचा एक भाग आहे. बाल विवाह, अस्थिर विवाह संबंध अनावरस मूलांना जन्म वधू मूल्यांची समस्या वैश्यावृत्ती सांस्कृतीक भिन्नता मागास भाषा शैली, रोजगार समस्या स्थलांतरीत शेती जमीन मालकीचा प्रश्न, वनक्षेत्रावर वनविभागाचा प्रभाव, अल्प मजूर, निरक्षरता, आरोग्य, जात पंचायतीचा प्रभाव या मूळे आदिवाशीच्या जीवनात अनेक प्रकारचा समस्या येतात. स्वातंत्र्यानंतर

शैक्षणिक सुविधा राजकिय आणि नोकऱ्यातील आरक्षण निवास योजना शैक्षणिक सवलती असे अनेक कार्यक्रम राबहूनही हा समाज वंचीत राहिलेला आहे. यामूळे या लोकांना आजही मूलभूत हक्कापासून वंचीत राहावे लागते. म्हणून आदीवाशी मधूनच आपल्या हक्कासाठी नक्सली कारवाया करण्याची वेळ येताना दिसते.

### १९.६.३ इतर मागास वर्ग (Other Backward Classes / OBC)

अनूसूचीत जाती जमाती प्रमाणेच विविध प्रकारच्या मागासजाती या घटकांमध्ये समाविष्ट होतात घटनेच्या ३४० कलमर्तगत इतर मागास वर्गीय समाजा बद्दल अभ्यास करणारे अनेक घटक समाविष्ट होतात. यांचा अभ्यास करण्यासाठी काका-कालेलकर आयोग बिंदेश्वर प्रसाद मंडल आयोग यांनी सामाजिक शैक्षणिक दृष्टिकोनातून मागास जातीचा अभ्यास करुन देशातील २७४३ जातीचा समावेश इतर मागास वर्गीय सुचीमध्ये केला. या जाती सामाजिक सांस्कृतीक धार्मिक राजकिय अधिकारापासून वंचीत आहेत. परंतू अनुसूचित जातीच्या तुलनेत दर्जा सुधारीत आहे. या जातीना धार्मिक निर्बंध कमी प्रमाणात होते. सामाजिक दृष्टया मागास वर्गीय जातीचा दर्जा कनिष्ठ असल्यामुळे सामाजिक अधिकारापासून वंचीत राहावे लागले. उत्पादनाची साधने व्यवसायावर आधारित होती म्हणून आर्थिक विकास होवू शकला नाही. शिक्षणापासून या जाती दूर राहिल्या राजकियदृष्टचा उच्च जातीच्या प्रभावापूढे सत्ता निर्माण करण्याची मानसिकता तयार झाली नाही. या सारख्या अनेक समस्येमुळे इतर मागासवर्गीय घटकाचा विकास झालेला नाही.

### १९.६.४ स्त्रिया (Women's)

भारतीय पुरूषप्रधान संस्कृतीने पिढयांनापिढयाच्या विचारा मधून स्त्रि-पुरुष विचाराला प्रेरणा दिली आहे. मनस्मृतीमध्ये स्त्रियांवर लादलेल्या निर्बंधाचा परिणाम आजपर्यंत टिकून आहे. हिंदू धर्मात पितृऋण फेडण्यासाठी कुटुंबामध्ये पूत्राचत जन्म महत्वाचा आहे. तर मुलिंला परक्याचे धन मानले आहे. यामुळे स्त्रियांना जन्मापासून वृध्दांकाळापर्यंत विविध समस्येला सामोर जावे लागते. सुशिक्षीत वर्गामध्ये गर्भजल परिक्षण करुन स्त्रिलिंगी गर्भाचा गर्भपात केला जातो. कुटुंबातील मुला-मुलींमध्ये फरक करुन विविध सुविधामध्ये तफावत केली जाते. चूल आणि मूल याच्याशी स्त्रिचा संबंध जोडला जातो. स्त्रियांना कनिष्ठ समजून सामाजिक जीवनापासून दूर ठेवले जाते. शिक्षणापासून परावलंबन करुन घर कामाकडे लक्ष पुरविण्यास सांगीतले जाते. नोकरी करणाऱ्या स्त्रिया जास्त काळ घराबाहेर राहतात. कुटुंबाच्या प्रतिष्ठेबद्दल आणि स्त्रिच्या चारित्र्याबद्दल संशय घेतला जातो. कौटुंबिक अधिकारापासून दूर ठेवले जाते. संपत्तीचा अधिकार दिला जात नाही. राजकिय अधिकारामध्ये पतीच्या विचाराशी पत्नीचे मत गृहीत धरले जाते. धार्मिक पूजा अर्चा करण्यासाठी पुरोहित होण्याचा स्त्रियांना अधिकार नाही. भारतीय स्वारंत्र्यानंतर स्त्रियांना समाजिक दर्जा मिळाला. हिंदू कोडबिलाने पूर्नविवाह घटस्फोट आणि संपत्तीचा अधिकार मिळाला. इंदिरागांधी पंतप्रधान, प्रतिभा ताई राष्ट्रपती, मायावती मुख्यमंत्री या सारख्या पदावर स्त्रिया बिरजमान झाल्या. परंतु यामूळे प्रत्येक स्त्रिची स्थिती सुधरली असे नव्हे. आजही ग्रामीण आदिवाशी अल्पसंख्यक स्त्रियांची दैयनिय स्थिती आहे.

### १९.६.५ अल्पसंख्यक (Minorities)

मुस्लीम, ख्रिश्चन यासारख्या सामाजिक वर्गाना अल्पसंख्याक मानले जाते यामध्ये मुश्लिम धार्मिक लोकामध्ये दारिद्र्याचे प्रमाण अधिक आहे. काही प्रमाणामध्ये मुश्लिम समाजामध्ये संपत्तीची साधने आहेत. परंतू बहूसंख्यीय मुश्लिम समाज दारिद्र्याचे जीवन जगताना दिसतो.

विकासाकरीता शिक्षण, आरोग्य, रोजगार या सारख्या मुलभूत साधनापासून अल्पसंख्याक समाज वंचीत आहे. असे सच्चर आयोगा सांगतो. प्रगतीची संधी देण्यासाठी शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक दृष्टिकोनातून समानता निर्माण करणे गरजेचे आहे. अल्पसंख्याक समाजातील स्त्रियांची स्थिती दैयनिय स्वरुपांची आहे. अल्पसंख्याक समाजातील स्त्रियांना शैक्षणिक सामाजिक धार्मिक अधिकारापासून दूर ठेवले आहे. यामूळे अल्पसंख्याकाचा सर्वांगीण विकास होणे गरजेचे आहे.

### १९.६.६ वृध्दवस्था (Aged)

निसर्ग नियमानुसार प्रत्येक व्यक्तीला बालव्यवस्था तरुणावस्था, प्रौढावस्था आणि वृध्दवस्था यामधून जावे लागते. वृध्दवस्था म्हणजे जीवनातील शेवटचा कालखंड होय. सर्वसाधारणपणे वयाच्या ६० वर्षापासुन वृध्दवस्थेला प्रारंभ होतो. वृध्दाना परावलंबनाचे जीवन जगावे लागते. कारण शारिरीक आणि मानसिक दृष्टया आपल्या गरजापूर्ण करणे शक्य नसते. आर्थिक उत्पादन करणे शक्य नसल्यामूळे आर्थिक दृष्टचां इतरांवर अवलंबून राहावे लागते. उतरत्या वया बरोबर दृष्टी जाणे, ऐकू न येणे, चालता न येणे, दात पडणे यासारख्या शारिरीक व्याधी बरोबर मानसिक संतूलन ही कमीधिक होते. तर पचनाचे आजार, ह्रदय विकास, रक्तदाब कमीधिक यासारख्या अनेक रोगाविषयक समस्याही निर्माण होतात. वृध्दत्वामुळे सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये सहभागी होता येत नाही, अशा वेळेस जन्म देणारी मुले वृध्द आई-वडीलांचा सांभाळ करण्यास तयार होत नाही. आपले वृध्द जीवन वृध्दाश्रमामध्ये घालवतांना दिसतात. वृध्दाच्या कल्याणाकरीता वृध्दासाठी दिन केंद्रे, भविष्य निर्वाह निधी वृध्दकाली निवृत्ती वेतन संजय गांधी निराधार योजना ज्येष्ठ नागरिकांना प्रवास भाडयात सवलत, मोफत आरोग्य उपचार यासारख्या अनेक सेवा-सुविधा देवूनही अनेक वृध्दाना आत्महत्या करण्याची वेळ येते.

### १९.६.७ विस्थापीत (Disabled)

देशाचा विकास करण्यासाठी अनेक औदयोगिक प्रकल्प राबवले जातात. मोठमोठी धरणे बांधली जातात. यामूळे अनेक लोकांना भूमिहिन गृहहिन होण्याची वेळ येते. यामूळे आपली जमीन सोडण्याची वेळ येते. यामूळे आपले मूळ गाव सोडून इतर भटकावे लागते. आदिवाशी आणि ग्रामीण लोकांवर याचा प्रतिकूल परिणाम होतो. जमिनीचा मोबदला विनामूल्य घर, नागरी सुविधा आणि इतर सेवा सुविधाचा आभाव निमार्ण होतो.

### १९.६.८ इतर घटक (Other Factors)

भारतामध्ये विविध सामाजिक दूर्बल घटक आहे. त्यांच्या विकासाची समस्या आहे. भारतीय लोकसंख्येमध्ये दूर्बल घटकांचे प्रमाण अधिक आहे. आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतीक क्षेत्रामध्ये दूर्बल घटकाच्या समस्या आहेत. दूर्बल घटक म्हणजे ज्यांना स्वतःच्या अवश्यक असणाऱ्या दैनदिंन गरजा पूर्ण करता येत नाही. कारण आर्थिक परिस्थितीमूळे आपल्या शारिरीक गरजापूर्ण करू शकत नाही. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य यांच्या समस्या आहेत. बेकारी, भिक्षावृत्ती, बालमजूरी आणि अपंग यासारख्या सामाजिक घटकांचा दूर्बल घटक म्हणून समावेश केला जातो. काम करण्याची इच्छा असताना अनेक लोकांना बेकार राहून दारिद्र्याची जीवन जगावे लागते. तर सामाजिक आणि कौटुंबिक परिस्थितीमूळे अनेक कोवळया मुलांना बालमजूर स्विकारावी लागते. खेळण्या बागडण्याच्या वया मध्ये प्रौढाप्रमाणे कष्ठाची कामे करुन जबाबदारी दयावी लागते. यामूळे देशाची भावी पिढी आधोगतीच्या दिशेने जाताना दिसते.

शारिरीक दृष्टया अपंग किंवा रोग एखादया आजाराने जरजर झालेल्या लोकांच्या समस्या वेगळयाच आहेत. भिक्षावृत्ति, वैश्याव्यवसाय, तूरूंगाची शिक्षा भोगून आलेला व्यक्ती नक्षली क्षेत्रातील आत्मसर्मपण करणारा तरुण यासारख्या अनेक घटकांच्या विकासाच्या समस्या आहेत.

**आपली प्रगती तपासा :**

उपेक्षीत घटकांची चर्चा करा.

---

---

---

---

## १९.७ सकारात्मक प्रक्रियांची गरज/प्रकाश लाऊज अमर्त्य सेन (Need for Affirmative Action)

**प्रस्तावना :**

डॉ. अमर्त्य सेन आणि प्रकाश लूईज यांनी सामाजिक उपेक्षा वर्गाची सविस्तर चर्चा करुन या वर्गाला विकासाची संधी देण्यासाठी राष्ट्रीय स्थरांवर काही नियोजनात्मक कार्यक्रमाची आखणी केलेली आहे. सामाजिक समता-आर्थिक सुधारणा करण्यासाठी काही महत्वाचे कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

### १९.७.१ नरेगा (NREGA)

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा महात्मा गांधी यांच्या जयंतीदिनी २ ऑक्टोबर २००९ मध्ये केंद्र शासनाने हा कायदा पास केला त्यापूर्वी २५ ऑगस्ट २००५ रोजी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कायदा होता. त्यामध्ये सुधारना करून १२० रू. रोज रोजदारी देण्याची हमी नरेगा कायदामध्ये आहे. केंद्रातील युपीए सरकारने या कायदयामध्ये पूढील तरतुदी केलेल्या आहेत. बेरोजगारी व्यक्तीने स्थानिक ग्रामपंचायतीकडे काम मागणारी तपासणी करून कामगार कार्ड दिले जाईल काम मागणारी व्यक्ती प्रौढ असावी. कामगार कार्ड मिळाल्यानंतर कामाची वाट १५ दिवस पहावी. त्यानंतर कार्ड धारक ते कार्ड लेखी अर्जासोबत ग्रामपंचायतीकडे जमा केले जाईल. त्यानंतर १४ दिवसांच्या आत सदर व्यक्तीला काम देण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीची असेल जर काम मिळाले नाही तर अशा बेरोजगारांना १०० रु. पर डे दररोज दिले जाते. यामध्ये ५० टक्के रोजगार ग्रामपंचायत क्षेत्रातील वंचीत घटकांसाठी असते. अनुसूचीत जाती-जमातीसाठी २३ टक्के अनुसुचीत जमातीसाठी १७ टक्के आणि महिलांसाठी ५० टक्के रोजगार राखीव असते. २०११ मध्ये ४१ मिलीएन रोजगार निर्माण केले. २००६ मध्ये २०० जिल्हयात हा प्रयोग राबवला होता. २००८-०९ मध्ये ५९३ जिल्हयात याचा विस्तार करण्यात आला. जूलै २०१२ मध्ये १७ लाख ९४३१८९ कुटुंब या योजनेचा लाभ घेताना दिसतात. ग्रामीण क्षेत्रामध्ये शेतविषयक कामे दिली जाते. ग्रामीण क्षेत्रातील उपेक्षीत वर्गाना रोजगाराची संधी दिली.

**आपली प्रगती तपासा :**

नरेगा कायदयाची माहिती सांगा.

### १९.७.२ माहितीचा अधिकार (R.T.I.)

शासकिय आणि निमशासकिय क्षेत्रातील माहिती जाणून घेण्याचा अधिकार प्रत्येक नागरिकाला (Right to Imformation act 2005) या कायदयानुसार घटनेच्या बाविसाव्या कलमाप्रमाणे भारतातील सर्व राज्य आणि केंद्र शासित प्रदेश (जम्मू काश्मीर राज्य वगळून) सर्व राज्यांना हा कायदा १५-६-२००५ पासून लागू झाला. या कायदामध्ये सरकारी कामकजातील माहिती मिळविण्याचा अधिकार प्रत्येक नागरिकाला बहाल करण्यात आला. जम्मू आणि काश्मीर राज्याने २००९ मध्ये विधान सभेत मान्यता देवून माहितीच्या अधिकाराला स्विकारले गेले. यामूळे संपूर्ण भारत देशामध्ये १९२३ चा गोपिनीय कायदा रद्दबदल ठरवून नविन कायदा पास केला. या पूर्वी तामिळनाडू १९९७, राजस्थान १९९७, दिल्ली २००१, महाराष्ट्र २००२, कर्नाटक २००२, मध्यप्रदेश २००३, जम्मू-काश्मीर २००४ या पैकी महाराष्ट्र आणि दिल्ली राज्यात या कायदयाचा सर्वात अधिक उपयोग केला. यामधून केंद्रीय गुप्तचर विभाग सुरक्षा एजन्सी आयकर विभाग रॉ.ऍन्टीकरपक्षण, बुॅरो, सि.वि. आय विमान सेवा या सारख्या काही घटकाला माहितीच्या अधिकारापासून बाजूला ठेवून जनहिताच्या आणि मानवी अधिकाराचे उल्लघण होणाऱ्या प्रत्येक संस्थेला समाविष्ट केले आहे. यामुळे भ्रष्टाचार आणि अफशतारी करणाऱ्या व्यक्तीला भिती निर्माण केलेली आहे. भारतीय दंड सहीता २६नुसार भारत सरकार आदेश देवून राज्य सरकारला जनतेच्या हितासाठी या कायदयाची अमलबजावणी करुन प्रसार आणि प्रचार करणे बंधनकारक आहे. यामूळे कोणत्याही कार्यलयामधील जनहिताच्या विविध योजना जाणून घेण्याचा अधिकार मिळालेला आहे. यामूळे कोणत्याही प्राधिकारणाकडे आलेल्या लेखी तक्रारीवर दोन महिन्याच्या आत माहिती पूरविण्याची जबाबदारी प्राधीकरण प्रमुखाची असेल. जर कार्यवाही योग्य रितिने झाली तर संबंधीत अधिकाऱ्यावर दंडात्मक कारवाई करण्याची तरतूद संबंधीत व्यक्तीने कोऱ्या कागदावर आपल्या माहिती हवी असणाऱ्या कार्यलयाच्या प्रमुखाकडे लेखी स्वरुपात तक्रार अर्ज करावा. विहित केलेले शुल्क भरुन संपूर्ण नाव, पत्ता लिहिने बंधनकारक आहे. याची सविस्तर माहिती केंद्रशासनाच्या सुचना आणि माहिती मंत्रालयाकडे आहे. तसेच केंद्रीय सुचना आयोग यांच्याकडे अंतिम अपिल करण्याचा अधिकार आहे. RTI संबंधी केंद्रीय माहिती आयोगाची वेबसाईड, CIC ऑनलाइन यावर तक्रार नोंदवता येते. असा हा आधुनिक अधिकार जनसामान्यांना मिळालेला आहे.

**आपली प्रगती तपासा.**

राज्य घटनेच्या कोणत्या कायदयानुसार नागरिकांना माहिती मिळविण्याचा अधिकार आहे.

### १९.७.३ पंचायतराज (Panchayts Raj)

समाजातील प्रत्येक गटाला सत्तेमध्ये सहभागी करुन घेण्यासाठी सत्तेचा विकेंद्रीकरणाचा संकल्पना स्वीकारूण भारतीय संविधनाच्या ७३व्या घटना दूरूस्तीनुसार घटनेच्या भाग - ९ (२४३) याप्रमाणे पंचायतराज्याची परिभाषा केलेली आहे. जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद तालूका स्तरावर पंचायत समिती आणि ग्राम स्थरावर ग्रामपंचायत असे त्रिस्थरीय सत्तेचे विभाजन बलवंत राव मेहता समितीने सुचविले त्यानंतर १९६० मध्ये वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षेखाली समिती स्थापन होवून १९५८ चा ग्रामपंचायत व्यवस्थापन कायदा पास केला गेला. १९९२ मध्ये विविध सुधारणा करुन पंचायतराज कायदा पास केला. २२-४-१९९३ पासून तो आमलात आणला. यामध्ये लोकशाही पध्दतीने लोकसंख्येच्या प्रमाणात सभासदांची निवड केली जाते. सभासद संख्येमध्ये अनुसुचित जाती-जमाती इतर मागास वर्गीय आणि स्त्रियांसाठी काही जागा राखीव असतात.सरपंच, पंचायत समितीचे सभापती, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष ही पदे फिरत्या पध्दतीने मागास वर्गीयासाठी राखीव ठेवले जातात. पंचायत राजचा उद्देश स्थानिक स्थरावरचा कारभार स्थानिक लोकानीच पाहणे. मागास गटाला नेतृत्वाची संधी देणे यासाठी पंचायतराज व्यवस्था कायदेशिर ठरलेली आहे. सत्ता, अधिकार आणि पदामूळे मागास गटाच्या सामाजिक दर्जात सुधारणा होतानां दिसते.

**आपली प्रगती तपासा :**

पंचायत राज व्यवस्था कोणत्या तीन स्थरावर आधारलेली आहे.

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

## १९.८ सारांश (Summary)

भारतीय समाजामध्ये सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक आणि राजकिय दृष्टिकोणातून उपेक्षीत घटकांची अवहेलनां झालेली आहे. वर्षोनुवर्षे हा समाज दारिद्रयाचे जीवन जगतांना दिसतो. अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांसाठी भटकती करावी लागते. यामूळे शिक्षण, आरोग्य, मानसन्मान या बाबी दूरच राहतात. उपेक्षीत वर्गाना राष्ट्रीय विकासाच्या प्रवाहात घेवून येण्यासाठी रोजगार, निवारा, अन्न, धान्य औषधउपचार आणि शिक्षण या सारख्या मुलभूत सुविधांचा पुरवठा करुन भारतीय उपेक्षीत समाजाला न्याय देण्याचे वेळ आहे. शासनाच्या विविध योजनेतून गरिबी दूर करण्याची आश्वासने देण्यात आली. परंतू हा दूबळा समाज आजही आर्थिक पारतंत्र्यात असल्याचा दिसतो. संपत्तीची साधने आणि नवीन शिक्षण यांच्या अभावामूळे हा वर्ग वंचीत राहिलेला आहे. आदिवाशी ग्रामीण आणि झोपडपट्टीसारख्या उपेक्षीत क्षेत्रामध्ये कार्य करण्यास शासकिय अधिकारी किंवा स्वयंसेवक तयार होत नाही. शासनाकडून अनेक योजना कागदावर तयार होतात परंतू अमलबजावणी करताना दोष निर्माण होवून त्याचा लाभ योग्य रितीने जनसामान्याना मिळत नाही. म्हणून शासनाशिवाय सेवाभावी कार्यकरू इच्छीणाचा समाज घटकाने पुढे येवून उपेक्षीत समाजाला मदतीचा हात देण्याची गरज आहे. या कामासाठी उपेक्षीत घटकाचाही स्व योग्य प्रतिसाद मिळणे महत्वाचे असते.

## १९.९ प्रश्न (Questions)

१ डॉ.अमर्त्या सेन यांची सामाजिक उपेक्षा / बहिष्कारन संकल्पना सविस्तर अभ्यासा.

२ डॉ. प्रकाश लुईस यांच्या सामाजिक उपेक्षा सिध्दांताचे संरचनात्मक अभ्यासाची चर्चा करा.

३ सामाजिक बहिष्कारान क्षेत्रांचे वर्णन करा.

४ सामाजिक उपेक्षा घटकांना / वर्गांन बद्दल माहिती दया.

५ सामाजिक बहिष्कारन विकासासाठी कोणत्या सकारात्मक प्रक्रीयांची गरज आहे.

६ टिप्पा लिहा.

अ) नरेगा ब) माहितीचा अधिकार क) पंचायत राज

## १९.१० संदर्भग्रंथ सूची (Reference List)

1) Development as freedom : Dr. Amartya Sen

2) Social Exclusion Concept Application and Scrutiny - Social Development Paper - Dr. Amartysen

3) Towards Inclusion and equity : Prakash Louis

4) India Human Development Report 2011 Towards Social Inclusion

5) Indentity and Exclusion in India's cities - The Economic and Political Weekly February 16, 2008.

६) भारतीय समाज संरचना आणि समस्या - डॉ. प्रदीप आगलावे -श्री साइनाथ प्रकाशन नागपूर

७) समाजशास्त्र - डॉ. शैलेजा माने - निराली प्रकाशन - पूणे

८) मानवी साधन संपत्तीचा विकास - स्मिता जोशी आणि विद्या म्हस्के - प्रगती बुक्स प्रा.लि.पुणे

९) विकासाचे अर्थशास्त्र आणि कृषी प्रा. - अपेक्षा जाधव निराली प्रकाशन पुणे

१०) समाजशास्त्र विश्वकोश - हरिकृष्ण रावत ; रावत पब्लिकेशनस, जयपुर

❖❖❖❖